१८७५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय — 
सं. नं. 
RLI BK-0006722

म. ग्र. सं.

# पॅरिसच्या परी

६७२२

प्रा. र. धों. कर्वे, एम्. ए.
संपादकः— समाजस्वास्थ्य, मुंबई

REFBK-0006722

— धारिती प्रकाशन, मुंबई —

किंमत तीन रुपये

: प्रकाशक :

श्री. वा. वि. भट, अभिनव प्रकाशन, मुंबई यांनीं
घरिलीं प्रकाशनासाठीं प्रसिद्ध केलें.

: मुद्रक :

श्री. रमाकांत वेलदे, श्री. ज. स. वाघ,
सुदर्शन मुद्रणालय, नासिक.

: मुखपृष्ठ :

चित्रकार श्री. दीनानाथ दलाल.
सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन.
१९४६

# प्रस्तावना

विद्वत्तेमुळें आणि कलाभिज्ञतेमुळे विद्वानांच्या स्नेहाला आणि प्रेमाला पात्र झालेल्या, 'हेटायरा' या नांवाने इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या, ज्या स्त्रिया प्राचीन ग्रीक समाजांत होऊन गेल्या, त्यांच्या मनसोक्त आचरणामुळें जरी त्यांना सामान्यतः गणिकांच्या सदरांत घालतात, तरी त्यांचा दर्जा सामान्य वेश्यांपेक्षा पुष्कळ वरचा होता. त्यांना शरीर विक्रयावर पोट भरण्याची गरज नसे आणि त्यांचा मुख्य धंदा खासगी किंवा सार्वजनिक रीतीने जनमनरंजन करण्याचा होता. अशाच प्रकारच्या कांही स्त्रिया सतराव्या शतकांत फ्रान्समधेंहि होऊन गेल्या. त्यांना धंदा असा कोणताच नसे, तरी देखील त्यांना वेश्या समजणें शक्य नव्हते. त्यांना प्रतिष्ठित समाजांतच नव्हे तर राजदरबारांतही मान असे, त्या स्वतः पुष्कळ वेळां उच्च घराण्यांतल्या असत आणि प्रचलित नीतीच्या दृष्टीने त्या कितीहि बहकलेल्या असल्या, तरी त्यांचें समाजांतील मानाचें स्थान ढळलें नाही. अशाच प्रकारच्या एका स्त्रीचे जीवनवृत्त या पुस्तकांत सांगितलें आहे. पतीला देव मानणाऱ्या आर्यमहिलांना अशा स्त्रियांची मनःप्रवृत्ति समजणार नाही, किंवा ती तिरस्कारार्ह आहे असें त्या म्हणतील. परंतु पुरुषांना जरी स्वतःच्या बायकांनी असे वागलेले खपणार नाही, तरी त्यांना सामान्यतः अशा स्त्रियांविषयी आकर्षण वाटतें असा सार्वत्रिक अनुभव आहे. अशा स्त्रियांचें स्थान हिंदुस्थानांतील धंदेवाईक गायिकांना पटकावतां आलें असतें, परंतु प्रतिष्ठित समाजाच्या नीतिबाजीला बळी पडून अशा स्त्रियाचा हळू हळू नायनाट होत आहे. तेव्हां अशा स्त्रियांची मनोवृत्ति तरी कशा प्रकारची असते, हें या चरित्रावरून समजण्यासारखें आहे. अशा बाबतींत फ्रेंच लेखक बिलकुल सोंवळेपणा बाळगीत नसल्यामुळें व या पुस्तकांत फ्रेंच लेखकांचाच अनुवाद असल्यामुळें हा प्रकार मराठी वाचकांना नवीन वाटेल अशी आशा आहे. याचें वाचकांनी स्वागत केल्यास अशींच आणखीहि चरित्रें त्यांना सादर करण्याचा विचार आहे.

—र. धों. कर्वे.

# : धरित्री प्रकाशन :

## दोन आगामी संग्रह

**आजकालची कथा :**

यशवंत रत्नाकराच्या काळापासून मराठींत लघुकथांचें एक नवीन युग सुरू झालें. तेव्हांपासून आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ठ कथांचा प्रातिनिधीक संग्रह.

**आजकालची कविता :**

इंग्रजीमधील ‘ सुवर्णकोशा ’ च्या धर्तीवर अधिकारी व्यक्तीं-कडून संपादित होणारें सर्वोत्कृष्ट आधुनिक मराठी काव्यांचें पहिलेंच प्रातिनिधिक संकलन.

# पॅरिसच्या परी

# १

---

निना द लांक्लो

( १६२०–१७०५ )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६०२२
मुख्य शाखा (स्वयं ग्र.)

# १

**निनॉचें** चरित्र समजण्याकरतां तिची थोडीशी पूर्वपीठिका पाहणें जरूर आहे. तिचा बाप **आंरी लॉक्लां** हा एका गरीब सरदार घराण्यांत १५९२ किंवा ९३ सालीं जन्मला असा इतिहास सांपडतो. त्याला लहानपणींच संगीताचा व वाचनाचा नाद लागला आणि संगीताच्या नादामुळें कांहीं हलकट लोकांशींहि त्याची दोस्ती झाली. तथापि तो लवकरच सांवरला आणि त्यानें या लोकांची संगत सोडली. परंतु त्याने जरी आपलें वाचन चालू ठेवलें आणि प्राचीन तत्ववेत्त्यांचीहि ओळख करुन घेतली, तरी तो एकंदरींत ऐहिक सुखाच्याच मागें असे आणि त्याला दुसऱ्या कशाची फारशी परवा नसे. अशा स्थितींत **ड्युक देलबफ** नांवाच्या एका सरदारानें स्वतःच्या करमणुकीकरतां त्याला आपल्या पदरीं ठेवून घेतला.

त्याला आतां नवीन हुद्दा मिळाल्यामुळें त्यानें पूर्वीच्या हलकट मित्रांचा सहवास अजीबात वर्ज्य केला, इतकेंच नव्हे तर संगीतांतही कांही कमीपणा आहे अशा कल्पनेनें तेंहीं आपल्याला आतां आवडत नाहीं असें तो म्हणूं लागला. पण हें केवळ ढोंग होतें, कारण एकदां तो आपल्या संगीतशिक्षकाकडे गेला असतां तेथें बरींच तंतुवाद्यें पडलेलीं पाहून त्याला राहवेना, आणि तो त्यांतलें एक घेऊन वाजवूं लागला. हें पाहून त्याच्या गुरूलाहि हुक्की आली

आणि ते दोघेही त्यांत इतके तल्लीन झाले कीं त्यांना अन्नपाण्याचीहि आठवण न होतां ते एकसारखें छत्तीस तास वाजवीत बसलें! असें कांहीं झालें म्हणजे त्याला गाण्यांत कांही अर्थ आहे असें वाटूं लागे. एरवीं आपल्या पोशिंद्याकडचें आयुष्य त्याला अगदीच नीरस वाटे. कारण श्रीमंतांनीं कितीहि चैन केली तरी नोकरांच्या वांट्याला काय येणार?

वयाच्या चोविसाव्या वर्षी त्याने **मारी बार्ब** नांवाच्या एका उच्च घराण्यांतील मुलीशीं लग्न केलें. ती अतिशय धार्मिक असल्यामुळें नवऱ्याला मारूनमुटकून सद्‌गुणी बनवण्याची तिची आकांक्षा होती. यामुळें त्यांचे वारंवार खटके उडूं लागले. तथापि सुदैवाने एका वर्षातच त्यांना एक मुलगा, आणि पुढें दोन वर्षांनीं आणखी एक मुलगा झाला. यामुळें आईचे लक्ष मुलांकडे वेधून नवऱ्याला थोडे स्वातंत्र्य मिळालें.

या स्वातंत्र्याचा त्यानें दुरुपयोग केला असावा असें दिसतें, कारण लवकरच त्याला पहिली नोकरी सोडावी लागली. पण संगीताचा शोक असलेल्या **देपिने** नांवाच्या दुसऱ्या एका सरदारानें त्याला आपल्या हाताखालच्या सैन्यांत अधिकाराची जागा दिली. या सरदाराकडे धर्माचें वारेहि नव्हतें, आणि मदिरेचें आणि मदिराक्षींचें बरेंच प्रस्थ होतें. परंतु तेथे जमणारे स्नेही जरी चैनी असले तरी बुद्धिमान होते, आणि ओरीच्या पाखंडी मतांचें तेथें कौतुक झालें. त्या सरदाराचा मुलगा **लुई** हा एक पाखंडी कवि होता, आणि ओरीचें आणि त्याचें चांगलेंच सूत जमलें.

या सगळ्या गडबडींत त्यानें बायकोकडे फारसें लक्ष दिलें नव्हतें, परंतु दुसऱ्या मुलानंतर एका वर्षानें त्याला एक मुलगी झाली, आणि तिच्याकडे त्याचें लक्ष वेधलें. तीच या चरित्राची नायिका. प्रथमपासूनच तिने आपल्या सौंदर्याने सर्वांना दिपवून टाकलें. तिकडील चालीप्रमाणें मुलांना बॉप्तिस्मा देवून नांव ठेवतेवेळीं त्यांच्या धार्मिक शिक्षणाची जबाबदारी घेण्याकरतां धर्मपिता व धर्ममाता म्हणून दोन माणसें उभीं राहतात, व याकरतां त्यानें बड्या लोकांकडे वशिला लावला, परंतु या दोन्ही माणसांना पुढें पश्चाताप झाला. कारण ही मुलगी बापाप्रमाणेंच पाखंडी झाली. पाखंडी बापानें

धर्मशिक्षणाची फिकीर कां केली असें कोणाला वाटेल, पण एक तर आई धार्मिक होती, आणि या दोन माणसांचा पुढें आयुष्यांत उपयोग होण्याचा संभव असतो, कारण तें एक नातेंच उत्पन्न होतें. या मुलीचें नांव प्रथम **ॲन** ठेवलें होतें, परंतु इतक्या सुंदर मुलीला हें नांव शोभत नाहीं असें सर्वांनाच वाटून तिला ॲनीन, नानी, नानीन, अशा कांहींतरी नांवाने लोक हांक मारूं लागले, आणि शेवटीं निनाँ हें नांव कोणीतरी सुचवलें आणि कर्णमाधुर्यामुळें तेंच अखेर कायम झालें. तिच्या आईला मात्र हें नांव आवडले नाहीं, आणि इतकें लोक आपल्या मुलींचे कौतुक करतात हेंहीं तिला पाहवत नसे. मुलांचे शिक्षण तर आपल्या हातीं नाहींच, पण मुलीला तरी आपण आपल्यासारखी धार्मिक बनवूं अशी तिला बरेच दिवस आशा होती.

परंतु बापानें तिचें या बाबतींत कांहीं चालूं दिलें नाहीं. ही मुलगी सर्व बाबतींत आपल्या वळणावर जाणार हें त्यानें ओळखलें. पण यामुळें मुलीची मात्र त्रेधा होत असे. एकीकडे आईच्या सांगण्यावरून तिला धार्मिक प्रवचनें ऐकावीं लागत, आणि दुसरीकडे बापाकडून पाखंडी मतेंहीं ऐकावी लागत. पण तिचा स्वतःचा कल बापाच्या मतांकडेच वळला, आणि आईच्या सांगण्यावरून जरी ती चर्चमधें गेली, तरी तिला धार्मिक लोकांना पाहून हंसूंच येत असें. तिला स्पष्ट दिसत असे कीं, बहुतेक लोक केवळ परंपरेमुळेंच देवळांत जातात. इतकेंच नव्हें तर पुष्कळ लोक या परंपरेचा फायदा घेऊन देवळांत एकमेकांना प्रेमपात्रिका देत असत, पुढील भेटीचे संकेत या ठिकाणीं होत असत, आणि डोळे उघडे ठेवणाराला हें सर्व दिसत असे. धार्मिक प्रवचनें चालूं असतांना लोक हलक्या आवाजांत गप्पा मारीत असत. आणि प्रेमकाव्यें लिहिलेल्या चिठ्ठया एकमेकांना देत असत. अशा स्थितींत प्रामाणिक मनुष्याचा धर्मावर विश्वास बसावा कसा? निनाँ प्रामाणिक होती आणि यामुळें तिला शेवटीं आईच्या आग्रहाचा जाच वाटूं लागला. पण ती सुस्वभावी असल्यामुळें तिने तें आईला दिसूं दिलें नाहीं. तथापि मनांतून ती आपल्या बापाचीच शिक्षणपद्धति पसंत करूं लागली. ती जात्याच हुषार असल्यामुळें तिनें थोड्याच वेळांत विद्वत्ता संपादन केली, आणि समाजाचा

शिष्टाचारहि शिकली. शास्त्रीय ज्ञानाबरोबरच ती स्पॅनिश व इटालिअन भाषा शिकली आणि कठीण प्रश्नांवर वादविवाद करण्याची ताकत तिच्या अंगांत आली. परंतु ती केवळ वेदाभ्यासजड व्हावी अशी बापाची इच्छा नव्हती, आणि तिच्या अप्रतिम सौंदर्यामुळें तसें होणें फारसें शक्यहि नव्हतें. थोड्याशा नखऱ्याचाहि समाजांत उपयोग असतो हें तिच्या मनांत चांगलें बिंबलें.

यानंतर बापानें तिला संगीताकडे वळवलें. आणि ती लवकरच तंतुवाद्यांत निष्णात झाली. युरोपांत लेखी संगीताचें बंड फार आहे, परंतु लिहिलेल्या सारेगमवरच अवलंबून न राहतां त्यांत स्वतःची कला कशी दाखवावी हेही ती शिकली. इतकें शिकून थोडा धीर चेपल्यावर ती गाऊंही लागली. आणि तिच्या आवाजांतील भावनाविष्करण पाहून श्रोते बेहद्द खुष होऊं लागले. यानंतर ती नाचायलाहि शिकली, आणि अशा तऱ्हेने विद्वत्तेबरोबर सर्व कलाहि तिला अवगत झाल्यामुळें तिच्यांत शारीरिक व मानसिक आकर्षणाची पराकाष्ठा झाली. बापाच्या मतानें ती आतां कोणत्याहि राजाची राणी होण्यास योग्य झाली होती. पण त्यालाहि ही कल्पना आली नाही कीं तिचें अशा तऱ्हेनें शिक्षण झाल्यावर राणी होण्याकरतां देखिल ती आपलें स्वातंत्र्य गमावायला तयार होणार नाहीं!

त्याला आतां तिच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला फारशी फुरसत न राहिल्यामुळें त्यानें आपलीं सर्व पुस्तकें तिला बक्षिस दिलीं. त्यांतलें एक महत्त्वाचें पुस्तक म्हणजे '**मॉंतेन्य** चे निबंध.' या निबंधांचा पुरा अर्थ कळण्याइतकें तिचें अजून वय झालें नव्हतें. परंतु पुढें वाचण्याकरतां त्यानें या पुस्तकाची अतिशय शिफारस केली. मनुष्यस्वभावांतील गुणदोषांचे त्यांत उत्तम आविष्करण केलेलें असून त्याचा अभ्यास करणारांत सत्याची आवड आणि मानवजातीच्या दोषांकडे सौम्य नजरेने पाहण्याची संवय उत्पन्न होते, आणि हे दोन बहुमोल असल्यामुळेंच त्याने या पुस्तकावर इतका भर दिला होता.

---

# २

ऑरीला आतां आपल्या मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला फुरसत नव्हती असें वर म्हटलें. याचें कारण त्यानें स्वतःवरच एक संकट ओढवून घेतलें होतें. पत्नीच्या सनातनीपणामुळें त्याचें तिच्याशीं पटत नसें हें वर पाहिलेंच आहे. त्याचा हुद्दा जरी लष्करी होता, तरी प्रत्यक्ष लढण्यांत त्यांचा फारच थोडा वेळ जात असें, आणि फुरसतीच्या वेळीं काय करावें याची त्यांच्यासारख्या अंमलदारांना कधींच पंचाईत पडत नसे. सर्व प्रकारची चैन करण्यांतच त्यांचा वेळ जात असें. आणि तो काळच असा होता कीं तरवारबहाद्दरांवर भाळणाऱ्या अनेक स्त्रिया मध्यमवर्गांतील कुटुंबांत सांपडत.

या बाबतींत त्यानें काय पराक्रम केले हें इतिहासांत नमूद नाहीं परंतु १६१० चे सुमारास **निकोलास द गूज** याच्या दोन मुलींशीं त्याची ओळख झाली होती. पैकीं **मारी** त्यावेळीं नऊदहा वर्षांची आणि **ल्यूक्रेस** आठ वर्षांची होती. त्या सुंदर आणि हंसतमुख असल्यामुळें त्याला फार आवडत असत आणि तो त्यांच्याशीं मोठ्या भावाप्रमाणें खेळत असें. १६१५ सालीं त्यानें लग्न केलें, तरी तो त्यांच्या घरीं जातच असें. **मारी**चें कांहीं दिवसांनीं लग्न झालें व **ल्यूक्रेस**च्याहि लग्नाची तयारी चालली होती, पण तिला त्याबद्दल मोठासा उत्साह नव्हता. ऑरी जरी तिच्यापेक्षां बराच मोठा

होता आणि त्याचें लग्नही झालें होतें, तरी त्याला बायकोची फारशी फिकीर नसल्यामुळें तो मोकळाच आहे, असें लोकांना वाटत असें, आणि तिचें त्याच्यावर प्रेम बसलें होतें. तथापि फ्रान्समध्ये मुलींचीं लग्नें त्यांच्या मर्जीप्रमाणें होत नसत, आईबाप सांगतील तें मुकाट्यानें ऐकावें लागत असें, आणि शिवाय **आंरी**शीं तिचें लग्न होणें शक्यही नव्हतें. त्यावेळीं आईबापांचा मुलींवर इतका ताबा असें कीं लग्नापूर्वी मुलगी कोठेही एकटी जाऊं शकत नसे, तिच्यावर नेहमी पहारा असें. यामुळें मुलींना लग्न म्हणजे स्वातंत्र्याचा मार्गच वाटत असें, कारण मग आईबापांची जबाबदारी संपली, आणि विवाहित स्त्रियांना एकटे हिंडण्याची मोकळीक असें. आंरीचें जरी इतर प्रेमसंबंध असलें तरी त्याचेंहि तिच्यावर प्रेम होतें आणि तें त्याला नकळत वाढत गेलें.

१६२७ सालीं **जां द् रीबरॉल** नांवाच्या एका वकिलानें तिला मागणी घातली. हा एका प्रांताच्या सुभेदाराचा चिटणीस होता, आणि अनेक बड्या लोकांशीं त्याचें सख्य होतें, यामुळें त्याच्या मागणीला तावडतोब रुकार पडून ती वकिलाची बायको झाली. **आंरीला** अर्थातच हें लग्न पसंत पडलें नाहीं, पण तो काय करणार? त्याला तिच्याशीं लग्न करणें शक्य नव्हतें, आणि ती तरी पंचवीस वर्षांपुढें किती दिवस अविवाहित राहणार? तथापि त्यानें तिच्या बापाकडे जाणेंयेणें सोडून दिलें. आणि तिचा नवरा भेटेल अशा ठिकाणीं न जाण्याची तो खबरदारी घेई.

असे कित्येक महिने गेले. **ल्यूक्रेसला** विवाहापासून बिलकुल सुख लागलें नाहीं. तिच्या नवऱ्याचा स्वभाव चमत्कारिक होता. कधीं कांहीं पसंत पडायचें नाहीं, नेहमी पैशाकडे दृष्टि, दानत बिलकुल नाहीं, दयामाया नाहीं. स्त्रीच्या सौंदर्याचा उपभोग घेण्यापेक्षां त्या सौंदर्याच्या जोरावर बढती मिळविण्याचा त्याचा नेहमी प्रयत्न असे. अशा स्थितींत तिला सुख होणें शक्य नव्हतें; इतकेंच नाहीं तर थोड्याच दिवसांत ती त्याचा तिरस्कार करूं लागली, आणि तिला आपल्या लहानपणच्या मित्राची आठवण झाली तर नवल काय? तो हल्ली तिच्याजवळ फिरकत नसे, यावरून त्याचेंही आपल्यावर प्रेम असलें पाहिजे असा तिनें अंदाज बांधला.

प्रेमानेंच तिला युक्ति शिकवली आणि नवऱ्याला शंका येऊं न देतां गोड गोड बोलून त्याच्या मनांत ओरीला बोलावण्याची इच्छा तिनें उत्पन्न केली. ओरी तिच्या नवऱ्याला लग्नापूर्वी तिच्या बापाकडे भेटलेला होता, आणि लग्न झाल्यावर तो तिला भेटला नाहीं, यावरून ओरीविषयीं त्याचें मत चांगलेंच झालें होतें. तेव्हां त्यानें स्वतः जाऊन त्याला घरीं बोलावलें. ही तिची युक्ति असावी असा आंरीनें तर्क केलाच आणि त्याला आनंदहि झाला. तरी देखील यानंतरसुद्धां तो तिच्याकडे फारच बेतानें जात असे.

तिचा नवरा इतके दिवस रजेवर होता. परंतु पुढच्या वर्षी त्याला कामावर रुजू व्हावें लागलें. तथापि बायकोला बरोबर नेल्यानें आपली गैरसोय होईल, तेव्हां तिनें पॅरिसलाच आपल्या बहिणीकडे रहावें असें त्यानें सुचवलें. बहिणीचा एक नवरा मरून तिचें दुसरे लग्न **सिमां ल तेलिअे** नांवाच्या लष्करी अंमलदाराशीं झालें होतें, आणि त्याला खुद्द राजाच्या देहरक्षक तुकडींतच काम होतें. नवरा आपल्याला बरोबर नेत नाहीं हें पाहून ल्यूक्रेसला अतिशय आनंद झाला, पण बाह्यात्कारीं तिनें दुःखाचें सोंग केलें. यामुळें नवरा तिच्यावर पूर्ण विश्वास टाकून, पण तिच्या खर्चाची बिलकुल व्यवस्था न करतां आपल्या नोकरीच्या गांवीं निघून गेला.

तेलिअे हा आंरीप्रमाणेंच लष्करी अंमलदार असल्यामुळें त्यांची चांगली ओळख होती आणि आंरीनें त्याच्या घरीं जावें यांत कोणाला आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. यामुळें ल्यूक्रेसचें चांगलेंच फावलें आणि आंरीचें सर्व लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याची तिची कारवाई चांगलीच यशस्वी झाली. तिच्यावरील कामुक प्रेम आणि मुलीवरील सात्विक प्रेम यांच्याइतकें आंरीच्या जीवनांत दुसऱ्या कशालाच महत्व राहिलें नाहीं.

ल्यूक्रेसच्या नवऱ्याविषयीं तिच्या बहिणीला किंवा मेहुण्यालाहि मोठीशी सहानुभूति नव्हती, तेव्हां त्यांनी दोघांनीहि या गोष्टीकडे कानाडोळा केला. तिला आपल्या बहिणीकडे पाहिजे तसें वागण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें तिनें आंरीला एकदां आपल्या खोलींत बोलावलें आणि त्यांच्या प्रेमाची पूर्तता झाली. तिची बहिण इतक्यांत बरीच आजारी पडली, यामुळें यांच्याकडे

लक्ष द्यायला कोणालाच फुरसत नव्हती. आंरी आपल्या कामावर किंवा आपल्या मुलीपाशीं नसला कीं तो तेलिअेकडे असायचा, असा नियमच ठरून गेला. संवयींमुळें तीं दोघें फारसें गुपितही ठेवीनाशीं झालीं, आणि शेवटीं हा शेजाऱ्यांचा चर्चेचा विषय होऊं लागला. तेव्हां याला कांहीं उपाय केला पाहिजे असें वाटून, अंधार पडण्याचे सुमारास आंरी त्या घरांतून बाहेर पडत असे आणि रात्रीं लोक निजले म्हणजे हळूच आवाज केल्याशिवाय परत येत असे.

कांहीं दिवसांनीं त्यांनीं एका नोकरिणिला आपल्या विश्वासांत घेतली. दिवसा ल्यूक्रेसला कोणी बायका भेटायला आल्या तर आंरी एखाद्या जिन्याखालीं लपून बसत असे आणि त्या गेल्यावर बाहेर येत असे. पण या नोकरिणीला आपली जीभ ताब्यांत ठेवतां आली नाहीं असें दिसतें, कारण एरवीं ल्यूक्रेस सकाळीं निजून उठून कपडे बदलीत असतांना आंरी तेथे हजर असें किंवा तो तिच्याशीं कशा प्रकारचें प्रेमाचें चाळे करीत असे, वगैरे इत्थंभूत हकीकत लोकांच्या कानावर कां जावी ? या गोष्टी या नोकरिणीशिवाय कोणाला दिसणें शक्य नव्हतें. तरीपण त्या दोघांचा तिच्यावर विश्वास होता आणि तेलिएकडे अशाप्रकारचे खेळ खेळण्यास त्यांना शेवटीं संकोच वाटूं लागल्यामुळें त्यांनीं त्याच ओळीला कांहीं अंतरावर या नोकरिणिच्याच घरीं आपला रंगमहाल थाटला. अर्थात् तिच्या घरीं सामान तें काय असणार ? तेव्हां ल्यूक्रेसनें तिच्या घरीं एक चांगला पलंग नेऊन ठेवला, आणि आपल्यामुळें तिला जो त्रास होईल त्याचा मोबदला म्हणून तीच त्या घराचें भाडे देऊं लागली. हा अर्थात् त्याचा मूर्खपणा होता. इतके दिवस त्यांचा केवळ स्नेह होता असें कोणाला म्हणतां आलें असतें, परंतु यापुढें तसें म्हणणें शक्य नव्हते. त्या रस्त्यांतल्या सगळ्या लोकांना त्यांचें नातें माहीत झालें, पण त्यांना त्याची परवा नव्हती. तीं आपल्या सुखांत दंग होतीं,

ही बातमी शेवटीं तिच्या नवऱ्याच्या कानावर गेली. त्याचे कदाचित् कांहीं गुप्त हेर असतील, किंवा कांहीं उपद्व्यापी मित्रांनीं बातमी पोंचवली असेल, तरीपण त्याने कांहीं आरडाओरडा केला नाहीं. याचे कारण कदाचित्

त्यानें तिच्या खर्चाची कांहींच व्यवस्था केली नव्हती हें त्याच्या मनांत डांचत असावें. पण त्यानें याची अगदींच दखल घेतली नाहीं असें नाहीं. आपल्याला सर्व कांहीं कळलें आहे असें दर्शवणारी उपरोधिक पत्रें तो तिला लिहूं लागला. पण तिनें कशाचीहि परवा केली नाहीं. ती दोघं आतां एकत्र राहूं लागलीं आणि तिची बहिण आतां बरी झाली होती तरी तिनेही कांहीं हरकत घेतली नाहीं, यामुळें तिच्या घरींहि त्यांची चैन चाले.

पण हें किती दिवस चालणार ? १६३० सालीं तिचा नवरा परत आला. तो तिच्या बहिणीकडे गेला, तिला पैसे न पाठवल्याबद्दल व उपरोधिक पत्रें लिहिल्याबद्दल त्यानें तिची क्षमा मागितली, आणि तिला आपल्याबरोबर घेऊन गेला. त्यावेळीं फ्रान्समध्यें द्वंद्वयुद्धाची पद्धत होती, आणि आंरीशीं आपलें भांडण झाल्यास त्याच्या तरवारीशींच गांठ पडेल, आणि मग आपली धडगत नाहीं हें तो जाणून होता, तेव्हां तो आंरीच्या वाटेस गेला नाही. त्यानें मुकाट्यानें आपला राग गिळला आणि घरीं गेल्यावर त्यानें बायकोला आपला पगार न मिळाल्याची हकीकत सांगितली. पैसे मुळींच नसल्यामुळें घरचें कांहीं चांदीचें सामान गहाण ठेवले, आणि बायकोचें कांहीं स्त्रीधन होतें तें तिनें आपल्याला द्यावें अशी मागणी केली. फ्रान्समध्यें हुंड्याची पद्धत असून शिवाय लग्नाचें वेळीं वधूवरांत एक लेखी करार होतो. त्याचा एक प्रकार म्हणजे सगळी मालमत्ता सामाईक समजतात, व दुसरा प्रकार म्हणजे हुंडा व दागदागिने व नंतर स्त्रीनें कांहीं मिळवल्यास तें सर्व स्त्रीधन म्हणून वेगळें राहतें आणि त्यावर नवऱ्याचा कांहीं हक्क पोंचत नाहीं. त्यांच्या विवाहाचा करार या दुसऱ्या पद्धतीचा होता, तेव्हां ती आपले स्त्रीधन त्याला द्यायला तयार नव्हती. अर्थात् त्याला पड खापी लागली.

पण त्याला पैशाची तर जरूर होती. त्यानें पाहिलें की आपली बायको व्यभिचारी आहे, मग याचा फायदा आपल्याला कां मिळूं नये ? त्याने तिला सांगितलें की आमच्या सुभेदारसाहेबांना तूं फार आवडतेस, आणि तूं माझ्या-बरोबर त्यांच्या गांवीं आलीस तर ते तूं काय मागशील तें देतील, आणि शिवाय माझा सहा वर्षांचा पगार थकलेला आहे तोही मिळेल. पण ती

याला कबूल नव्हती. ती व्यभिचार करीत होती तो केवळ आंरीवर प्रेम असल्यामुळें, पण नवऱ्यानें निर्लज्जपणानें पुढें ठेवलेला पैशाचा सवदा तिला बिलकुल पसंत नव्हता आणि तिनें रागावून अकांडतांडव केलें. तो त्यावेळीं कांहीं बोलला नाहीं, पण तो एकसारखा आपल्या ओळखीच्या श्रीमंत लोकांना घरीं बोलावी आणि त्यांतला कोणीतरी तिला पसंत पडून तिनें अशा रीतीनें आपल्या उपयोगीं पडावें याकरतां त्याचे सारखे प्रयत्न चालू होते, आणि यामुळें ती त्याचा अधिकाधिक तिरस्कार करूं लागली. एके दिवशीं तर त्यानें एका वकिलाला आपल्या निजण्याच्या खोलींत बोलावून आणला. तेव्हां ती घाबरून तबेल्यांत जाऊन बसली. त्यानें तेथें जाऊन तिच्या पायां पडून तिला खोलींत चलण्याची विनंति केली, तरी ती ऐकेना असें पाहून त्यानें तिला तेथून ओढून फरपटत आपल्या खोलींत नेली आणि बिछान्यावर निजायला सांगितलें. शेवटीं तिनें आपण रजस्वला असल्याची सबब सांगितली तेव्हां तो वकील हिरमुसलें तोंड करून घरीं निघून गेला. नंतर या दोघांचें रात्रभर भांडण चालू होतें. एकदां त्यानें तिचा गळा दाबला, नंतर तो तिला मारण्याकरतां तरवार शोधीत होता, परंतु ती सुदैवानें सांपडली नाहीं.

तेव्हांपासून तिला जिवाची भीति वाटूं लागली. शेवटीं तिनें त्याला सोडून आईबापांकडे जाऊन रहाण्याची भीति घातली, आणि तरी जेव्हां त्यानें एकलें नाहीं, तेव्हां ती खरोखरच तेलिएच्याच इमारतींत राहणाऱ्या मार्शा नांवाच्या एका मैत्रिणीकडे निघून गेली. तेथें तिनें आपल्या नात्याच्या माणसांना आणि मैत्रिणींना बोलावलें आणि आतां काय करावें म्हणून त्यांचा सल्ला विचारला, आणि शेवटीं नवऱ्याविरुद्ध कायदेशीर तक्रार करून आपल्याला त्याच्यापासून फारकत मिळावी अशी मागणी केली.

इकडे आंरी तिला विसरला नव्हता. तिच्यावर त्यानें देखरेख ठेवली होती, आणि ती नवऱ्याकडून निघून गेल्याचें कळतांच तो तिला भेटायला आला, आणि तीं पूर्ववत् उघडपणें राहूं लागलीं. मार्शा अविवाहित होती. तिच्याकडे, किंवा पूर्वीची नोकरीण अजूनहि तिला अनुकूल होती तिच्याकडे तीं भेटत असत. मात्र कांहीं दगा होईल या भीतीनें आंरी रात्रीं एक मेणबत्ती

जळत ठेवीत असे आणि हातार्शी एक पिस्तूल बाळगीत असे. असा दगा होण्याची भीति वास्तविक फारशी नव्हतींच. तिच्या नवऱ्याच्या अंगांत आंरीशीं लढण्याइतकें धैर्य बिलकुल नव्हतें. मात्र तिला त्रास देण्याकरतां म्हणून तीं दोघें एकत्र असतील अशा वेळीं तो तिला बोलवायाला नोकर पाठवीत असे. प्रथम ती थोडी भीत असे आणि एकदां नोकरिणीच्या घरीं ती तृप्त होऊन स्वस्थ झोपली असतां नवऱ्याचा नोकर आला, तेव्हां ती झटकन् उठून मागच्या बाजूनें आपल्या बहिणीकडे जाऊन निजली, आणि नंतर नोकर बहिणीकडे गेला तेव्हां त्याला ती तेथें सांपडली. पण नंतर एकदां आंरीसह मार्शीकडे निजली असतां नोकर बोलवायला आला, तेव्हां तिनें आंरीला झांकण्याकरतां पडदा ओढला, आणि नोकराला तिनें अंथरुणांतूनच सांगितलें, 'मी आजारी आहे, मला विश्रांति पाहिजे आहे. बरें वाटलें म्हणजे येईन.' आणि ती खरोखरच एखादेवेळीं नवऱ्याकडे जाऊन त्याच्याकडून थोडें पैसेहि काढून घेऊन येत असे.

तिच्या नोकरिणीला सांगून ठेवलेलें असें कीं तीं रात्रीं निजलेलीं असतांना नवराच प्रत्यक्ष आला, तर तिने झोपेचें ढोंग करून दार लवकर उघडूं नये, म्हणजे आंरीला पळून जायला वेळ सांपडेल. पण स्वतः येण्याइतकें धैर्य नवऱ्याच्या अंगांत नव्हतें, कारण आंरीने त्याला एकदां एक विश्वासु माणसाबरोबर निरोप पाठवला होता कीं तूं फार गडबड केलीस तर तुला ठार मारीन. याने तो इतका घाबरला कीं कांहीं दिवस त्याने त्या दोघांना मुळींच त्रास दिला नाहीं, आणि त्यांनीं निर्धास्तपणें एका मैत्रिणीच्या गाडींतून उघडपणें एका खेड्यांत जाऊन आठ दिवस निवांतपणें एकत्र काढले.

नंतर आंरीच्या सल्ल्यानें ती त्याच्या एका बड्या मैत्रिणीकडे जावून राहिली. तेथे तिला त्रास देण्याची नवऱ्याची छाती नव्हती, पण याबद्दल त्यानें अनेकांजवळ तक्रार केल्यामुळें तिला तें घर सोडावें लागलें. तरी ती आणखी एका बड्या मैत्रिणीकडे जाऊन राहिली. तिचा नवरा आतां नीतीच्या गोष्टी बोलूं लागला, आणि एकदां एका बालपणच्या मित्राबरोबर ती रस्त्यांतून जात असतां त्याने तिला ठार मारण्याची धमकी देऊन तरवार

उगारली, तेव्हां लोकांना मध्यें पडून तिला सोडवावें लागलें. आतां त्याला काय करूं आणि काय नाहीं असे झालें होतें. आंरीशीं भांडण करण्याची तर छाती नव्हती. तेव्हां त्याने कायद्याची मदत घेण्याचें ठरवलें आणि त्या दोघांवर व्यभिचाराबद्दल फिर्याद केली. लोक आपल्याला हंसले तरी हरकत नाहीं पण सूड घेतला पाहिजे, असें ठरवून त्याने तिच्या नोकरिणीला आपल्या पदरीं ठेवली, आणि आसपासच्या लोकांकडूनहि बातम्या काढल्या.

१६३१ च्या प्रारंभी हा खटला सुरूं झाला. आतां केवळ लपंडाव खेळून भागण्यासारखें नव्हते. नवरा स्वतः कायद्यांतल्या खांचाखोंचा जाणणारा वकील होता, आणि कायदेशीर कैफियत देणें कठिण होते. तथापि दोन्ही बाजूंचे एकमेकांवर आरोप, पुरावे, जबान्या, तहकुबी, वगैरे एक वर्षभर चालल्यावर देखील खटला लवकर निकालांत निघेल असा रंग दिसेना. शेवटीं हा खटला वरिष्ठ कोर्टाकडे जावा असा नवऱ्याने अर्ज केला. आणि त्याप्रमाणें तो गेला. नवऱ्याने आपलें काम कसोशीनें केलें होते. त्यांना ज्यांनी ज्यांनी मदत केली होती त्या सर्वांच्या साक्षी झाल्या. आणि त्यांना घाणेरड्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावी लागली. पण दुसरी बाजूही कांहीं कमी नव्हती. दोन्ही आरोपींनीं व्यभिचार साफ नाकबूल केला. साक्षीदारांनीं सांगितलें कीं या दोघांचा स्नेह होता, पण त्यांत वावगें काय आहे? फिर्याद करण्यांत फिर्यादीचा दुष्टपणा मात्र दिसतो, शिवाय त्याची स्वतःची वागणूकही चांगली नाहीं, वगैरे अनेक फांटे फोडले. नवऱ्याने चिडून अनेक प्रकारचे खोटे आरोप देखील केलें. ईस्टरच्या पूर्वीचा जो 'लेंट' नांवाचा चाळीस दिवसांचा उपास असतो, त्या दिवसांत यांनीं मांस खाल्लें असाहि एक आरोप होता. (हा उपास म्हणजे फक्त मांस खाण्यास परवानगी नसते इतकेंच. र. धों. क.) हे आरोप सिद्ध करण्याकरतां त्याने खोटे साक्षीदारहि उभे केले. आंरी या सर्व प्रकारामुळें अतिशय चिडला होता, तरीपण धीर न सोडतां दोन वर्षे पर्यंत त्याने ल्यूक्रेसबरोबर खटल्याला तोंड दिलें.

पण यापुढें मात्र आपल्या विरुद्ध कांहीं कट होत आहे अशी त्याला शंका आली, आणि त्याला कारणही होतें. नवऱ्याच्या गांवचे लोक त्याला

सामील झाले आणि त्यापैकीं लुई द शॅबां नांवाच्या एका बड्या माणसाचें राजाजवळ देखील वजन होतें. त्याला न्यायाधीशांवरही वजन घालतां आलें असतें, परंतु तसें न करतां त्यानें खोटे साक्षीदार पुरवले आणि आंरीवर मारेकरी घालण्याचाही बेत केला. आंरीला त्याचा सुगावा लागला होता. पण तरवार चालवण्यांत तो निष्णात होता आणि त्याला भीति कशी ती माहीतच नव्हती. यामुळें एके दिवशीं संध्याकाळीं रस्त्यांत ल्यूक्रेसचा नवरा आणि त्याच्याबरोबर चारपांच सशस्त्र लोक त्याला मारण्याकरतां टपून बसलेले त्याला दिसले, तेव्हां घावरून पळून न जातां तो त्यांचीच चेष्टा करीत एकटा त्यांच्या अंगावर चालून गेला. तेव्हां कोणी पाहील या भीतीनें तेच त्याला शिव्या देत पळून गेले. पण आतां स्वस्थ बसून उपयोगी नाहीं हें तो उमजला, आणि खोट्या साक्षीदारांना घाबरवण्याकरतां त्यानें त्यांपैकीं कित्येकांना चोप दिला आणि धाक घातला. त्यांत एक ॲन मोजँ नांवाची बाई होती. ती आपल्या नोकराबरोबर जात असतां हा घोड्यावरून खाली उतरला आणि तिला लाथा आणि ठोसे लगावून काठीनेंही मारलें, आणि खोटी साक्ष दिल्या-बद्दल तिला ठार मारण्याची धमकी दिली. ती ओरडत एका दुकानांत शिरली, त्यानें तिला तेथून हुसकून काढली आणि तिला उचलून लांब नेऊन सांगितलें कीं तूं यापुढें गप्प बसलीस आणि इतर खोट्या साक्षीदारांचे पत्ते मला दिलेस तर मी तुला त्रास देणार नाहीं. ती ऐकेना, तेव्हां त्यानें तिला रात्र पडेपर्यंत अनेक ठिकाणीं जबरदस्तीनें नेली आणि खोटी साक्ष दिल्याची कबुली तिच्या-कडून घेण्याची शिकस्त केली, पण ती बधली नाहीं. नंतर कांहीं दिवसांनी त्यानें तिच्या घरीं जाऊन तिला बाहेर काढली आणि तिला पुनः एकदां चोप दिला आणि तो मोहल्ला सोडून जायला लावलें.

पण याने त्याचा कोणताही फायदा झाला नाहीं. या बाईने चिडून त्याच्यावर फिर्याद केली. तिच्या अंगावर मारल्याच्या खुणा होत्याच, यामुळें मॅजिस्ट्रेटने त्याला तुरुंगांत टाकला. परंतु तेथून तो लवकरच सुटला. यानंतर दोन महिने काय झालें हें इतिहासांत नमूद नाहीं, पण तो रीबरॉल ( ल्यूक्रेसचा नवरा ) ऐवजीं शॅबांवरच जास्त चिडला होता असें दिसतें. त्यानें एक भक्कम

तरवार हातांत घेऊन त्याचा शोध केला, व तो सांपडत नाहीं असें पाहून बातमी काढून एका घराशेजारीं त्याची वाट पहात बसला. कांहीं वेळानें शॅवां तेथें गाडींतून आला आणि त्या घरांत शिरला. तेव्हां ओरी त्या गाडीमागें लपून बसला आणि शॅबां पुनः बाहेर येऊन गाडींत बसूं लागतो तों त्यानें पुढें होऊन त्याला दोनदां तरवारीनें भोंसकला. शॅबां मरून पडला आणि ओरी तेथून चालता झाला. त्यानें सर्व तयारी पूर्वींच करून ठेवली असली पाहिजे, कारण शॅबांच्या बायकोनें राजाकडे तक्रार करून राजानें त्याचा पाठलाग करण्याचा हुकूम सोडीपर्यंत ओरी देश सोडून फरारी झाला होता, आणि यानंतर त्याचें नांवहि कोणाला ऐकूं आलें नाहीं.

अशा रीतीने या प्रेमामुळें त्याच्या आयुष्याचा नाश झाला. ओरी शूर होता, आणि त्याने हा प्रकार करण्यांऐवजी शॅबांशीं उघडपणें द्वंद्वयुद्ध करून त्याला मारला असता तर त्याला कोणीं नांवें ठेवलीं नसतीं. द्वंद्वयुद्धाविरुद्धहि कायदा होताच; परंतु त्या कायद्याला लोकमताचा पाठिंबा नव्हता. त्यामुळें अशा युद्धांत जरी शॅबां मेला असता तरी ओरीच्या मित्रांनी त्याला पाठिंबा दिला असता आणि सर्व प्रकारें मदत केली असती. परंतु त्याऐवजी अशा रीतीनें त्याचा खून केल्यामुळें मित्रांच्या देखील सहानुभूतीला तो मुकला आणि त्याला देशत्याग करावा लागला. ल्यूक्रेसच्या नवऱ्याने तिला पुढें शक्य तितका त्रास दिला, परंतु त्याचा मुख्य शत्रुच नाहींसा झाल्यामुळें त्याला यापासून फारसें समाधान लाभलें नाहीं.

---

# ३

पिन्हो, एपिक्यूरस इत्यादि ग्रीक तत्ववेत्त्यांचा अनुयायी म्हणवणारा आंरी लांक्लो हा शेवटीं अशा रीतीनें क्रोधवश होऊन मनःशांतीपासून ढळल्यामुळें त्याचा स्वतःचा नाश झाला. इतकेंच नव्हे तर त्यानें अनेकांना दुःखांत लोटले. शॅबां मारला गेल्यामुळें त्याच्या बायकोला आणि मुलांना केवळ वियोगदुःखच नव्हे तर मानहानि सहन करावी लागली. फ्रान्समध्यें व्यभिचाराला फारसें महत्व नव्हतें, परंतु खुनाचा आरोप मात्र भयंकर होता. विशेषतः नीनॉंचे त्याच्यावर अतिशय प्रेम असल्यामुळें तिला मरणःप्राय दुःख झालें. तो तिचा केवळ बापच नव्हे तर जिवलग स्नेही होता. तो देश सोडून गेला त्यावेळीं तिचे वय अवघें तेरा वर्षांचें होते, म्हणजे ती बालवयांतून यौवनांत पदार्पण करण्याच्या बेतांत होती. अशा वेळीं अशा स्नेह्याच्या सान्निध्याला अतिशय महत्त्व होतें, पण तें तिच्या नाशिबीं नव्हतें.

तिची आई धार्मिक असल्यामुळें ईश्वरानेच त्याच्या दुर्वर्तनाबद्दल त्याला हद्दपारीची शिक्षा दिली असें ती मानी आणि मुलीवरचें आपलें नाहींसें झालेलें वजन परत मिळवण्याचा प्रयत्न करी. पण आतां तें शक्य नव्हतें. अर्थात् या वयांत आईला अजीबात धुडकावून लावणेंही नीनॉंला शक्य नव्हतें. यामुळें ती आईबरोबर चर्चमधें जात असे. पण तेथें ती बायबलाऐवजी तशाच बांधणीच्या

कादंबऱ्या वाचीत असे. या वयांत कामविषयक जिज्ञासा सर्वच मुलींच्या मनांत उत्पन्न होते, तशी ती तिलाहि होती. अर्थात् या वेळीं ही केवळ मानसिक जिज्ञासा होती. प्रयोग करून पाहण्याची इच्छा नव्हती. रॅबले-सारख्यांच्या स्पष्टोक्तींपासून तों प्रेमाला अत्यंत काव्यमय स्वरूप देणाऱ्या लेखकांच्या स्वप्नरंजनापर्यंत सर्व प्रकारचीं वर्णनें तिनें पुस्तकांत वाचलीं. सत्याची आणि काव्याची तिला बरोबरच ओळख झाली.

तिला सारा दिवस पुस्तकांत गढलेली पाहून आईला वाटलें कीं हिच्यावर खरोखरच ईश्वराची कृपा झालेली आहे, आणि ती आपल्या म्हणण्याप्रमाणें जोगीण बनण्यास तयार होईल अशी तिला आशा वाटूं लागली. पण तसें म्हणावें तर कांहीं बाबतींत ती आईचें बिलकुल ऐकत नसे. इतकेंच नव्हे तर ऐहिक सुख फोल आहे असें पाद्र्याने सांगितलें तर ती त्याचें म्हणणें खोडून काढीत असे. ती स्वतःच्या शरीराची उत्तम निगा राखीत असे आणि तिला नखराहि कमी नव्हता. तिला कपडे तिच्या मर्जीप्रमाणें मिळत नसत, पण ते कितीहि वाईट असले तरी ती त्यांना सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करी. स्त्रियांनी छाती पुरी झांकावी असें आईचे मत होतें, पण स्तन सुंदर असल्यावर ते झांकण्याचें कारण नाही असें तिला वाटे. अर्थात् आई संतापत असे. आणि आपलें तिच्यावर फारसें वजन नाहीं हें तिला लवकरच स्पष्ट दिसलें. नीनांला संगीताचें वेड होतें. आणि नाचणें हें पाद्र्यांच्या मताने पाप होतें तरी तिला तें अत्यंत प्रिय होतें. हें असें फार दिवस चालणें शक्य नव्हतें. आईला दुखवूं नये म्हणून ती वरकरणी धर्माचें सोंग करीत असे, पण तिला तें असह्य होवूं लागलें, आणि स्वातंत्र्याची हांव तिच्या मनांत उत्पन्न झाली.

एके दिवशीं ती आईबरोबर ख्रिस्ताच्या मृत्यु संबंधाचें नाटक पहायला गेली असतां इतरांबरोबर दुःखांत मग्न होण्याऐवजीं तिनें सर्वांना ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें एका लोकप्रीय चटोर गाण्यांतील एक ओळ म्हटली. धर्माचा अपमान झाला, आणि तो करणाराला शिक्षा केली पाहिजे. अशा बुद्धीने लोक पाहूं लागले, तों तिचा सुंदर लाजरा चेहरा पाहून कोणाला कांहीं बोलण्याचा धीर झाला नाहीं. तरीपण तिच्या आईने तिला पाद्र्याची क्षमा मागायला

लावली आणि तिला खूप रागें भरायला त्याला सांगून ठेवलें याचा परिणाम इतकाच झाला कीं ती आतां बंडखोर झाली.

नीनॉंची मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. आईचा धार्मिक जाच तिला फार दिवस सहन करणें शक्य नव्हतें. बाप खून करून पळून गेल्यामुळें कुटुंबाची बदनामी झालेली, आणि तिच्याबरोबर फारसा हुंडाहि मिळणें शक्य नाहीं, अशा स्थितींत तिला कोणी चांगला वर मागणी घालील अशी आशा करण्यास जागा नव्हती. यावेळीं फ्रॉन्समधें प्रीतिविवाहाची पद्धत बिलकूल नव्हती, आणि विवाह पैशाच्या आकर्षणावरच अवलंबून असत. पण तिच्याजवळ सौंदर्यापलीकडे दुसरें भांडवल नव्हतें. तिच्याबद्दल अशी एक दंतकथा आहे की एकदां एक जादूगार तिच्यावर खुष होऊन तिला वर देवूं लागला आणि मोठेपणा, पैसा किंवा अढळ सौंदर्य, यांपैकीं काय पाहिजे तें माग, असें त्यानें म्हणतां तिनें सौंदर्य पसंत केलें. याचा अर्थ इतकाच कीं तिचें सौंदर्य मरेपर्यंत कायम राहिलें, या ऐतिहासिक सत्यावर ही दंतकथा रचलेली आहे.

तिच्याभोंवतीं प्रेमिकांचा गराडा असे. अशा प्रसंगीं पुस्तकांतलि तत्वज्ञान तिला उपयोगी पडेना, आणि ती भांबावून जात असे. बाप अशावेळीं तिच्या मदतीला खात्रीनें आला असता, पण आई आली नाहीं. या प्रेमिकांपैकींच कोणीतरी तिला मागणी घालील अशी तिची अपेक्षा होती, यामुळें तिनें कोणालाहि बंदी केली नाहीं. पण त्यांपैकीं कोणाचाही मागणी घालण्याचा विचार नव्हता. ते सर्व केवळ सुखाच्या मागें होते, त्यांना विवाहाची जबाबदारी नको होती, पण अर्थातच हें कोणीहि उघडपणें कबूल करीत नाहीं.

शेवटीं प्रेमाचें नाटक करण्यांत इतरांपेक्षां अधिक कुशल असलेल्या सँत एतिएन् नांवाच्या सरदार घराण्यांतील तरुणाच्या कारवाईला ती बळी पडली. बदफैलीपणाबद्दल त्याची प्रसिद्धि होती, पण तिच्या आईला या बाबतींत अक्कल नसल्यामुळें तिनेंही त्याला उत्तेजन दिलें आणि त्याच्या विवाहाच्या वचनावर विसंबून नीनॉंनें आपलें कौमार्य गमावलें. तिचें त्याच्यावर प्रेम होतें असें म्हणतां येत नाहीं, परंतु तारुण्याचा उन्माद होता आणि त्याच्या वचनावर विश्वास होता. तो अनाठायीं होता हें तिला लवकरच कळून आलें

आणि तें कळल्याबरोबर तिनें हा संबंध तोडला. शिवाय ती बापाकडून जें तत्वज्ञान शिकली होती, त्यांत झाल्या गोष्टीचा शोक करीत बसूं नये हेंही एक तत्व होतें. तेव्हां तिला फारसा पश्चातापहि झाला नाहीं. तथापि यानंतर साहजिकच कांहीं दिवस ती समाजांत वावरली नाही. कांहीं लेखकांनीं यासंबंधीं फोल तर्क लढवले आहेत. टॅलमां म्हणतो कीं या प्रथम संबंधांत प्रेमिकाच्या धसमुसळेपणामुळें तिला इजा झाली असावी, आणि म्हणून तिनें विश्रांति घेतली. परंतु याला आधार बिलकुल नाहीं. उलट आणखी एक लेखक म्हणतो कीं कार्डिनल रिशलिअला आतां मॅरिआं द लॉर्मचा कंटाळा आला होता, आणि त्यानें नीनॉला आपल्या तैनातींत घेण्याकरितां तीन लक्ष फ्रँक देऊं केले होते. ही रक्कम भारी दिसते, आणि हा लेखकहि फारसा विश्वसनीय नाहीं. या दोघांचीं प्रेमपत्रें या वेळीं चालू होती असेंहि एकानें लिहिलें आहे, आणि कित्येकांनीं तर खुद्द सॅंत एतिएन्ने या बाबतींत मध्यस्थी केली असेंहि लिहिलें आहे. तथापि या सर्व गप्पांकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं.

नीनॉची या प्रकरणांत फसवणूक झाली खरी, परंतु ती रिशलिअसारख्या बड्या माणसाच्या कानावर जाणें संभवनीय नव्हतें, किंवा तिला वेश्यांच्या सदरांत घालण्याचेंही कारण नाहीं. रिशलिअचें लक्ष या वेळीं तिच्याइतक्या सुंदर नव्हे, परंतु तिच्यापेक्षां उच्च दर्जाच्या स्त्रियांकडे होतें. तिच्या सौंदर्याची ख्याति देखील रिशलिअच्या मरणानंतरच विशेष झाली. तेव्हां वरील गोष्टींत फारसे तथ्य असणें शक्य नाहीं. रिशलिअ बडा होता, पण म्हातारा होता. तेव्हां त्याची इच्छा असती तरी देखील तिने त्याला धुडकावून लावला असता. तिच्या प्रेमिकांची यादी बरीच लांब आहे, पण तींत म्हातारे नाहींत. कारण तिला सुखाची हांव असली तरी पैशाची नव्हती. ती स्वतः बरीच मोठी झाल्यावर देखील तरुणांनाच जवळ करीत असे आणि त्यांत देखील मुख्य हेतु कामतृप्तीचा नसून सौंदर्यनिरीक्षणाचं असे.

नीनॉची फसवणूक झाली हें जेव्हां तिच्या आईला कळलें, तेव्हां तिनें अर्थातच तिला नांवें ठेवलीं, आणि ती नीनॉवर अधिक कडक देखरेख ठेवण्याचा प्रयत्न करूं लागली. पण तिची प्रकृति आतां बरीच बिघडली असल्यामुळें

तिला तें फारसें शक्य झालें नाहीं. नीनॉंच्या भोंवतीं प्रेमिकांची गर्दी होतीच आणि त्यांचीं चोरटीं चुंबनें चालूच होतीं. कौमार्य अगोदरच नष्ट झाल्यामुळें तिला आतां कामवासना दाबून ठेवणें अधिकच कठिण जाऊं लागलें, आणि शिवाय तिनें आतां विवाहाचा बेत कायमचा सोडून दिला. विवाहानें स्वातंत्र्य नाहींसें होऊन सुखाला अडथळा येतो, असेंच त्या वेळच्या नामांकित लेखकांचें म्हणणें होतें, आणि तें तिला तंतोतंत पटलें.

तरीपण अजूनही तिला जगाचा अनुभव नव्हता, माणसाची पारख नव्हती. यामुळें ती पुनः एकदां एका उडाणटप्पूच्या तथाकथित प्रेमाला भुलली. याचें नांव आंरी द लांसी, सरदार घराण्यांतला सभ्य बदमाष. त्याचे प्रेमानें ओथंबलेलें डोळे पाहून नीनॉंला त्याची दया आली, इतकेंच नव्हे तर तिच्यावर अजून आईचा पहारा होता आणि त्याला ती कंटाळली होती, याचाही परिणाम त्याला अनुकूलच झाला. पहारा असल्यामुळें तो चुकवून चोरून भेट घेण्याची इच्छा झाली, आणि याचा परिणाम व्हावयाचा तो झाला. परंतु इतक्यांत तिच्या आईची प्रकृति जास्तच बिघडली, आणि तिला आईकडे अधिक लक्ष देणें भाग पडलें. आईवर तिचें किती प्रेम होतें याची खरोखर तिलाहि कल्पना नव्हती, परंतु तिच्या या शेवटच्या आजारांत नीनॉंने जीवापाड मेहनत करून तिची शुश्रषा केली आणि ती मेल्यावर सर्व धार्मिक विधि यथासांग करवले. या सर्व श्रमांमुळें तिची स्वतःची प्रकृतिहि किंचित् खालावली आणि तिचें मनही इतकें विटलें की तिनें शेवटीं एकांत मिळण्याकरतां एका मठाचा आश्रय घेतला. त्यावेळीं बड्या कुटुंबांतील स्त्रियांची ही रीतच होती कीं कांहीं दिवस विश्रांति पाहिजे असल्यास समाजाचा संपर्क होऊं नये म्हणून अशा एखाद्या मठांत जाऊन रहावें आणि बरें वाटलें म्हणजे पुन्हां समाजांत यावें. अशा स्त्रियांकरतां मठांत जागा राखून ठेवलेल्या असत आणि त्यांच्याकडून पैसे मिळाल्यामुळें मठांचें त्यांत नुकसान नसे. मठ जरी धार्मिक संस्था असत, तरी अशा तात्पुरत्या आलेल्या स्त्रियांनी बाह्यात्कारी श्रद्धा दाखवली म्हणजे त्यांना धर्माचा फारसा त्रास होत नसे. एरवीं नीनॉं अशा ठिकाणीं गेलीच नसती, कारण ती पुरी नास्तिक होती.

अशा रीतीनें कांहीं दिवस विश्रांति मिळून शीण गेल्यावर तिला मठाचा कंटाळा येऊन ती घरीं परत आली. परंतु आतां आपलें काय होणार याची तिला चिंताच होती. आईबापांनीं पुंजी फारच थोडी ठेवली होती, तीवर निर्वाह कसा होणार ? तिचे भाऊ तिला कांहीं मदत करतील अशीही अपेक्षा करण्यास जागा नव्हती,

ती घरीं परत आली असें कळल्याबरोबर तिच्याभोंवतीं पूर्वीप्रमाणें प्रेमिकांचा गराडा पडला आणि आतां आईचीही आडकाठी नव्हती. परंतु जीवनकलहाचा बिकट प्रश्न सोडवल्याशिवाय तिला प्रेमाचा विचार करण्यास फुरसत नव्हती.

—

# ४

विवाहाचा धंदा तिला आतां शक्य नव्हता आणि तिला तो पसंतही नव्हता, तेव्हां कोणाची तरी रखेली होणें तिला भाग होतें. तथापि केवळ पैशाचा सौदा करण्याची तिची तयारी नव्हती. सौंदर्याकडे तिचा ओढा होता, आणि मनुष्य देखणा नसेल तर असा संबंध ठेवण्याची तिला लाज वाटली असती. जां कूलॉं नांवाचा एक मनुष्य तिला आग्रह करीत होता, पण तो देखणा नव्हता इतकेंच नव्हे तर तो सर्व दृष्टींनी बदनामी झालेला मनुष्य होता. तो पार्लमेंटचा सभासद होता, पण तो तेथें नसेल तेव्हां गुत्त्यांत सांपडायचा अशी त्याची ख्याती होती. तो रस्त्यांत देखील कोणाला शिव्या द्यायला कमी करायचा नाहीं. त्याची सर्वत्र चेष्टा होत असे, पण त्याची त्याला बिलकुल लाज नव्हती. त्याची बायको अत्यंत सुंदर होती, पण त्याचा घरचा खर्च मात्र इतर लोक चालवीत असत. ‘ इतके लोक प्रयत्न करतात, तरी पण मला अजून मूल नाहीं तें नाहींच ! ’ असें तो स्वतःच उघडपणें म्हणत असे.

नीनॉंला या सर्व गोष्टी माहीत होत्या, तरी पण त्यानें महिना पांचशें फ्रँक देवूं केल्यामुळें तिने त्याला शेवटीं आपल्या घरांत घेतला. तथापि तिने आपलें स्वातंत्र्य कायम ठेवलें होतें, आणि कूलॉंनेही याला हरकत घेतली नाहीं. पण त्याच्या बायकोला मात्र हें पाहवलें नाहीं. ती स्वतः पतिव्रता नव्हतीच,

आणि नवरा नीनाँकडे जातो याबद्दल तिची तक्रार नव्हती, पण तो तिला इतके पैसे देतो हें तिला पाहवेना. तिने याबद्दल बभ्रा करून नीनाँची बदनामी करण्यास सुरवात केली. नीनाँ अजून उघड गणिकांच्या सदरांत आली नव्हती पण आतां या प्रकरणाचा बभ्रा झाल्यावर सभ्य स्त्रियांचीं घरें तिला बंद झाली. परंतु कूलँच्या बायकोचा उद्देश मात्र साधला नाहीं, कारण नीनाँचा पगार चालूच राहिला. सभ्य घरें नीनाँला बंद झाल्यावर तिनें उघडपणें गणिकांप्रमाणेंच राहण्याचा बेत केला, आणि ढोंगाचें कारण न राहिल्यामुळें तिला अतिशय आनंद झाला. तिनें पहिली गोष्ट केली ती अशी कीं कूलँकडून येणारा पगार पुरेसा न वाटल्यामुळें तिने त्याच्याच एका मित्रालाहि घरांत घेतला. याचें नांव काँत दोबिजू. यालाही कूलँप्रमाणेंच सर्व प्रकारचीं व्यसनें होतीं. पण तो देखणा होता आणि तसाच शूरहि होता.

अशा तऱ्हेची भागीदारी या दोघांनीं कशी कबूल केली, याचें पुष्कळांना आश्चर्य वाटे. पण नीनाँचें सौंदर्य आणि इतर गुण इतके आकर्षक होते कीं बाजारी स्त्रीप्रमाणें आपण पैसे देतों म्हणून तिच्यावर ताबा सांगणें दोघांनाहीं बरें वाटेना, आणि तात्पुरती भागीदारी जरी त्यांनीं कबूल केली तरी प्रत्येकाला अशी आशा होती कीं केव्हांतरी ती दुसऱ्याला घालवून देऊन सर्वस्वी आपली होईल. तेथपर्यंत मिळेल तेवढ्यावरच समाधान मानणें त्यांना भाग होतें, इतकेंच नव्हे तर ही भागीदारी तरी भाग्यानेच आपल्याला मिळाली असें दोघांनाही वाटत असे.

इकडे नीनाँची मनःस्थिति अशी होती कीं नाइलाज म्हणून तिला जरी त्यांच्याकडून पैसे घ्यावें लागले तरी ती त्यांचा मनांतून तिरस्कारच करी. तिच्याकडे इतरहि अनेक लोक खेटे घालीत असत आणि प्रेमाने वेडे होत, किंवा निदान झाल्याचा देखावा करीत. पण याचा नीनाँवर बिलकूल परिणाम होत नसे. तिच्या मनांत जोंपर्यंत कोणाबद्दल कांहीं चेतना झाली नाहीं, तोंपर्यंत ती कोणाला दाद देत नसे. चेतना झाली म्हणजे मात्र ती शरीराचे समाधान करायला मागेंपुढें पहात नसे. तिची बुद्धी अतिशय तीक्ष्ण होती आणि बुद्धिमान लोकांच्या संभाषणांत तिला परमानंद होत असे. पण बुद्धीला

जो आनंद देऊं शकतो तो शरीराचे समाधान करूं शकेलच असें नाहीं, याची तिला चांगली जाणीव होती, आणि ती या दोन गोष्टी नेहमी वेगळ्या ठेवीत असे. यामुळें बुद्धिमान पुरुषांची पुष्कळ वेळां निराशा होई, पण याला ती काय करणार ? बुद्धिमान लोकांची संगत संभाषणापुरती, जरूर ते शारीरिक गुण असल्याखेरीज त्यांचा बिछान्यांत शिरकाव व्हायचा नाही, असा नियम ती पाळीत असे. यामुळें तिच्या मनाला आणि शरीरालाही योग्य तें समाधान मिळत असे, आणि तिची प्रकृति उत्तम रहात असे.

कूलँच्या बायकोच्या कारवाईमुळें तिला सभ्य लोकांचीं घरें बंद झाल्यामुळें तिची प्रथम थोडी कुचंबणा झाली आणि बुद्धिमान लोकांची संगत मिळावी कशी असा प्रश्न पडला. परंतु ही तिची मनीषा लवकरच पूर्ण झाली. तिच्याच प्रमाणें उच्च कुळांत जन्मलेली परंतु दैववशात् गणिका बनलेली मॅरिऑं द लॉर्म नांवाची एक स्त्री यापूर्वीच पॅरिसमधें प्रसिद्धीला आलेली होती, आणि तिच्याकडे प्रसिद्ध दरबारी आणि विद्वान लोक नेहमी उघडपणें जमत असत. ती नीनाँसारखी विदुषी नव्हती, पण तिचें सौंदर्य कांहींच्या मतें नीनाँ-पेक्षांही आकर्षक होतें. तिची आई तिच्या बरोबरच रहात असे नीनाँने तिची ओळख करून घेतली आणि ती तिच्याकडे वारंवार जाऊं लागली. तरी ती फार बेतानें वागत असे आणि तिच्याशीं चढाओढ करण्याचा प्रयत्न नीनाँने केला नाहीं. तिच्याकडे कवींचा आणि विद्वान लेखकांचा अड्डा होता, आणि तेथें या दोघींवरहि कविता होत असत. मॅरिऑंच्या सौंदर्यावर लोक कितीहि भुलले, तरी नीनाँच्या विद्वत्तेचाही त्यांच्यावर परिणाम झाला आणि तिची विद्वानांत चांगलीच छाप बसली. ती गणिका आहे हें माहीत असतांही स्कॅरॉं नांवाच्या एका कवीने तिला नव्या वर्षाची भेट म्हणून एक कविता करून पाठवली, तींत तुला चांगला नवरा मिळो अशी इच्छा प्रदर्शित केली होती. याच कवीने तिला पुढें एकदां असा इशारा दिला की तूं आपल्या डोळ्यांचा उपयोग जरा बेतानें करीत जा, कारण कटाक्षांनी फार लोकांना घायाळ करणें बरें नव्हे, कारण तुझ्या सौंदर्यामुळें कलह माजण्याचा बराच संभव आहे. हा कवि उगाच कांहींतरी लिहिणारा नव्हता, त्याच्या कवितांत नेहमीं कांहीं उद्देश

असे, तेव्हां वरील कवितेवरून अशी शंका येते की मॅरिऑशीं चढाओढ न करण्यांत नीनाँने प्रथम दाखवलेला संयम तिने नंतर सोडून दिला की काय ?

मॅरिऑकडे तिची गॅस्पार द कॉलिन्यी नांवाच्या एका सरदाराशीं ओळख झाली आणि त्यावर तिचें मन गेलें. पण तो तिच्याकडे मुळींच पाहीना. तो मॅरिऑभोंवतींच घुटमळत होता, पण ती त्याला बधेना. मॅरिआ प्रेमाची भुकेली होती, कोणावरहि तिचें प्रेम बसलें कीं तें जन्मभर टिकणार अशा विश्वासाने ती वागत असे. असे प्रेमी पुष्कळ झाले, तरी तिचा विश्वास कायम होता. गॅस्पार हा अशा प्रकारचा मनुष्य नव्हे हें तिने केव्हाच ओळखलें, आणि म्हणूनच ती साव-धगिरीने वागत होती. तो जेव्हां मुळीच ऐकेना, तेव्हां तिने अशी अट घातली कीं त्याने आपला प्रॉटेस्टंट धर्म सोडून कॅथोलिक पंथाचा स्वीकार करावा. ही अट अर्थातच कठीण होती, आणि त्याने ती कबूल न केली तर कटकट गेली, आणि त्याने कबूल केलीच तर आपल्याला हार खावी लागेल, पण निदान धर्माच्या दृष्टीनें आपण सत्कृत्य केल्यासारखें होईल, अशा विचारानें तिने ही अट घातली होती, कारण नीनाँ जितकी नास्तिक होती तितकीच मॅरिऑ धार्मिक होती. गॅस्पारने ही अट कबूल केली, कारण त्यांत त्याचा दुहेरी फायदा होता. एका बाजूला मॅरिऑ वश होणार, आणि दुसऱ्या बाजूला दरबारांत त्याचें वजन वाढणार, कारण राजा कॅथोलिक होता. याऊपर धर्माचा उपयोग नसतो असें कोण म्हणेल? तो कॅथोलिक धर्माचे तंत्र शिकून ताबडतोब कॅथोलिक झाला आणि मॅरिऑकडे आला आणि तिनेही मग आढे वेढे न घेतां आपला करार कसोशीने पाळला.

परंतु इतक्या खटपटीनें त्याचा उद्देश साधल्याबरोबर त्याला तिची किंमत वाटेनाशी झाली आणि तो इतर स्त्रियांचे मागें लागला. यावरून नीनाँची अशी कल्पना झाली कीं आपले प्रेमी राखण्याची कला मॅरिऑला अवगत नाहीं, आपण तिला यांत धडे देऊं. कॉलिन्यी मॅरिऑचें नादीं लागल्यावर तिनें त्याचा नाद सोडून दिला होता, पण आतां तिच्या प्रेमानें ( कीं कामवासनेने ? ) पुनः उचल खाल्ली आणि तिने करूं नये ती गोष्ट केली. तिने त्याला प्रेमपत्रिका लिहून भेटायला बोलावलें, आणि आपण होऊन आपली किंमत कमी करून

घेतली. तिच्या पत्राप्रमाणें तो आला खरा, पण त्याला प्रेमानें नव्हे तर कुतूहलानें खेंचून आणला. खऱ्या प्रेमाची लायकीच त्याच्या अंगीं नव्हती, तेव्हां ह्या एकतर्फी प्रेमाच्या पुरांत तो गटंगळ्या खाऊं लागून त्याचा जीव कासावीस झाला तर नवल काय? तो तिच्याकडे फिरकत नाहीसा झाला, आणि ती दुःखाचे सुस्कारे टाकीत बसली. यामुळें तिच्या भोंवतीं घुटमळणाऱ्या प्रेमिकांपैकीं एकाला तिची इतकी दया आली कीं त्यानें कॉलिन्यीचें मन वळवून त्याला तिच्याकडे परत आणला. पण या रडतराऊच्या मनांत आपल्याबद्दल प्रेम तर नाहींच पण आपल्या सौंदर्यानें त्याला तात्पुरती शारीरिक स्फूर्ति देखील होत नाहीं, हें पाहून ती अधिकच ख़ट्टू झाली आणि त्यानंतर तिचे प्रेम लवकरच ओसरले.

पण या सर्व प्रकारामुळें मॅरिऑंची मैत्री मात्र ती गमावून बसली. इकडे कॉलिन्यीचें एका कॅथोलिक मुलीशीं लग्न झालें, त्यांने. प्रॉटेस्टंट पक्षाचे लोक इतके खवळले कीं त्याच्या वरच्या अधिकाऱ्याने त्याला कामानिमित्त हॉलंडमध्यें पाठवून दिला. नीनॉंला हा पहिलाच प्रेमाचा अनुभव इतका कडू मिळाल्यामुळे ती बरीच शहाणी झाली, आणि प्रेमाचे बाबतींत तिचे मन विटले. यापुढे ती आपल्या मनाला आवरून धरायला शिकली, आणि प्रेमापेक्षा स्नेहच अधिक टिकावू असतो हा धडा तिने घेतला.

---

# ५

अशी एक आख्यायिका आहे की नीनॉंचा बाप मरण्यापूर्वी पुनः पॅरिसला आला होता. आणि त्यानें मरतांना नीनॉंला भेटायला बोलावून शेवटचा उपदेश असा केला की तुझ्या प्रेमिकांच्या संख्येबद्दल मी कांहीं सांगत नाहीं, पण ते कसोशीनें निवडलेले असावे इतकेंच सांगतों. तिचा बाप केव्हां मेला याबद्दल देखिल मतभेद आहे तेव्हां या आख्यायिकेंत कितपत तथ्य आहे हें सांगणें कठिण आहे, तथापि नीनॉं आपल्या आयुष्याच्या प्रथमार्धांत तरी या उपदेशाप्रमाणें वागली असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

कालिन्यीची वरीलप्रमाणें वाट लागल्यावर नीनॉं त्याच्या नांवानें खडे फोडीत बसली नाहीं. त्याच्या भ्रमरवृत्तीमुळें तिच्या मनांत विचारांचा प्रवाह सुरू झाला आणि स्त्रियांचे बाबतींत होणाऱ्या सामाजिक अन्यायाकडे तिचें लक्ष वेधलें. जी गोष्ट पुरुषांनीं केली तर त्यांना कोणी नांवें ठेवीत नाहीं, इतकेंच नव्हे तर इतर पुरुषांना त्यांचा हेवा वाटतो, तीच गोष्ट स्त्रियांचे बाबतींत मात्र इतकी गर्हणीय कां समजावी, याचा तिला उलगडा होईना. हा अन्याय तिला जाणवूं लागला आणि या गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याचा तिने निश्चय केला. अर्थात् कित्येक शतकांच्या गुलामगिरीच्या बेड्या तोडून तिच्याबरोबर बंड करायला फारशा बायका तयार होणार नाहींत याची तिला

जाणीव होती. पण तिला त्याची परवा नव्हती. सर्वांच्या विरुद्ध एकटीचें मत प्रतिपादण्याचें धैर्य तिच्या अंगांत होतें अर्थात् तिने आपल्या मताचे जाहीर पत्रक काढले नाहीं, पण स्वतः उदाहरण घालून देण्याचे तिने ठरवले. 'पुरुषांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असते आणि स्त्रियांना नसते. ठीक आहे आजपासून मी पुरुष होणार' असा निश्चय ती उघडपणे बोलूं लागली.

अर्थात् चेष्टा करणारे लोक कांहीं कमी नव्हते. कित्येकांनी या लिंगभेद-निषेधावर उपरोधिक काव्यें केलीं, कित्येकांनीं तिची निर्भत्सना केली. मन मानेल तशी चैन करायला पाहिजे आणि वर तत्वज्ञानाचा आव आणते आहे, अशी कित्येकांची प्रामाणिक समजूत झाली. परंतु तिच्या स्वातंत्र्यप्रेमाची मजल कोठवर गेली आहे, याची त्यांना त्या वेळीं कल्पना येणें शक्य नव्हतें. स्त्रियांच्या हक्काबद्दलची चळवळ सुरूं व्हायला पुष्कळच अवकाश होता. अशावेळीं हें तत्वज्ञान कोण ऐकणार? पण उघडपणें जरी कोणीं ऐकलें नाहीं. तरी बऱ्याच स्त्रियांना तिचें म्हणणे पटलें यांत शंका नाहीं, आणि त्यांनीं उघडपणें जरी आपली संमति दर्शवली नाहीं, तरी खाजगी रीतीनें त्या तिचे उदाहरण अंमलांत आणूं लागल्या.

कांहीं उल्लू लोक तिच्या तत्वांचा गौरव करूं लागले. कारण त्यांचा फायदा आपल्याला मिळेल अशी त्यांना आशा होती. पण हे उल्लू तिच्यामागें लागल्यामुळे इतर स्त्रियांना मात्र तिचा हेवा वाटूं लागला. परंतु सर्वांनाच तिच्याकडे जाऊन बसण्याची मोकळीक नव्हती. ही परवानगी फक्त निवडक लोकांनाच होती, आणि यांत केव्हां केव्हां त्या वेळचे कांहीं नामांकित लोक असत. तिच्या दूरच्या नात्याचा एक उच्च धर्माधिकारी देखील तिच्याकडे जात असे, कारण तिला धर्माकडे वळविण्याची त्याला आशा होती असें तो म्हणत असे. परंतु तिच्याकडे त्याला नांवें ठेवण्यासारखे कांहींच नव्हतें. तिच्याकडे विद्वत्तेचें कंटाळवाणें प्रदर्शन जरी होत नसे, तरी सभ्य भाषेबद्दल तिचा कटाक्ष असे, आणि हलकट चेष्टा करण्याची तेथें कोणाची ताकत नव्हती. तेथें येणारे सर्व लोक नास्तिक आणि स्वातंत्र्यवादी होते खरे, आणि त्यांपैकी बरेच केवळ संभाषणापेक्षां कांहींतरी जास्त आपल्याला मिळेल अशा आशेनें येत होते

हेंही खरें, तरी त्या सर्वांवर ती करडी नजर ठेवीत असे. अनेकांची तिच्यावर कामुक दृष्टि असली, तरी या चढाओढींत तेथें भांडणें होत नसत, कारण आपले खाजगी विचार प्रत्येकाला मनांतच ठेवावे लागत असत. काव्य, शास्त्र, विनोद, राजकारण, वगैरे सर्व विषयांवर तेथे चर्चा होत असे. आणि बहुतेकांना त्यांतून मिळणाऱ्या मानसिक करमणुकीवरच समाधान मानावें लागत असे.

याचा अर्थ असा नव्हे की नीनाँ आतां ब्रह्मचर्यानें राहूं लागली. याच लोकांतून तिच्या प्रेमिकांची निवड होत असे, पण तिची मर्जी किती दिवस टिकेल ही खात्री कोणालाहि नसे. तिला कंटाळा आला की ती त्यांना वाटेला लावीत असे. तथापि असें झाल्यावरही हे लोक तिचे स्नेही म्हणून तिच्याकडे येतच असत. कदाचित् आणखी एखाद्या वेळीं आपल्याला पुनः संधि मिळेल अशी आशा त्यांना असावी. कांहीं निराश झालेल्या लोकांनी तिच्यासंबंधी भलभलत्या अफवाही उठवल्या. तिला कांहीं मुलें झालीं असें कोणीं लिहिले आहे. परंतु इतिहासांत त्यांचा पत्ता लागत नाहीं. एकाने तर असे लिहिले आहे की ही आपली आई हे माहीत नसलेल्या तिच्या एका मुलाचें तिच्यावर प्रेम बसलें, आणि त्याला कांहीं दिवस आपल्या नादीं लावून नंतर तिनें त्याला आपलें नातें सांगितलें, आणि यामुळे त्याने आत्महत्या केली. परंतु ही गोष्ट नीनाँच्या स्वभावाशीं विसंगत आहे. लेखकाने ही गोष्ट १६७२ सालीं झाल्याचें लिहिलें आहे, म्हणजे नीनांचे वय त्यावेळीं ५२ वर्षांचें असले पाहिजे. तेव्हां हें कितपत शक्य आहे हा प्रश्नच आहे, आणि दुसरा कोणताही लेखक या गोष्टीचा उल्लेख करीत नाहीं, यावरून ती बहुधा कल्पितच असावी.

तिचें स्वतःचें प्रेम फार दिवस टिकत नसे या विषयीं तिने स्वतः असें लिहिलें आहे कीं (प्रेम आंधळें असतें. तें असतें तोपर्यंत आपण विचार करीत नाहीं, पण विचार केला म्हणजे डोळे उघडतात आणि डोळे उघडले म्हणजे प्रेम नाहींसें होतें.) आणि नीनाँला फार वेळ विचार केल्याशिवाय राहणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच तिचें प्रेम टिकत नसे. अर्थात् ती आलेल्या प्रसंगाचा पुरा फायदा घेतल्याशिवाय रहात नसे आणि पुढचा फारसा विचारही

करीत नसे. आजचें सुख आज, उद्यांचे उद्यां. यामुळें ती नेहमी म्हणत असे की कामतृप्तीची पद्धत एकच असली तरी तिच्याइतकें वैचित्र्य दुसऱ्या कशांतच नाहीं. तिनें प्रेमसंबंध तोडला तरी तिच्या प्रेमिकांची कधी तक्रार नसे, आणि यांत आपलें विशेष कौशल्य आहे याची तिला जाणीव होती. ती म्हणे, सैन्यांत शिस्त राखण्यापेक्षांही हें कठिण आहे.

अर्थात् ती या बाबतींत कोणालाहि फसवीत नसे, टिकाऊ प्रेमाची लालूच दाखवीत नसे. तिचे प्रेम ही तिच्या मर्जीची गोष्ट, आणि ज्यांना टिकाऊ-प्रेम पाहिजे असेल त्यांनीं दुसरी वाट धरावी, हें ती स्पष्टपणें सांगत असे. हा माझा विसावा प्रेमी आहे, असें ती उघडपणेंही बोलत असें. एकदां लुइ द बुरबाँ नांवाच्या लढवय्याँ सरदारावर तिचें मन गेलें, पण त्याची भेट झाल्यावर तिला लवकरच समजलें कीं त्याचा पराक्रम रणांगणापुरताच होता, तिला त्याचा उपयोग नव्हता. तेव्हां हें प्रकरण ताबडतोब संपलें. तरीहि त्यांचा स्नेह कायम राहिला. अशां वेळींही स्नेहें कायम राखण्याची ही एक कलाच तिला साध्य झाली होती.

ती आपल्या लहरीप्रमाणें वागत असे, पण यामुळें तिची एखादेवेळीं फजीतीहि होत असे. ती पुष्कळ वेळां त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें खुर्चीतून फिरायाला जात असे. ही खुर्ची बंद असून तिला दोन खिडक्या असत, आणि ती दोन नोकरांनी उचलून न्यायची असे. ती फिरायला गेली म्हणजे तिच्या भोंवतीं ओळखीचे लोक गोळा होऊन तिच्याबरोबर चालूं लागत असत आणि एखादे वेळीं ती नोकरांना खुर्ची खालीं ठेवायला सांगून रस्त्यांतच गप्पा मारीत बसे. एकदां अशा रीतीनें ती लोकांच्या घोळक्यांत असतांना तिचें लक्ष एका तरुण सरदाराकडे गेलें आणि त्याचा एकंदर रुबाब पाहून तिने त्याची चौकशी केली, आणि तेथल्या तेथें त्याला एक चिठ्ठी लिहून नोकराबरोबर त्याच्याकडे पाठवली. त्या चिठ्ठीवरून ती परत जातांना तो तिच्या खुर्ची-बरोबर चालूं लागला. तिने त्याला आपल्या घरीं नेला आणि उत्तम भोजन घातलें. जेवतांना प्रेमविषयक गोष्टी झाल्या, आणि नंतर तिने त्याला आपल्या निजायच्या खोलींत नेऊन, 'मी आतां आलेंच, म्हणून ती निघून गेली. ती

सुंदर होती तरी केवळ आपल्या नग्न शरीरावर लोक मोहित होतील अशी तिची कल्पना नव्हती. तिनें आपल्या नोकरिणीला बोलावून शरीर निर्मळ आणि सुशोभित करण्यांत बराच वेळ घालवला, आणि सुसज्ज होऊन रंगमहालांत दाखल झाली. आपला प्रेमी उत्सुकतेनें आपली वाट पहात बसला असेल अशी तिची कल्पना होती, पण पाहते तों त्याला गाढ झोप लागली होती ! सैन्यांत नोकरी करणारांना थकवा येण्याचा बराच संभव असतो हें ती विसरली. ती खूप रागावली, चिडली, आणि त्याला तेथून धक्के मारून घालवून द्यावा असाहि विचार तिच्या मनांत आला. आपल्या सौंदर्याचा असा अपमान! आपल्या हेवा करणाऱ्या स्त्रियांना किंवा आपल्या भोंवतीं घुटमळणाऱ्या प्रेमिकांना हें कळलें तर आपल्या फजीतीला पारावार नाहीं. पण शेवटीं तिने विचार केला, थकला असेल बिचारा, त्यांत त्याचा तरी काय दोष? मीं नट्टापट्टा करण्यांत इतका वेळ घालवला ही माझीच चूक. शेवटीं आणखी एक विचार तिच्या मनांत येऊन तिने त्याचे कपडे आणि हत्यारें गोळा केलीं आणि एका नोकरिणीला आपल्याला पहांटे उठवायाला सांगून ती स्वस्थ झोपली. सकाळीं तो तरुण सरदार खोलींत कांहींतरी भयंकर आवाज झाल्यामुळें जागा झाला आणि पाहातों तों एक तरुण मनुष्य हातांत नंगी तलवार घेऊन आपल्याला मारायला उद्युक्त झाला आहे. तो शूर होता, तेव्हां द्वंद्वयुद्ध करण्याकरतां तयार होऊं पहातो तर आपल्या कपड्यांचा आणि तरवारीचा पत्ता नाहीं! ही त्याची फजीती पाहून तो सशस्त्र तरुण मोठ्यानें हंसला, तेव्हां सरदार न्याहाळून पाहूं लागला आणि ही नीनाँ आपले कपडे घालून आपल्या समोर उभी आहे असें त्याला दिसलें. तिची वाट पाहतां पाहतां आपल्याला झोप लागली, याची आठवण होऊन तो अतिशय गोंधळला. नीनाँने त्याला क्षमा केली आणि ते उसने कपडे काढून टाकून ती बिछान्यावर जाऊन बसली. इतकें झाल्यावर तरी कालचें उट्टें आज निघेल अशी तिची कल्पना होती, पण तरी देखील तो तिचें समाधान करूं शकला नाहीं. शूर सरदारांच्या बाबतींत तिची ही पुनः फसगत झाली, आणि या दोघांचें प्रेम तेवढ्यावरच संपलें. त्याचें नांव काँत द नॅव्हाय.

त्याची जागा प्येर द व्हिलार नांवाच्या दुसऱ्या ऐका योद्ध्याने घेतली. हा अत्यंत देखणा मनुष्य होता, आणि त्याची शौर्याबद्दल जशी ख्याती होती, तशीच कामुकतेबद्दलही होती. त्याच्या चरित्रावर आधारलेली एक कादंबरीही प्रसिद्ध झाली होती. त्यांत कॅसांद्र नांवाच्या एका स्त्रीचें प्रेम संपादण्याकरतां त्याने केलेलें पराक्रम वर्णिले होते आणि ते करीत असतांना वाटेंत एका गुहेंत त्याला स्तॅतीरा नांवाची एक स्त्री अर्धनग्न स्थितींत भेटली असतां त्यांच्या कामक्रीडेचेंही वर्णन केलें होतें. नीनॉंला त्या कादंबरीच्या नायिकेपेक्षा या अचानक भेटलेल्या स्त्रीचाच जास्त हेवा वाटला. कवि आणि कादंबरीकार प्रेमाचें जें काव्यमय वर्णन करीत असतात तें तिला बिलकुल पसंत नसे. विप्रलंभशृंगाराची तिला मुळीच आवड नव्हती. प्रेमपूर्ति फारसा विलंब न लागतां झाली पाहिजे असें तिचें ठाम मत होतें.

या दोघांच्या प्रेमाची थोडीशी कादंबरीच झाली. या सुमाराला पॅरिसमध्यें दंगेधोपे सुरू होते. राजा चौदावा लुई अजून वयांत आला नव्हता, आणि त्याच्या वतीने कारभार पाहणारे लोक पार्लमेंटला पसंत नव्हते, यामुळे मारामाऱ्या चालू होऊन रस्त्यांतून हिंडण्यांत देखील धोका होता. मॅझॅरॅ हा मोठा मुत्सद्दी होता, पण त्याचें वजन अजून बसलें नव्हतें, यामुळें तोही कांहीं करूं शकला नाहीं. अशा स्थितींत व्हिलारला लष्करी कामाकरतां पॅरिस सोडून जावें लागलें. नीनॉंलाहि अशा परिस्थितींत पॅरिसला रहायला नको होतें, तेव्हां त्याने आपल्यालाहि बरोबर न्यावें अशी तिची इच्छा होती. पण लष्करी कामांत बायकांची अडचण कशाला, असें त्याला वाटलें. त्याने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण तिचें समाधान होईना. तथापि तो जेव्हां शेवटीं लिऑंला जाण्याकरतां घोड्यावर बसला, तेव्हा आतां नीनॉंचा संबंध तुटला अशचि त्याची कल्पना होती.

पण नीनॉंला त्याने ओळखली नव्हती. तिने त्याच्या मागोमाग जाण्याचा निश्चय केला. आपण आजपासून पुरुष होणार असा तिचा निश्चय मागें दिलाच आहे. यावेळीं तिने पोषाखहि पुरुषाचाच केला. कमरेला तरवार आणि पिस्तूल अडकवून ती निघाली. तिने टपालांच्या गाडींतून प्रवास केला. राजाची सत्ता

प्रबल नसल्यामुळें टपालांच्या गाड्यांना नेहमी लुटारूंचें भय असे, तथापि ती घाबरली नाहीं.

तिच्या निंदकांना यावेळीं चांगलीच संधि सांपडली त्यांनीं अशी कंडी पिकवली कीं तिच्या बदफैलीपणामुळें तिला कांहीं रोग झाल्यामुळें तो लपवण्या-करतां तिने पॅरिस सोडलें, आणि कर्मधर्मसंयोगाने यापुढील घटनेने त्यांच्या म्हणण्याला दुजोरा मिळाला. अर्थात् नीनॉला या निंदकांची मुळींच परवा नव्हती. व्हिलार निदान कांहीं तास तरी आपल्याला भेटावा इतकीच तिची आकांक्षा होती. पण दुर्दैवानें तीहि पुरी झाली नाहीं. ती लिऑं येथें पोंचल्यावर त्याला भेटण्याची आशा समूळ नष्ट झाली आणि या निराशेचा तिच्या प्रकृतीवर इतका परिणाम झाला कीं तिने पुनः एकदां एका मठांत आश्रय घेतला. पण यावेळीं तिला तेथेंहि मनःस्वास्थ्य लाभलें नाहीं तिनें जोगिण होऊन जगाचा त्याग करण्याची इच्छा तेथील वृद्ध अधिकाऱ्याला दर्शवतांच त्याने तिला उत्तेजन देण्याऐवजीं उलट तोच तिच्याजवळ प्रेमयाचना करूं लागला. तो प्रसिद्ध कार्डिनल रिशलिअच्या घराण्यांतील एक बडा धर्माधिकारी ( आर्चबिशप ) होता आणि त्याची दुर्वर्तनाबद्दल प्रसिद्धिच होती. एवढा मोठा धर्माधिकारी आपलें आमरण ब्रह्मचर्याचें व्रत सोडून आपल्या मागें लागतो, हें पाहून तिला धर्माचा इतका वीट आला कीं ती पुनः कधीहि त्याच्या वाटेला गेली नाहीं.

तथापि पॅरिस अजून सुरक्षित नसल्यामुळें तिने कांहीं काळ लिऑं शहरांतच घालवण्याचा निश्चय केला. तेथेहि तिला ओळखी करण्यास वेळ लागला नाहीं. मार्क आंत्वान पेराशॉं नांवाचा तेथील एक खुशालचंद श्रीमंत गृहस्थ तिला पाहतांच इतका भाळला कीं केवळ तिला भेटण्याची परवानगी मिळवण्याकरतां त्याने तिला एक पन्नास हजार फ्रँक किंमतीचें घर बक्षिस दिलें. एका कोंपऱ्यांत गप्प बसण्याच्या अटीवर तिने त्याला आपल्या दिवाणखान्यांत येण्याची परवानगी दिली. असे कांहीं दिवस गेल्यावर तो धीट होऊन तिला स्पर्शही करण्याची इच्छा दर्शवूं लागला. तिने त्याला आपल्या कराराची आठवण दिली. अर्थात् तो चिडला, परंतु नीनॉं सहज बधणारी स्त्री नव्हती.

तिनें त्याचें घर त्याला परत करून घालवून दिला आणि ती संतापून पॅरिसला निघून गेली.

पॅरिसला दंगा चालूच होता. तरी गेल्याबरोबर तिचे नेहमीचे स्नेही तिच्या भोंवतीं गोळा झाले. अर्थात् हे सर्व तिच्या प्रेमाचीच नेहमी अपेक्षा करीत असत, परंतु ती आपल्या लहरीप्रमाणेच वागत असे. पैशाने ती वश होणें शक्य नव्हतें, आणि तिच्या मनांत जोंपर्यंत कांहीं चेतना उत्पन्न झाली नाही, तोंपर्यंत प्रेमाचाही तिच्यावर परिणाम होत नसे. चौथ्या हेनरीचा अलेक्झांदर नांवाचा एक अनौरस मुलगा होता. त्याला पदव्या पुष्कळ होत्या, तो देखणा होता, उत्तम नर्तक होता आणि संभाषणचातुर्याबद्दल त्याची ख्याती होती. यामुळें कोणतीही स्त्री आपल्याला नकार देऊं शकणार नाहीं अशी त्याची कल्पना होती, इतकेंच नव्हे तर आपलें मन ओळखून स्त्रियांनीं आपण होऊन आपल्याकडे चालत यावें असें त्याला वाटत असे. नीनॉनें तसें कांहीं न करतां त्याला इतरांप्रमाणेंच वागवलें हें पाहून त्यानें तिला कांहीही करून वश करण्याचा निश्चय केला, पण उपयोग झाला नाहीं. स्पष्ट याचना तर तिनें अर्थातच धुडकावून लावली. यामुळें तो चिडला आणि त्यानें एक कविता करून तिच्या टेबलावर ठेवून तो निघून गेला. ती तो कागद उघडून पाहते तों, 'माझ्या प्रेमाचा किंवा अश्रूंचाही तुझ्यावर परिणाम झाला नाहीं, पण तुला सोडून जातांना मला मुळींच वाईट वाटत नाहीं, कारण माझ्या प्रेमानें तुला सौंदर्य उसनें दिलें होतें. तूं मुळींच सुंदर नाहींस', अशा अर्थाची कविता दिसली.

आपण सुंदर आहों कीं नाहीं हें तिला समोरच्या आरशांत दिसत होतें. तेव्हां तिला या कवितेने राग आला नाहीं, उलट त्याचा मूर्खपणा मात्र दिसला. त्याला चांगला धडा शिकवला पाहिजे असें ठरवून तिनें त्याला उलट कविता करून पाठवली, 'तुझ्या प्रेमाचा किंवा अश्रूंचा माझ्यावर परिणाम झाला नाहीं म्हणून चिडून तूं निघून गेलास, पण सौंदर्य जर उसने मिळते तर तूं कां नाहीं थोडेसें उसने घेऊन आलास ? तो यावर काय उत्तर देणार ? हळूहळू त्याचा राग जाऊन त्याला आपली चूक कळली, आणि तो पुनः

तिच्याकडे आला. प्रेमाऐवजी स्नेहाला तो आतां आनंदानें कबूल होता. यापुढें नीनाँने इतरांवर प्रेम केलें तरी तो खट्टू न होतां तें सहन करीत असे.

या सुमाराला मार्की द सेव्हिन्ये व त्याची बायको यांचें जें प्रकरण झालें, त्यामुळें पॅरिसमधल्या समाजाची खूपच करमणूक झाली. सेव्हिन्ये हा देखणा, बांधेसूद आणि जोमदार मनुष्य होता, आणि त्याला पाहिल्याबरोबर नीनाँचें मन त्याच्यावर गेलें. या शारीरिक गुणांपलीकडे चौकशी न करतांच तिनें त्याला भेटायला बोलावला. टिकाऊ प्रेमाची तिला अपेक्षाच नव्हती, आणि हा संबध तीन महिन्यांपेक्षां जास्त टिकणार नाहीं असें तिनें त्याला बजावलें. हा संबंध जगजाहीरच होता, आणि त्यामुळें आपल्या बायकोला काय वाटेल याची त्यानें परवा केली नाही. तिला अशा वागणुकीची संवयच होती. नीनाँशीं पहिलीच भेट झाल्यावर दुसऱ्या दिवशीं त्याला बायकोचा एक ब्यूसी रॅव्युतँ नांवाचा नातलग भेटला. त्याला हा म्हणतो, 'काल रात्रीं मोठीं मौज झाली बुवा!' ब्युसी थक्क होऊन त्याच्याकडे पाहूं लागला, कारण सेव्हिन्येच्या बायकोवर त्याचें प्रेम होतें. त्याला समजलें नाही असें पाहून सेव्हिन्ये पुढें म्हणाला, 'म्हणजे मी घरीं नव्हतों काल, नीनाँकडे होतों!' तेव्हां ब्युसी म्हणाला, 'कळली तुमची अक्कल. तुमची बायको कितीतरी अधिक सुंदर आहे. माझी खात्री आहे की ती तुमची बायको नसती तर तुम्ही तिच्या मागें लागलां असतां.' सेव्हिन्ये म्हणाला, 'हां, तें शक्य आहे.'

आपल्याला ही संधि बरी आहे असें पाहून ब्युसीने ही हकीकत त्याच्या बायकोला जाऊन सांगितली. हेतु हा की तिने नवऱ्यावर संतापून त्याचा सूड घेण्याकरतां आपल्यावर प्रेम करावें. त्यानें तिला तसें उघड सांगितलेंही. तिला दुःख झालें, आणि तिनें तें आपल्या पत्रांत लिहिलेंही (मॅदम द सेव्हिन्येचीं पत्रें, हें फ्रेंच भाषेंतील प्रसिद्ध पुस्तक आहे) पण तिने ब्युसीचें म्हणणें ऐकलें नाहीं. इतकेंच नव्हे तर तिने नवऱ्यालाहि यासंबंधी पत्रांत कांहीं लिहिल्यामुळें ब्युसीने तिला सर्व सांगितलें असावें अशी त्याला शंका आली. पण त्याला त्याची परवा नव्हती. तो नीनाँसंबंधी उघड बढाई मारीत असे. ब्युसीने त्याला बजावलें कीं अशा वर्तणुकीने बायको एखादे वेळीं चिडण्याचा संभव

आहे, आणि तसें झाल्यास त्याचा फायदा घ्यायला कोणी तरी तयार असतोच. पण इतिहास सांगतो कीं ब्युसीला शेवटपर्यंत असा फायदा मिळाला नाही. त्यानें तिला प्रेमपत्रेंहि लिहून पाहिली, पण तीं अचानक नवऱ्याच्या हातांत पडल्यामुळें त्याला त्या घरांत पुनः येण्याची मनाई मात्र झाली.

पण याबद्दल सूड नीनॉंने घेतला. सेव्हिन्येचे तीन महिने संपल्यावर तिने त्याला हांकून दिला आणि मॅदम द सेव्हिन्येकडे नेहमी जाणारे तिचे दोन स्नेही नीनॉंने पळवले. त्यांपैकीं एकाचे नांव आंत्वान रांबुय्ये. नीनॉंने त्याचे बाबतींत लिहिलें आहे. 'मी त्याच्यावर तीन महिने प्रेम करीन असें वाटतें. तीन महिन्यांपेक्षां जास्त म्हणजे मला अशक्यच वाटतें.' त्याचाही स्वभाव याच जातीचा असल्यामुळें त्यालाही टिकाऊ प्रेमाची अपेक्षा नव्हती. तेव्हां तीन महिन्यांनी नीनॉंने त्यालाच विचारलें, 'अमुक अमुक मनुष्य कसा काय आहे? मला आतां कंटाळा आला आहे.'

यानंतर मॅदम द सेव्हिन्येचा दुसरा मित्र मार्की द व्हॅसे याची तिची गांठ पडली, पण त्याच्याजवळ पैसे असले तरी अक्कल नसल्यामुळें त्याला लवकर यश आलें नाहीं. शेवटीं नीनॉंने त्यालाहि जवळ केला, पण त्याच्या तोंडाला मनस्वी घाण येत असल्यामुळें तिने त्याला लवकरच रजा दिली. तथापि याचा बभ्रा होऊं नये म्हणून तो तिला फुकटचे पैसे देणाऱ्या श्रीमंतांपैकीं एक होऊन बसला.

---

म.ग्रं.स

# ६

निनाँची वर्णनें अनेक लेखकांनीं लिहिलीं आहेत, त्यांत तिच्या बुद्धिमत्तेबद्दल व चातुर्याबद्दल जरी एकमत दिसतें, तरी तिच्या शारीरिक सौंदर्याबद्दल बराच मतभेद दिसतो. तॅलमां नांवाच्या लेखकाने लिहिलें आहे कीं नीनाँ कधीच फारशी सुंदर नसावी, परंतु तिच्यामध्यें आकर्षण मात्र विलक्षण आहे. सामेझ नांवाच्या दुसऱ्या एका लेखकानें लिहिलें आहे कीं ती एकटी असतांना तिची वृत्ति बरीच उदास असे, हें तिला केवळ समाजांतच पाहणारांना खरें देखील वाटणार नाहीं. कारण लोकांना ती नेहमी उत्साही आणि उल्हासी दिसे आणि चतुर संभाषणांत आनंद मानणारे सर्व लोक तिच्या भोंवतीं गोळा होत असत. शारीरिक प्रेमाच्या दृष्टीनेही तिच्यांत कांहीं उणीव नव्हती हें जरी पुष्कळांना प्रत्यक्ष अनुभवानें माहीत होतें, तरीहि तिचे मानसिक गुण तिच्या शरीरापेक्षाही आकर्षक होते यांत शंका नाहीं आणि ते नसते तर केवळ शारीरिक सौंदर्यानें तिच्याकडे इतके लोक खचित आकृष्ट झाले नसते. तथापि या दोन्ही लेखकांचें म्हणणें सर्वस्वी ग्राह्य मानतां येत नाहीं, कारण पहिला लेखक जरी तिचा स्नेही होता, तरी त्याची व तिची ओळख फार उशीरां झाल्यामुळें त्यानें तिला तारुण्याच्या भरांत पाहिलेलें नव्हतें आणि दुसरा लेखक जरा सोंवळा असल्यामुळें तिचे मनसोक्त आचरण त्याला पसंत नव्हतें.

या उलट आंजेलीक पती या प्रसिद्ध लेखिकेनें तिचें जें वर्णन दिलें आहे, तें खोटें असण्याचा संभव दिसत नाहीं, इतकेंच नव्हें तर हें वर्णन एका स्त्रीनें लिहिलेलें असल्यामुळें त्याला अधिकच महत्त्व येतें, कारण एक स्त्री दुसरीच्या सौंदर्याची निष्कारण तारीफ करील हें संभवत नाहीं आतां हें वर्णन प्रत्यक्ष तिचें म्हणून दिलेलें नाहीं, तें एका कादंबरीच्या नायिकेचें आहे, परंतु ही नायिका म्हणजे नीनाँचें हुबेहुब चित्र आहे असें लेखिकेनें कबूल केलेलें आहे. ती म्हणते, 'आपण लोकांना आवडावें म्हणून कोणीही ज्या ज्या गुणांची इच्छा करणें शक्य आहे, ते सर्व तिच्यांत आहेत. तिची कमर बारीक आहे आणि तिच्या इतके आकर्षक डोळे कोणाचेच नसतील. तिचे ओठ निसर्गतः लाल आहेत, त्वचा साफ आहे, वक्षस्थल आणि हात कुशल कारागिराने कोरल्यासारखें दिसतात. बाकीचें शरीर झांकलेलें असल्यामुळें (त्या काळीं स्त्रियांची छाती फारशी झांकलेली नसे. र. धों. क.) जरी प्रत्यक्ष दिसत नसलें, तरी चालतांना तिच्या अंगविक्षेपांवरून तें अंदाजाने ताडतां येतें, आणि तें कल्पनेच्याहि पलीकडे सुंदर असलें पाहिजे असें वाटतें. ती अप्रतिम सुंदर नाचते, तिच्या तिच्या 'ल्युत' वादनाने (हें एक तंतुवाद्य असे) श्रोते मोहित होतात. तिचा आवाज इतका मोहक आहे की ती थोडी अधिक धीट असती तर तिने गाण्यांत सर्वांवर मात केली असती. परंतु ती तितकी धीट नसली तरीहि अत्यंत गोड आणि शास्त्रशुद्ध गाते. तिची बुद्धिहि अत्यंत तीव्र आहे आणि ज्या प्राचीन स्त्रियांची आज इतकी स्तुति ऐकूं येते. त्यांचा तिच्या-पेक्षां वरचढ गुण म्हणजे फक्त प्राचीनता एवढाच असावा. तिचें संभाषण ऐकणाराच्या वृत्तीला आणि बुद्धीला साजेसें असतें. ती गंभीर तत्वज्ञानाचीहि चर्चा करूं शकते आणि अमुक ग्रंथकार तिला माहीत नाहीं असें कधी होत नाहीं. तिचा स्वभाव उत्तम आहे आणि दुसऱ्याला सुख देण्यांत तिला आनंद वाटतो. जेथें गंभीर राहणें अस्थानीं दिसेल, अशा ठिकाणीं तिच्या उल्हासी वृत्तीने आणि चतुर व विनोदी संभाषणाने सर्वांची करमणूक होते. मोठमोठ्या लोकाचें प्रेम तिने संपादन केलेलें आहे आणि प्रेमाचे बाबतींत कोणतीहि स्त्री तिची बरोबरी करूं शकत नाहीं. सारांश ती सर्व राजधानीला भूषणावह झालेली

आहे. आतां कादंबरीकारांच्या वर्णनांत थोडीबहुत अतिशयोक्ति असणार, असा या वर्णनावर एक आक्षेप येणें शक्य आहे, परंतु सुदैवानें त्या वेळच्या अनेक चित्रकारांनी तिच्या प्रतिमा काढून ठेवलेल्या आहेत. त्यांवरून तिच्या सौंदर्या-बद्दल मत बनवणें शक्य आहे. यापैकीं सात चित्रें हल्ली अस्तित्वांत आहेत व तीं खाजगी किंवा सार्वजनिक संग्रहालयांत ठेवलेलीं आहेत. याशिवाय एका चित्रांत ती आपला ग्रंथसंग्रह व्हॉलतेरला देत आहे असें दाखवलें आहे. हें चित्र एका आख्यायिकेवर आधारलें आहे व त्यांत नीनाँचें व व्हॉलतेरचें चित्र केवळ कल्पनेने काढलेलें आहे. परंतु बाकीचीं चित्रें प्रत्यक्ष तिला समोर बसवून कुशल चित्रकारांनी काढलेलीं आहेत. यापैकीं एका चित्रासंबंधीं ती स्वतः म्हणत असे कीं 'ही माझी तत्वज्ञाची मुद्रा आहे.' या चित्रावरून पाहतां ती निःसंशय सुंदर होती. यांत तिच्या कुरळ्या केसांचीं वेंटोळीं, दीर्घवर्तुलाकृति चेहऱ्याभोंवतीं मेहरप करून मानेवर व खांद्यांवर रुळत आहेत. गळ्यांतल्या टपोऱ्यां मोत्यांच्या माळेनें त्वचेचा गुलाबी रंग अधिकच खुलत आहे. तशाच मोत्यांनी शृंगारलेल्या ब्लाऊजच्या वर स्तनांचा वरचा भाग स्पष्ट दिसत आहे. बुद्धिमत्तेचें निदर्शक उंच कपाळ, काळे डोळे, आणि त्यांवरची जाड भुंवयांची दुहेरी कमान. हे डोळे सतेज आणि गंभीर असूनहि मोहक आहेत. नाक सरळ बारीक व नाजूक असून तोंड, रसिकांना चुंबनाची आणि स्मिताची आठवण देत आहे असा भास होतो.

चित्रकाराने जरी इतकाच भाग दाखवला आहे, तरी कवींनीं तिच्या स्तनांचेंही वर्णन दिलें आहे. स्तनांचा रंग दुधासारखा असून चूचुक मात्र गुलाबाच्या कळीसारखें दिसतात असें वर्णन आहे यूरोपांत फक्त गाईचेंच दूध असतें व त्याचा रंग किंचित पिंवळसर असतो हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. त्या वेळच्या कांहीं स्त्रियांच्या नग्न तसबिरा देखील आहेत, तेव्हां कवींनीं स्तनांचें वर्णन केलें यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. नीनाँच्या मैत्रणींनीं तिच्या कमरेचें, बांधेसूद शरीराचें, तिच्या विनयाचें व नृत्य आणि गायन-वादनांतील नैपुण्याचें वर्णन केलें आहे. हायगेन्स नांवाचा जो प्रसिद्ध डच शास्त्रज्ञ होऊन गेला, त्याने नीनाँसंबंधीं कवन करून असें म्हटलें आहे कीं

तिच्या एकंदर पांच गोष्टींवर माझें प्रेम बसलें आहे. तिचे दोन हात आणि दोन डोळे मिळून चार, आणि पांचवी गोष्ट तर्कानें जाणावी. एका प्रसिद्ध शास्त्रज्ञानें तिच्यावर काव्य केलें यावरून तिचें आकर्षण किती विलक्षण असलें पाहिजे हें उघड दिसतें, मॅदलेन द स्क्युदेरी आणि आंजेलीक पती या दोन लेखिकांनी तिच्या अंतःकरणाची, औदार्याची, निरपेक्षतेची, प्रेमाची आणि इमानाची तारीफ केली आहे. तिचे इतके प्रेमी झाले तरी एका वेळीं तिचा एकच प्रेमी असे, त्याला सोडला नाहीं तोंपर्यंत तिनें दुसऱ्याकडे कधींहि लक्ष दिलें नाहीं याचें पुष्कळांना आश्चर्य वाटे. तिच्या बुद्धीची तर एकानें इतकी स्तुति केली आहे कीं त्याचे मतें तिची बरोबरी करणें कदाचित् शक्य असलें तरी तिच्यावर ताण करणें शक्य नाहीं. ही कदाचित् अतिशयोक्ति वाटली, तरी तिची त्यावेळीं सर्वांवर किती छाप पडली होती हे यावरून दिसतें.

नीनॉंची धर्माकडे प्रवृत्ति कधींच नव्हती हें आपण मागेंच पाहिलें आहे, तरी पण तिनें त्या विषयाचा फारसा विचार मात्र केलेला नव्हता. पण या सुमाराला तिला अशी संगत, मिळाली कीं ती विचारपूर्वक नास्तिक बनूं लागली. दुर्दैवानें त्या वेळीं नास्तिकांची अशी एक टोळी होती कीं त्यांच्या जीवनाला कोणत्याहि प्रकारचा धरबंध राहिला नव्हता. उदाहरणार्थ ईव्हतो नांवाचा एक मनुष्य तेराव्या लुइचा शिक्षक असे, त्याच्या अंगांत सर्व प्रकारचे दुर्गुण भरले होते, आणि त्याला नास्तिकपणामुळें दरबारांतून हांकून दिला होता. त्यानें पॅरिसच्या बाहेर, पण शहराच्या जवळच, एक मोठें घर बांधलें आणि तेथें त्यानें आपल्या भोंवतीं कांहीं मित्रमंडळीं जमवली आणि तीं सर्व ग्रीक व रोमन देवदेवतांच्या पोषाखांत वावरत असत आणि त्यांच्या पुराणकथांचा अभिनय करीत असत. नीनॉंला संगीताचा नाद असल्यामुळें ती तेथें जात असे. ते लोक दुराचारी असले तरी कलाभिज्ञ होते, आणि त्या घराचें आणि भोंवतालच्या बागेचें सौंदर्य, सुग्रास अन्न, आणि मोहक संगीत यांचा मोह तोडणें तिला शक्य नव्हतें. यांत कांहीं बडे आणि श्रीमंत लोक होते आणि ते सर्व नास्तिक असल्यामुळें नीनॉंची नास्तिकपणाकडे अधिकाधिक प्रवृत्ति होऊं लागली.

याच सुमाराला तिच्या नास्तिकपणाला विशेष उत्तेजन देणारा एक गुरुहि तिला भेटला. सॅंतेव्हमाँ नांवाच्या ज्या एका तरुण लष्करी अंमलदाराला तिनें मॅरिआंच्या घरांतून काढून आपल्याकडे आकृष्ट केला होता, तोच आतां या बाबतींत तिचा गुरु झाला. तिचा व त्याचा कधी शरीरसंबंध होता कीं नाहीं याची शंकाच आहे आणि त्यानें तिला लिहिलेल्या एका पत्रांत आपलें स्थान स्नेही व प्रेमी यांच्या मध्यें कोठेतरी आहे असें दर्शवलें होतें. तसें पाहिलें तर त्याच्यांत शारीरिक सौंदर्य बिलकुल नव्हतें आणि एकाच डोळ्याला आरशी लावीत असल्यामुळें तर तो अधिकच विरूप दिसे. तरीदेखील चेहऱ्यावरून तो बुद्धिमान दिसत असे, तो फारच थोडें बोलत असे, पण जें बोलत असे तें अक्कलेनें बोलत असें. यामुळें सर्वांचें लक्ष त्याच्याकडे जात असें, तो जरी सुखाच्याच मागें होता, तरी त्याला सुख मिळणें कठिण होतें, कारण कोणतीहि इच्छित वस्तु मिळाली कीं त्याला तिचा तावडतोब कंटाळा येत असे. त्याच्या बुद्धिमत्तेमुळें नीनाँचा व त्याचा स्नेह जमला आणि तो जन्मभर टिकवण्याची नीनाँने खटपट केली. तिच्या बापाने जे शिक्षण तिला दिलें होतें, तेंच त्यानें पुढें चालवलें आणि धर्माचा वेडगळपणा तिला स्पष्ट दाखवला. तिच्या बापाने ज्यावेळीं तिला मॉंतेन्यचे निबंध दिलें होतें, त्यावेळीं तिला ते समजणें शक्य नव्हते, पण आतां ती ते वाचूं लागली, आणि नेहमी जवळ बाळगूं लागली. इतकेंच नव्हे त्याच विचाराचे इतर ग्रंथही तिनें वाचले आणि अशा रीतीनें त्याचे विचार तिच्या मनांत पक्के बिंबले. परंतु अजून सुद्धां मॉंतेन्यचा अंतःस्थ हेतु तिच्या लक्षांत आला नव्हता. त्याने अश्रद्धेवर जोर दिला होता, आणि अविश्वास हें शहाणपणाचें मूळ म्हणून पुरस्कारलें होतें, त्यांतला मुख्य हेतु परमतसहिष्णुता अशा तऱ्हेने उत्पन्न व्हावी हा होता, अमुक एका मताकरितां भांडावें हा नव्हता. याचें कारण म्हणजे तिचा गुरु सॅंतेव्हमाँ हा देखील अजून प्रचारकार्याच्या पहिल्या उत्साहाच्या भरांत होता. यामुळें तीहि उत्साहाने नास्तिकतेचा प्रचार करूं लागली. पण तरीहि ती एकदां आजारी पडून आसन्नमरण झाली असतां तिने शिष्टाचार म्हणून पाद्र्याला बोलावला होता. पण तो केवळ शिष्टाचार म्हणून.

'ज्यांना जगांत वागण्याकरतां धर्माची जरूर पडते, त्यांची दया येते' अशा प्रकाराचे विचार ती नेहमी बोलून दाखवित असे, आणि त्याकाळीं असे विचार पुरुषांना देखील अक्षम्य समजले जात असत. मग तिच्या घरीं सैतानाचें ठाणें आहे असे लोकांनीं ठरवलें यांत नवल काय? ईस्टरच्या वेळीं ख्रिस्ती लोकांचा जो लेंट नांवाचा चाळीस दिवसांचा उपास असतो (हा उपास म्हणजे या दिवसांत मांस निषिद्ध असतें इतकेंच) तेव्हां गायनही निषिद्ध समजतात. अशा वेळीं नीनॉने आपल्या घरीं एका कवीला गायला सांगितलें. त्याने तेथल्या तेथे एक कविता करून म्हटली.

अशा रीतीनें लोकमताचा उपमर्द केल्यामुळें तर या सुमाराला तिने आपली जागा बदलली नसेल? पण इतिहासावरून तसें दिसत नाहीं. तिचा चरितार्थ यावेळीं कूलॉं आणि ओबिजू या दोघांनीं दिलेल्या पैशावर चाललेला होता. या दोघांनी आतांपर्यंत तें आपसांत पटवून घेतलें, पण आतां त्यांचें पटेना, आणि ओबिजूने तिला एक नवें घर देऊं केलें, आणि तेथें तिने आपल्याजवळ रहावें अशी इच्छा दर्शवली. त्या दोघापैकीं तोच अधिक देखणा होता, इतकेंच नव्हे तर तो अधिक उदार होता आणि त्याला शिष्टाचार अधिक कळत असे, आणि शिवाय त्या नव्या घरांत उजेड आणि हवा भरपूर होती. नीनॉने तेथे जाण्याचें केलें तेव्हां कूलॉं चिडला आणि चडफडला. तेव्हां नीनॉने त्याला घालवून दिलें आणि ती नव्या घरांत रहायला गेली.

कूलॉंसारख्या कुरूप माणसाला घालवून देतांना तिला अर्थातच मोठेसें वाईट वाटलें नाहीं. तरी पैशाची कांहीतरी व्यवस्था करणें भाग होतें, कारण ओबिजू एकटा तिचा खर्च चालवण्यास समर्थ नव्हता पण पैसे देणारा मनुष्य कुरूपच असला पाहिजे असें नाहीं! या सुमाराला मॉरी नावाचा एक अठरा वर्षाचा मुलगा तिच्या इतका नादीं लागला की तो कुत्र्यासारखा तिच्या मागून जात असे, किंवा कांहीं कारणाने त्याला तिच्यापासून दूर जावेंच लागलें, तर तिला पत्रें पाठवून बेजार करीत असे. तो व त्याचे काही मित्र नास्तिकपणाबद्दल प्रसिद्ध होते, आणि त्याच्याजवळ पैसे पुष्कळ होते. तो हुशार होता म्हणून तिला आवडत असे, परंतु ही आवड प्रेमाची मर्यादा गांठीना.

तो तिला एखाद्या राणीसारखा मान येत असे आणि तिच्यासमोर स्पष्ट बोलायलाही भीत असे. तिला त्याची दया येइना, तरी तिला केवळ पैसे देणारा प्रेमी या नात्याने त्याने कूलॉंची जागा घेतली.

परंतु या तिच्या नव्या जागेजवळच एक चर्च होतें, आणि तेथला पाद्री अतिशय सोंवळा होता. अर्थात् त्याला नास्तिकांची चीड होती, आणि शिवाय नीनॉं तेथें राहूं लागल्यावर तेथल्या शांत रस्त्यांत गाड्यांची जा ये सुरू झाली, आणि रात्रीं नीनॉंकडे दिव्यांचा लखलखाट असे, तोही लोकांना जाचक वाटूं लागला. शेवटीं त्यांना असा शोध लागला कीं या सैतानाच्या घरांत नास्तिकांचा अड्डा आहे. तरी प्रथम त्यांनी तिकडे दुर्लक्ष केलें, पण लेंटच्या उपासाच्या दिवसांत नीनॉंच्या घरीं उघडपणें मांसाहार चालतो असें जेव्हां त्यांनी ऐकलें, तेव्हां तर त्यांचा विश्वासहि बसेना. पण नीनॉंच्या खिडकीखालून जातांना एका पाद्र्याच्या अंगावर जेव्हां एक हाड पडलें, तेव्हां त्यांना विश्वास ठेवणें भागच पडलें. ही तक्रार वरिष्ट अधिकाऱ्याकडे गेली. या अधिकाऱ्याची स्वतःची वागणूक मोठीशी चांगली नव्हती, तरीदेखील धर्माचें संरक्षण करणें त्याचें काम होतें. तरी यांतून आपल्याला कांहीं फायदा होईल या आशेने त्यानें नीनॉंला या संबंधी ईशारा दिला. तिने आपले दोन मित्र त्याची समजूत घालण्याकरतां पाठवले आणि त्यांनी पैसे भरून तें प्रकरण मिटवलें. पण तें मिटलें तरी लोकांचीं तोंडें कोण बंद करणार ? शेवटीं ही तक्रार त्या वेळची फ्रान्सची राणी ॲन हिच्यापर्यंत गेली, आणि या नास्तिक नीनॉंची कांही तरी व्यवस्था लावली पाहिजे, असा लोकांनी आग्रह धरला. त्या वेळीं पश्चाताप पावलेल्या वेश्यांकरतां पॅरिसमध्यें एक आश्रम होता, त्यांत तिला ठेवावें असें राणीनें सुचवलें. यावर बोत्र्यू नांवाच्या एका प्रसिद्ध नास्तिकानें तिला सांगितलें 'पण राणीसाहेब, ती वेश्याही नाहीं आणि तिला पश्चात्तापही झालेला नाहीं ?' तथापि त्याचा कांही उपयोग झाला नाहीं. राणीसाहेबांनी नीनॉंला एक लेखी हुकूम पाठवला, त्यांत तिने मठांत जाऊन रहावें असें फर्मावलें होते. नीनॉंने तो वाचून पाहिला आणि त्यांत मठाचें नांव लिहिलें नव्हतें असें पाहून तिने उलट उत्तर लिहिलें की कोणत्या मठांत जावें हें

ज्याअर्थी माझेवर सोंपवलें आहे, त्याअर्थी मी 'ग्रां कॉर्दलिये' हा मठ पसंत करतें. या वेळीं या मठाची दुराचाराबद्दल इतकी प्रसिद्धि होती, की हें उत्तर पाहून राणीसाहेब भयंकर रागावतील असा सर्वांचा तर्क होता. पण परिणाम उलट झाला. तें उत्तर पाहून ॲनला अतोनात हंसूं लोटलें आणि ती उग्दारली, 'जा मर, तुला पाहिजे तिकडे जा,' आणि राणीसाहेब पुन्हा तिच्या वाटेला गेल्या नाहींत. तरीदेखील हे धर्मवेडे लोक आपल्याला त्रास देतील ही नीनॉला भीति होतीच. यामुळें तिने अशी बातमी पसरवली की आतां आपण अमेरिकेला निघून जाणार. अमेरिकेंत विपुल पैसा आहे अशा समजुतीने त्या वेळीं धाडसी लोक श्रीमंत होण्याकरतां अमेरिकेचा रस्ता धरीत असत, तेव्हां यांत कांही आश्चर्य वाटण्याजोगे नव्हतें.

---

# ७

खरें पाहिलें तर नीनाँचा अमेरिकेला जाण्याचा बेत मुळीच नव्हता आणि पैसे मिळवण्याकरतां ती अमेरिकेला जाईल हें शक्यच नव्हतें, कारण तिला पॅरिसमध्यें काय कमी होतें ? पण राजसत्तेकडून धमकी मिळाल्यामुळें ती थोडी बहुत घाबरली होती हें मात्र खरें. त्यावेळीं ही सत्ता अमर्याद होती आणि या दृष्टीनें जपून वागण्यांतच शहाणपण होतें. याकरतां १६५१ सालीं ती एकदोनदां चर्चमध्येंही गेली होती असें दिसतें. या चर्चमध्यें धनवान समाजाचें जाणें येणें असे आणि यांपैकीं एका स्त्रीची तिच्याशीं चमत्कारिक रीतीनें ओळख झाली. या स्त्रीची स्वतःची वागणूक मोठीशी सोंवळी नसे, आणि तिचा धर्मही दाखवण्यापुरताच होता. एकदां चर्चमध्यें प्रवचन चालू असतां तिनें हलक्या आवाजांत बोलायला सुरवात केली आणि आपण कोणाशीं बोलत आहों हें माहीत नसल्यामुळें तिनें नीनाँचीच कांही कुटाळी केली. त्यावर नीनाँ म्हणते, 'पण नीनाँ कदाचित् चांगलीही असेल. लोक कोणाचीही निंदा करतील. कदाचित् तुमच्या आमच्याबद्दलही तसेंच बोलत असतील. नंतर दोघींच्याही ओळखीचा एक मनुष्य भेटल्यामुळें तिला समजलें की आपण नीनाँशींच बोलत होतों. तेव्हां ती खूप संतापली, पण तिची स्वतःची वागणूक जवळ जवळ नीनाँसारखीच असल्यामुळें तिचा राग फार वेळ राहिला नाहीं आणि या दोघींची पुढें चांगली मैत्री झाली.

यावेळीं धार्मिक लोकांचे वजन फार होतें, इतकेंच नव्हे तर त्यांची एक गुप्त टोळी असून जरूर तर दंडेली करूनहि नास्तिकांचा नायनाट करण्याचा त्यांचा बेत होता, आणि पुष्कळ वेळां त्यांना कायद्याचा पाठिंबा मिळे. यामुळें त्यांना भिऊन वागणेंच जरूर होतें आणि निनॉं तशी वागली तर तिला दोष देतां येत नाहीं. तथापि तिनें आपला नास्तिकपणा सोडला नाहीं, परंतु त्याचा उघडपणें प्रचार करण्याऐवजीं तिनें आतां आपल्या घरीं फक्त कवींना बोलावून आपण आतां दुसऱ्या कशाकडे लक्ष देत नाहीं असें दाखवलें. पण तिच्याकडे जे लोक जमत असत ते पक्के नास्तिक होते. तिच्याकडे शिरकाव व्हावा म्हणून पुष्कळांनीं तिच्यावरच काव्यें करून तिला पाठवलीं, पण तिने त्यांची मुळींच कदर केली नाहीं. या सुमाराला तिच्याकडे प्रामुख्यानें दिसणारे सँ पॅव्हँ दे बॅरो, ब्वारॉबेर आणि शॅपेल हे चार नामांकित लेखक होते. त्यापैकीं पहिले तिघे तर म्हातारे होते आणि चौथ्यांतही शारीरिक आकर्षण बिलकुल नव्हतें. परंतु त्यांच्या लिखाणावरून ते नास्तिक होते यांत शंका नाहीं, आणि तेवढ्याकरतांच त्यांचा तिच्याकडे शिरकाव होत असे. अर्थात् निनॉंकडे येणाऱ्या सर्वांनीं तिच्यावर प्रेम केलेंच पाहिजे अशी रीतच पडून गेली होती आणि त्याप्रमाणें हेही तिला प्रेमकाव्यें करून पाठवीत. पण तिनें उलट प्रेम केलें तर तें स्वीकारण्याची त्यापैकीं एकाचीही ताकत नव्हती. तिच्याकडे पाहण्यापलीकडे तिच्या सौंदर्याचा त्यांना उपयोग नव्हता. यापैकीं सँ पॅव्हँ आणि ब्वारॉबेर यांना धर्मसंस्थांतून कांहीं प्राप्तीही होती, यामुळें त्यांची नास्तिकता प्रच्छन्न होती तरी खरी होती. 'सगळे सोंवळे लोक स्वर्गांत जात असल्यामुळें तो प्रदेश कोणाही बुद्धिवान माणसाला अत्यंत कंटाळवाणा वाटेल, असें नास्तिकाशिवाय कोण लिहूं शकेल ? आणि ब्वारॉबेर याने तसें लिहिलें नसलें तरी ध्वनित केलें होते खास.

दे बॅरो हा मात्र त्या सर्वांपैकीं उघडपणें आणि जोराने नास्तिकपणाचा प्रचार करीत असे. मरणानंतर काय होईल याला भिण्याचें बिलकुल कारण नाहीं, प्रत्येकानें यथेच्छ चैन करून घ्यावी, असें तो सांगत असे, आणि त्याप्रमाणें वागतही असे. शारीरिक सुख हेंच तो आपलें ध्येय समजत असे

आणि नीनाँचें या बाबतींत त्याच्याशीं पटत नसे, कारण तिला बुद्धीचें महत्व वाटत होतें, आणि या मुद्यावर शेवटीं त्यांचें भांडण होऊन तो तिच्याकडे येत नाहींसा झाला. ती अजून कच्ची आहे, आपली शिष्या व्हायला योग्य नाहीं, असें तो म्हणत असे.

नीनाँने त्याची बिलकुल खंत न बाळगतां त्याची जागा **शार्लव्हाल** नांवाच्या एका कवीला दिली. हा कपड्यांची वगैरे खूप ऐट करीत असे, अत्तरें वापरीत असे, आणि त्याची प्रकृति नाजूक आणि रंग फिका असल्यामुळें स्त्रियांना विशेष सहानुभूति उत्पन्न होऊन लहान मुलाप्रमाणें त्याचे लाड करावे असें वाटत असे. त्याने या युक्तीने अनेक स्त्रिया काबीज केल्या होत्या, आणि कोणतीही स्त्री आपल्याला वश झालीच पाहिजे अशी त्याची कल्पना झाली होती, आणि हल्ली आपला मोर्चा कोणत्या स्त्रीकडे वळलेला आहे हेंही तो मित्रांना पत्रांतून लिहीत असे. आपल्याला संभाषणाची अपेक्षा आहे, प्रेमाची नाहीं, हें त्याला समजवण्याचा नीनाँने पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तें त्याला कांही केल्या समजेना. इतके दिवस आपण मारा चालू ठेवला असतांही ती वश होत नाहीं याचें त्याला आश्चर्य वाटलें, आणि एकदां तर तिनें त्याला स्पष्टच सांगितलें कीं 'माझा स्वभाव लहरी आहे, माझी लहर लागेल तोंपर्यंत वाट पहा.' त्यानें पुष्कळ वाट पाहिली, परंतु त्याची शेवटपर्यंत निराशाच झाली.

शेवटीं आपल्यावरील धार्मिक लोकांचा पहारा बराच ढिला झाला असें पाहून तिने हळूंहळूं आपलें घर कवींपुरतेंच खुलें न ठेवतां पूर्वीच्या सर्व नास्तिक मित्रांना आव्हान दिले. परंतु हे सर्व नास्तिक लोक स्वैराचारी होते हेंहि खरें. याचवेळीं तिचा जुना मित्र ब्वारॉबेर याने **मार्की द व्हिलार्सो** याला तिच्याकडे आणून ओळख करून दिली, तो देखणा होता, शिकारीचा नाद असल्यामुळें त्याचें शरीर बांधेसूद होतें, आणि तो मोठा तत्वज्ञ नसला तरी धर्माचीं बंधनें त्यांने तोडली होतीं. खरें म्हटलें तर तो स्वभावानें हलकट होता. विवाहाच्या उद्देशाने त्याची एका मुलीशीं ओळख करून दिली असतां त्याने तिच्या प्रेमाचा गैरफायदा

घेऊन नंतर तिला झिडकारलीं, व मागाहून तिचें दुसऱ्या माणसाशीं लग्न झाल्यावर तिच्याशीं फिरून संबंध जोडला, आणि तिचें त्याच्यावर अजूनही प्रेम असल्यामुळें तिने त्याला विश्वासाने पत्रें लिहिलीं, तीं त्याने सर्वांना दाखवलीं, अर्थात हे सर्व प्रकार नीनॉंला त्यावेळीं माहीत नव्हते आणि त्याच्या सौंदर्यावर आणि बुद्धीवर मोहित होऊन तिचें त्याच्यावर प्रेम बसलें हें खरें. तिच्या प्रकृतीला शारीरिक आणि बौद्धिक सुखाची नेहमी जोड पाहिजे असे, आणि ती तिला येथे मिळाली. तिचें इतकें गाढ प्रेम बसलें की कोणी कांहीं जादूटोणा केला असला पाहिजे असेंच तिला क्षणभर वाटलें. या प्रेमामुळे तिने इतर सर्वांना हांकून दिलें आणि त्यांत तिला फुकटचा पैसा पुरवणारे ऑबिजू आणि मोरी यांचीही तिने परवा केली नाहीं. यामुळें तिचें घरदार नाहीसें झालें आणि तिला एकदम गरीबी आली. व्हिलासींलाही तिने दुसऱ्या कोणाकडे पाहिलेलें खपत नव्हतें, पण तिला ठेवावी कोठे याची त्याला पंचाईत पडली. त्याचें स्वतःचें घर पॅरिसमध्यें नव्हतें आणि तो नोकरीकरतां पॅरिसमध्यें राही तेव्हां त्याला राजवाड्यांतच जागा असे. परंतु तेथें नीनांला ठेवणें शक्य नव्हतें. तिला त्यानें आपलें गांवींही ठेवली असती, पण तेथें त्याची बायको होती. तथापि तेथून जवळच त्याचा व्हॅलिकिएरव्हिल नांवाचा एक मित्र होता. तो राजकारणांत अनेक भानगडी करून आतां स्वस्थ घरीं बसला होता. त्याच्याकडे त्याने नीनॉंला ठेवली आणि त्यानेही आपला सुटीचा वेळ तेथेच काढला. हा मित्र विद्वान होता, यामुळें मानसिक दृष्ट्याही तिला तेथे कंटाळा आला नाहीं.

नंतर हिंवाळ्यांत व्हिलासींला पुनः पॅरिसला जाणें भाग होतें, तेव्हां नीनॉंला कोठे ठेवावी हा प्रश्न पुनः उपस्थित झाला. दुसऱ्या कोणीही तिच्याकडे जाऊं नये अशी त्याची इच्छा होती, परंतु बायकोच्या भीतीमुळें दोघांनी एकत्र राहणेंही शक्य नव्हतें. शेवटीं त्याने तिला एक लहानसें घर पाहून दिलें, आणि त्याचा मित्र ब्वारॉबेर याचें स्वतःचे घर समोरच होतें, तें त्यानें विकायला काढलें होतें, परंतु त्याला स्वतःला जन्मभर तेथें रहायला पाहिजे होतें. व्हिलासीं याने ही अट कबूल करून तें घर विकत घेतलें आणि

तो तेथें राहूं लागला. तेथून नीनॉंच्या घराच्या खिडक्या दिसत असत, यामुळें त्याला नीनॉंवर पहारा ठेवतां येत असे. असूयेने त्याला इतकें बेजार केलें होतें कीं त्याला रात्रीं झोंप येत नसे आणि तो एकसारखा नीनॉंच्या खिडक्यांकडे पहात बसे. पण नीनॉंला ढोंग बिलकुल माहीत नव्हतें, तेव्हां त्याला संशय येण्यासारखें कांहींहीं घडणें शक्य नव्हतें. तथापि एका रात्रीं त्याला तिच्या निजायच्या खोलींत दिवा दिसल्यामुळें त्याने एक मनुष्य पाठवून ती आजारी आहे की काय अशी चौकशी केली. तिने आजारी नाहीं असें कळविलें, तेव्हां ती दिवा लावून कोणाला तरी प्रेमपत्र लिहीत असली पाहिजे असें त्याने ठरवलें. तो रागाने इतका आंधळा झाला कीं त्याने तिच्याकडे ताबडतोब जाऊन पाहण्याकरितां डोक्याला घालायला टोपी म्हणून उचलली तें एक चांदीचें भांडें होतें, आणि तें त्याच्या डोक्याला इतकें घट्ट बसलें की निघतां निघेना !

त्याला आपली शंका आली हें समजल्यार नीनॉं इतकी रागावली की तिने दिवा कां लावला होता याचें कोणतेंहि कारण ती सांगेना. यामुळें त्याला आणखी धक्का बसून तो आजारी पडला, तेव्हां मात्र नीनॉं घाबरली आणि त्याच्या मनांत आपल्याबद्दल विश्वास उत्पन्न करायला काय करावें हें तिला समजेना. शेवटीं तिनें आपलें सुंदर केंस स्वतःच कातरीने कापले आणि ते त्याला पाठवून दिले. ते पहांताच तिचें दुसऱ्या कोणावर प्रेम नाहीं अशी त्याची खात्री झाली. आणि आपला मूर्खपणाहि त्याच्या लक्षांत आला. तो ताबडतोब बरा झाला, आणि हें नीनॉंला कळतांच ती त्याच्याकडे गेली आणि त्याच्या बिछान्यावर शेजारी निजली. त्या बिछान्यावरच त्या दोघांनीं आठ दिवस काढले !

अर्थात् या गोष्टी लपून राहणें शक्य नव्हतें. त्या शेवटीं त्याच्या गांवाला बायकोपर्यंत पोंचल्या. परंतु ती बिचारी काय करणार ? तिने आपल्या मुलांच्या शिक्षणांत काळ काढण्याचें ठरवलें. ब्वारॉबेर मधूनमधून तिला भेटायला जात असे, आणि नवऱ्याची बातमी सांगे आणि तिची थोडीबहुत करमणूक करी, कारण गोष्टी सांगण्याबद्दल त्याची ख्यातीच होती. कांहीं दिवसांनीं व्हिलार्सोंने

नीनॉला त्याच घरांत ठेवण्याचा आग्रह धरल्यामुळें तिला तेथून निघून जावे लागलें.

या सुमाराला ( १६५३ ) नीनॉला व्हिलार्सोंपासून एक मुलगा झाला. त्याचें नांव लुइ फ्रांस्वा असें ठेवलें. या मुलासंबंधी अशी एक आख्यायिका आहे कीं मारेशाल देस्त्रे याने तो मुलगा आपला आहे असें म्हटल्यावरून चिठ्ठया टाकून तो कोणाचा हें ठरवलें. परंतु हा दुसरा मनुष्य या वेळीं ८५ वर्षांचा असल्यामुळें या आख्यायिकेंत मोठासा अर्थ दिसत नाहीं. या वेळेपासून नीनाँ स्वतःला व्हिलार्सोंची पत्नी समजू लागली आणि तिने आपल्या मुलाची शेवटपर्यंत उत्तम काळजी घेतली. हा मुलगा अनौरस होता तरीही फ्रान्समधील कायद्याप्रमाणें व्हिलार्सोला पुढें तो मुलगा आपला असें कायदेशीर रीतीनें ठरवून घेतां आलें. ( अनौरस मुलांना अशा रितीनें कायदेशीर दत्तक घेण्याची पद्धतच फ्रान्समधें आहे आणि हें मुलांच्या दृष्टीने फायदेशीर आहे.) हें त्याने १६९० सालीं केलें आणि आपलें वजन खर्च करून त्याला आरमारांतील जहाजाच्या कप्तानाची जागा मिळवून दिली आणि मृत्युपत्रांतही त्याला कायमचें उत्पन्न करून दिलें. नीनॉला आणखीही मुलें झाली होतीं असें कांहींनी लिहिलें आहे, परंतु तसें असेल तर तीं निदान मोठी होण्यापूर्वीच मेली असली पाहिजेत, कारण नीनॉने या मुलाची जशी काळजी घेतली तशी त्यांचीही घेतली असती, पण याचा कांहीं पुरावा मिळत नाहीं.

व्हिलार्सोचें तिच्यावरील प्रेम वाढत गेलें असे दिसतें. शेवटीं तिला आपल्या घरीं नेल्याशिवाय त्याला राहवलें नाही, परंतु यामुळे त्याची बायको जरी तेथून निघून गेली, तरीदेखील त्याने नीनॉला तिची जागा न देतां मुख्य घराला लागूनच असलेल्या एका सुंदर महालांत तिला ठेवलें. या महालांत जाण्यास आंतूनच रस्ता होता. नीनाँ येथें फार दिवस राहिली नाहीच, कारण एकांतांत तिला किती दिवस चैन पडणार? परंतु येथे तिने एका तलावांत स्नान केल्यामुळें तलावाला तिचें नांव मिळालें.

एकांताचा कंटाळा आल्यावर ती पुनः पॅरिसला आली आणि तिने पुनः आपले नास्तिक मित्र गोळा केले. तिला केवळ नास्तिक लोक नको होते, तर

ज्यांना चर्चा करून आपल्या मतांचें समर्थन करतां येईल असे लोक पाहिजे होते. या अवधींत व्हिलार्सोकडील तिचें लक्ष थोडें कमी झालें. आणि आपण केवळ शारीरिक सुखच देऊं शकतों, म्हणून ती आपला थोडाबहुत तिरस्कार करते कीं काय, अशी त्याला शंका येऊन थोडा रागही आला, आणि ती आपला वेळ नास्तिक चर्चेत घालवते हें त्याला बरें वाटेना. तथापि लोक त्या दोघांना अजून प्रेमीच समजत होते, आणि कांहीं लोक चेष्टेने असेंही म्हणूं लागले कीं नीनाँ आतां म्हातारी झाल्यामुळें एकनिष्ठ झाली आहे. पण ही केवळ चेष्टा होती. तिचें वय आतां ३५ वर्षांचें होतें आणि तिला एक मूलही झालें होतें, तरी तिच्या शरीराचा लवचीकपणा कायम होता आणि तिला चालतांना पाहून ती तरुण नाही असे म्हणण्याची कोणाची ताकद नव्हती.

आणि तिची चंचलताही अजून नाहींशी झाली नव्हती याचा तिला लवकरच अनुभव आला. तिचा जुना स्नेही सँतेव्हमाँ याने तिला एके दिवशीं एककविताबद्ध पत्र लिहिलें आणि विचारलें, तूं असतेस कोठे आणि करतेस काय ? एखाद्या जादूगाराने तुला पळवून नेऊन लपवून ठेविली आहे काय ? एकनिष्ठतेनें खरें सुख मिळत नाहीं. खऱ्या सुखाला वैचित्र्यच पाहिजे, वगैरे, वगैरे. तिचें मन वळण्याची फारशी जरूरी नव्हती, कारण तिलाही आतां व्हिलार्सोचा कंटाळा आला होता. याचें उत्तर म्हणून तिने त्याला बोलावून घेतलें, आणि हळू हळू तिचे सर्व स्नेही पुनः तिच्याभोंवतीं गोळा झाले, आणि या नास्तिकांच्या गटामुळें धार्मिक लोकांचें लक्ष पुनः तिच्याकडे गेलें.

व्हिलार्सोच्या मनांत असूयेने पुनः पेट घेतला आणि विशेषतः म्यॉसां नांवाचा तिचा एक स्नेही तिच्याशीं पुनः संबंध जोडूं पहात होता, त्याबद्दल त्याला विशेष तिटकारा होता. पण आतां नीनाँच्या मनांत व्हिलार्सोविषयी फारसें प्रेम बाकी नसल्यामुळें त्याची असूया तिला खपेना. तिने या दोघांपैकी एकालाहि दाद दिली नाहीं. हें पाहून व्हिलार्सोने आपला हलकट स्वभाव पुनः दाखवला आणि 'नीनाँ मला चिकटत होती, पण मीच तिला सोडली,' अशी बढाई मारूं लागला. नीनाँला हें कळलें तरी नाहीं, किंवा तिने त्याला क्षमा केली, कारण झिडकारलेले प्रेमी बोलतांना फारसा विचार करीत नाहींत हें तिला माहीत होतें.

खरें म्हटलें तर निनॉला प्रेमाचा विचार करायला फारसा वेळच नव्हता. धार्मिक लोकांच्या एका गटानें तिचा छळ करण्याचा बेत केला होता आणि यामुळें दुसरा कसलाच विचार तिला सुचणें शक्य नव्हते. या गटाची नेहमीची पद्धत म्हणजे अशी की त्यांना एखादा मनुष्य नकोसा झाला कीं त्यांनीं ओळखीच्या एखाद्या मॅजिस्ट्रेटकडे तक्रार करावी आणि त्याने त्याला त्यांच्या मर्जीप्रमाणें शिक्षा करावी. परंतु निनॉचें स्वतःचे वजन इतकें होतें की ही पद्धत तिच्या बाबतींत अमलांत आणण्याचें धाडस त्यांना झालें नाहीं. तेव्हां त्यांनीं प्रथम तिच्या विरुद्ध सांपडेल तेवढा पुरावा गोळा केला व दरबारांत व विशेषतः राणीसाहेबांजवळ वजन असलेला मॅरेशाल द ग्रॅमॉं नांवाचा एक सरदार होता त्याकडे तो पाठवून दिला. त्याने कांहीं इतर लोकांच्या मदतीनें राणीसाहेबांची खात्री करून दिली कीं निनॉच्या दुराचारामुळें सर्व शहराची विशेषतः तरुणांची नीति बिघडत आहे आणि या उघड स्वैराचारामुळें प्रत्यक्ष दरबाराचा अपमान होत आहे ! यामुळें आतां तिची गय करतां नये असें राणीच्या मनानें घेतलें आणि तिच्या तैनातींतल्या दोन दरबारी स्त्रीयांनी निनॉला पकडून स्वतः एका मठांत नेऊन पोंचवलें. अशाने आपण फ्रान्सला एका मोठ्या संकटांतून वांचवतों आहों असें राणीसाहेबांना वाटले खरें, पण त्याचा परिणाम मात्र विपरीत झाला. दरबारांतील सरदारांनीं या अन्यायाचा निषेध केला इतकेंच नव्हे तर त्यांनी मठावर हल्ला करण्याचा विचार केला आणि मठाच्या भिंतींची उंची वगैरे मोजण्याचा ते उपक्रम करूं लागले आणि यामुळें मठावर पहारा ठेवावा लागला.

पण तरी सुद्धां लोकांनी पहारेकऱ्यांवर हल्ला केला तर काय होईल, ही भीति होतीच. तेव्हां राणीसाहेबांनी विलंब न लावतां तिला त्या पश्चाताप झालेल्या वेश्यांच्या मठांतून उचलून दुसऱ्या एका लांबच्या मठांत नेऊन टाकली. तेथे तिला मित्रांना भेटण्याची परवानगी होती, यामुळे तिला जरा बरें वाटलें. पण तेथेही तिला लवकरच कंटाळा आला. ब्वारॅबेर आणि व्हिलार्सो तिला भेटायला गेले होते, पण तेवढ्याने काय होणार? परंतु लवकरच तिची आश्चर्यकारक प्रकाराने सुटका झाली.

६०२२

एके दिवशीं ती मानवी सुखाच्या अनिश्चिततेबद्दल विचार करीत बसली असतांना अकस्मात् दाराबाहेर गडबड ऐकूं आली, आणि तिच्या खोलीचें दार उघडून अर्धा पुरुषी आणि अर्धा बायकी असा चमत्कारिक पोषाख केलेली एक स्त्री आंत आली, आणि तिला म्हणाली, 'मी स्वीडनची राणी ख्रिस्तीन. ती स्वीडनहून रोमला जायला निघाली होती, आणि नीनॉंला मठांत कोंडून ठेवलें आहे असें ऐकून तिला भेटायला आली होती. नीनॉंच्या बुद्धिमत्तेची कीर्ति तिच्यापर्यंत पोंचली होती. आणि इतर बुद्धिमान लोकां-प्रमाणेंच नीनॉंबद्दल तिला अतिशय आदर वाटत होता. तिने नीनॉंकरतां नजराणा आणला होता आणि ती बराच वेळ नीनॉंजवळ गप्पा मारीत होती आणि या संभाषणावरून नीनॉंच्या बुद्धिमत्तेबद्दल तिची प्रत्यक्ष खात्री झाली. नीनॉंने आपली सगळी हकीकत तिला सांगून आपल्याला तुरुंगांत कां टाकलें आहे तेंही सांगितलें. मजबरोबर रोमला चल, असें राणी तिला म्हणाली. परंतु राणीची देखील ताबेदारी तिला पसंत नव्हती. ती म्हणाली मला पॅरिसच आवडतें आणि मला स्वातंत्र्य प्रिय आहे. राणी समजली आणि तिने अधिक आग्रह केला नाहीं. या मुलाखतीबद्दल एका लेखिकेने लिहिलें आहे कीं या राणीला फ्रान्समध्यें पुष्कळ स्त्रिया भेटल्या, पण तिने नॉनॉंशिवाय दुसऱ्या एकीबद्दलही असा आदर दाखवला नाहीं. आणि ती केवळ आदर दाखवूनच थांबली नाहीं. मठांतून निघाल्याबरोबर तिने फ्रान्सचा राजा चौदावा लुई याला पत्र लिहिलें कीं नीनॉंला तूं अधिक जवळ करशील तर तुझी चांगली करमणूक होईल लुईला तसल्या करमणुकीची जरूर नव्हती, तथापि त्याने धार्मिक गटाची परवा न करतां नीनॉंला तावडतोब मोकळीक दिली.

---

# ८

नीनाँ आतां तुरुंगांतून सुटली खरी, पण तिला फुकटचा पैसा पुरवणाऱ्या प्रेमी लोकांना तिने रजा दिल्याला आतां तीन वर्षें झालीं होतीं, यामुळें तिजजवळ पैसे मुळींच नव्हते. अशा स्थितींत तिने राजवाड्यापासून आणि धार्मिक गटापासून लांबच्या मोहल्ल्यांत एक लहानशी जागा भाड्यानें घेतली. तिचे खरे स्नेही कांहीं होते, पण ते बहुतेक गरीब होते. व्हॅलिकिएरव्हिल हा गरीब नव्हता, पण तिला पैसे देऊं करणें त्याला प्रशस्त वाटलें नाहीं आणि तिनेही कधी तशी अपेक्षा केली नाहीं. पण त्याने अप्रत्यक्ष रीतीने तिला मदत केली नीनाँचा मुलगा लुइ–फ्रांस्वा याची थोडीशी आबाळच झाली होती हें त्याच्या लक्षांत होतें. त्याने व्हिलासोंला बरीच मोठी रक्कम नडीच्या वेळीं उसनी दिली होती, व तिचें व्याज त्याला नियमाने मिळत असे. तें व्याज त्याने कायदेशीर रीतीने त्या मुलाच्या नांवावर करून दिलें. तो स्वतः अविवाहित होता आणि यापुढे तो लग्न करण्याचा संभव नव्हता, तेव्हा त्याने नीनाँच्या स्नेहाखातर तिच्या अनौरस मुलाची अशा रीतीने व्यवस्था करून दिली. पण त्यासंबंधी कागदांत त्याने कांहीं अटी घातल्या होत्या. मुख्य अट अशी की तो मुलगा जर त्याच्या स्वतःच्या अगोदर मेला, तर त्या पैशांतली निंमी रक्कम त्याच्या स्वतःच्या वारसांना मिळावी आणि नीनाँ

तेथपर्यंत जिवंत असून नास्तिकच राहिली असल्यास बाकीची निमी रक्कम तिला मिळावी. त्याचा अनुभव असा होता की स्त्रिया प्रथम कितीही नास्तिक असल्या तरी म्हातारपणीं त्या धर्मवेड्या होण्याचा संभव असतो, आणि नीनाँच्या बाबतींत तसें झाल्यास आपण ठेवलेले पैसे तिच्याकडून एखाद्या मठाला मिळावे हें त्याला नको होतें, आणि म्हणूनच त्याने अशी व्यवस्था केली होती.

नीनाँने मोठ्या कृतज्ञतेने या देणगीचा स्वीकार केला, पण आपण पुढें कदाचित् मठांत जाऊं अशी त्याला भीति वाटलेली पाहून तिला हंसूं आलें. तिला स्वतःला अशी कल्पनाही करणें शक्य नव्हतें. तिचे नास्तिक स्नेही तिच्या भोंवतीं होतेच, पण तिला आतां नास्तिकतेच्या बाबतींत त्यांची गरज नव्हती. आपल्या मतांकरतां तुरुंगवास भोगून आल्यावर तिचीं नास्तिक मतें आतां अधिक निश्चीत झालीं होतीं. तिचा एक स्नेही सँतेव्हमाँ हा, यानंतर लवकरच द्वंद्वयुद्ध केल्याच्या आरोपावरून तुरुंगांत गेला (१६५८) आणि प्रेमगीतें करणारा शार्लव्हाल हा बहुधा उत्तरेकडे आपल्या मालकीच्या ठिकाणींच रहात असे. तेव्हां हे दोघेही तिला फारसे भेटले नाहींत हल्लीं कॉंत द व्ही व्हॉन नांवाचा एक नवा मित्र तिच्याकडे येत असे, परंतु तिचें सर्व लक्ष या सुमाराला स्कॅरॉं नांवाचा एक कवि आणि त्याची बायको तिच्या शेजारींच रहात असत त्यांच्याकडे वेधलें गेलें.

या कवीशीं तिची ओळख फार जुनी होती ती जेव्हां मॅरिऑंकडे जात असे तेव्हांच तो तिला भेटलेला होता आणि त्यांची मैत्री अव्याहत चालू होती. त्याने १६५२ सालीं लग्न केलें आणि त्याच्या बायकोशीही नीनाँचे चांगलेच सख्य जमलें त्यांच्या घरीं मोठीच बैठक असे, आणि तेथें भाषण-चातुर्याची जणूं काय चढाओढ लागत असे. नीनाँचें आणि मॅदम स्कॅरॉंचें जमतें कसें याचें पुष्कळांना आश्चर्य वाटे. कारण मॅदम स्कॅरॉंचें सौंदर्य जरी नीनाँच्याच जातीचें होतें आणि यामुळें ती देखील नीनाँप्रमाणेंच सुखलोलुप असावी असें लोकांना वाटे, तरी हा केवळ भास होता. तिला कामवासना मुळीच नव्हती म्हटलें तरी चालेल, आणि ती प्रत्येक गोष्ट पूर्ण विचार करून,

हिशोबी धोरणाने करीत असे. म्हणजे तिचा स्वभाव नीनांच्या उलट होता आणि शिवाय ती धार्मिक होती. असें असूनहि दोघींचें प्रेम जमलें कसें ? त्या दोघीही संभाषणांत चतुर होत्या आणि धार्मिक दृष्टीने नीनाँ जरी दोषी असली तरी तिच्या बुद्धिमत्तेमुळें लोक दिपून जात, हेंच त्यांतलें इंगित होतें.

मॅदम स्कॅरॉं ही पुढें मॅदम मँतनाँ या नांवाने प्रसिद्ध झाली, पण तिच्या तरुणपणची फारशी माहिती उपलब्ध नाही. स्कॅरॉं हा अत्यंत कुरूप होता आणि त्यावर तिचें बिलकुल प्रेम नव्हतें, परंतु ती त्याच्याशीं पत्नी या नात्याने इमानाने वागली की नाहीं हें समजण्यास मार्ग नाही. ती धार्मिक होती हें खरें, पण धर्माचा उपयोग पापें धुवून टाकण्याकडे होत असल्यामुळें त्याने पापाचरणाला उत्तेजनही मिळतें, तेव्हां यावरून कांहीं सांगतां येत नाही. कोणी म्हणतात की तिने व्हिलार्सोला नीनाँकडून आपल्याकडे ओढून घेतला परंतु यांत मोठेंसें तथ्य नाहीं. आतां नीनाँचा व त्याचा संबंध तुटला होता आणि केवळ स्नेह राहिला होता. तो बरेच दिवस मॅदम स्कॅरॉंच्या भोंवतीं घिरट्या घालीत होता हें खरें, पण त्यांतून कांही निष्पन्न झालें असावें असें दिसत नाहीं. कांही असलें तरी नीनाँच्या स्वभावांत असूयेला स्थान नव्हतें, तेव्हां यानें त्या दोघींच्या मैत्रीला बाध येणें शक्य नव्हतें. परंतु या वेळींही व्हिलार्सोने आपल्या हलकटपणाचा आणखी पुरावा दिला. तो असा कीं त्याने मॅदम स्कॅरॉंची एक जवळजवळ नग्न तसबीर स्वतः काढली आणि ती या तसबिरीकरतां स्वतः आपल्यासमोर तशा स्थितींत बसली होती असें लोकांना भासवलें. याने अर्थातच त्याला कोणता लाभ झाला नाही. कोणी म्हणतात कीं तिने त्याला घालवून देऊन पुन्हा तोंड न दाखविण्याची ताकीद दिली, परंतु हें खरें नसले तरी तिने एका पत्रांत याबद्दल नीनाँकडे तक्रार केली आहे. पण वस्तुतः या तसबिरीवरून त्यांचे भांडण झाले असावें असे दिसत नाही. तो तिच्याकडे जातच होता आणि मॅदम स्कॅरॉं च्या शीलाबद्दल संशय घेण्यासारखा पुरावा बराच आहे. एकतर स्कॅरॉं हा प्रथम तिच्यावर केलेल्या आरोपांची चेष्टा करीत असे, परंतु नंतर तो स्वतःच तिच्याबद्दल तक्रार करूं लागला. स्त्रियांच्या चंचलतेबद्दल त्याने

या सुमारला एक कविता लिहिली आहे, इतकेंच नव्हे तर नीनाॅंला लिहिलेल्या एका पत्रांत त्याने आपल्याला जीव नकोसा झाल्याचें लिहिलें आहे. नीनाॅंने स्वतः एका पत्रांत लिहिलें आहे कीं तिने आपली खोली मॅदम स्कॅरॉं आणि व्हिलार्सो यांना वापरूं दिली होती. कांहीं असले तरी इतकें मात्र खरें की तिचा आतां व्हिलार्सोशीं संबंध नव्हता आणि तिला बिलकुल असूया वाटत नव्हती.

व्हिलार्सो हा तिच्या आयुष्यातला एक अपवाद होता. दुसऱ्या कोणावरही तिचें प्रेम इतका वेळ टिकलें नाही. या वेळचा तिचा एक प्रेमी कौंत द नांसे नांवाचा होता. त्याने लढाईवर जाण्यापूर्वी आपण परत येईपर्यंत नीनाॅंने आपली आठवण बाळगावी, म्हणजे इतरांना दूर ठेवावें, अशी इच्छा प्रदर्शित केली आणि तिने केवळ तोंडी कबुली दिल्यानें त्याचें समाधान न होऊन त्याने तिच्याकडून लेखी करार लिहून घेतला. तिनें तो दिल्यावर तो हा कागद सर्वांना दाखवीत सुटला. अर्थात् आपल्या शब्दावर त्याचा विश्वास नाहीं हें पाहून नीनाॅंला त्याचा अगोदरच राग आला होता आणि या वर्तनानें ती अधिकच चिडली. त्या कागदाची तिने बिलकुल पर्वा बाळगली नाही, आणि त्याचें जगांत हंसें झालें. तिला कोणी लेखी वचनें दिली तरी तिलाही त्यांची किंमत वाटत नसे. तिचे वय आतां वाढत चाललें होतें आणि आपलें तारुण्य फार दिवस टिकणार नाही याची तिला जाणीव होती. चाळिशी उलटण्यापूर्वीच काय तें सुख भोगलें पाहिजे हें ओळखून तिने आपली वागणूक ठेवली होती.

पुनः तिच्या भोंवतीं प्रेमीजनांचा घोळका जमला. एका लेखकानें असें लिहिलें आहे कीं "आपल्या मुलाला या बाबतींतलें व्यवहारज्ञान असावें असें एखाद्या दरबारी मनुष्याला वाटलें तर तो त्याला नीनाॅंकडे पाठवीत असे (आपल्याकडेही शिक्षण पूर्ण होण्याकरतां, **देशाटनं पंडितमित्रता च वारांगना राजसभाप्रवेशः**, हे मार्ग सांगितलेले आहेत) प्रेमी जनांनीं कसें वागावें, कसें बोलावें, याचें उत्तम शिक्षण अशा मुलांना तिच्याकडे मिळत असे. अमुक स्त्रीवर आपले प्रेम बसलें आहे, तर आतां कसें करावें असें

एखाद्याने तिला विचारलें तर ती पुढीलप्रमाणें उपदेश करीत असे. 'प्रथम हें लक्षांत ठेवा कीं स्त्रियांचें सर्वांत अधिक प्रेम स्वतःच्या सौंदर्यावर असतें. त्यांतलें थोडेसे तुमच्या वांट्याला यावें अशी तुमची इच्छा असेल तर हें सदैव लक्षांत बाळगून, तिच्याशीं अत्यंत आदबीने, कळकळीने, बोललें पाहिजे, ती सांगेल तें तें केलें पाहिजे, आणि तिच्या उपयोगी पडायला नेहमीं तयार राहिलें पाहिजे. तिच्याजवळ बोलतांना स्वतःबद्दल फारसें बोलूं नका, तिच्याबद्दलच बोला. तुमच्या प्रेमाचें वर्णन ऐकण्यापेक्षा ती आपला स्वतःचा चेहरा किती सुंदर आहे हेंच ऐकायला अधिक उत्सुक असते. अशा रीतीने तिचें प्रेम संपादन केल्यावर तिने जर तुम्हाला माळ घेतली तर ती आपलें सर्व आयुष्य तुम्हाला विश्वासाने अर्पण करते आहे असे समजून तिच्याशीं वागा.' "

अशा तऱ्हेचा उपदेश करण्याबद्दल तिच्या कंपूत तिची चेष्टा देखील होत असे. अशा रीतीने ती सर्व तरुणांना आपल्याकडे ओढून घेते, आणि यामुळें गांवांतल्या इतर प्रेमलोलुप स्त्रियांची गैरसोय होते अशा अर्थाची कविताही एका कवीने लिहिली. नीनॉला चेष्टेचीही परवा नव्हती, आणि या इतर स्त्रियांच्या तक्रारींचीही नव्हती. त्या वेळचे कांही प्रसिद्ध तरुण आपण तिच्या शाळेंत शिकल्याची बढाई मारीत असत. कांही लोकांनी अर्थातच अशी शंका प्रदर्शित केली आहे की नीनॉ फक्त प्रेमाचें व्याख्यानच देऊन थांबत असे, की प्रत्यक्ष प्रयोगही करीत असे? ही शंका कांही अस्थानीं नव्हती, परंतु नीनॉसारख्या अनुभवी स्त्रिचें या नवशिक्यांकडून समाधान होण्यासारखें नव्हतें असें दिसतें. या सुमाराचा तिचा एक प्रेमी गुर्व्हिल हा या तरुणांइतका देखणा खास नव्हता, पण अत्यंत चतुर आणि कर्तबगार होता. हा मूळचा 'ला रॉशफूको' या घराण्याचा नोकर, पण त्यांना गरिबी आल्यावर तो नोकराऐवजी स्नेही झाला आणि हळूहळू चढत जाऊन शेवटीं एक बडा सरदार झाला, आणि ला रॉशफुकोच्या एका मुलीशी त्याने गुप्तपणें लग्नही केलें होतें. कामाच्या गडबडीमुळें त्याला बायकांकडे लक्ष द्यायला वेळही नव्हता, आणि तो स्त्रियांच्या प्रेमाची बढाई मारणाराही नव्हता.

नीनाँ त्याच्या पुष्कळ उपयोगी पडली आणि तिचा व त्याचा स्नेह जरी कायम होता, तरी त्यांचा प्रेमसंबंध फार दिवस टिकला नाहीं.

या गुर्व्हिलला एकदां पळून जाण्याचा प्रसंग आला असतां त्यानें आपल्या पैशाचे दोन भाग करून ६०००० फ्रँक एका धार्मिक अधिकाऱ्याच्या ताब्यांत दिले, आणि तितकीच रक्कम नीनाँकडे ठेवली. पुढें तो परत आल्यावर त्या अधिकाऱ्यानें ती ठेव नाकारली, परंतु नीनाँनें मात्र त्याची रकम त्याला ताबडतोब परत केली. आणि नीनाँ यावेळीं पैशाच्या बाबतींत अत्यंत प्रामाणिक होती, हें अनेकांनीं नमूद करून ठेवलें आहे.

पण तिला आतां कोणीतरी पैसेवाला प्रेमी गांठणें जरूर होतें. यावेळीं तिला एक फूरो नांवाचा श्रीमंत मनुष्य भेटला. त्यानें पैसे लबाडीनें मिळवलेले होते हें कळल्यामुळें तिला त्याच्याकडून बरेंच पैसे काढतां आले, परंतु त्याच्या मांडीला एक गळूं झालें होतें हें पाहून तिनें त्याला आपल्याकडे यायची बंदी केली, आणि त्यानें कितीही करुणा भाकली तरी तिनें ऐकलें नाहीं.

अशा रीतीनें पैशाची व्यवस्था लागल्यामुळें तिला इतर गोष्टींकडे लक्ष द्यायला वेळ सांपडला. ज्या सुशिक्षित स्त्रियांच्या कृत्रिमतेची चेष्टा करण्याकरतां मॉलिएरनें पुढें एक नाटक लिहिलें, त्यांचा याच वेळीं पॅरिसमध्यें गाजावाजा झाला होता, आणि नीनाँ त्यांच्यांत मिसळत असे यांत शंका नाहीं. तथापि ती स्वतः त्यांच्याप्रमाणें कधीही हास्यास्पद झाली नाहीं. मॅदम कॉरन्युएल नांवाची तिची मैत्रीण वारल्यावर एका कवीनें तिच्या थडग्यावर लिहिण्याकरतां एक कविता लिहिली, आणि तिचा शेवट असा केला कीं 'तिच्या अंगांत किती गुण होते हें थोडक्यांत सांगायाचें म्हणजे नीनाँला तिच्याविषयीं आदर वाटत होता इतकें सांगितलें कीं पुरे.'

नीनाँही पुष्कळवेळां कविता लिहीत असे, तथापि तिला आपल्या कवित्वाचा अभिमान नसल्यामुळें त्यांवर तिची सही देखील असे असा नियम नाहीं, यामुळें त्यांचा संग्रह कोणीं केलेला नाहीं. तिच्या कविता कधीं लांब नसत, बहुधा चुटकेवजा असत. व्हेर्सायच्या राजवाड्यांतील बागेचें वर्णन करण्याकरतां बोव्हिलिए नांवाच्या कवीनें एक गचाळ कविता लिहिली, तेव्हां

त्याला गप बसवण्याकरतां नीनाँने, 'त्या बागेंत कलेने निसर्गावर कसा विजय मिळवला आहे हें आम्हाला डोळ्यांनी पाहूनच जास्त चांगलें समजेल, तुझी कविता कडक हिंवाळ्यापेक्षाही त्या बागेला अधिक बाधक आहे,' अशा अर्थाची एक कविता लिहिली. सारांश, तिने कधीही कीर्ति मिळवण्याकरतां कांही लिहिलें नाही. तिच्या लिहिण्यांत कांही हेतु असे. एखाद्या मूर्खाला उत्तर देण्याचा किंवा कांही प्रचार करण्याचा उद्देश असे.

उदाहरणार्थ तिला आतां जरी गुरु म्हणून कोणाही तत्वज्ञाची जरूर नव्हती, तरी तिला तात्विक चर्चा प्रिय असल्यामुळें ती अशा लोकांना नेहमीं जवळ करी. त्याप्रमाणें या सुमाराला कोणीं तरी लुई द लेक्लाश नांवाच्या मनुष्याला तिच्याकडे आणला. तो बोलून जरी लोकांवर छाप पाडीत असे, तरी खऱ्या विद्वत्तेपेक्षां त्याला घमेंडच जास्त होती हें नीनाँने ओळखलें. त्याने कांही पुस्तकें लिहिलीं होतीं आणि बरेच श्रीमंत विद्यार्थीही जमवले होते. नीनाँने त्याची फजीति करण्याचा बेत केला. तो ॲरिस्टॉटलच्या मतांचा प्रचार करीत असे आणि नीनाँला शिकवण्याची इच्छा त्याने दर्शवतांच नीनाँ कबूल झाली, आणि कांही दिवसांनी आपल्या कांही स्नेह्यांना अगोदर इशारा देऊन ठेवून त्याला त्यांची ओळख करून देण्याकरतां बोलावलें. आपण ॲरिस्टॉटलचें तत्वज्ञान कोष्टकांत बसवलें आहे अशी त्याला घमेंड होती, तेव्हां तो आल्यावर तेथें जमलेल्या मंडळीने प्रेमावर चर्चा करण्यास सुरवात केली. लेक्लाशने लगेच आपलीं कोष्टकें काढून एका ओळींत प्रेमाची व्याख्या सांगितली. यावर नीनाँ स्वतः कांही बोलली नाही, पण इतरांनी त्याची चेष्टा करण्यास सुरवात केली. 'बस, एका ओळींत प्रेमाची व्याख्या !' 'इतका मोठा विषय एका ओळींत संपवला ! वाहवा ! मग नृत्यावद्दल आपलें काय म्हणणें आहे ? त्याचेंही आपण कोष्टक बनवलेंच असेल,' आपली चेष्टा होत आहे याचा त्याला अजूनही पत्ता नव्हता. तो म्हणाला बनवलें नाही, पण उद्यां बनवून आणतों. तें वाचलें की कोणालाही चांगलें नाचतां येईल. यावर जेव्हां चांगलाच हशा पिकला, तेव्हां त्याच्या लक्षांत आलें की हे लोक आपली टर करींत आहेत. तो संतापून जो निघून गेला तो पुनः आला नाही. तथापि

जातां जातां तो नीनाँला सांगून गेला, 'मी आतां आपला एक शिष्य तुझ्याकडे पाठवीन, तो तुला शिकवील.'

नीनाँला या शिष्याची मुळीच जरूर नव्हती, पण तो शिष्य सांगितल्याप्रमाणे आलाच, तेव्हां तिचा नाइलाज झाला. त्याचें नांव फेलिक्स द जुव्हनेल. हा उच्च घराण्यांतला होता आणि त्याने कांहीं पुस्तकेंही लिहिलीं होतीं, पण कीर्ति त्याच्या वांट्याला आली नव्हती. जी कीर्ति अंगच्या गुणांनी मिळत नाहीं ती लटपटी करून मिळविण्याची त्याची इच्छा होती हें नीनाँने प्रथमच ताडलें. त्याचें वय या वेळीं चाळीसच्या पुढें होतें आणि त्याला बायको आणि पांच मुलें होतीं. तथापि तो तरुणाची ऐट आणून नीनाँकडे जमलेल्या स्त्रियांवर छाप बसवण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां त्यांनी नीनाँला न कळवतांच त्याची फजीति करण्याचा बेत केला. तो अमुक दिवशीं पुन्हा येणार आहे असें पाहून नीनाँकडे त्यांनी मोठी सभाच भरवली. आणि तो येतांच त्याची स्तुति करण्यास सुरवात केली. तो चढून गेला असें पाहून त्यांनी त्याला भाषण करण्यास सांगितलें. त्याने आपल्या गुरूच्याच पोतडींतल्या कांहीं गोष्टी सांगितल्या. पुन्हां सर्वांनी त्याची वाहवा केली. यामुळे तो फारच फुशारला आणि एका तरुणीला एका बाजूला बोलावून त्याने तिच्या कानांत कांहीं सांगण्याचें मिष करून तिचें चुंबन घेतलें. तिने ताबडतोब त्याच्या मुस्कटांत दिली. हें पाहून सर्व स्त्रियांनी त्याच्यावर हल्ला केला. एकीने टांचणी टोंचली, दुसरीने थप्पड मारली, हें पाहून नीनाँ त्याला मदत करण्याकरतां धांवली आणि त्याला जेमतेम त्यांच्या तावडींतून सोडवून त्याला पळून जायला वाट करून दिली आणि तो चडफडत आणि सूड घेण्याची धमकी देत निघून गेला. नीनाँ विद्वानांना नेहमी आश्रय देत असतां या दोघांची तिने अशी फजीति कां होऊं दिली? याचें कारण ते ढोंगी होते हें तिनें ताबडतोब ओळखलें होतें आणि तिला ढोंग खपत नव्हतें. कदाचित् तिला ज्यांनीं छळलें होतें त्या धार्मिक लोकांचेच हेर आहेत अशीही तिला शंका आली असावी. हे दोघेही व्याख्यानांतून आणि लेखांतून धर्माच्या व नीतीच्या गप्पा मारीत असत. आणि खाजगी जीवनांत मात्र स्त्रियांच्या मागें लागत. तेव्हां त्यांबद्दल कोणालाही आदर वाटणें शक्य

नव्हतें. जूव्हेनेलने खरोखरच म्हटल्याप्रमाणें सूड घेण्याकरितां नीनाँसारख्या स्वतंत्र वृत्तीनें राहणाऱ्या स्त्रियांची खऱ्या सनातनी वृत्तीने निंदा करणारा एक लेख प्रसिद्ध केला (१६५९). अशा स्त्रियांपैकीं नीनाँच प्रमुख असल्यामुळें तिलाच उद्देशून तो लेख होता यांत शंका नाहीं. पुरुषांपेक्षां स्त्रियांचे हक्क तिळमात्र कमी असतां नये याकरतां ती भांडली होती आणि आतां तिला बऱ्याच शिष्यिणी मिळाल्या होत्या. त्यांनीं धर्माच्या शृंखला तोडल्या होत्या आणि पुरुषांची गुलामगिरी नको म्हणून लग्न केल्याशिवाय स्वतंत्र रहात होत्या. पैशाकरतां लग्न करण्यापेक्षां यांत त्यांना बिलकुल कमीपणा वाटत नव्हता. तरीदेखील विवाह करणारांना सोडलग्नाची सवलत असावी असें त्या म्हणत असत. मातृपद स्त्रियांना मिळालें पाहिजे, पण ते लग्नाच्या गुलामगिरींत नव्हे तर स्वेच्छेने स्वातंत्र्यांत मिळालें पाहिजे असें त्यांचें मत होतें तथापि विवाहित कुटुंबांत देखील पतिपत्नीचे हक्क सारखे असले पाहिजेत असेंहि त्या जोराने प्रतिपादीत असत. त्यांच्या बाजूला अनेक कवि आणि तत्ववेत्ते मिळाले होते आणि अशा रीतीने त्यांच्या पक्षाला जोर आला होता.

जूव्हेनेलने या पक्षावर जेव्हां जोराचा हल्ला केला, तेव्हां अर्थातच नीनाँ स्वस्थ बसली नाहीं. तिनेही लेखणी हातांत घेतली, पण ती तात्विक वादविवादाकरतां नव्हे. तिने जूव्हेनेल व लेक्लाश यांचीं शद्बचित्रें मोठ्या कौशल्याने रेखाटून त्यांची स्त्रियांनी केलेली फजीति अशा रीतीने वर्णन केली कीं त्या दोघांना कोठें तोंड दाखवायला जागा राहिली नाहीं.

तरी देखील तिचे मन स्वस्थ झाले नाहीं, पण याच सुमाराला तिला एका मोठ्या लेखकाचा पाठिंबा मिळाला. मॉलिएरची व नीनाँची पूर्वीच ओळख असून त्यांनीं हें संगनमताने केलें होतें कीं काय हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. विद्वत्तेचें निष्कारण फाजील प्रदर्शन करून हास्यास्पद होणाऱ्या स्त्रियांची चेष्टा करण्याकरतां मॉलिएरनें जें 'प्रेस्यज रिडिक्यूल' नांवाचें नाटक लिहिलें, तें याच सुमाराला रंगभूमीवर आलें. कोणाला वाटेल कीं नीनाँच्या भोंवतींही त्यावेळच्या विदुषी गोळा झाल्या असल्यामुळें ही कदाचित् त्यांचीच चेष्टा असेल. पण मॉलिएरने स्वतः नाटकाच्या प्रस्तावनेंत याचा खुलासा केला

आहे. केवळ विदुषींची त्याने चेष्टा केलेली नाहीं, तर ढोंगी प्रदर्शन करणाऱ्या विदुषींचीच फक्त चेष्टा केली आहे. या विदुषी धर्माचे ढोंग करणाऱ्या होत्या, तेव्हां त्या नीनाँच्या बाजूला नव्हत्या आणि यामुळें नीनाँच्या पक्षाला अप्रत्यक्ष पाठिंबा मिळाला. याचा आणखी एक पुरावा म्हणजे धार्मिक लोकांचें दरबारांत वजन असल्यामुळे दरबारच्या हुकुमाने या नाटकाचे प्रयोग कांहीं दिवस बंद करावे लागले होते. केवळ शिकलेल्या स्त्रियांचीच ती चेष्टा असती, तर त्यांत राजाला मधें पडण्याचें कांहीच कारण नव्हतें, कारण तो स्त्रीशिक्षणाचा पुरस्कर्ता नव्हता.

मॉलिएरने बरीच खटपट करून वशिले लावून शेवटीं दरबारचा हुकूम रद्द करवला आणि प्रयोग पुनः सुरू झाले. पण धार्मिक पक्ष तरीही डगमगला नाही. त्यांनीही एका भाडोत्री लेखकाकरवीं मॉलिएरची आणि नीनाँची बदनामी चालवली. नीनाँ मूर्ख आहे असें त्याने म्हटलें असतें तर तो स्वतःच मूर्ख ठरला असता, तेव्हां तसें न म्हणतां त्याने असें लिहिलें कीं नीनाँ एके काळीं कदाचित सुंदर असलीच, तरी आतां ती मुळीच सुंदर राहिली नाहीं.

नीनाँने या मूर्खपणाची मुळींच परवा केली नाहीं, किंवा तिला उत्तर द्यायला वेळ नव्हता असें म्हटलें तरी चालेल. कारण या वेळीं तिच्या राहत्या घराचा मालक अडचणींत आल्यामुळें तें घर विकायला पहात होता आणि यामुळें तिची फारच गैरसोय होणार होती. तें घर स्वतःच विकत घेतां आलें तर पहावें अशी तिची खटपट होती, पण पुरेसे पैसे नव्हते. या वेळीं एक स्नेही तिच्या मदतीला धांवून आला. हा तिच्याकडे नेहमी जात असे पण यापलीकडे त्यांचा संबंध नव्हता, आणि नीनाँने अशी कांही अट कबूलही केली नसती. पण त्यांतून अशी तोड निघाली कीं त्यानें आणि नीनाँने भागीदारीने घर विकत घ्यावे, नीनाँने जन्मभर तेथें रहावें, आणि नंतर तें घर त्याला मिळावें, किंवा तो अगोदर मेल्यास तें नीनाँला मिळावें. यामुळें तिची राहण्याची कायमची सोय झाली. अर्थात् तिच्या वर्तीने निंमी किंमत तिचा या वेळचा पैसे देणारा प्रेमी लेऑं फूरों याने दिली.

आतां घर तिचें स्वतःचें झाल्यामुळें त्यांत पाहिजे तशा सोयी करून घेण्यांत तिचा बराच वेळ गेला आणि हें सगळें होतें तोंपर्यंत मॉलिएरचें नवीन

नाटक 'एकॉल दे मॅरी' (नवऱ्यांची शाळा) हें रंगभूमीवर आलें होतें. यांत लग्नासंबंधीं मुलींवर बापांचा जो नेहमी जुलूम होत असतो, त्याचा निषेध केला होता, म्हणजे स्त्रियांच्या स्वातंत्र्याचाच तो पुरस्कार असल्यामुळें नीनॉंला तें फार आवडलें. या सुमाराला नीनॉंची मॉलिएरशीं ओळख होऊन त्यांच्यांत स्नेह उत्पन्न झाला होता असा पुरावा सांपडतो. या सुमाराला नीनॉंचा स्नेही सँतेव्हमॉं याने लिहिलेले एक खाजगी पत्र राजाच्या राजनीतीवर टीका करणारें असें गुप्त हेरांना सांपडल्यामुळें त्याला देश सोडून जावें लागलें होतें, यामुळें नीनॉंला अतिशय वाटलें होतें. त्याची जागा मॉलिएरने घेतली असें जरी म्हणतां येत नाही, तरी या दोघांचीं बरींच मतें जुळतीं असल्यामुळें तिला मॉलिएर अधिक प्रिय झाला यांत शंका नाहीं. पण या दोघांपैकी एकही तिचा प्रेमी नव्हता. तिला फक्त त्यांची बौद्धिक मैत्रीच पाहिजे होती. आणि नीनॉं आणि मॉलिएर या दोघांना धार्मिक ढोंगावर हल्ला करण्यांतही एकमेकांची मदत झाली. नीनॉंच्या घरीं मॉलिएरचा शिरकाव झाल्यामुळें त्याला त्या समाजाचें निरीक्षणही करण्यास मिळालें, आणि नाटकें लिहिण्यास त्याचा उपयोग झाला. त्याचें यापुढचे नाटक 'एकॉल दे फॅम' (पत्नींची शाळा) हें याची साक्ष देतें. विवाहाची दुसरी बाजू यांत दाखवली आहे, आणि नीनॉंकडे नेहमी येणाऱ्या बिदुषींशीं मॉलिएरची ओळख झाल्याचें या नाटकावरून उघड दिसतें

अशा रीतीने मॉलिएर आणि नीनॉं यांचें सहकार्य सुरू झालें. १६६४ च्या प्रारंभी मॉलिएरने जेव्हां धार्मिक भोंदूंचीं बिंगें बाहेर काढण्याकरतां 'तार्त्युफ' हें नाटक (गुरुबाजी हें याचें भाषांतर आहे. र. धों. क.) लिहायला घेतलें, आणि त्याने प्रथम नीनॉंला त्याची स्थूल कल्पना दिली, त्यावेळीं नीनॉंने अशा भोंदूचें बरोबर चित्र त्याला दाखवलें. त्या सुमाराला लेक्लाश व जुव्हनेल यांची तर तिने फजीति केलीच होती; तसाच आणखी एक मनुष्य तिच्या नादीं लागला होता. याचा धंदा पाद्र्याचा आणि नांव ॲबे द पॉंस. तो इतका निर्लज्ज होता की आपण नीनॉंच्या नादीं लागलों हें ठीकच आहे असें दाखवण्याकरतां तो सेंट पॉल आणि सेंट फ्रान्सिस यांचीं उदाहरणें देत असे.

तालमां ने लिहिलें आहे की या ॲबेची नीनाँने मॉलिएरशीं ओळख करून दिली, आणि त्याचें बरोबर चित्र त्याने नाटकांत दाखवलें आहे. हें नाटक त्याने प्रथम राजाला वाचून दाखवलें आणि नंतर नीनाँच्या बैठकींत वाचून दाखवलें. राजा जरी सुखलोलुप होता, तरी तो धार्मिक कंपूला भीत असे, आणि तें प्रथम जरी राजवाड्यांतल्याच एका समारंभाच्या प्रसंगीं करून दाखवण्यांत आलें ( व्हेर्साय येथील राजवाड्यांत एक पुऱ्या आकाराचें सुसज्ज नाटकगृह आहे. र. धों क. ), तथापि या नाटकापायीं मॉलिएरला पांच वर्षेपर्यंत धार्मिक कंपूच्या निंदेला तोंड द्यावें लागलें. अर्थात नीनाँच्या कंपूचा त्याला पाठिंबा होता, पण नीनाँने प्रत्यक्ष या वेळीं कांहीं केलें असल्याचा पुरावा सांपडत नाहीं. ती आणखी एकदां प्रेमांत सांपडल्यामुळें तिला दुसरें कांहीं सुचत नसावें, असा तर्क कांहीं इतिहासकारांनीं केला आहे, पण त्यांत ज्या मनुष्याचें नांव दिलें आहे, तो या वेळीं फक्त बारा वर्षांचा होता! तेव्हां या लेखकांनीं पुरावा न मिळाल्यामुळें कल्पनेला वाव दिला आहे इतकाच त्याचा अर्थ आहे.

यानंतर तिचें नांव सांपडतें तें १६६७ सालच्या एका खटल्यांत, आणि तें सुद्धां परोपकार करूं गेल्यामुळें. तिचा एक जुना प्रेमी अलेक्झांडर देल्बेन हा मूळचा श्रीमंत, पण बरीच उधळपट्टी करून गरीब झाला होता, तेव्हां नीनाँने त्याला पैसे उसने दिले. पण तेवढ्याने तो वांचला नाहीं, आणि शेवटीं त्यावर फिर्याद होऊन जप्तीचे वारंट आलें. त्याने नीनाँला तारण म्हणून आपल्या इस्टेटीचा कांहीं भाग तोडून दिला होता, आणि सर्वच जप्त होईल या भीतीनें नीनाँ त्याचा कब्जा घेऊन बसली. तो कब्जा उठवण्याकरतां तिच्यावर फिर्याद झाली, आणि तो तिला सोडावा लागला. तरीदेखील तिनें देल्बेनला पुढेंही मदत केली, इतकेंच नव्हे तर त्याने तिचा मित्र सँतेव्हमाँ याकडूनही कांहीं पैसे घेतले होते, आणि ते तो परत मागत होता, कारण तो परदेशांत अगदी अन्नान्नदशेला आलेला होता, त्यांतही नीनाँ मधें पडली आणि मीच तुला कांहीं पैसे पाठवीन असें त्याला कळवलें. पण ते बरेंच दिवस न पाठवल्यामुळें त्यानें चिडून एक पत्र लिहिले, तेव्हां तिने ते पैसे पाठवून त्याला एक खरमरीत पत्र लिहिले आणि एकंदर रकमेंत त्याला बरीच

सूट द्यायला लावून तें भांडण मिटवलें. याचा परिणाम एकंदरींत बरा झाला नाहीं. या पैशाच्या भानगडी त्यांच्या स्नेहाच्या आड आल्या आणि त्यांचा पत्रव्यवहार यापुढें फारसा सांपडत नाही, पण त्याने एका स्नेह्याला लिहिलेल्या पत्रांत नीनाँबद्दल चौकशी केलेली आढळते.

या पैशाच्या भानगडी संपतात तों नीनाँ खरोखरच पुनः प्रेमांत सांपडली, आणि तेंही एका तेवीस वर्षांच्या तरुणाशीं. त्याचें नांव शार्ले, मार्की द सेव्हिन्ये. याचा चेहरा बायकी, शरीर सडपातळ, आणि डोळे कामालस होतें असें वर्णन सांपडतें. पूर्वीं ज्या मार्की द सेव्हिन्येचें नांव तिचा प्रेमी म्हणून आलें आहे, त्याचा हा मुलगा. बापाच्या आणि नीनाँच्या प्रेमामुळें झालेलें दुःख आई विसरत होती, तोंच मुलानें आपलें प्रेम नीनाँवर बसल्याचें तिला कळवलें. अर्थात ती धार्मिक असल्यामुळें तिला मोठाच धक्का बसला, तथापि तिने याचा फारसा बभ्रा केला नाहीं. हें प्रेम फार वेळ टिकणार नाहीं हें तिला पूर्वीच कळलें होतें.

नीनाँचें वय ५१ वर्षांचें होतें, तेव्हां हा तेवीस वर्षांचा तरुण आपल्यावर प्रेम करतो हें पाहून तिला थोडा अभिमान वाटला यांत नवल नाहीं, आणि त्याला स्वतःला अभिमान मुळींच नसल्यामुळें तो तिच्या हातांतलें खेळणेंच झाला. त्याने इतर स्त्रियांकडे पाहिलेलें तिला खपत नसे. याबद्दल तिने एकदां त्याच्या मुस्कटांतही मारली, आणि नंतर लगेच त्याचें चुंबन घेतलें. तिने त्याच्या मनांत थोडा स्वाभिमान उत्पन्न करण्याचाही प्रयत्न केला, पण फुकट. रॅसीनच्या नाटकांत काम करणाऱ्या एका तरुण नटीवर त्याचें प्रेम होतें, हें ऐकून तिने त्याला लिहिलेलीं सर्व पत्रें नीनाँने मागितलीं आणि त्याने तीं मुकाट्यानें आणून दिलीं. ही हकीकत त्याच्या आईला कळल्यावर तिनें तीं पत्रें त्याला परत आणायला लावलीं, तथापि एका महिन्यांत नीनाँलाच जर त्याचा कंटाळा आला नसता, तर तो आईच्या खटपटीने तिच्या कचाट्यींतून इतक्या लवकर सुटताना. इतका शिळपट मनुष्य आपण कधींही पाहिला नाहीं, असें तिने स्वतः त्याचें वर्णन दिलें आहे. या प्रकरणामुळें ती नटीही रागावली, आणि त्याच्या दोन्ही प्रेमिका

एकदम दूर झाल्या. पण त्याला तें मोठेंसें जाणवेल अशी त्याची प्रकृति नव्हती.

नीनॉंचा हा शेवटचाच प्रेमी. यानंतर नीनॉं केव्हाही प्रेमांत सांपडली नाहीं. अर्थात् निंदा करणाऱ्या इतिहासकारांनी ती मरेपर्यंत कामलोलुप होती असें लिहिलें आहे. नीनॉं मरतेवेळीं ८५ वर्षांची होती, हें लक्षांत घेतां यांत कांहीं तथ्य असेल असें दिसत नाहीं. तथापि तिला स्वतःला जर या गोष्टीचा कंटाळा आला नसता, तर तिनें केवळ वयामुळें प्रेमावर बहिष्कार घातला नसता असें ती स्वतः म्हणत असें. ती अजूनही सुंदर होती यांत शंका नाहीं, तरीपण आतां तिचें मन अधिक गंभीर विषयांकडे वळत होतें आणि या तरुणाला घालवून दिल्यावर तिनें स्वतःच टिकाऊ सौंदर्याचें वर्णन करणाऱ्या सँतेव्हमॉंला लिहिलें कीं माझ्या सौंदर्याला आतां फारसें महत्व नाहीं, इतर गुणांचें आतां मला अधिक महत्व वाटतें. आणि हें खरेंच असले पाहिजे, कारण तिला ढोंगाची मोठी चीड होती, आणि हें खरें नसतें तर तिनें कधींही तसें लिहिलें नसतें.

---

# ९

नीनॉला यावेळीं पैसे पुरवणारा लेऑं फूरों नांवाचा एकच मनुष्य होता, परंतु कोणीही पैसे देऊन आपल्या शरीरावर मालकी सांगावी हें नीनॉला पसंत नव्हते. आपल्याला आतां त्याच्याकडून पुरेसे पैसे मिळाले आणि आपल्या पुढच्या चरितार्थाकरितां आपल्याला आतां कोणाची गरज नाहीं, असें पाहून तिने त्याला घालवून दिला, कारण त्याचा स्नेह राखण्यासारखा तो मनुष्य नव्हता. पन्नाशीच्या सुमाराला आल्यामुळें आतां आपल्याला कांहींतरी कायमची व्यवस्था केली पाहिजे असें ठरवून तिने आपल्याला वर्षाला कांहीं ठराविक रकम मिळेल अशी व्यवस्था केली. २३ जानेवारी १६६९ रोजीं तिने एका इस्पितळाला २५००० फ्रँक दिले आणि आपल्याला त्याबद्दल जन्मभर वर्षाचे २००० फ्रँक मिळावे असा करार लिहून घेतला. अशाच रीतीने लियॉंच्या म्युनिसिपालिटीकडून तिला वर्षाचे १००० फ्रँक मिळत असत; कित्येक उधळ्या लोकांना तिने पैसे उसने देऊन त्यांच्याकडून त्यांच्या मिळकतीचा कांहीं भाग तोडून घेतला.

अशाच रीतीने इतर ठिकाणींही रकमा गुंतवून तिने आपल्याला एकंदर वर्षाला सात हजार फ्रँक मिळतील अशी कायमची व्यवस्था करून ठेवली. ही मोठीशी श्रीमंती होती असें नाहीं, पण तिच्या गरजा एवढ्यांत भागण्यासारख्या

होत्या. शिवाय अडीअडचणीकरतां तिने आपल्याजवळ कांहीं नगद रकम ठेवलीच होती, आणि त्यातून तिने अनेक स्नेह्यांना वेळोवेळीं मदत केल्याचा पुरावा सांपडतो. अर्थात् नीनॉं ८५ वर्षेपर्यंत जगल्यामुळें ज्यांनीं अशा रीतीने तिच्याकडून रकमा घेऊन तिला वार्षिक उत्पन्न लिहून दिलें त्यांचें अतोनात नुकसान झालें. पण यांत तिची चूक नव्हती. हल्ली विमा कंपन्या असा व्यवहार करतात, परंतु त्यावेळीं अशा कंपन्या नव्हत्या. ज्या इस्पितळाने तिच्याकडून २५००० फ्रँक घेऊन तिला वर्षाचे २००० देण्याचें कबूल केलें होतें, त्यांना नीनॉला एकंदर ७२००० फ्रँक भरावे लागले, कारण नीनॉं त्यापुढे ३६ वर्षे जगली. पण त्याला इलाज नव्हता. या पैशाच्या उलाढाली करण्यांत तिला सल्ला देणारे दोन स्नेही होते, आणि तिला स्वतःला कायद्याच्या भानगडी कळत नसल्यामुळें त्यांच्याच सल्ल्याने ती चालत असे. यांपैकी एका सल्लागाराचा मुलगा पुढें व्हॉलतेर या नांवाने प्रसिद्ध झाला.

नीनॉंने आतां प्रेमसंबंध अजीबात सोडून दिले आणि फक्त स्नेही मात्र राखले. प्रेम तर फार दिवस टिकत नाहीच, पण स्नेह देखील टिकणें कठिण असतें असें ती म्हणत असे. आतां तिला प्रेमाची जरूर नव्हती, स्नेहाची होती. या सुमाराला तिची मॅदॅम द ला सॅब्लिएरशीं ओळख*झाली. तिचा नवरा नीनॉंचा पूर्वीचा प्रेमी होता आणि त्याने आपल्या बायकोला अतिशय छळलें होतें. तरी देखील ती नीनॉंप्रमाणें बंडखोर बनून स्त्रियांच्या हक्कांकरतां भांडत बसली नाही. ती विदुषी होती आणि पुस्तकांत आणि विद्वानांच्या संगतींत तिचें मन रमत असे. तिने स्वतः मनसोक्त वागून नवऱ्यावर सूड घेण्याचा प्रयत्न कधींही केला नाही. या दोघींत इतकें अंतर असतांही त्यांची मैत्री जमली आणि नीनॉं तिच्याकडे वारंवार जात असे. तेथे तिला मॉलिएर व इतर कांहीं विद्वानही भेटत असत. या वेळीं पॅरिस युनिव्हर्सिटीच्या धार्मिक शाखेने प्रसिद्ध तत्वज्ञ देकार्त याच्या नास्तिकपणामुळें त्याच्यावर आणि त्याच्या ग्रंथांवर बहिष्कार घालण्याचें ठरवलें होतें व मॉलिएर या विषयावर एक नाटक लिहिण्याच्या विचारांत होता परंतु कांही विद्वानांच्या विनंतविरून त्याने तो बेत मोडून दिला. तथापि कित्येकांनी याबद्दल युनिव्हर्सिटीची चेष्टा केल्यामुळें शेवटीं देकार्तवर बहिष्कार घातला नाहीं.

## पॅरिसच्या परी

यावेळीं मॅदॅम द ला सॅब्लिएरकडे विद्वानांची बैठक असें आणि नीनॉंलाही अशा बैठकींत आनंद वाटे. या विद्वानांत प्रसिद्ध कथालेखक ला फॅतेंन हाही असे आणि येथें येणारे बहुतेक लोक नास्तिक असत. यामुळें मालकिणीचा कल जरी प्रथम धर्माकडे असे, तरी तिचेही मत हळू हळू बदलले आणि ती नास्तिकांना अधिकाधिक आश्रय देऊं लागली. ती एकटीच रहात असल्यामुळें तिला सोबतीची गरज होती आणि यामुळें पुष्कळ वेळां ती जमलेल्या लोकांना जेवायला ठेवून घेत असे. या निकटच्या मंडळींत नीनॉं, मॉलिएर, ब्वालो व बेर्निए ही होती. या सुमाराला मॉलिएर 'मॅलॅद इमॅजिनेर' ( काल्पनिक रोगी ) नांवाचें नवीन नाटक लिहीत होता, आणि त्याची स्वतःची प्रकृति बरी नसल्यामुळें हें नाटक कितपत यशस्वी होईल याबद्दल त्याला भीति वाटत होती. त्याचीं नाटकें म्हणजे हास्यरसप्रधान असायचीं, पण जवळजवळ सर्व नाटक अजाऱ्याच्या खोलींत घडल्यामुळें तें लोकांना आवडेल कीं नाहीं याचा त्याला संशय होता. त्याने तें नाटक बैठकींत स्वतः अभिनयासह वाचून दाखवलें आणि तेथे सर्वांनी त्याची स्तुति केल्यामुळे त्याला धीर आला. त्यांत त्याने डॉक्टरांच्या युनिव्हर्सिटींतल्या पदवीदान समारंभाचीही चेष्टा केली होती, आणि बेर्नियेे याला स्वतःला मॉंपेलिए युनिव्हर्सिटीची पदवी मिळालेली असल्यामुळें त्याने या कामांत त्याला मदत केली. ही चेष्टा करण्याकरतां त्याने त्या नाटकांत एक प्रवेशिका घातली होती आणि या चार माणसांनी ती तेथल्या तेथे बसवली.

यानंतर लवकरच मॉलिएरला मृत्यूने गांठलें आणि नंतर मॅदॅम द ला सॅब्लिएरच्या बैठकीचे स्वरूपही बदललें. मार्की द ला फार नांवाच्या एका मनुष्यावर तिचें प्रेम जडलें आणि इतके दिवस पाळलेल्या ब्रह्मचर्याचा वचपा काढण्याचें तिने ठरवलें असावेंसें दिसतें. अर्थात् हें पाहून आपला मधें व्यत्यय नको म्हणून नीनॉं तिच्याकडे फारशी जाईनाशी झाली. तथापि तिच्याकडेच या सुमाराला नीनॉंची बों रपो नांवाच्या मनुष्याशीं ओळख झाली आणि तिचें पुढें स्नेहांत रूपांतर झालें. याचा तिला बराच उपयोग झाला, कारण तिच्या मुलाला कांही क्षुल्लक कारणावरून बडतर्फ केलें होतें, त्याला

त्याहीपेक्षां चांगली जागा मिळवून द्यायला हा मित्र उपयोगी पडला, कारण त्याचें राजाजवळही वजन होतें. त्याच्यांत शारीरिक आकर्षण बिलकुल नव्हतें, कारण तो ठेंगणा आणि लठ्ठ असून त्याचा आवाजही कर्कश होता. परंतु तो वागण्यांत अतिशय सभ्य, बोलण्यांत चतुर आणि स्वभावाने गोड होता. यामुळे तो सर्वांना आवडत असे.

याच वेळीं निनोंच्या राहत्या घरासंबंधीं कांहीं भानगडी उपस्थित झाल्या, यामुळें तिचें लक्ष तिकडे वेधलें. ती व तिचा एक स्नेही मिळून एक घर विकत घेतल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्या दोघांपैकीं जो जास्त जगेल त्याला तें घर शेवटीं मिळायचें होतें असा करार होता. तो स्नेही या सुमाराला वारला आणि तें घर वास्तविक तिला बिनतक्रार मिळायला पाहिजे होतें, परंतु त्याच्या वारसांनीं तिला तें सुखेपणानें मिळूं दिलें नाहीं. यामुळें तिला या बाबतींत थोडीशी कायदेबाजी, करावी लागली. तिने एक तिऱ्हाईत उभा केला. तिच्याकडून तीन हजार फ्रँक येणें असून तें न आल्यास तिचें घर जप्त करण्याची त्याने धमकी दिली. तिने तें देण्याचें नाकारलें, तेव्हां घर जप्त होऊन लिलांव करण्याचें ठरलें. तेव्हां तें एका वकिलाने तिच्या तर्फे ११६०० फ्रँक भरून विकत घेतलें. तेव्हां नंतर त्यावर कोणीही हक्क सांगू शकलें नाहीं. अर्थात तें घर सोडण्याचें तिच्या जिवावर आलें होतें, म्हणूनच तिने स्वतःचेंच घर मिळवण्याकरतां इतकी खटपट करून शिवाय आणखी पैसेंही भरलें. आतां तें नक्की तिचें झाल्यामुळें तिने तें सजवण्याकरतां आणखी थोडा खर्च केला. याच घरांत ती मरेपर्यंत राहिली. हें घर पांचमजली असून प्रत्येक मजल्याला रस्त्याच्या बाजूला दोन खिडक्या होत्या. नीनोंची स्वतःची खोली दुसऱ्या मजल्यावर होती. तिसऱ्या मजल्यावर तिचे पांच नोकर निजत असत.

ती उत्तरवयांत देखील आपल्या शरीराची अतिशय काळजी घेत असे तरी खाण्यापिण्याकडे तिचें फारसें लक्ष नसे. तिच्या पाहुण्यांना जरी मद्य मिळत असे, तरी ती स्वतः पाणीच पीत असे. तथापि तिला उत्तेजित करायला मद्याची जरूर नव्हती. ती जात्याच उल्हासी वृत्तीची होती आणि बोलण्यांत कोणाला हार जात नसे. म्हातारपणीं ती फाजील लठ्ठही झाली

नाहीं आणि कृशही झाली नाहीं. तिचें सौंदर्य इतकें विलक्षण रीतीने कायम कसें राहिलें याबद्दल लोक अनेक तर्क करीत. कांहीं म्हणत तिने सैतानाशीं करार केला आहे कोणी म्हणत तिला एखादे गुप्त औषध माहीत आहे, पण खरी गोष्ट अशी होती कीं ती आरोग्याचे नियम पाळीत असें, फारसें जागरण करीत नसे आणि खाण्यांतही अतिरेक करीत नसे. तिने दागिने अजीबात सोडून दिलें, परंतु कपडे मात्र ती उत्तम वापरीत असे. जर, किनखाप, वगैरे जड कपडे तिला बिलकुल आवडत नसत. रेशीम, सॅटिन किंवा सुताचे अतिशय तलम कपडे तिला पसंत होते आणि शेवटच्या आजारांत देखील ती सॅटिन वापरीत असे. हे कपडे तिला शोभत असत आणि ती घरांत काय किंवा बाहेर जातांना काय, त्यांत फरक करीत नसे.

तिने आतां आपलें तरुणपणचें नांव नीनाँ हे देखील सोडून दिले. मॅदम्वाझेल द लांक्लो असेच नांव ती आतां वापरूं लागली. व्हॉल्तेरने तिच्या विरुद्ध बरेंच लिहिलें आहे, पण या वयांत तिची कीर्ति इतकी पसरली होती कीं सभ्य वागणुकीचें आणि भाषणाचें शिक्षण घ्यावें तर तिच्याकडे, अशी दरबारापर्यंत सर्वांची समजूत झाली होती. इतकें असूनहि तिच्याकडे संभाषण कधीही कंटळावाणें होत नसे, परंतु तिची स्वतःची वागणूक अशी होती कीं डूशेस दॉर्लेआं ने देखील तिची स्तुति केली आहे. ही मूळची जर्मन स्त्री राजाच्या भावाची बायको झाली होती आणि तिचीं पत्रें प्रसिद्ध आहेत. तिला स्तुति करण्याची फारशी संवय नव्हती, तेव्हां तिच्या स्तुतीला कांही किंमत आहे.

कोणी म्हणेल असें तिच्यामध्यें होतें तरी काय ? अर्थात् तिच्याकडे नीतिमत्तेचा बडेजाव असणें शक्यच नव्हतें, पण सर्वांना मोहून टाकण्याची कला तिला साधली होती यांत शंका नाही. आणि सर्वच प्रख्यात माणसें तिच्याकडे जात असल्यामुळें तेथे लोकांच्या ओळखीही होत असत हा आणखी एक फायदा होता. ढोंग किंवा विद्वत्तेचें फाजील प्रदर्शन तिला खपत नसे, आणि अशा लोकांना ती दूर ठेवीत असे, परंतु तिचें स्वतःचें संभाषण साधें असलें तरी त्यावरून तिची गणना तत्ववेत्यांतच केली पाहिजे. मानसशास्त्र तिला उत्तम कळत होतें. प्रेमाविषयीं तिचे बोल अमोल आहेत. ‘ स्त्रियांच्या वतीने

मी असें म्हणतें की पुरुष पुष्कळ वेळां आलेली संधि भित्रेपणाने घालवतात. स्त्रियांना एखादे वेळीं फाजील धीटपणा खपतो, पण भित्रेपणा खपत नाहीं. स्त्रियांच्या एकंदर पराधीन स्थितीची तिला कींव येत असे. 'नवऱ्यानें जुलूम करावा, प्रेमी असेल तर त्याने तिरस्कार करावा, किंवा अब्रू घ्यावी, सर्वांनी त्यांच्यावर नेहमी पहारा ठेवावा. अशा स्थितींत त्या ढोंगी झाल्यातर त्यांना नांवें कोण ठेवील ?' 'विवाह हा व्यवहार आहे, त्यांत प्रेमाचा संबंध नसतो.'

'दया आणि स्नेह हें शेवटपर्यंत तिच्या अंगचे मुख्य गुण होते आणि सौंदर्य कोठेही दिसलें तरी तिला मनापासून प्रिय होतें आणि तें ताबडतोब ओळखण्याइतकी रसिकताही होती,' असे शातोनफ याने लिहून ठेवलें आहे.

पंडितंमन्यांचा कंटाळा असे आणि ती त्यांना आपल्याकडे टिकूं देत नसे. एकदां एका स्नेह्याने तिला सांगितलें, 'माझ्या मुलीच्या शिक्षणाची मी इतकी काळजी घेतों पण फुकट. तिच्या लक्षांतच कांहीं रहात नाहीं.' यावर ती उत्तरली, 'फार छान. निदान ती भराभर उतारे देत सुटणार नाही.' डेमॉस्थेनीसचें भाषांतर करणारा जॅक द तुरेय याला उतारे देण्याची फार संवय होती. तो फ्रेंच ॲकॅडेमीचा सभासद होता, तरी त्याची चेष्टा करायला तिने कमी केले नाही.' शेवटीं त्याने चिडून तिच्यावर एक कविता केली आणि म्हटलें की 'विद्वानांच्या भाषणांत नीनॉसारखीला काय कळायचें आहे? तिने फारतर कामशास्त्रांतल्या आसनांचा अभ्यास करावा.' पण ज्याला स्वतःला विचार करतां येतो त्याला उतारे देण्याची गरज भासत नाही, हे कळण्याइतकी अक्कल त्याला नव्हती.

तिची स्वतःची विद्वानांत गणना होत असे हें पूर्वी सांगितलेच आहे. तिने संगीताचा ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास केला होता आणि तिच्याकडे संगीतज्ञांना नेहमी आमंत्रण असे. ती स्वतःही कधीकधी गात असे आणि तिचें असें स्पष्ट मत होतें कीं संगीत म्हणजे केवळ हाताची किंवा घशाची करामत नव्हे, तर ज्यांत भावनाविष्कार असेल तेंच खरें संगीत. जें हृदयाला जाऊन भिडत नाही तें संगीत कसलें ?

चेष्टा करण्याबद्दल तिची ख्याती होती. त्या वेळचा राजा चौदावा लुई देखील तिला घाबरत असे. राजांच्या अंतःपुरांतल्या बातम्या देखील लोकांच्या

कानावर गेल्याशिवाय रहात नाहीत, आणि त्या काळीं तर राजा सकाळीं उठला म्हणजे त्याला कपडे चढवायला मोठमोठे सरदार हजर असत. अर्थात् लोक काय म्हणतील याची राजांना नेहमी भीति वाटत असे. पण लुई म्हणे, नीनाँ काय म्हणेल?' अर्थात् तिला विचारायचा त्याला धीर होत नसे. पण नीनाँचे उद्गार त्याच्या कानावर येत आणि तो ते लक्षांत ठेवीत असे. एकदां फ्रेंच ॲकडेमीचा एक सभासद ॲबे द दांजी आणि नीनाँ यांच्यांत आत्म्याच्या अमरत्वावर वाद झाला आणि नीनांने त्यांत दॉ पलो नामक एका धार्मिक लेखकाचाच आधार दिला हें राजाच्या कानावर जाऊन त्याने तें लक्षांत ठेवलें आणि यानंतर तीन वर्षांनीं सदर लेखकाला बिशप करण्याबद्दल कोणीतरी त्याच्याकडे शिफारस केली, तेव्हां तो म्हणाला, 'आत्मा अमर आहे असें जो मानीत नाहीं त्याला मी बिशप करूं? तें होणार नाहीं.' आणि त्या बिचाऱ्याला बिशपची जागा मिळाली नाहीं. चौदावा लुई स्वतः इतका गर्विष्ठ होता कीं, 'फ्रान्स म्हणजेच मी' असें तो म्हणत असे आणि नीनाँकडची इत्थंभूत हकीकत तो विचारीत असे यावरून तिला किती महत्त्व आलें होतें. हें सहज समजेल. मोठमोठे सरदारच नव्हे तर राजघराण्यांतील माणसांना सुद्धां तिच्याकडे शिरकाव होण्यांत मोठेपणा वाटत असे, आणि तिच्यावर या बड्या लोकांचा इतका विश्वास असे की राजकारणांत देखील ते तिचा सल्ला घेत असत. तिच्याजवळ बोललेल्या गुप्त गोष्टी कधी बाहेर फुटणार नाहींत याबद्दल त्यांची खात्री असे. नामांकित लेखकाना आणि कलावंताना तिच्याकडे मानाचें स्थान असे. एखाद्या चित्रकारानें नवीन चित्र काढलें कीं प्रथम तिला दाखवून मग त्याचें प्रदर्शन व्हायचें, अशी पुष्कळांची रीत असे. संगीतज्ञांनाही माहीत होतें की हजार लोकांच्या स्तुतीला तिच्या एका शद्बाइतकी किंमत नाहीं.

ला फॉंतेन हा प्रसिद्ध कवि फारसा बोलत नसे, पण तो तिच्याकडे नेहमी बसलेला असे. ती आतां म्हातारी झाली होती, तरी देखील तिच्या सौंदर्याची तारीफ करणारे कवि अजूनही नव्हते असें नाहीं. पण अशा स्तुतीची तिला आतां परवा नव्हती. आतां तिच्याकडे फक्त पुरुषच येत होते असें नाहीं, तर त्यावेळच्या नामांकित स्त्रियांना देखील तिच्या बुद्धीचें आणि चातुर्याचें कौतुक

वाटत असे. अर्थात् तिचीं नास्तिक मतें सर्वांनाच पसंत होती असें नाहीं. तरीपण त्यांना तिच्याकडे जावेंसे वाटत असे. ज्याना तिच्याबद्दल पूर्वी सकारण असूया वाटत असे, त्या देखील आतां तिचा स्नेह संपादन करूं लागल्या, कारण आतां त्यांना तिच्या सौंदर्याची भीति नव्हती. याचा परिणाम मात्र असा होई कीं तिच्याकडे लोक जमले म्हणजे त्यांना वेळाची शुद्ध रहात नसे आणि कितीही रात्र झाली तरी उठावेंसें वाटत नसे, अर्थात् अशा लोकांना घालवून देणें शक्य नसे. एकदां दोन विद्वानांचा वाद लवकर संपण्याचा रंग दिसेना, तेव्हां तिने एक युक्ति काढली. प्राचीन ग्रीक लोकांच्या चालीरीतींसंबंधी वाद असल्यामुळें तिनें मधेंच विचारलें 'तें सगळें खरें, पण त्यांची निजायची वेळ कोणती होती?' ते तिचा आशय समजले आणि तिची क्षमा मागून तेथून चालते झाले.

अर्थात् या सर्व प्रकाराने ती थकून जाई आणि कधी कधी दरवाजा बंद ठेवून कोणालाही येऊं देत नसे. पण तरीही तिला फारशी विश्रांति नसे. हा वेळ ती लांबलांबच्या स्नेह्यांना पत्रें लिहिण्यांत खर्च करीत असे, आणि ती कितीही एकटी राहिली तरी तिला दरबारची सर्व तपशीलवार हकीकत नियमाने कळवणारे कांही लोक होतेच. तिचे स्नेही सर्वच निरपेक्ष होते असें नाही. मॅदम द मॅंतनॉं हिचें राजाजवळ प्रस्थ त्यावेळीं फार होतें आणि तिचा हुद्दा मोठा असला तरी ती राजाची रखेलीच होती. यांत त्यावेळीं कोणाला कमीपणा वाटत नसे, ती मानाचीच जागा होती. नीनॉंला तिचा सर्व पूर्वेतिहास माहीत होता आणि ती आपली केव्हां फजीति करील याचा नेम नाहीं अशा भीतीने ती नीनॉंशी अत्यंत स्नेह दाखवीत असे. पण तिला मनांतून त्याची लाज वाटत असे. कारण तिची पूर्वीची स्वैर वृत्ति आतां नष्ट झाली होती आणि ती आठवण तिला आतां नको होती. नीनॉंचें तोंड बंद करण्याकरतां तिला तिने आपल्याजवळ रहायला बोलावलें. पण नीनॉंने हें ओळखून तिला कळवलें कीं आतां मला ढोंग करायला शिकणें जड जाईल, तेव्हां मी आहे येथेंच ठीक आहे.

तथापि मॅदम द मॅंतनॉंच्या हातांत सत्ता असल्यामुळें कारण राजाच्या रखेलीपेक्षा अधिक सत्ता कोणाला असणार नीनॉंला एखादे वेळीं तिला

लिहिण्याची गरज पडे तिला स्वतःला कांही मागायचें नव्हतें पण अडचणींत असलेल्या एखाद्या स्नेह्याकरतां तिने एखादी मागणी केली तर ती ताबडतोब मान्य होत असे इतकी नीनाँची भीती तिला वाटत असे.

या सुमाराला मारी ॲन मांसिनी नांवाच्या एका स्त्रीकडे बऱ्याच विद्वानांची बैठक असे. तिचा नवरा तिच्या स्वैर वागणुकीकडे फारसें लक्ष देत नसे, मग तें अज्ञानामुळें असो किंवा कांहीं उपयोग होणार नाहीं म्हणून असो. तो नेहमी शिकारींत गुंतलेला असे आणि तिची इकडे वेगळ्याच प्रकारची शिकार चालू असे. तिच्यासारख्याच चैन करणाऱ्या स्त्रिया आणि बरेच कवि व लेखक तिच्याकडे जमत असत. अर्थात निरुद्योगी श्रीमंत अशा ठिकाणी असायचेच. हे सर्व चैनी प्राणि तेथे जमलें म्हणजे कवींच्या कविता, ताल सुटलेल्या लोकांचे फटकळ प्रलाप, आणि शिवाय दारू वगैरेलाही ऊत येत असे. पण या बाइचें तेवढ्याने समाधान होत नव्हते. तिला नीनाँचा पाठिंबा पाहिजे असे व तिने आपल्याकडच्या बैठकींना यावें असे तिला फार वाटे. पण नीनाँला हें फारसें पसंत नव्हतें. तिचा स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळे फारच आग्रह झाला तर ती एखादे वेळीं तेथें जाई देखील, आणि आपल्या संवादचातुर्याने सर्वांना कांहीं वेळ मोहून टाकी, पण तेथे तिला फार वेळ बसवत नसे. चैनीला देखील कांहीं मर्यादा पाहिजे असें तिचें मत आणि स्वभाव असल्यामुळे ती तेथून लवकरच परत फिरे.

यापेक्षा तिला मॅदम्वाझेल द स्क्युदेरीकडे जायला जास्त आवडत असे. ही नांवाजलेली लेखिका अत्यंत कुरूप होती. ती प्रेमाची भुकेली होती आणि तो अनुभव तिला मिळणें जवळजवळ अशक्य होतें. पण तिच्या डोक्यांत कल्पना होत्या आणि नीनाँला कल्पक लोकांचें नेहमी आकर्षण वाटत असे, आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्याकरतां आपल्यासारखीच झगडणारी ही एक बाई आहे असें पाहून तिने तिच्याशीं सख्य केलें होतें.

या सुमाराला तिची दृष्टि किंचित् मंद झाल्यामुळे तिला चष्मा लावल्या-शिवाय कोठे जातां येत नसे, आणि ती बाहेर जाण्याचा कंटाळा करूं लागली. ती होतां होई तों घरींच असे आणि सर्व वेळ विचार करण्यांत आणि लिहिण्यांत घालवी.

---

## १०

मॅडम द ला साब्लिएर नांवाची नीनांची मैत्रीण होती, तिची थोडीशी हकीकत पूर्वी आलीच आहे. ही विदुषी केवळ ग्रीक आणि लॅटिनच नव्हे तर गणित आणि तत्वज्ञानही वाचीत असे, आणि तिचा ज्ञान मिळविण्याचा सतत प्रयत्न पाहून नीनॉला तिजबद्दल अतिशय प्रेम होतें. तिचें वैवाहिक आयुष्य फुकटच गेलें होतें, यामुळें तिला तिची दयाहि येत असे. तिने कोणांशींही आतांपर्यंत प्रेमसंबंध जोडला नव्हता पण आतां मार्की द ला फार याशीं ओळख होऊन तिचें लवकरच प्रेमांत रूपांतर झालें नीनॉने तिला या बाबतींत उत्तेजन दिलें, कारण तिला आयुष्यांत कांहींतरी सुख लागावें अशी तिची इच्छा होती. परंतु तिची ही मैत्रीण अगदी साधीभोळी असल्यामुळें त्याचें प्रेम कसें राखावें हें तिला कळलें नाहीं. कांहीं दिवसांनीं तिचा नवरा वारल्यामुळें तिला त्याच्याशीं लग्नही करतां आलें असतें, पण तेथपर्यंत तिचा प्रेमी तिला सोडून गेला होता.

यांतली मौज अशी की तीं दोघेही एकमेकांविरुद्ध तक्रारी तिला सांगत असत. पण या बाबतींत तिने द ला फार याच्या भ्रमरवृत्तीलाच दोष दिला. तिची मैत्रीण आतां पुनः एकटी राहिली, नीनॉला तिचें सांत्वन करणें भाग पडलें. प्रेमरहित जीवनांत देखील कांहीं सुख असूं शकतें, हें तिने आपल्या

स्नेहाने तिला पटवून दिलें तरीपण शेवटीं हा स्नेह देखील टिकला नाहीं. ती धार्मिक लोकांच्या तावडींत सांपडली, आणि अर्थातच ते नीनॉंची निंदा करीत असल्यामुळे ती नीनॉंपासून हळूहळू दुरावली. तरी नीनॉंने तिला सोडलें नाही. तिने घर बदललें होतें आणि तिच्या धार्मिक प्रवृत्तीमुळे तिचे जुने मित्र तिच्याकडे जाईनात. एक ला फॉंतेन मात्र तेथे नीनॉंला भेटे, पण तो आतां बराच म्हातारा झाला होता आणि त्याची बुद्धि जवळजवळ नष्ट झाली होती.

नीनॉं आतां फारशी बाहेर जात नसे हें वर सांगितलेंच आहे. पण ती एकसारखी पत्रें लिहित असे आणि यापुढची तिची हकीकत या पत्रांवरूनच कळते, तरीपण अजूनही तिच्याकडे म्हातारींच नव्हे पण तरुण माणसेंही जमत असत. तथापि आतां ती फक्त निकट स्नेह्यांनाच बोलावीत असे, कारण आतां तिची शक्ति कमी झाली होती आणि तिच्याने दगदग होत नसे. इतरांच्या पत्रांतही तिचें नांव मधूनमधून सांपडतें आणि त्यांत तिच्याबद्दल नेहमी आदरच व्यक्त केलेला आढळतो·

अर्थात् तिला आपल्या नष्ट सौंदर्याबद्दल वाईट वाटत नसे असे नाही, तरीपण तिची बुद्धी, वाक्चातुर्य आणि उल्हासी वृत्ति हीं अजूनही कायम होतीं आणि यामुळेच ती इतकी लोकप्रिय होती आणि तिच्या म्हातारपणच्या चित्रावरूनही तिचें सौंदर्य समूळ नष्ट झालें होतें असें दिसत नाही. तिच्या डोळ्यांत अजूनही चमक होती आणि शुभ्र पांढरे दांत अजून कायम होते, यामुळे तिच्या स्मिताचें आकर्षण अजून नाहीसें झालें नव्हतें. तोंडावर अर्थातच थोड्याबहुत सुरकुत्या होत्या, पण तिने त्यांबद्दल विशेष वाईट वाटून घेतलें नाही. ती अकलेची खूण आहे असें ती म्हणत असे.

तिचे कांहीं स्नेही लंडनला गेले होते आणि त्यांनी तिची इतकी स्तुति केली की कांही प्रसिद्ध इंग्रज मुद्दाम पॅरिसला येऊन तिला भेटून गेले. तिचा स्नेही सॅंतेव्हमॉं हा यांपैकीं होता आणि त्याने दुसऱ्या चार्लसचा अनौरस पुत्र ड्यूक ऑफ सेंट आल्बन्स याला तिच्याकडे पाठवला होता, आणि तो फार सुंदर तरुण आहे असे त्याचें वर्णन केलें होतें. तिने चेष्टेनेच त्याला लिहिलें कीं मला आतां सौंदर्याशीं काय करायचें आहे? हा तिचा मित्र तिला अजूनही

नास्तिकतेचा उपदेश करीत असे, कारण नीनाँ म्हातारपणीं धार्मिक होते की काय अशी त्याला भीती वाटत होती.

तरीपण तिला म्हातारपणीं जीवन कंटाळवाणें वाटूं लागलें होतें यांत शंका नाहीं. आपल्या ओळखींचीं माणसें मरतांना पहायचीं आणि आपण मात्र त्याच त्याच कंटाळवाण्या गोष्टी रोजरोज करीत जगायचें, अशा जीवनाचा उपयोग काय ? माझी अशी स्थिति होईल असें मला कोणी सांगितलें असतें तर मी तेंव्हांच जीव दिला असता, असें ती म्हणत असें. वस्तुतः तिला आतां कसलीही काळजी नव्हती. तिचा अनौरस मुलगा आरमारांत कप्तान होता, व्हिलार्सोने त्याला मरण्यापूर्वीं दत्तक घेऊन त्याला औरस केला होता, आणि त्याला कांही पैसेही ठेवले होते.

ती आतां रोमन तत्ववेत्ता सेनेका यांचीं पुस्तकें वाचूं लागली. अर्थात तिच्या गतायुष्याबद्दल तिला त्यांत स्तुति आढळली नाहीं, तरीपण आतां तिला त्याची पर्वा नव्हती. निसर्गनियमांप्रमाणें वागून जें कांही होईल तें शांतपणें पहावें, हें त्याचें मत तिला पसंत पडलें आणि स्नेहभावाची त्याने जी स्तुति केली आहे, तीहि तिला पटली, आणि आपल्या वांट्याला दुःख आल्यास तें शांतपणें सहन करावें, हा उपदेश तिच्या उपयोगी पडला. यामुळें तिला मरणाची भीति वाटत नाहीशी झाली. ती आपल्या वाचनाचा फायदा आपल्या स्नेह्यांना नेहमीच देत असे, परंतु तिने सेनेकाची स्तुति केलेली सँतेंव्ह्‌मॉला मात्र खपत नसे. तिलाहि त्याचा अर्थ समजला. तिची आतां जगाचा त्याग करण्याची तयारी झाली होती, पण त्याला अजून सुखाची आशा होती. तेंव्हां त्यांचे विचार जमावे कसे ? सेनेका दैववादी होता. आपल्याला सुख मिळावें की दुःख, हें निसर्गनियमांनी निश्चित झालेलें असतें तें जर आपल्याला बदलतां येत नाहीं, तर त्याबद्दल वायफळ शोक करण्यांत काय अर्थ आहे ? जें येईल तें मुकाट्याने स्वीकारावें, असें त्याचे म्हणणे होतें. ईश्वराविषयीं तो म्हणे, मी ईश्वराची आज्ञा पाळीत नाहीं, मी त्याच्या इच्छेशी तन्मय होतों त्याच्याच इच्छेने सर्व कांहीं होतें हें जर खरें, तर त्याविरुद्ध फुकट तक्रार करण्यांत अर्थ काय ? अर्थात ही ईश्वरभक्ती नीनाँच्या तत्वांशीं

जुळती नव्हती, आणि तिचें मन भक्तीला तयार नव्हतें. पण आत्मा जर अमर असला, तर आपण मेल्यावर आपले मेलेले स्नेही आपल्याला पुनः भेटतील ही आशा तिला सोडवेना. हा तिचा मित्र सॅंतेव्ह्मॉं १७०३ सालीं मेला, आणि ती बातमी जेव्हां तिला समजली, तेव्हां याचें आतां कांहींही शिल्लक नाहीं, तो अजिबात नाहीसा झाला, अशी कल्पनाच तिला करवेना.

यापुढे ती जरी जिवंत होती, तरी तिचें सर्व लक्ष मरणानंतर काय होणार, या प्रश्नाकडे लागलें होतें. पापाबद्दल शिक्षा करणाऱ्या क्रूर ईश्वराची कल्पना जरी तिनें मान्य केली नाहीं, तरी येशू ख्रिस्ताकडे तिचें मन ओढ घेऊं लागलें. तो ईश्वराचा मुलगा हें तिला खरें वाटलें नाही, तरीपण त्याचे बोल दैवी होते असें तिला वाटूं लागलें. म्हातारपणीं मरणाच्या पंथाला लागल्यावर कित्येक नास्तिक माणसें धर्माकडे वळतात अशीं उदाहरणें तिला अनेक दिवस होतीं.

तिच्या मनाची अशी स्थिति झालेली पाहून तिचें मन वळवल्याचें श्रेय घेऊं पाहणारे अनेक धर्मोपदेशक तिला व्याख्याने देऊं लागले. पण अशा स्थितींतही तिला त्यांच्या कारवाया चांगल्या समजत होत्या. या सुमाराला तिने एका मित्राला पत्रांत लिहिलें कीं 'तुला माहीतच आहे की माझ्या शरीराला अनेक लोकांकडून मागणी असे. पण आतां माझ्या आत्म्याला त्याहीपेक्षा जास्त मागण्या आल्या आहेत. निरनिराळे पक्ष त्याकरतां भांडत आहेत.' पण धर्मांतला बावळटपणा तिला पटण्यासारखा नव्हता आणि तिच्यांत अजूनही वाद करण्याची ताकत होती. वादांत तिच्यापुढे कोणीही टिकला नाही.

याच वेळीं तिची एका १२ वर्षांच्या मुलाची ओळख झाली. हा पुढें व्हॉलतेर या टोपणनांवाने प्रसिद्ध झाला आणि १२ वर्षांच्या वयांतही त्याच्या संभाषणांत प्रौढता होती. म्हाताऱ्या नीनॉंबद्दल त्याला कोणतेंही आकर्षण वाटणें शक्य नव्हतें, पण तिला मात्र तो फार आवडला, कारण त्यांच्या मधें मानसिक साम्य बरेच होतें. नीनॉंचें मरण कांही महिन्यांवर आलें होतें. ती अंथरुणावरच होती, तरीपण तिची बुद्धि अजूनही तीव्र होती.

तथापि ती शेवटीं धर्माकडे वळलीं यांत शंका नाही. पण तें मुख्यतः मरतांना धार्मिक लोकांची मदत मिळावी म्हणून. तिने आपलें मृत्युपत्र केलें, तेव्हां तें बजावण्याचें काम व्हॉलतेरच्या बापावर सोंपवलें आणि याबद्दल तिने त्याला एक हजार फ्रँक ठेवले होते. ते मुलाला पुस्तकें घेण्यास उपयोगी पडले.

शेवटचे तीन दिवस तिचा आजार विकोपाला गेला, आणि १७ आक्टोबर १७०५ रोजीं ती वारली तेव्हां तिचें वय ८५ वर्षांचें होतें. शेवटीं सर्व धार्मिक संस्कार यथाविधी झाले आणि मरतांना तिचें मन शांत होतें. मरणापूर्वीच्या शेवटच्या रात्रीं देखील तिने एक कविता लिहिली असे म्हणतात. 'माझे आतां मरणाचे वय झालें आहे, आतां जास्त जगून मी काय करणार ?' असा तिचा भावार्थ.

अनेक प्रसिद्ध लेखकांनी तिच्यावर कांही ना कांही लिहिलें आहे, पण तिचें मन फारच थोड्यांना समजलें. कांहीनी तर तिला जवळजवळ वेश्याच म्हटले आहे. तिच्या शारीरिक सौंदर्याची स्तुति अनेकांनी केली आहे. ला ब्र्युइयेर याला तिचा थोडीबहुत कल्पना होती, कारण तो म्हणतो पुरुषांचे आणि स्त्रियांचे सगळे उत्कृष्ठ गुण तिच्यांत एकवटले होते.

नीनॉचीं सात चित्रें अस्तित्वांत आहेत. त्यापैकीं चार सार्वजनिक संग्रहालयांत आहेत व बाकीचीं खाजगी संग्रहांत आहेत. याशिवाय आणखी एका चित्रांत ती आपला ग्रंथसंग्रह व्हॉलतेरला अर्पण करीत आहे असें दाखवलें आहे, हें उघड आहे. पण वर दिलेल्या हकीकतीवरून हें केवळ काल्पनिक आहे हें उघड आहे.

मरतांना पश्चात्ताप होऊन धर्माकडे वळलेल्या लोकांच्या यादींत नीनॉचें नांव अर्थातच घालणें भाग आहे, पण सर्व स्नेही मेल्यावर आतां कोणाचाही आधार नाही अशी स्थिति झाल्यावर मरतांना मदत मिळावी या व्यावहारिक दृष्टीनेच ती धर्माकडे वळली असे अनुमान वरील हकीकतीवरून निघते. मुसलमानांच्या मुलखांत सांपडलेला एखादाच हिंदु केवळ याच दृष्टीने जसा मुसलमान होतो, तशीच तिची स्थिति झाली असली पाहिजे. हा मरतेवेळचा कमकुवतपणा आहे मनाची खात्री नव्हे,

---

# पॅरिसच्या परी

## २

---

मॅरिआँ द लॉर्म

* *
*

( १६११–१६५० )

# १

फ्रान्सचा राजा तेरावा लुई ( १६१०–१६४३ ) याच्या कारकीर्दींत फ्रान्समध्यें ज्या दोन इतिहासप्रसिद्ध गणिका होऊन गेल्या, त्यांपैकीं नीनाँ द लांक्लो हिचें चरित्र वाचकांसमोर आहेच. ग्रीसमध्यें प्राचीन काळीं 'हेटायरां' नांवानें प्रसिद्ध असलेल्या ज्या विद्वन्मान्य गणिका असत, त्यांच्याच तोडीची नीनाँ ही विदुषी होती. आतां जिचें चरित्र देणार आहों ती मॅरिआं द लॉर्म ही केवळ गणिका होती, विदुषी नव्हती. अर्थात् ती वेश्या नव्हती, पण तिला उच्च शिक्षणाचा गंध नव्हता, तत्त्वज्ञान कशाशीं खातात हें तिला कळत नव्हतें. गाणें, बजावणें, आणि नृत्य. यांत ती पारंगत होती, आणि कांहींच्या मतें ती नीनाँपेक्षांही सुंदर होती. पण तिचा मानसिक दर्जा नीनाँ-पेक्षा निःसंशय कमी होता. तिच्याकडेही विद्वानांची गर्दी होत असे, पण ती केवळ करमणुकीकरतां, विद्वात्तापूर्ण संभाषणाकरतां नव्हे.

तसें पाहिलें तर मॅरिआँ अत्यंत उच्च कुलांत जन्मलेली होती. तिचा बाप श्रीमंत होता, इतकेंच नव्हे तों शांपेन्य प्रांतांत सरकारी खजिनदार होता. यामुळे तिच्या शिक्षणाला कोणतीही आडकाठी नव्हती. पण तें तिच्या नशिबी नव्हतें. श्रीमंत बापाची मुलगी म्हणून तिचें बालपण सुखांत गेलें असें नाहीं. तिचा बाप कर्मठ होता आणि त्याच्या कुटुंबात सर्वांवर धर्माची

सक्ती असे. पण याचा परिणाम मात्र त्याच्या बऱ्याच मुलांवर विपरीत झाला आणि तीं वाह्यात निघालीं.

मॅरिआं ही बापाच्या दुसऱ्या बायकोच्या बारा मुलींपैकी पांचवी होती. तिचा जन्म पॅरिस येथें ३ आक्टोबर१ ६१३ सालीं झाला. तिच्यासंबंधीं बऱ्याच गप्पा प्रसिद्ध आहेत, यामुळे खरी हकीगत काय होती हें समजणें मुष्किलचे झालें आहे. उदाहरणार्थ तिच्या एका चित्राखाली असें लिहिलें आहे की तिचा जन्म १६०६ मधें आणि मृत्यु १७४१ सालीं झाला, म्हणजे ती १३५ वर्षे जगली. हे धडधडीत खोटे आहे. आणि ऐतिहासिक पुराव्यावरून ती १६१३ सालीं जन्मली आणि ३० जून १६५० रोजीं वारली असली पाहिजे. म्हणजे तीं फक्त ३७ वर्षे जगली.

तीच्या बापानें आपल्या सर्व मुलांचीं लग्नें पैशाच्या जोरावर बड्या कुटुंबात करून दिलीं आणि अशा रीतीने तो आणखी श्रीमंत झाला. पण मॅरिआं लग्नाला कबूल होईना. तिला लग्नापेक्षां प्रेम अधिक पसंत होते. ती गायला, नाचायला, आणि 'तेऑर्ब' नांवांचे वाद्य वाजवायला शिकली, आणि तिची विद्वत्ता यापलीकडे गेली नाही. तिचा बाप तिच्यावर सक्त नजर ठेवीत असे, पण त्याचे घर मोठे होते आणि त्याच्या कडे येणाऱ्या पाहुण्यांत तरुणांना मज्जाव नव्हता. अशा स्थितींत मुलीवर पहारा ठेवणें कसें शक्य आहे? दोन मुलींचीं त्यानें लग्नें करून दिलीं खरीं, पण त्याही लग्नानंतर पतिनिष्ठ राहिल्या नाहीत. मॅरिआं अधिक प्रामाणिक होती, तिने लग्न करून नवऱ्याला फसवलें नाहीं.

तिला लिहायला शिकवण्यांकरतां बोलिय नांवाचा मनुष्य येत असे, पण त्यानें तिला अक्षराचें वळण शिकवण्या ऐवजी निराळेंच वळण लावलें, तो तिच्यावर काव्य करित असें आणि थोड्याअधिक सलगिलाही तिची ना नव्हती, पण नोकरी गमावण्याच्या भीतीनें तो फारसा पुढें गेला नाहीं. शेवटीं १६३२-३३ च्या सुमाराला त्यानें 'दे बारो' नांवाच्या आपल्या एका मित्राशीं तिची ओळख करून दिली आणि मित्राच्या प्रेमकथांवरच तो समाधान मानून राहिला. दे बारो दिसायला इतका देखणा होता की सर्व प्रकारच्या व्यसनां-

बद्दलची त्याची ख्याती जरी तिच्या कानांवर आली असती, तरी तिला ती खरी वाटली नसती. इतका देखणा मनुष्य वाईट असेल कसा ? शिवाय तिच्या संगतींत तो सुधारला आणि तिंच्या संगतींत त्याला प्रेमाचा खरा अनुभव आला असें म्हणतात. त्यानें तिचे चुंबन घेंतलें तें शुद्ध मनानेंच घेतलें. पण तिच्या बापाला त्याचा संशय आला, आणि त्यानें इतर मुलांना त्यांच्यावर पहारा ठेवायला सांगितला. शेवटीं त्यानें त्याला आणि त्याच्या मित्राला घालवून दिलें, पण नेहमीच्या नियमाप्रमाणें प्रेमाला अडथळा आला की तें वाढीस लागते. दे बारोनें एक वर्षभर कविता करण्यांत आणि चोरून भेटी घेण्यांत घालवलें, पण त्याचा अंतिम हेतु सिद्धीस गेला नाही. शेवटीं मॅरिआंनें कंटाळून त्याला खाजगी भेट देण्याचे कबूल केलें तरी पण हा प्रकार बरेच दिवस चोरटाच राहिला.

शेवटीं १६३९ सालीं तिचा बाप मेला आणि आईनें तिंच्यावर कडक पाहरा ठेवला नाहीं. दे बारो तिच्या जवळच एक घर घेऊन राहिला. पण तिला शेवटीं या चोरट्या आयुष्याचा कंटाळा आला. लवकरच ती आपल्या आईबरोबर दुसऱ्या घरांत रहायला गेली आणि तेथें त्यांच्याकडे तरुणांची गर्दी होऊं लागली. या तरुणांना युद्ध आणि प्रेम याशिवाय दुसरा उद्योग नसे. नीनाँ द लांक्लोची अजून विषेश प्रसिद्धि झालेली नव्हती. आणि तीही या सुमाराला मॅरिआंकडे येत असें.

मॅरिआंच्या प्रेमिकांचा कालक्रम ठरविणें कठिण आहे. तथापि ती दे बारोच्या प्रेमांतून प्रथम सुटली ती राजाच्या मर्जीतल्या सँ मार्स याच्या खटपटीमुळे यांत शंका नाहीं कोणी म्हणतात की त्याने तिच्याशी लग्न करायचें कबूल केलें, आणि सँ मार्सवर तिचें वजन पडल्याचा परिणाम बरा होणार नाहीं अशी भिती राजाला वाटल्यासुळे त्याने २९ नव्हेंबर १६३९ रोजी गुप्त विवाहांविरुद्ध एक कायदा केला. तिला या सुमाराला पॅरिस सोडून जाण्याचा हुकूम मिळाला होता. असें मात्र या वेळच्या कांहीं पत्रावरून दिसते.

याच सुमाराला प्रसिद्ध कॅथोलिक मुत्सद्दी ‘ कार्डिनल रिशलिय ’ याचेही लक्ष तिच्याकडे गेले होते. अर्थात त्याचे चाहते ही गोष्ट कबूल करीत नाहींत कॅथोलिक धर्मगुरूंना स्त्रियांपासून अलिप्त राहण्याची सक्ति असते, पण त्या

वेळच्या लोकांच्या साक्षी याबद्दल भरपूर पुरावा देतात. तालमां, ब्वारॉबेर वगैरे रिशलियेच्या स्नेह्यांनी लिहिलेल्या पत्रांवरून उघड सिद्ध होते की रिशलियू व मॅरिआं यांच्या खाजगी मुलाखती होत असत, आणि असें म्हणतात की सँ मार्सच्या व आपल्या संबंधाला धक्का लागू नये एवढ्याकरतांच मॅरिअ याला कबूल होत असे. पण दे बारो याने आणखीही तपशीलवार हकीकत दिली आहे.

तो कवि होता आणि त्याने आपल्या प्रेयसीवर कविता लिहाव्या हें साहाजिक होते. पण त्या कवितांत तिच्या चंचलतेचे वर्णन करावे लागावें यापेक्षां अधिक दुःखद प्रसंग कोणता ? रिशलियच्या हातांत सत्ता होती. त्याच्या विरुद्ध त्याला कांहीही करणें शक्य नव्हते. शिवाय एका जेझुईट पाद्र्याचा उपमर्द केल्याबद्दल रिशलियचा त्याच्यावर राग होता, पण त्यानें तो राग गिळून दे बारोला असें कळवलें होते की तूं मॅरिआंचा नाद सोडलास तर मी तुझें हित करीन. पण दे बारोने ही लालूच स्वीकारली नाही, आणि यासंबंधी कांही कविता लिहून असें जाहीर केलें कीं या उन्मत्त सत्ताधाऱ्यापेक्षां मॅरिआं मलाच अधिक चाहते. याच्या परिणामी आपल्याला तुरुंगांत जावें लागणार अशी त्याला साधार भीती होती, आणि इतकेंही करुन मॅरिआँ आपल्याला विचारीत नाही ती नाहीच, असें पाहून तो या सुमाराला पॅरिस सोडून पळाला या प्रकारामुळें त्यांच्या मनाचा तोल सुटून या पुढची त्याची वागणूक बेताल होत गेली.

याच सुमाराला सँ मार्सही तिला सोडून मॅरी लुईझ नांवाच्या पोलंडच्या भावी राणीच्या मागें लागला. पण मॅरिआँला चाहते कमी पडले नाहीत. रिशलियच्या कंपूपैकी पुष्कळच तरुण तिच्यामागें होते. तालमांच्या म्हणण्या-वरून सँ मार्स नंतर तिचें प्रेम ‘ मार्की द रूव्हिल ’ नांवाच्या मनुष्यावर बसलें. हा श्रीमंत असून त्याच्यात पुष्कळ आकर्षक गुण होते. असें ‘आंजेलिक पेती’ या बाईने केलेल्या वर्णनावरून दिसते. मॅरिआँवरून त्याचे दुसऱ्या एका चहात्याशीं भांडण होऊन द्वंद्वयुद्धापर्यंत वेळ आली. पण इतके झालें तरी मॅरिआँचा स्वभावच चंचल असल्यामुळें ती फार दिवस त्याला चिकटून राहीली नाहीं.

१६४२ सालीं ' गॅस्पार द कॉलिन्यी ' याचे तिच्यावर प्रेम बसलें. पण हा मनुष्य प्रॉटेस्टंट पंथाचा होता आणि मॅरिऑं अत्यंत धार्मिक कॅथोलिक होती. तेव्हां त्यानें धर्मांतर करावें या अटीवर ती त्याच्या प्रेमाला कबूल झाली. त्यानें धर्मांतर केलेंच, पण तो लगेच मॅरिऑंला सोडून नीनॉं द लांक्लोच्या मागें गेला.

पण मॅरिऑंला त्याची फारशी फिकीर नव्हती, कारण तिला कांही कमी नव्हतें. स्कॅरॉं नांवाच्या त्या वेळच्या प्रसिद्ध कविनें तिच्याकरतां झुरणाऱ्या तरुणांची यादी दिली आहे. त्यापैकी तिची मर्जी आर्नो नांवाच्या माणसावर बसली पण तो लष्करी अधिकारी असल्यामुळें त्याला वारंवार तिला सोडून सैन्याच्या कवायतीकडे धावें लागत असे. १६४६ सालीं तिनें ग्रॅमॉंला आश्रय दिला, आणि १६४७ सालीं ' ड्युक द ब्रिसॅक ' याने मॅरिऑंकरतां इतका खर्च केला की त्याच्या बायकोनें आपल्याला मिळकतीचा भाग वेगळा मिळावा म्हणून त्याचेवर फिर्याद केली.

# २

पण मॅरिआंचा स्वभाव इतका खर्चिक असे की तिला आतां प्रेमिकांकडून पैशाची मागणी केल्याशिवाय गत्यंतर नव्हते. अर्थात यामुळे तिच्याकडे येणाऱ्या लोकांचा दर्जा बदलला, आणि तिला पैशांत लोळणाऱ्या लोकांवर अवलंबून रहावें लागलें. यांतला पहिला 'मिशेल पार्तिसेली' नांवाचा होता. या वेळीं तिला आपलें पूर्वीचें प्रशस्त घर सोडून लहान घरांत रहावें लागलें. तिची आई, तीन भाऊ, आणि एक बहिण, तिच्याजवळच रहात असत, आणि इतक्या सर्वांचा खर्च तिच्या अंगावर असे. आणि कौटुंबिक प्रेम हा तिचा एक गुण असल्यामुळें ती तो आनंदाने चालवीत असे. इतकेंच नव्हे तर एकदां एका भावाला कर्जाकरतां तुरुंगांत जावें लागूं नये म्हणून तिने म्हाताऱ्या न्यायाधीशाबरोबर एक रात्र काढायला मागेंपुढें पाहिलें नाही.

या नवीन घरांत तिच्या स्वतःकडे फारशी जागा नव्हती. पण जी काय होती ती तिने मोठ्या थाटांत सजवली होती. तशीच स्वतःच्या शरीराची ती अत्यंत काळजी घेत असे, आणि कपड्यांत व प्रसाधनसाधनांत तिचा अतिशय खर्च होत असे. याचे एकच उदाहरण द्यायचें म्हणजे तिच्याजवळ ६५ जोड्या हातमोजे होते, आणि यांतल्या प्रत्येक जोडीवर तिचें नांव होतें. ती मेल्यावर तिच्या मालमत्तेची यादी केली होती, तीवरून ही माहिती मिळते. पण तिचे

दागिने मात्र फारसे नव्हते. या यादींत एकच दागिना दिला आहे. तो म्हणजे कर्णभूषणांची एक जोडी. यांत मध्यभागीं एक मोठा हिरा असून सभोवतीं दहा लहान लहान गुलाबाचीं फुलें होती. ( हीं पोंवळ्यांचीं केलेलीं असावी. ) मरेपर्यंत ती याच लहान घरांत होती. येथेच त्या वेळचे अनेक प्रसिद्ध तरुण तिच्याकडे येत असत. यांत प्रसिद्ध लेखक 'ला रॉशफू कॉ' हाही होता, पण नंतर तो तिला सोडून नीनॉंकडे जाऊं लागला, कारण नीनॉंची विद्वत्ता मॅरिऑं जवळ नव्हती. मॅरिऑं सुंदर होती; आणि यामुळे ती कामुकांना प्रिय होती, पण तिच्याजवळ तत्वज्ञानाच्या किंवा वाङ्मयाच्या गोष्टी बोलण्यांत अर्थ नव्हता. तिला त्यांतलें कांही कळत नव्हतें. तिच्याकडेही विद्वानांची बैठक असे असें दाखवण्याचा कांही लेखकांनी प्रयत्न केला आहे, पण याला बिलकुल पुरावा नाही. कित्येक असेंही म्हणतात की रिशलियूनंतर तिने मॅझॅरॅंच्या विरुद्ध कांही कारस्थानें केली, पण याचाही कांही विश्वसनीय पुरावा सांपडत नाही. सारांश कामुक आकर्षणापलीकडे तिच्याजवळ कांही नव्हतें हेंच खरें. कार्डिनल मॅझॅरॅंच्या विश्वासांतला देमरी नांवाचा मनुष्य त्या वेळीं तिला पैसे पुरवीत असे, आणि त्यानें तिला अशी धमकी दिली होती की मॅझॅरॅविरुद्ध कारस्थानें केल्यास तुला एक पैही मिळणार नाही. राजकीय गडबडीच्या काळांत धनाढ्य लोक किंवा त्यांच्या रखेल्या लोकप्रिय होण्याचा संभव, नसतो. कदाचित् त्यांना लुटण्याकडेच लोकांची प्रवृत्ति होण्याचा संभव. तेव्हां अशा वेळीं मॅझॅरॅ सारख्या मनुष्याचें वैर संपादण्याऐवजीं ती थोडीशी त्याला घाबरूनच वागत असे.

देमरी १६५० सालीं एकाएकीं वारला आणि यामुळे तिची रसद एकदम बंद झाली, आणि तिला गरिबींत दिवस काढावे लागणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. पण तिच्या नशिबांत तसें नव्हतें. यानंतर एकाच महिन्याने ती आजारी पडली, आणि हाच तिचा शेवटचा आजार. तो आजार काय होता हें कोणालाच धडसें समजलें नाही, आणि चारपांच दिवसांतच तिचा अंत झाला. तिची मालमत्ता कर्ज वारण्यास पुरेशी नव्हती, पण ज्या अनेक व्यापाऱ्यांचें ती देणें लागत होती, त्यांनी तिच्या वारसांशीं तडजोड करून समजूत करून घेतली.

मॅरिऑंला वेश्या म्हणणें चूक होईल. त्या काळीं फ्रान्समधें विवाहित स्त्रिया देखील मोठ्या कसोशीनें पातिव्रत्य पाळीत नसत. त्या काळचें प्रेमाचें तत्वज्ञानच हल्लीपेक्षां वेगळें होतें. बाह्यतः वागणुकींत छचोरपणा दिसला नाहीं, म्हणजे व्यभिचारी स्त्रियांचा देखील दर्जा जात नसे, आणि मॅरिऑंची वागणूक छचोर नसल्यामुळें तिलाही लोक मान देत असत. आर्नो याच्या पत्रांवरून असें दिसतें कीं दरबारांतूनही तिला आमंत्रण येत असें, आणि दरबारांत येणाऱ्या पुष्कळ स्त्रियांची वागणूक तिच्यापेक्षांही चंचल असें. मॅरिऑं विवाहित नव्हती ही एक गोष्ट सोडली, तर ती त्या वेळच्या विवाहित स्त्रियांपेक्षां फारशी अधिक चंचल वृत्तीची होती असें म्हणतां येत नाहीं.

तिच्या सौंदर्यापलीकडे तिच्यांत चिरस्मरणीय असे कोणतेही गुण नव्हते, आणि लाबॉर्द नांवाच्या एका लेखकाने तिचें एक खोटेंच चरित्र लिहून ठेवलें नसतें तर तिची कोणाला आठवणही राहिली नसती. याच माणसानें ती १३४ वर्षांपेक्षां जास्त जगल्याचें लिहिलें आहे, आणि ही गोष्ट १८५४ सालापर्यंत खरी मानली जात असे. पण या सालीं तालमां याने तिच्याविषयीं कांहीं खऱ्या गोष्टी प्रसिद्ध केल्यामुळें ही लबाडी बाहेर पडली. परंतु ही लबाडी जर झाली नसती तर मॅरिऑंची कोणाला आठवणही राहिली नसती, तेव्हां या लबाडीचा थोडासा उपयोग झाला हें खरें. तिचा हा चरित्रकार तिला नीनाँ द लांक्लोपेक्षां सुंदर ठरवतो पण तालमांचें मत तसें नाहीं.

त्याचप्रमाणें नीनाँ एक सारखी वाचनांत आणि स्वतःचे ज्ञान वाढवण्यांत दंग असे, यामुळे ती नास्तिक बनली इतकेंच नव्हे तर तिच्या म्हातारपणींही तिच्या ज्ञानाचा फायदा घेण्याकरितां तिच्याकडे केवळ बड्या लोकांचीच नव्हे तर विद्वानांची गर्दी असे. मॅरिऑं आपल्या शरीराची विशेष काळजी घेत असे आणि तें शक्य तितकें अधिक आकर्षक करण्याचा यत्न करीत असे. नीनाँ ज्ञानार्जनांत गुंतल्यामुळें तिला शेवटी शरीराची मातब्बरी वाटत नाहीशी झाली. मॅरिऑं सुंदर होती पण शारीरिक सौंदर्य किती दिवस टिकणार? तें नाहीसें झालें कीं लोक विसरतात, पण नीनाँची तरुणपणची चंचलता सोडून दिली तर ती त्या शतकांतली एक प्रख्यात विदुषी म्हणूनच तिचें नांव इतिहासांत अजरामर राहील.

प्राचीन ग्रीसमध्यें हेटायरा या नांवाने प्रसिद्ध असलेल्या ज्या गणिका असत, त्यांच्या तोडिच्या या दोनच स्त्रिया फ्रान्समधें होऊन गेल्या. यांचें नांव इतिहासांत राहिलेंच पाहिजे, कारण त्या काळचे बहुतेक बडे लोक याच्या तैनातींत असत. फ्रान्स व इंग्लंडमधें मुख्य फरक आहे तो हा की या काळीं म्हणजे तेराव्या लुईच्या कारकीर्दीत अनिर्बंध प्रेमाला पूर्ण मोकळीक होती आणि त्याचा उघडपणें पुकारा करण्याची कोणालाही लाज वाटत नसे. ग्रीसमधले वक्ते किंवा योद्धे जितके प्रसिद्ध होते, तितक्याच गणिकांही होत्या. त्याचप्रमाणें फ्रान्समधील या दोन गणिकांची स्थिति होती ?

—–—

# पॅरिसच्या परी

# ३

——

मॅडॅम द मॅंतनाँ

* *
*

( १६३५–१७१९ )

# १

मॅदॅम द मँतनाँ हिला जरी गणिकांच्या सदरांत घालतां येणार नाहीं, तरी हीही त्याच काळांतली असून तिचें चरित्र अत्यंत चमत्कृतिजनक असल्यामुळें त्याचा यांत समावेश केला आहे. ही स्वतःच्या कर्तबगारीनें आणि व्यवहारचातुर्यानें हालअपेष्टांतून निघून राजाची राणी कशी बनली, याचा इतिहास कादंबरीपेक्षांही अधिक आकर्षक आहे. 'स्त्रियश्चरित्रम्' म्हणून जें म्हणतात, तें एका अर्थानें हिच्या चरित्राला लागू आहे.

हिचा जन्म झाला तो तुरुंगांत ! तिचा बाप कॉंस्तां दोबिन्ये हा तुरुंगांत असतांना त्याचें व तुरुंगावरील अधिकाऱ्याच्या मुलीचें प्रेम जमलें आणि शेवटीं त्या दोघांचें लग्न लावून देणें अपरिहार्य झालें. अर्थात मुलीच्या लग्नाला बापानें नाइलाज म्हणून संमति दिली, परंतु तरीदेखील त्यांचा तुरुंगांतून सुटका झाली नाहीं. कारण कॉंस्तां यानें तुरुंगवासांत बरेंच कर्ज करून ठेवले होतें आणि तें फिटलें नाहीं तोंपर्यंत त्याला तुरुंगांतच राहणें भाग होतें. तेथेंच या चरित्राची नायिका फ्रांस्वाज हिचा जन्म २८ नवंबर १६३१ रोजीं झाला. यावेळीं तिच्या बापाचें वय ४६ आणि आईचें १८ होतें.

कॉंस्तांचा बाप बराच प्रसिद्ध असून श्रीमंत होता, परंतु त्याचा पंथ प्रॉटेस्टंट होता आणि मुलानें कॅथोलिक पंथाच्या मुलीशीं लग्न केलें, तेव्हां

दोन्ही बाजूचे नातेवाईक नाखुष झाले आणि त्याचें कर्ज फेडून त्याची सुटका करायला कोणीही तयार होईना; आणि एका काळीं ऐटींत पोषाख करून दरबारांत वावरणाऱ्या या लक्ष्मीपुत्राला थोड्याशा रकमेकरतां तुरुंगांत खितपत पडावें लागलें.

या वेळीं धर्माच्या निमित्ताने आपआपसांत युद्धें होत असत. त्याचा बाप ॲग्रिप्पा याला धर्माचा जाज्वल्य अभिमान होता, पण मुलगा आपल्या सोयीप्रमाणें कोणत्याही पंथांत जायला तयार होता ! तेव्हां बापाला मुलाची मोठीशी किंमत वाटली नाही यांत नवल नाही. आणि त्याला कोणीही मान द्यावा अशी त्याची वागणूक नव्हती. पण त्याच्या मुलीच्या अंगांत बापाचे गुण न दिसतां आजाचे दिसूं लागले. चिकित्सक बुद्धि आणि मनाचा खंबीरपणा या दोन गुणांबद्दल मॅदम द मँतनाँची प्रसिद्धि आहे आणि हे गुण बापांत नव्हते, आजांत होते. अर्थात् तरुणपणीं त्यानेही गुण उधळले नव्हते असें नाही, पण त्याला पुढें त्याबद्दल पश्चात्ताप झाला होता आणि मॅदम द मँतनाँ ही जरी राजाची प्रेयसी झाली तरी तिला ऐहिक सुखांविषयी एकंदरींत तिटकाराच वाटत असे, आणि त्या काळचें सामाजिक वातावरण पाहिलें म्हणजे याबद्दल आश्चर्यच वाटतें, कारण अत्यंत धार्मिक लोक देखील तोंडाने पाहिजे तें बोलले तरी स्त्रीपुरुषसंबंधांत कांही पाप आहे असें व्यवहारांत मानीत नसत.

काँस्तां पैशाकरतां वाटेल तें करायला तयार होता, आणि त्याने धर्माकरतां हद्दपार केलेल्या बापाविरुद्ध चाल करायला मागेंपुढें पाहिलें नाही. बापानेही मरतांना त्याला शापच दिला आणि आपली संपत्ति त्याला न ठेवतां त्याच्या मुलांना ठेवली. त्याची नात फ्रांस्वाज हिच्या अंगांत जरी त्याचेच बरेच गुण आले होते, तरी धर्म अंगच्या गुणांवर अवलंबून नसतो. तो आईबापांनी मुलांवर लादलेला असतो. तिच्या आईच्या इच्छेप्रमाणें तिला कॅथोलिक पंथाची दीक्षा दिली, आणि आई तुरुंगांत असल्यामुळें हें काम काँस्ताची बहिण मार्कीज द व्हिलेत हिने केलें, आणि तिनेच मुलीला तुरुंगांत राहूं न देता आपल्या घरीं नेऊन वाढवली. कांस्तां खरें पाहिलें तर नास्तिक होता, म्हणजे मुलगी कोणत्या पंथांत गेली याची त्याला परवा

नव्हती. त्याला मुलगी झाल्याबरोबर बापाच्या मृत्युपत्राप्रमाणें त्यांच्या मुलांना ठेवलेली मिळकत त्याच्या ताब्यांत आली. याचा उपयोग त्यानें इतकाच केला कीं ती त्यानें तावडतोब आपल्या मेहुण्याला विकली आणि त्यानें त्याबद्दल त्याला पंधराशें फ्रँकचें वर्षासन करून दिलें. कॉंस्तां यानें त्यांतून आपलें कर्ज फेडून तुरुंगांतून बाहेर पडल्याबरोबर आणखी कर्ज केलें, आणि तें फेडतां येईना म्हणून तो पुनः तुरुंगांत जाऊन बसला. हा धडा लहानपणींच मिळाल्यामुळे त्याची मुलगी स्वतंत्र झाल्यावर अत्यंत काटकसरी निघाली.

तिला जरी कॅथोलिक पंथाची दीक्षा मिळाली होती तरी तिची आत कॅथोलिक नव्हती आणि तिनें तिला अ‍ॅग्रिप्पाचा प्रोटेस्टंट धर्मच शिकवला. बाप तुरुंगांतून सुटला म्हणजे ती त्याच्याकडे जात असे. तो पुनः तुरुंगांत गेला म्हणजे पुनः आतेकडे येत असे. तिच्या मामानें बापाला जें वर्षासन कबूल केलें होतें, तें तो आतां देईना आणि घेतलेली मिळकतही परत करीना आणि तिची आई या बाबतींत कोर्टात फिर्यादी करण्यांत गुंतली होती व शेवटीं ती त्यांतच मेली, आणि कायद्याच्या भानगडींत ती मिळकतही तिच्या हातांतून गेली. तिची अन्नानदशा झाली होती. ती एकदां नवऱ्याबरोबर तुरुंगांत असतां मुलीला तेथे तिला भेटायला नेली होती, तेव्हां तिचा कठोर झालेला चेहरा पाहून मुलगी रडूं लागली. मॅदम द मँतनॉनें लिहून ठेवलें आहे, माझ्या आईनें माझें कधींही चुंबन घेतलें नाही. बाप मात्र तिचे लाड करीत असे.

इतक्यांत कार्डिनल रिशालिअ मरून त्याच्या जागीं मॅझॅरँ आला आणि त्यानें बरेच कैदी सोडले आणि त्यांत कॉंस्तांचीही सुटका झाली आणि हें कुटुंब एकत्र आलें. फ्रांस्वाज आतां सात वर्षांची झाली होती. तिची आई तिला कॅथोलिक चर्चमध्यें नेत असे, पण ती प्रॉटेस्टंट पंथांत वाढल्यामुळे ती वेदीकडे पाठ करून बसत असे, आणि आईनें मारलें तरी ऐकत नसे. इकडे बापानें वशिला लावून फरान्सच्या ताब्यांतील वेस्ट इंडिजमधील एका बेटाच्या गव्हर्नरची जागा मिळवली, आणि तीं सगळीं एकदम तिकडे रवाना झालीं.

तिकडे त्यांचे खाण्यापिण्याचे जरी हाल झाले नाहीत, तरी आपलीं मुलें शिद्दी नोकरांत वाढत असलेलीं आईला पसंत नव्हतीं. त्यांची फारशी हकीकत नमूद नाहीं, पण फ्रांस्वाजला आतां दोन भाऊ झाले होते आणि तीं सर्वजणें कांहीं दिवसांनीं परत आलीं. आतां कॉंस्तांच्या डोक्यांत एक नवीनच वेड शिरलें. यामुळें मुसलमान होऊन तुर्कस्थानांत कांहीं जमलें तर पहावें म्हणून तो निघणार होता. पण इतक्यांतच तो वारला. आईजवळ उपजीविकेचें साधन नसल्यामुळें ती आतेकडे परत गेली. तिचा एक भाऊ बुडून मेला आणि दुसरा भाऊ चार्लस याला मॅदॅम द नय्यां नांवाच्या त्याच्या मावशीने त्याला आपल्याकडे नेलें आणि नंतर राणीपर्यंत वशिला पोंचवून फ्रांस्वाजलाही नेलें. ही बाई कॅथोलिक होती आणि तिने तिला आपल्या पंथांत ओढण्याची शिकस्त केली, पण ती बधेना. शेवटीं मठांतील एका जोगिणिनें असें ताडले की धाकदपटशापेक्षां युक्तीने तिचें मन वळवणें अधिक शक्य होईल, आणि तिने तिला हाताशीं धरून ममतेनें वागवल्यामुळें फ्रांस्वाजने एकदां कॅथोलिक व प्रॉटेस्टंट धर्मवेत्त्यांचा वाद ऐकण्याची इच्छा दर्शवली. तिच्या इच्छेप्रमाणें असा वाद झाला, आणि ती बायबल हातांत घेऊन तो ऐकत होती. हा वाद कित्येक दिवसपर्यंत चालला होता आणि शेवटी त्यांत प्राटेस्टंट हरला. तिच्या बालमनाला हा पुरावा पुरेसा वाटला आणि ती लगेच कॅथोलिक झाली, इतकेंच नव्हे तर शक्य तितक्या लोकांना कॅथोलिक बनवण्याचा तिने चंग बांधला.

त्या वेळची राणी ॲन ऑफ आस्ट्रिया, ही कॅथोलिक होती, तेव्हां मॅदॅम द नय्यां फ्रांस्वाजला घेऊन पॅरिसला गेली. आणि तिने राजदरबारांत तिची ओळख करून दिली. पण लवकरच एक नवीनच अडचण उपस्थित झाली. फ्रेंच मुलींना दोनच मार्ग मोकळे असतात, एक लग्न करावें किंवा जन्मभर मठांत राहावें. पण त्या वेळीं हुंड्याशिवाय लग्न होणें अशक्य होतें. आणि जन्मभर मठांत राहण्याची तिची तयारी नव्हती. यांतून तोड काढणें कठिण होतें, पण शेवटीं ती निघाली.

मॅदॅम द नय्यां ज्या घरांत रहात असे, त्याच घरांत एक विद्वान परंतु गरीब लेखक आणि कवि रहात असे. तो गरीब होता इतकेंच नव्हे तर त्याला

अर्धांगवायु झालेला असल्यामुळें त्याला सारा दिवस खुर्चीत बसून काढावा लागे. ही खुर्ची बंद करतां येत असे आणि ती बंद केली म्हणजे फक्त त्याचे डोके लोकांना दिसत असे. तथापि तो अत्यंत विनोदी असल्यामुळें त्याच्याकडे लोकांची गर्दी होत असे. लोकांत हंशा पिकला असतां एकादे वेळी त्याला दुःखानें ओरडावे लागे आणि अशा वेळी लोकांना त्याची दया येई. त्याला कवितांवर थोडेसे पैसे मिळत आणि त्याचे स्नेहीही थोडीबहुत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करीत आणि त्याचे कसे तरी चाले. एकदां मॅदॅम द नय्यां फ्रांस्वाजला आणि तिच्या आईला घेऊन त्याच्याकडे गेली फ्रांस्वजच्या अंगावर धडसे कपडे नव्हते, आणि या कवीनें तिच्याकडे रोखुन पाहिल्याबरोबर ती रडूं लागली आईने मारलें तरीही जी कधी रडली नाहीं, ती आपल्या कपड्यां मुळें लोकांना दया येते हें पाहून रडली. अशा रितीनें त्यांची ओळख झाली. या कविचें नांव स्कॅरॉं आणि हा इतिहासांत प्रसिद्ध आहे.

---

म.ग्रं.सं. ठाणें.

# २

यानंतर फ्रांसमध्यें दोन पक्षांत युद्ध होऊन सर्वांची पांगापांग झाली, आणि ती गडबड संपेपर्यंत फ्रांस्वाजला पॅरिसमधून जावें लागलें. ती संपते तों तिची आईही वारली आणि ती पुनः एकदां मावशीच्या ताब्यांत आली. आईबरोबर तिला कांहीं काळ मठांत काढावा लागला होता, आणि लग्न न झालें तर अशा तुरुंगांत जन्म काढावा लागणार ही कल्पना तिला असह्य झाली. मावशी श्रीमंत होती, पण तिच्या मुलीचें जरी एका बड्या ड्यूकशीं लग्न झालें तरी ती फ्रांस्वाजकरतां खर्च करायला तयार नव्हती. तिला आपण आपल्या घरीं आश्रय देतों हाच तिला महदुपकार वाटत होता. अशा स्थितींत फ्रांस्वाज एका निकामी झालेल्या कवीशीं लग्न करायला तयार झाली याबद्दल तिला नांवें कोण ठेवील? हें व्यवहारचातुर्य जर तिनें दाखवलें नसतें तर तिचें नांवही कोणाला ऐकूं आलें नसतें, कारण मठ म्हणजे जिवंतपणीं मरण! तिच्या मावशीला तिच्याकडे लक्ष द्यायलाही फुरसत नव्हती. ही गरीब पण ऊंच आणि सुंदर मुलगी पाहून लोकांना दया येई. हळूहळू त्यांनी स्कॅरॉंबद्दल बोलायला सुरवात केली. प्रथम त्यांनी प्रत्यक्ष त्याचें नांव घेतलें नाहीं, तरी तुझें पुढें काय होणार असें विचारूं लागलीं, आणि नंतर तिनेंही विचार केला कीं मठ बरा कीं स्कॅरॉंशीं लग्न बरें?

या वेळी तिला सोळा वर्षें पुरीं होत आलीं होतीं. युद्धाचा वणवा पेटलेलाच होता. नवा राजा चौदावा लुई लहान होता व त्याची आई राज्य करीत होती. त्यांच्याभोंवतीं बडे लोक भांडत होते. पॅरिसला एकदां वेढा पडला होता आणि पुनः पडण्याची धास्ती होती. स्कॅरॉंला जो मदत करील त्याच्या बाजूने तो लिही. एकदां तो आपल्या खुर्चीतून राणीच्या दरबारांत गेला आणि त्याच्या वाक्चातुर्यामुळे राणीची त्याच्यावर ताबडतोब मर्जी बसली, पण तो कोणत्याही बाजूला टिकण्यासारखा नव्हता. कविता आणि गंमत करून लोकांची करमणूक करायची, आणि कोणी कांहीं देईल त्यावर जगायचें, हाच त्याचा धंदा होता. त्याने एकदां कार्डिनल मॅझॅरँची चेष्टा केल्यामुळे त्याने राणीला सांगून त्याची नेमणूक बंद करवली पण ते नुकसान इतारांनी भरून काढलें स्कॅरॉंच्या भोवतीं बड्या लोकांची गर्दी होत असे, कारण तेथे करमणुकीला तोटा नसे. त्याच्या भोंवती एक कुत्रा एक पोपट आणि एक माकड हीं कायमचीं असतच, आणि तेथे कांही बड्या बायाही येत असत. तेव्हां स्कॅरॉं जरी गरीब होता. तरी अगदींच फालतू मनुष्य नव्हता. तो एक प्रसिद्ध कवि होता. आतां फ्रांस्वाजला १८ वर्षेंही पुरीं झाली नव्हतीं आणि स्कॅरॉंला बेचाळीस पुरीं होतीं. पण तिला आपल्या आईच्या प्रेमविवाहाचें उदाहरण डोळ्यांसमोर होतेंच, तेव्हां मावशीला तिला फारसा आग्रह करण्याचें कारण पडलें नाही. या वेळीं स्कॅरॉं फार चातुर्याने वागला. त्याला बायकोचा उपयोग म्हणजे फक्त परिचारिका म्हणून होता. आणि तिला त्याने कधीही लग्नाचा आग्रह केला नाही. इतकेंच नव्हे तर मठांत जाण्याकरितांही जो थोडासा पैसा द्यावा लागतो तो त्यानें स्वतः एकदां देऊं केला. मात्र तिच्या सौंदर्याचा आपल्यावर बराच परिणाम झाला आहे. अशी बातमी त्याने अप्रत्यक्ष रीतीने तिच्यापर्यंत पोंचवली. तिने शेवटीं असा विचार केला की मावशी जर युद्धाच्या भीतीने कोठे निघून गेली तर पॅरिसमध्यें आपण एकटीने काय करावे? शिवाय स्कॅरॉं हा अगदींच कोणीतरी होता असें नाहीं. त्याचा आजा पार्लमेंटचा सभासद होता, आणि बापाची धार्मिकपणाबद्दल प्रसिद्धि होती.

बापाने दुसरें लग्न करून त्याला सावत्र आई दिल्यामुळे त्याला घरांतून जावें लागलें कारण तो तिच्या कंजूषपणाबद्दल वात्रट कविता करीत असे,

आणि बापाची तिच्यापुढें बोलायची छाती नव्हती. तेव्हां शेवटीं तो धंदेवाईक धार्मिक बनला, आणि एका लहानशा शहरांत जाऊन कांही दिवस प्रतिष्ठेने राहिला. पण तेथें एकदां एक नाटकमंडळी गेली, तेव्हां त्याच्या स्वभावाने उचल खाल्ली आणि नटींशीं प्रेमाचे खेळ खेळण्यांतच त्याचा वेळ जाऊं लागला. त्याला अर्धांगवायु कशाने झाला याबद्दल एक चमत्कारिक गोष्ट आहे, पण ती खरी आहे की नाही कोणाला ठाऊक! चमत्कारिक वेष करून नाटकी लोकांबरोबर हिंडण्याची त्याला संवय होती. अशा एका वेळीं तो आपल्या अंगाला प्रथम मध चोपडून नंतर परांच्या गादीच्या पिसांत लोळला आणि याशिवाय कोणताही कपडा न घालतां एका जत्रेंत गेला. तेथून तो लपतछपत घरीं जात असतांना कांही वात्रट लोकांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याची सर्व पिसें काढून टाकल्यामुळें तो नागवा झाला, आणि त्यांच्या पासून सुटण्याकरतां त्याने एका पुलावरून उडी मारली, आणि खालीं नदीच्या कांठच्या पाण्यांत पडला. तेव्हां त्याला थंडी बाधली आणि त्यामुळें अर्धांगवायु झाला असें म्हणतात! तेथून तो पॅरिसमध्यें जाऊन बरेच दिवस लपून राहिला, आणि त्याने वैद्यकी, फलज्योतिष, जादूटोणा, वगैरेचा अभ्यास केला, पण त्याला आराम पडला नाहीं. अर्थात त्याने कविता करण्याचें सोडलें नाहीं.

अर्थात ही सगळी हकीकत फ्रांस्वाजला माहीत नव्हती. तिला इतकेंच दिसलें. कीं याच्याशीं लग्न केल्यावर अर्थातच त्याची काळजी घ्यावी लागणार, पण निदान आपल्याला स्वतःला एक खोली मिळेल आणि त्याच्याकडे येणाऱ्या सर्व लोकांचा पाहुणचार करण्याची जबाबदारी पडली तरी अर्थात ओळखही होईल. अशा रीतीने आयुष्य कंठण्यांत कांहीं कमीपणा नव्हता, आणि तिला कोणाचा तरी आधार पाहिजे होता, तेव्हां तिने तें कबूल केलें. आणि शेवटीं हें लग्न झालें. या लग्नाच्या वेळची एक गोष्ट सांगतात की हा पंगू मनुष्य लग्नाला तयार झालेला पाहून लग्न लावणाऱ्या पाद्र्याने विचारलें, 'आपल्याला सर्व वैवाहिक कर्तव्यें पार पडतां येतील का? यावर स्कॅरॉनें उत्तर दिलें, 'हा प्रश्न माझा बायकोचा आणि

माझा आहे. आपण आपलें काम करा.' फ्रांस्वाजला अठरावें वर्ष पुरें झालें नव्हतें.

स्कॅरॅांचा पोरकटपणा आतां बराच कमी झाला आणि युद्धाची गडबड अजून संपलं नसल्यामुळें आपल्या वाह्यात कवितांमुळें आपल्यावर एखादे वेळीं भलताच प्रसंग येईल अशी त्याला भीति वाटूं लागली. या बाबतींत बायकोचें त्याच्यावर वजन पडलें यांत शंका नाहीं. या सुमाराला त्याचें एक नाटक रंगभूमीवर येऊन चांगलें यशस्वी झालें. तथापि या आपसांतल्या युद्धांत स्कॅरॅांचे बरेच स्नेही मेले आणि रस्त्यांतून एकसारखीं प्रेतें जात असत. पण या लग्नानंतर सहा महिन्यांनीं राजाला चौदा वर्षे पुरीं झाली आणि त्याने राजसत्ता हातीं घेतल्याबरोबर तो एकदम इतका लोकप्रिय झाला की त्यापुढें दंगल करण्याची कोणाचीही छाती झाली नाहीं, आणि सर्व बंडखोर आपआपले भाडोत्री सैनिक घेऊन पळून गेलें आणि सर्वजण राजाची मर्जी संपादणिच्या उद्योगाला लागले.

यांतल्या कांही लोकांना स्कॅरॅांने मदत केलेली असल्यामुळें आतां त्याची उपासमार होण्याची वेळ आली. पण फ्रांस्वाज त्याला धीर देण्यास सज्ज होती. त्याच्याबरोबर तिने इटॅलियन, स्पॅनिश व लॅटिन भाषांचा अभ्यास केला. आणि त्याला आतां लिहितां येईनासें झाले होतें, तेव्हां ती लेखकाचें काम करूं लागली. आतां त्याच्याकडे कोणी येईना, पण तो स्पॅनिश नाटककारांचें अनुकरण करून नाटकांत रोखठोक भाषा आणि विनोदी संवाद लिहूं लागला. फ्रांस्वाज प्रथम या भाषेला घाबरत असें, पण हळूहळू तिलाही यामुळें सरळ आणि स्पष्ट भाषा लिहायची संवय झाली.

पण पूर्वी त्याच्याकडे येणारे बडे लोक आतां त्याच्या वाऱ्याला उभे रहात नव्हते, कारण राजाची मर्जी संपादन करीपर्यंत त्याची स्वतःचीच शाश्वती नव्हती. त्याचे पोट भरण्याची पंचाईत होती. एकदां नवराबायकोने मनाचा धडा करून होते नव्हते तें विकुन परदेशी जाण्याचा प्रयत्न केला, परंतु नवऱ्याच्या पंगूपणामुळें तें जमेना. शेवटीं तीं दोघेंही पॅरिसला परत आली. खुर्चीत बसून राहणाऱ्या पंगू माणसाला काय करतां येणार? परंतु बायकोच्या

नाल्याची मॅदॅम द नान्हाय नांवाची एक बाई दरबारांत वजन राखून होती तिच्या वजनाचा फायदा घेण्याचें त्यांनीं ठरवलें, आणि एक घर तीन वर्षांच्या करारानें भाड्याने घेतलें या घराशेजारींच नाटकगृह होतें, आणि तेथल्या प्रेक्षकांनीं दिलेल्या टाळ्या स्कॅरॉंला ऐकं येत असत.

पण आतां सर्वत्र शांतता होत होती आणि यामुळें लोक स्कॅरॉंकडे परत येऊं लागले इतकेंच नव्हे तर आतां त्याची बायको तेथें असल्यामुळें प्रतिष्ठित लोक आपल्या बायकांना बरोबर घेऊन येऊं लागले फ्रांस्वाज सुंदर होती, पण तिची वृत्ति गंभीर असल्यामुळें स्त्रियांना देखिल तिच्या सौंदर्याचा मत्सर वाटत नसे. केवळ बडे लोकच नव्हे तर बुद्धिमान लोकही आपल्याकडे येतात याचा तिला अभिमान वाटूं लागला. आणि एके दिवशीं सर्व शहरांत सौंदर्य, बुद्धि, चातुर्य वगैरे सर्वच बाबतींत आदर्श होऊन बसलेली नीनाँ द लांक्लो देखील तिच्याकडे हजर झाली. नीनाँ या वेळीं चाळीस वर्षांची होती आणि तिची चंचलता अजूनही कमी झाली नव्हती. तरी सर्व शहरावर तिची छाप होती. आणि ती कोठेंही गेली तर ती भाग्याचीच गोष्ट समजत असत.

या कालासंबंधी तिने पुढें असें लिहिलें की 'लोकांचा स्नेह आणि मान संपादन करावा. यापलीकडे माझी कोणतीही स्वार्थी दृष्टि नव्हती.' आणि या गोष्टी तिला भरपूर मिळाल्या. तिची वागणूक भारदस्त असे. स्कॅरॉंच्या दोस्तांचें संभाषण सभ्यतेच्या मर्यादेपलिकडे जात आहे असें वाटल्यास ती आपल्यासारख्याच कांही बायकांना आपल्या स्वतःच्या खोलींत घेऊन जाई. आणि मग इकडे वाह्यांत संभाषणाला ऊत येई. स्कॅरॉं गरीब होता, तरी त्याचेकडे गर्दी करण्यास बड्या लोकांना देखील संकोच वाटत नसे, कारण तेथें जाणारे पुष्कळ लोक त्याला कांहीं उपयुक्त नजराणे पाठवून अप्रत्यक्ष मदत करीत असत. पण हें ज्यांना माहीत नव्हते त्यांना तेथील चैनीचे पदार्थ आणि चमचमीत अन्न पाहून आश्चर्य वाटत असे.

विनोदाची मूर्ति समजलेला नवरा, आणि सभ्यतेचें प्रतीक मानलेली बायको, यांचे कसें काय जमत असेल अशी कोणालाही शंका येईल, कारण विनोद आणि सभ्यता यांचें फारसें सख्य नसतें. पण विनोदाबद्दल ख्याति

असलेले लोक पुष्कळ वेळां खाजगी आयुष्यांत विनोदी नसतात कांहीं असलें तरी नवऱ्यामुळेच आपल्याला कांहीतरी आधार मिळाला हें जाणून फ्रांस्वाज आपल्या कर्तव्याला जागत असे.

युद्धाचा वणवा शांत होऊन चौदाव्या लुइने १६६० सालीं पॅरिसमध्यें मोठ्या थाटाने प्रवेश केला. स्पेनच्या राजाच्या, म्हणजे त्याच्या मामाच्या मुलीशीं त्याचे नुकतेंच लग्न झालें होतें. ही मिरवणूक पहायला फ्रांस्वाज ज्या बड्या घराच्या सज्जांत बसली होती, त्याच्याच पलीकडच्या सज्जांत खुद्द राजाची आई, इंग्लंडची हद्दपार झालेली राणी, आणि मॅझॅरँ वगैरे बडे लोक बसले होते. या नगरप्रवेशाचें वर्णन तिने आपल्या एका मैत्रिणीला लिहिलेलें आहे. त्यावरून तिच्या मनावर याचा केवढा परिणाम झाला हें समजतें. नव्या राणीला किती समाधान वाटलें असेल, याचें वर्णन करतांना एक दिवस आपणही याच राजाची राणी होणार आहों याचें स्वप्न तिला खात्रीने पडले नव्हतें पण आपल्या स्वतःच्या स्थितीबद्दल तिला वाईट वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

यावेळेंपासून स्कॅरॉंच्या लोकप्रियतेला उतरती कळा लागली. करमणुकीची सर्व साधनें राजदरबारांत नेहमीच असतात, तेव्हा लोक तिकडे आकर्षित झाले तर नवल नाही. त्याच्याकडे आतां फारसे कोणी येईनासें झाले आणि यामुळें त्याला कांही मदतही मिळेना. शेवटी त्याला आपले कांहीं सामानही विकावें लागलें त्याने एखाद्या बड्या माणसाला आपल्या कविता अर्पण केल्या तरी त्याच्याकडून कांही मिळेना, तेव्हां संतापून त्याने एकदां कांहीं कविता आपल्या आवडत्या कुत्र्याला अर्पण केल्या. आणि तो पुनः एकदां आपली प्रकृति सुधारण्याकरतां रासायनिक प्रयोग करूं लागला. आपल्याला एखादे नवयौवन देणारें अमृत सांपडेल, किंवा एखादें भूत, पिशाच्च आपल्याला मदत करील अशीही त्याची कल्पना होती. पैसे मिळवण्याचेही निरनिराळे बेत त्याने केले, पण ते फारसे व्यवहार्य नसत.

अशा स्थितींत त्याला एकदां स्वीडनची राणी क्रिस्तीना हिच्याकडून आमंत्रण आलें तेव्हां त्याला फार आनंद झाला. ही राणी पॅरिसच्या गमती

पहायला आली होती आणि याच दृष्टीनें तिने त्याला बोलावला होता. त्यानें आपली खुर्ची तिच्याकडे नेववली, आणि तीं दोघेंही एकमेकांना पाहून खुष झालीं. तिची बुद्धि आणि विद्वत्ता पाहून स्करॉंला आश्चर्य वाटलें. स्पॅनिश नाटककारांविषयीं तिला त्याच्यापेक्षांही जास्त माहिती होती. त्याला निरोप देतांना तिने सांगितले की 'आपण दोघेही कुरूप असल्यामुळें आपलें चांगलें जमेल. तुला माझ्यावर प्रेम करायला मी परवानगी देतें' पण तें तितकेंच राहिलें.

यापुढें त्याचीं प्रकृति अधिकच बिघडली. एका खेड्यांत त्याच्या बहिणीचे घर होते, तेथें तो रहायला गेला. तो एक विनोदी कादंबरी लिहित होता. अर्थात् लिहिण्याचें काम फ्रांस्वाज करीत असे, आणि तें काम झाल्यावर ती त्याच्या शेजारीं चरकावर सूत काढीत बसे, आणि तो तिच्याकडे पहात तासचे तास बसत असे. अशा सुंदर स्त्रीचें आयुष्य आपल्यासारख्याची काळजी घेण्यांत फुकट जावे याबद्दल त्याला वाईट वाटत असे, या सुमाराला त्याने एका मित्राला लिहिलें की 'मी आतां लवकरच मरेन, पण मला सर्वांत वाईट वाटतें तें इतकेंच की अशा बायकोला मागें ठेवण्यासारखें माझ्याजवळ कांहीं नाहीं.'

शेवटीं त्याला पॅरिसलाच मरण आले. त्याला पन्नासावें वर्ष लागलें होतें. मरतांना त्याच्याजवळ एका पाद्र्याशिवाय कोणीही नव्हते. अर्थात फ्रांस्वाज तेथें होतीच. अशारीतीनें ती कुमारी असतांनाच विधवा झाली.

---

६७२२

# ३

फ्रांस्वाजचीं यापुढील दहा वर्षे अज्ञातवासांत गेलीं. स्कॅराँ मेल्याबरोबर ज्या ज्या लोकांचें कर्ज देणें होतें त्यांच्याकडून मागण्या आल्या. दुकानदार, नोकर, आणि आप्तेष्ट या सर्वांचेंच देणें होतें. लग्नाच्या करारांत स्कॅराँने तिला २३००० फ्रँक कबूल केले होते, परंतु सर्व सामान विकून आणि कर्ज वारून शेवटीं तिच्या हातीं फक्त चारपांच हजार फ्रँक शिल्लक राहिले. तेव्हां तिने एका मठांत आपली सोय केली. म्हणजे ती कायमची मठांत गेली नाही, कारण तें टाळण्याकरतां तर तिने लग्न केलें होतें, परंतु तिने मठाच्या आवारांत जागा घेतली आणि जेवणाची सोय मठाकडूनच करून घेऊन त्याचा खर्च मात्र ती देत असे. अशा रीतीने ती घरकामांतून सुटली आणि तिला कोठेही जाऊन पाहिजे तें करायला वेळ मोकळा राहिला.

या वेळाचा उपयोग तिने आपल्या स्नेह्यांना मदत करण्यांत केला. बऱ्याच लोकांच्या ओळखी तिने अशा रीतीने कायम ठेवल्या आणि जो तो प्रत्येक बारीकसारीक बाबतींत तिचा सल्ला विचारूं लागला. घरखर्च कमी कसा करावा हेंही ती सांगे त्याचप्रमाणें राजकारणांतही तिचा भारदस्तपणा तिच्या कामाला आला. वयोवृद्ध मुत्सद्दी तिला आपल्या मसलतींत घेऊं लागले आणि तिने जरी स्वतः असें लिहून ठेवलें आहे की 'मला इतरांबरोबर हंसायला खिदळायला जास्त

आवडलें असतें' तरी तिला मिळालेला मोठेपणा तिला आवडत नाही असे दिसत नाही, मॅदलेन द स्क्युदेरी नांवाच्या प्रसिद्ध लेखिकेचा व तिचा इतका स्नेह जमला की 'मॅदॅम स्कॅरॉं नेहमी आमच्याकडेच जेवायला जसे' असें तिने लिहिलें आहे. या लेखिकेने गोष्टीच्या रूपाने फ्रांस्वाजचें हुबेहुब चित्र काढलें आहे. स्कॅरॉंसारख्या लोकप्रिय लेखकाची विधवा अशा रीतीने एका मठांत राहते आहे, ही बातमी विधवा राणीच्या कानावर गेली, आणि तिच्या एका धार्मिक मैत्रिणीने तिला असेंही सांगितलें की अशा तरुण आणि सुंदर विधवेला गरिबींत रहायला लावण्यांत धोका आहे, तेव्हां राणीने ताबडतोब तिला खर्चातून २००० फ्रँकचें वर्षासन नेमून दिलें. अर्थात् हें वर्षासन म्हणजे जेमतेम अन्नवस्त्राचा खर्च निघेल इतकेंच होतें, परंतु ती अत्यंत काटकसरीने रहात असल्यामुळें यांतूनही ती शिल्लक टाकीत असे.

ती अत्यंत कामसू असल्यामुळें ती सर्वांनाच पाहिजे असे, आणि स्कॅरॉंच्या सहवासाने तिच्यांत बरेंच संभाषणचातुर्य आल्यामुळे तिचा कोणाला कंटाळा येत नसे. यामुळे रिशलिअरसारख्या बड्या मनुष्याच्या घरांत देखील तिला केव्हांही जातां येत असे. तिला कोणी जेवणाचा आग्रह केला तर ती रहात असे आणि रात्रीं मठाचीं दारें बंद होण्याइतका वेळ गप्पा झाल्यातर तिची झोपण्याचीही सोय लोक आनंदाने करीत असत. त्या काळच्या नीतिमत्तेच्या कल्पना लक्षांत घेतां ही तरुण आणि सुंदर विधवा कामविकारापासून अगदीच अलिप्त राहिली असेल की काय, याबद्दल कित्येक लेखकांनी शंका व्यक्त केली आहे आणि कित्येकांनी तर तिचा अनेकांशी संबंध जोडून दिला आहे परंतु तिच्या काळच्या लेखकांनी मात्र अशी शंका घेतलेली नाही. तिची धार्मिक वृत्ति आणि एकंदरींत शारीरिक सुखाविषयी तिरस्कार, या गुणांवरून कामविकारापासून तिला फारसा त्रास झाला असेल असें दिसत नाही. ती आपली गरीबी लपवीत नसे, तरी तिला आपल्या थोर कुळाचा अभिमान होता व ती जरी सुंदर होती, तरी लोकांना तिचा हेवा वाटत असे तो तिच्या सौंदर्याबद्दल नसून मोठमोठे लोक तिला आपलें गुपेत सांगून तिचा सल्ला घेत असत याबद्दल होता.

ती एखाद्या सरदारणीकडे पाहुणी गेली तर तिच्या घरची व्यवस्था पाहण्याचें काम हिच्याकडेच आपोआप येई, आणि ती तें मोठ्या आनंदाने करी. ती सकाळीं सहा वाजतां उठून कामाला लागत असे आणि नोकरांना कामाला लावीत असे. याचा परिणाम असाही झाला की तिला कांही कारणाने एखादे दिवशीं बरें नसले, तर या बड्या बाया तिच्या समाचाराला ताबडतोब येत असत. मठावरच्या अधिकाऱ्यांना हें मोठेंसें पसंत नसे, आणि त्यांनी तक्रार केल्यावरून तिने एकदां आपले बिऱ्हाड दुसऱ्या मठांत नेलें. इतकें काम करूनही तिने आपला दर्जा कधीही कमी होऊं दिला नाही. थोर लोकांच्या घरीं जरी तिनें मदत केली तरी ती त्यांच्या बरोबरीने वागत असे.

यामुळें राजाने जेव्हां एकदां बडा खाना दिला, तेव्हां तिला आमंत्रण मिळालें आणि दरबारांत तिचा प्रथम शिरकाव झाला. अर्थात या खान्याला भपकेबाज पोषाख केलेल्या तीनशें स्त्रिया हजर होत्या, तेव्हां तिच्याकडे कोणी विशेष लक्ष दिलें असेल असें नाहीं, परत आल्यावर नव्या राणीविषयी गप्पा सुरू झाल्या. तिला अजूनही धड फ्रेंच बोलतां येत नव्हतें आणि तिची प्रकृतीही ठीक नव्हती. तिला एक मुलगा झाला होता, पण नंतर तिला चार वर्षांत चार मुलें होऊन तीं सर्व मेलीं होतीं. या वेळीं मार्कीज द मॉस्पां नांवाची बाई राणीच्या तैनातींत होती, आणि तिचा शयनगृहापर्यंत शिरकाव असल्यामुळें ती राणीसंबंधी नेहमी बोलत असे. गरीब बिचारी राणी राजा येण्याची वाट पहात अंथरुणावर पडलेली असे आणि तिची करमणूक करण्याचें काम हिच्याकडे असे. तिकडे राजा आपल्या मर्जीतल्या एखाद्या बाईबरोबर गप्पा करीत बसलेला असे. या वेळीं मॅडम द व्हॅलिएर नांवाच्या बाईवर त्याचें प्रेम होतें. तिला या वेळेपर्यंत राजापासून चार मुलेंही झालीं होती, आणि यांपैकीं दोन बाळंतपणें राजवाड्यांतच झालीं होतीं. राणीला हें माहीत नव्हतें असें नाहीं, आणि शेवटच्या मुलाच्या वेळीं तिने स्वतः बाळंतिणीच्या खोलींत जाऊन तिची विचारपूस केली होती ही हकीकत मॅडम द मॉंतेस्पां हंसत हंसत सांगत होती शेवटीं ती असेंही म्हणाली कीं ' दुर्दैवाने मी जर राजाच्या मर्जींत असतें तर राणीच्या समोर

जायची माझी छाती झाली नसती.' माजी राणी कॅन्सरच्या विकारानें जजर झाली होती, तेव्हां ती कशांतच लक्ष घालीत नसे. यानंतर राजाची मर्जी मॅडम द मॉंतेस्पांवरच बसली, पण या वेळीं तिला कदाचित ही कल्पनाही नसेल. आणि मॅडम स्कॅरॉं? ती या सर्व हकीकती ऐकून घेत होती, पण आपल्यावरही पुढें तोच प्रसंग येणार आहे याचें स्वप्नही तिला पडलें नव्हतें. धार्मिक वृत्तीमुळें ती अशा गोष्टींचा विचारच करण्याचें टाळीत असे.

तरीपण कांहीं लेखकांनीं तिची नालस्ती केली आहे हें खरें. तथापि या बाबतींत तिच्या काळच्या लोकांच्या मतालाच अधिक महत्व देणें भाग आहे. नीनॉं द लांक्लो तिची मैत्रीण होती आणि फ्रांस्वाज तिच्याकडे जातही असे. नीनॉंच्या नीतीच्या कल्पना अगदीच वेगळ्या होत्या आणि मॅडम स्कॅरॉंचें शील कायम राहिलें किंवा न राहिलें, याचें महत्व तिला वाटत नव्हतें. तरीपण तिच्या मतें तें कायम होतें. ती थोड्याबहुत तिरस्कारानें फ्रांस्वाजबद्दल म्हणते की 'तिला ईश्वराची फार भीति वाटत असल्यामुळें ती नीतीने राहते. मीं तिला पुष्कळ सांगितलें, पण ती ऐकत नाहीं!' यावरून ती आपलें शील संभाळून होती याबद्दल शंका वाटत नाहीं. तालमां दे रेओ या लेखकाने तिच्याबद्दल लिहिलें आहे की 'व्हिलार्सो तिच्या मागें आहे, पण ती त्याची कांहीं डाळ शिजूं देत नाहीं.' सुंदर स्त्रियांच्या मागें कांहीं लोक असायचेच, पण ती त्यांना बधत नव्हती असें दिसतें.

—

# ४

१६६६ सालीं राजाची आई कॅन्सरच्या विकारानें मेली, आणि लुई जरी त्या वेळीं भरपूर रडला, तरी नंतर त्याला अधिक स्वातंत्र्य मिळाल्यासारखें वाटलें यांत शंका नाहीं त्याचें वय या वेळीं २८ होतें. त्याच्या पूर्वीच्या राजांची नीतीबद्दल ख्याती नव्हती. राजा म्हटला की त्याच्या रखेल्या आणि अनौरस मुलें सर्वत्र विखुरलेलीं असायचीं हें ठरलेलेंच, आणि चौदाव्या लुइची अहंमन्यतेबद्दल प्रसिद्धि आहे. त्याच्या लढायांमुळें फ्रान्सला बरेंच वैभव प्राप्त झालें यांत शंका नाहीं. पण त्यामुळें त्याची घमेंड इतकी वाढली की, ' फ्रान्स म्हणजेच मी ', असें त्यानें म्हटल्याचें इतिहासप्रसिद्ध आहे. राजांचे खाजगी व्यवहार देखील गुप्त रहात नाहींत. या वेळीं त्याची मर्जी ला व्हॅलिएर नांवाच्या स्त्रीवर होती. हें वर सांगितलेंच आहे. आतां त्याबद्दल कांहीं गुपित ठेवण्याचे कारण राहिलें नाहीं.

त्या वेळची पद्धत अशीं होती की राणीच्या तैनातीला कांही मोठ्या कुळांतील स्त्रिया नेमून दिलेल्या असत आणि त्यांना यांत भूषणच वाटत असे. अर्थात याच स्त्रिया राजाच्या नजरेंत नेहमीं येत आणि त्यांतूनच अंगवस्त्राची निवड होई. ला व्हॅलिएर त्यांपैकींच होती. तिची दोन मुलें अगोदरच मेलीं होती, पण जुनी राणी मेल्यानंतर एकाच वर्षांत तिचें तिसरें

मूल ‘मॅदम्वाझेल द ब्ल्वा’ हिला कायद्यानें औरसपणा मिळाला, आणि तिच्या आईला डचेस हा किताब मिळाला. यामुळें तिचा बडेजाव झाला खरा, पण तिला त्याबद्दल आनंद वाटला नाहीं. उलट आपली कारकीर्द आतां संपली म्हणूनच राजानें आपल्याला हें शेवटचें बक्षिस दिलें आहे, अशी तिची खात्री झाली. आणि तेंच खरें ठरलें.

राणीच्या तैनातींतल्या स्त्रियांपैकीं सर्वांत आनंदी आणि चतुर म्हणजे ‘मार्कीज द मांतेस्पां’ ही होती आणि तिच्याकडेच राजाचें लक्ष गेलें होतें. १६६७ सालीं तो जेव्हां सैन्याबरोबर लढाईला निघाला, तेव्हां तिला राणीच्या गाडींत स्थान मिळालें आणि ला व्हॅलिएरला निमंत्रणच नव्हतें. तरीदेखील ती आपण होऊनच आपल्या गाडींतून त्याच्या मागोमाग गेली आणि राजाच्या छावणींत दाखल झाली. पण त्यानें तिला स्पष्ट सांगितलें की ‘मला प्रेमांत जबरदस्ती खपणार नाही.’ या छावणींतच तिचें स्थान मॅदम द मॉंतेस्पानें पटकावलें. ‘दुर्दैवानें मी राजाच्या मर्जींतली असतें तर...’ असें जें ती एकदां बोलली होती, तेंच दुर्दैव आतां तिच्या नशिबीं आलें, पण तिला त्याबद्दल वाईट वाटलें असें दिसलें नाही.

यांत एकच अडचण होती कीं तिचा नवरा जिवंत होता आणि तो हें सहज कबूल करणारा नव्हता. त्यानें आरडाओरड करून कांही उपयोग होत नाहींसें पाहून एकदां आपल्या बायकोची खोटीच प्रेतयात्रा काढली, आणि ती मेली असें समजून त्यानें काळे कपडे घातले. तरीपण ती कायद्यानें त्याची बायको होती आणि तिला राजापासून मूल झालें तरी कायद्यानें तें त्याचेंच झालें असतें. राजाला त्याची अडचण भासली यांत शंका नाही. त्यांतून त्यानें अशी युक्ति काढली की ला व्हॅलिएरला आपण अजून टाकलें नाही असा त्यानें बहाणा केला, आणि तिच्या खोलींतून त्याला मॅदम द मॉंतेस्पांच्या खोलींत जातां येईल अशी व्यवस्था झाली.

पण तिला मूल झाले तर काय करावें ही अडचण होतीच. या वेळीं तिला अपली मैत्रीण मॅदम स्कॅरॉं हिची आठवण झाली. तिनें राजाचें मूल आपल्या ताब्यांत घेऊन गुप्तपणें वाढवावें असा बेत झाला. पण फ्रांस्वाज

अशी सहज कबूल होणारी नव्हती. तिनें आपल्या धर्मोपदेशकाचा सल्ला विचारला. व्यभिचरापासून झालेल्या मुलाला वाढवणें योग्य होईल काय, असे विचारतां त्यानें यांतून तोड काढली. ती अशी कीं, तें राजाचें मूल, तें कसें झालें हें पाहण्याचें कारण नाहीं. त्या मुलाला पुढें कायद्यानें औरसपणा दिला, तर त्याच्या आईचें नांव अर्थातच जाहीर होणार नाही. कारण ती विवाहित स्त्री होती. तेव्हां त्यांत आईचा संबंध नाही असें मानून तें राजाचें मूल राजाज्ञेप्रमाणें वाढवायला कांही हरकत नाही, असें त्याने मत दिले. ला व्हॅलिएरला झालेलीं मुले वाढवण्याचें काम मॅदॅम कॉलबेरकडे होतें, तसेंच मॅदॅम द मॉंतेस्पांला राजापासून झालेलीं मुले वाढवण्याचें काम फ्रांस्वाजकडे आले. आणि धर्माची परवानगी मिळाल्याबरोबर तिने ते अंगावर घेतलें. राजाज्ञेचे पालन करण्यांत पाप कसें असणार? या बाबतींत तिची प्रत्यक्ष राजाशीं मुलाखत होऊन करार झाला.

यापैकी पहिलें मूल (मुलगी) पॅरिसमधेंच जन्माला आलें. फ्रांस्वाज तेथें बुरखा घेऊन गेली, तिने तें ताबडतोब आपल्या ताब्यांत घेतलें आणि पॅरिसच्या हद्दीवर एक बंगला नर्ससह तयार ठेवला होता, तेथें ते नेऊन त्यांच्या हवाली केलें. आतां तिला मठांतली जागा सोडून एक घर घ्यावें लागलें. कारण तिच्या या गुप्त हालचाली मठांतून करणें शक्य नव्हतें. तिने आपल्याकडून यांत शक्य तितकी गुप्तता राखली आणि आपण हें काम करीत आहों याची कोणालाही दाद दिली नाहीं.

दुसरें मूल (मुलगा) प्रत्यक्ष राजाच्या घरींच जन्मलें. आणि राजानें त्याला ताबडतोब ड्युक दी मेन ही पदवी दिली. अर्थात् पुढें त्याला औरसपणा मिळणार हें उघड होते. अजूनही लोकदृष्ट्या ला व्हॅलियेर हीच राजाच्या अंगवस्त्राच्या ठिकाणीं होती. अर्थात् फ्रांस्वाजचा राजवाड्यांत प्रवेश कसा व्हावा? याकरतां राजाच्या विश्वासांतल्या एका माणसानें तें मूल आपल्या कपड्यांत कसें तरी गुंढाळून घेऊन राणीवशांतूनच बाहेर नेलें आणि आवाराच्या-बाहेर मॅदॅम स्कॅरॉं गाडींत वाट पहात होती तिच्या हवाली केलें हें मूल आणखी एका बंगल्यांत नेऊन ठेवलें. या दोन बंगल्यांत वेळोवेळीं जाऊन या मुलांच्या

अन्नाची वगैरे व्यवस्था पाहून ती सर्व महत्त्वाचीं कामें स्वतः करीत असे. यांत तिनें कधीही कंटाळा केला नाहीं आणि राजाचें हें गुपित कोणालाही कळूं नये म्हणून तिला अतिशय कष्ट पडले, तेहीं तिनें मुकाट्यानें सहन केले. राजानें तिला याबद्दल मोबदला देऊं केला होता हें खरें, परंतु तो मोबदला काय हें नक्की ठरलेलें नव्हतें. तें मोघमच होतें. पण यामुळे राजाजवळ तिच्या शद्बाला किंमत होती आणि तिनें आपल्या आप्तेष्टांचें बरेंच कल्याण साधलें असें दिसतें. तिचा एक मावस भाऊ आरमारांत होता, पण तो प्रॉटेस्टंट असल्यामुळे तिला त्याचा फायदा करून देतां आला नाही आणि तिनें त्याला उपदेश केला की 'हा तुझा धर्म नेहमी तुझ्या आड येईल, तेव्हां तूं कॅथोलिक हो.' अशा कारणांकरतां धर्म बदलणें बरोबर नाही हे तिच्या लक्षांत आलें तेव्हां तिनें लगेच पुढें लिहिले की 'अशा रीतीनें तुझें ऐहिक आणि पारमार्थिक सुख दोन्हीही साधतील आणि मला मोठा आनंद होईल' तिचा स्वतःचा भाऊ चार्लस हा आपल्या बापासारखाच बेपरवा आणि स्वार्थी होता, ती एक गरीब विधवा होती, तेव्हां तिला तो विसरला होता पण तिचे वजन आहे असें कळल्याबरोबर तोही तिची विनवणी करूं लागला. पण त्याच्या चारित्र्यामुळे आपल्या कुळाला कंलक लागेल की काय याची तिला भीति होती. या वेळींही तिची महत्वाकांक्षा फारशी नव्हती. पूर्वीप्रमाणें आपल्याला स्वतःचें घर आणि जमीनजुमला असावा इतकेंच तिला वाटत होतें. राजानें मोबदला देऊं केला होता, पण तो काय देणार होता कोणाला ठाऊक?

या सर्व भानगडींत तिच्या धर्मोपदेशकाचा उद्देश वेगळा होता. तिच्या मार्फत राजावर धर्माच्या बाबतींत वजन पाडावें असा त्याचा मानस होता. इतकेंच नव्हे तर मॅदम द मांतेस्पां व तिचीं मुलें यांच्यावरही फ्रांस्वाजच्या उपदेशाचा परिणाम व्हावा अशी त्याची इच्छा होती. राजाच्या बाबतींत त्याच्या कलानेच घ्यायला पाहिजे हें उघड होतें, पण मुलांची गोष्ट वेगळी होती. ती त्यांना वाढवीत होती, तेव्हां त्यांचें मन तिच्या ताब्यांत होतें. कॅथोलिक धर्मोपदेशकांचा नेहमींचा पाताळयंत्रीपणा याही बाबतींत दिसून आला तर नवल काय?

तिची स्वतःची स्थिती मोठी चमत्कारीक होती. एकदां ती खरी पत्नी नसूनही स्कॅरॉंची पत्नी म्हणवून घेत होती, त्याचप्रमाणें ती स्वतः माता

नसूनही तिच्याकडे मातेचें काम आलें होतें. व्यभिचार हा धर्माच्या कितीही विरुद्ध असला तरी ती एका दृष्टीने व्यभिचाराला मदतच करीत होती. पण ती हें सर्व गुप्तपणें करीत असल्यामुळे तिच्या स्वतःबद्दल लोकमत मोठेसें चांगलें असणें शक्य नव्हतें. पण ही गुप्तता फार दिवस टिकली नाहीं. तिसरें मूल तिच्या ताब्यांत आल्यावर तीन मुलांना वेगवेगळ्या बंगल्यांत ठेवून देखरेख करणें अशक्य झालें. तेव्हां तिने पॅरिसच्या एका टोंकाला एक मोठा बंगला घेतला आणि तेथे तिन्ही मुलें घेऊन ती राहिली. यापैकीं पहिलें मूल लवकरच मेलें, पण त्याची जागा लवकरच भरून निघाली. साधारणपणें वर्षाला मूल होत होतें आणि अशा रीतीने मॅदॅम द मँतेस्पांला सात मुलें झालीं. लोकांना शंका येऊं नये म्हणून फ्रांस्वाजने आपल्या एका मैत्रिणीची मुलगी आपल्याकडे आणली आणि तिच्या शिक्षणांत आपण गुंतलों आहों असें भासवलें. पण खरें पाहिलें तर त्या बंगल्याच्या उंच भिंतींच्या आंत राजाचीं सर्व मुलें खेळत होतीं. राजाही कधी कधी त्यांना भेटायला येत असे. पण मॅदॅम स्कॅरॉंचा भारदस्तपणा, विद्वत्ता आणि सभ्य भाषण त्याला मुळींच पसंत नव्हतें आणि तो तसें बोलूनही दाखवित असे.

या तिच्या कामामुळें तिला आपल्या मैत्रिणींकडे जायला फारच थोडा वेळ रहात असे. पण या सुमाराला मॅदॅम द सेव्हिन्ये आणि मॅदॅम द ला फेयेत या दोघींशीं तिची विशेष जानपछान झाली. मॅदॅम द ला फेयेत नेहमीं आजारी असे, आणि प्रसिद्ध लेखक ला रॉषफूको हा तेथे नेहमी येऊन बसत असे, आणि मग सगळ्या जगाच्या उलाढालींसंबंधीं गहन विचार चालत असत. फ्रांस्वाजही तेथे मोकळेपणानें बोलत असे आणि ती या सर्वांची आवडती झाली. मॅदॅम द सेव्हिन्येही ही लेखिका होती आणि तिने फ्रांस्वाजच्या बुद्धीची आणि सरळपणाची प्रशंसा केली आहे, सायंकाळीं ती तेथेच जेवीत असें आणि तीं सगळीं तिला परत घरीं पोंचवीत असत. या बाया कधीं कधीं तिच्याकडेही जात असत, पण राजाचीं मुलें त्यांच्या दृष्टीस पडत नसत आणि त्याही फाजील चौकसपणा करीत नसत. त्यांना सर्व कांहीं माहीत होते, पण काय बोलावें आणि काय लिहावें हेंहीं त्यांना कळत होतें.

कधीकधीं फ्रांस्वाजला सर्व मुलें घेऊन राजवाड्यांतही राजाला भेटायला जावें लागत असे. अर्थात राणीला हें कळणार नाहीं अशी खबरदारी सर्वच घेत असत, पण अशा वेळीं मॅदम द मँतिस्पांलाही आपलीं मुलें भेटत असत. अर्थात राजाचा औरस मुलगा अगदी वेगळा असे, आणि राजाला त्याच्याविषयीं बिलकुल प्रेम नसे. हींच मुलें त्याला जास्त आवडत असत. औरस मुलाचें शिक्षण सरकारी पद्धतीनें चालू होतें, पण त्यांत प्रेमाचा लवलेश नव्हता. एखादें अगदी, नवीन मूल दाखवायला आणले की राजा विचारी, 'पण हें कोणाचें मूल ? नर्स उत्तर देई, 'कोणाला माहीत, पण त्याची बरदास्त पाहून तें कोणा थोरामोठ्याचे असावें. कदाचित एखाद्या हायकोर्ट जज्जाचें असेल!'

१६७३ मध्ये राजाने युद्धांत मोठा विजय मिळवल्यामुळें त्याची कीर्ति झाली होती, आणि तिच्या जोरावर त्याने यांपैकीं तीन मुलांना औरसपणा देण्यासंबंधी ठराव पार्लमेंटपुढें मांडला आणि तो मंजूर झाला. अर्थात या मुलांची आई कोण याचा उल्लेख झाला नाहीं, कारण ती अजूनही विवाहित स्त्री होती. तीं राजाचीं मुलें, आणि मॅदम स्कॅरँ ही त्यांची मानलेली आई. हा राजरोस व्यभिचार चालू असतांना तो बंद करण्याविषयीं धार्मिक लोकांच्या खटपटी चालू होत्याच. मॅदम द मँतिस्पां देखील धार्मिकच होती. उपासाच्या वेळीं पाव किती खायचा तो ती वजन करून घेत असतांना कोणीतरी हंसले, तेव्हां ती म्हणाली, 'मी एक पाप केलें म्हणून कांहीं सगळी पापें करावीं असे होत नाहीं!' मॅदम द स्कॅरँ देखील तिला उपदेश करीत असे आणि तिच्याशीं नोकराप्रमाणें बिलकूल वागत नसे. ती राजाची नोकर होती, तरीदेखील त्याला कॅथोलिक धर्माकडे ओढणाऱ्या पक्षांत ती उघडपणें होती. राजाचीं मुलें ती वाढवीत होती आणि तीं आतां औरस झाली असल्यामुळें ती देशाचे काम करीत होती. मॅदम द मँतेस्पांचें स्थान राजाच्या मर्जीवर अवलंबून होते, त्याच्या मुलांचें शिक्षण हें अधिक महत्त्वाचें काम होतें.

——

# ५

वर सांगितल्याप्रमाणें राजपुत्रांना औरसपणा मिळाल्यावर त्यांच्यासंबंधी कोणतेंही गुपित राखण्याची जरूरी राहिली नाही, आणि त्या सगळ्यांना आणि त्यांच्याबरोबर फ्रांस्वाज़लाही राजवाड्यांतच स्थान मिळालें. अर्थातच तिच्यावर आतां मॅदॅम द मॉंतेस्पांचा ताबा चालूं लागला, कारण तीही राजवाड्यांतच रहात होती. राजवाड्यांत राहिल्यापासून आपल्यावर कांहीं शिंतोडा येईल हें तिच्या स्वप्नांतही आलें नाही, कारण ती आपल्या धर्मोपदेशकाच्या सांगण्या-प्रमाणें वागत होती आणि तिला उपदेश देण्याकरतां त्यालाही या पापाच्या घरांत तिला भेटावें लागे. तरीपण तिला हें काम सोडून दे असें सांगितल्याचा परिणाम अर्थातच असा होणार की हीं मुलें दुसऱ्या एखाद्या बाईच्या ताब्यांत जाणार, आणि यांत मोठाच धोका होता हें जाणूनच त्याने फ्रांस्वाजला तेथेंच रहायला सांगितलें.

शिवाय तिला मोबदला मिळायचा होता तो अजून मिळाला नव्हता. राजाच्या तोंडांतून एक लक्ष फ्रँकची रकम निघाली होती. आणि तेवढी मिळाली असती तर ती एकदम नोकरी सोडून गेली असती, कारण तिच्या जन्माची तरतूद झाली असती. तिला चैन नको होती, पण स्वतंत्रपणें रहायला पाहिजे होतें. तिचे स्नेही तिच्याबद्दल अनेक प्रकारच्या खटपटी करीत होते.

कोणी एका ड्युकशीं तिचें लग्न जमवीत होते, पण केवळ पदवीकरतां वाटेल त्याशीं लग्न करायला ती तयार नव्हती. लुईला ती आवडत नव्हती आणि हें तिला माहीत होतें. मुलांची जबाबदारी तिच्यावर असल्यामुळे ती त्यांच्या आईबरोबर प्रसंगीं भांडतही असे. त्यांना कशा प्रकारचें अन्न द्यावें याबद्दल मतभेद झाल्यास ती इतरांना कधी बधत नसे, आपलेंच म्हणणें चालवी. यामुळे तिनें एकदां वर्षाच्या ( १६७४ ) शेवटीं नोकरी सोडून जाण्याचा निश्चय केला होता. पण ती राजाला जरी आवडत नव्हती, तरी देखील त्याला तिच्याबद्दल आदर होता आणि तिने सोडूं नये अशी त्याची इच्छा होती. ते एक लक्ष फ्रँक तिला मिळण्याच्या बेतात होते आणि तिच्या वतीनें जमीनजुमला विकत घेण्याची खटपट चालू होती, मात्र ते मिळाले नव्हते.

मॅदॅम द मॉंतेस्पांशी जरी तिचे मतभेद होत असले, तरी तिच्यावर ती वजन ठेवून होती. राजा जवळ नसला म्हणजे ती तिला आपली रखेलीची जागा सोडून देण्याचाही उपदेश करायला कमी करीत नसे आणि आपण पाप करीत आहों याची जाणीव मॅदॅम द मॉंतेस्पांला नव्हती असें नाहीं. यामुळे तिला जास्तच मानसिक त्रास होत असे, आणि तिने राजाकडे याबद्दल तक्रार केली म्हणजे फरांस्वाज त्याला अधिकच नावडती होई.

शेवटीं जानेवारी १६७५ मधें तिला राजानें सांगितलें की तुला एक लक्ष फ्रँकची रक्कम दिली आहे. याच सुमारास राजा एकदां आपल्या आवडत्या मुलाला मांडीवर घेऊन बसला असतां मुलाला म्हणाला, 'तूं किती शहाणा आहेस रे!' त्यावर मुलानें उत्तर दिलें, 'मी शहाणा कसा असणार नाही? मॅदॅम स्कॅरॉंनें मला वाढवलें आहे आणि ती तर मूर्तिमंत शहाणपणा आहे.' हें ऐकून राजाने तिला दुप्पट रक्कम देण्याचा हुकूम सोडला. अर्थात आतां ती सोडून जायला मोकळी होती, पण ती राजाला म्हणाली, 'आपल्या सोईला येईल तेव्हां मी जाईन.' पण राजाचें मत आतां थोडेंबहुत बदललें होतें. त्याने तिला मॅंतनॉं नांवाची मालमत्ता बक्षिस दिली आणि दरबारांत त्याने तिला मॅदॅम द मॅंतनॉं या नांवाने संबोधल्यानंतर तिचें मॅदॅम स्कॅरॉं हें नांव पुढें कोणीही उच्चारलें नाही.

याच वर्षी ईस्टरच्या प्रसंगीं राजानें आपल्या धर्मोपदेशकाला आपली वर्तणूक सुधारण्याचें वचन दिलें आणि मॅदॅम द मॉंतेस्पांची रवानगी झाली. ती दुसरीकडे जाऊन राहिली आणि तेथें तिला राणीदेखील भेटायला जात असे. पण हें फार दिवस टिकलें नाही. जुलै महिन्यांत राजा पुन्हां एकदां युद्धांत विजय मिळवून परत आला. आणि त्या जोरावर त्यानें तिला बोलावणें पाठवतांच ती राजवाड्यांत परत आली.

तथापि फ्रांस्वाजला आतां मोठा दर्जा मिळाला होता. तिनें आपलें काम अजीबात सोडलें नव्हतें. राजाचा आवडता मुलगा डयूक डयू मेन आजारी असे आणि तिनें त्याला घेऊन दूर जाऊन रहावें असें ठरलें आणि त्याप्रमाणें ती गेली. त्या दोघांची सर्वत्र राजाप्रमाणें बरदास्त राहिली असें तिनें स्वतः लिहिलें आहे. ती वस्तुतः राजाच्या मुलाची आई झाली होती. निदान आईचें काम करीत होती, आणि यामुळें राजाशीं वारंवार संबंध येत असे आणि आतां ती नावडती राहिली नव्हती. पारडें फिरलें हें तिला समजलें होतें आणि कदाचित् धार्मिक लोकांच्या आग्रहानें पुन्हां मॅदॅम द मॉंतेस्पांची रवानगी झाली तर आपल्यावर काय प्रसंग येईल, असा विचार तिच्या मनांत डोकावूं लागला होता.

मॅदॅम द मॉंतेस्पां आतां सर्वांशीं तोऱ्यानें वागूं लागली. मुलगा बरा झाल्यावर मॅदॅम द मॅंतनॉं त्याला घेऊन परत आली आणि आतां तिला दरबारांत मान मिळूं लागला, हें मॅदॅम द मॉंतेस्पांला पाहावत नसे. ती सर्वांवर आपला हुकूम चालवूं पाही पण मुलांच्या बाबतींत मॅदॅम द मॅंतनॉं तिला दाद देत नसे. मुलांच्या अन्नासंबंधी नेहमीं भांडणें होत आणि तिनें राजाला स्पष्ट सांगितलें की यांत माझा अधिकार चालला नाही तर त्यांची जबाबदारी मला घेतां येणार नाही. मॅदॅम द मॉंतेस्पांच्या रागाला आणखी एक कारण होतें. तिला जरी राजानें परत बोलावलें होतें, तरी आपण दुसऱ्याकोणाकाडे पाहणार नाही असें त्यानें वचन दिलें नव्हतें, आणि त्याच्या भोंवतीं तरुण स्त्रियां मनसोक्त असत. या सर्वांचा तिला मत्सर वाटत असे आणि यामुळे तिचा स्वभाव अधिकच बिघडला. ती हवा तसा खर्च करूं लागली. तिनें एकदां एका रात्रींत एक लक्ष फ्रॅंक जुगारांत घालवले. अर्थात् हा राजाचा खाजगी खर्च असल्यामुळें कॉलबेर यानें याबद्दल तक्रार केली.

राजाची मर्जी इतरांवर बसत आहे हें पाहून तिने जादूटोणा करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा कांही उपयोग होत नाही असें पाहून तिनें मॅदम द फाँतांज नांवाच्या बाईला विष घातले. याबद्दल खाजगी चौकशी झाली तेव्हां राजाच्या लक्षांत आलें कीं यापासून आपल्या जिवालाही धोका होता. आणि आपण केवळ यदृच्छेनेच वांचलों. मॅदम द मँतनाँ आतां राजाजवळ मोकळेपणाने बोलत असें आणि कोणालाहीं उपदेश करायला घाबरत नसे. एकदां तिने राजाला विचारलें की 'तुमच्या शिपायांपैकी एकाने दुसऱ्याची बायको चोरली तर तुम्हाला काय वाटेल?' आणि इतकें बोललें तरी राजा रागवत नसें, कारण त्याला तिची किंमत कळूं लागली होती. प्रेम म्हणजे काय हें तिला कळतच नव्हते, यामुळे मॅदम द फाँतांजने तिला एकदां विचारलें, 'प्रेमाचे व्यवहार टाकून देणें म्हणजे अंगांतला सदरा काढण्याइतकें सोपें आहे असें तुम्हाला वाटतें काय?' तिला राजाची मर्जी संपादन करायची होती, असा आक्षेप तिच्यावर कित्येकांनी घेतला आहे, पण तो चूक आहे हें यावरून कळेल. ती राजाला सुमार्गावर आणण्याचा प्रयत्न एकसारखा करीत होती, आणि याचा पुरावा म्हणजे प्रत्यक्ष राणीने तिला आपली हिरेजडित तसबीर उघडपणें अर्पण केली. मॅदम द माँतेस्पां आपल्या शेवटच्या बाळंतपणाकरितां तिच्याच घरीं गेली गेली होती. यावरून तिच्याही मनांत अशी कल्पना आली नव्हती असें दिसतें. राजाजवळ मॅदम द मँतनाँचें वजन वाढलें होतें यांत शंका नाही, पण त्यांत तिच्या बाजूने कांही प्रेमाचा भाग नव्हता हें स्पष्ट आहे. कारण त्यावेळच्या कोणाही लेखकाने तसें लिहिलेलें नाही. नीनाँ द लांक्लोच्या घरी दरबारी मंडळी नेहमी जमत असे पण तेथेही कोणी याबद्दल बोललेलें नमूद नाही.

——

# ६

विषप्रयागोच्या प्रकरणापासून चौदाव्या लुईने धडा घेतला. त्याचें वय आतां ४२ वर्षांचें झालें होतें. तारुण्याचा भर ओसरला होता, आणि हें प्रकरण आपल्याच वागणुकीचा परिणाम होय याची जाणीव त्याला झाली. आजपर्यंत तो असें समजून वागत होता की नीति ही प्रजेकरतां आहे, आपल्याला पाहिजे तें करण्याचा हक्क आहे. पण त्याला नीतीची किंमत कळत नव्हती असें नाहीं. शिवाय आतां त्याचीं मुलें मोठी होत होती. राज्याचा वारस ( त्याला डॉफिन अशी पदवी असते ) आतां मोठा झाला होता. आणि त्याचें लग्नही झालें होते. राणी जितकी धार्मिक होती, त्यापेक्षां कांकणभर अधिकच धार्मिक त्याची सून होती. आणि ती दोघें राजवाड्यांतच रहात होती. त्यांची त्याला थोडी लाज बाळगावी लागे. त्याची सून अत्यंत कुरूप होती, पण तिला त्याची जाणीव होती. आणि तिचा संगीताकडे आणि वाङ्मयाकडे ओढा असून ती संभाषणांतही कुशल होती. राजा तिच्याशी अत्यंत सौजन्याने वागत असे. या सर्वांचा परिणाम असा झाला की आतां राजाला आपली वागणूक बदलावी लागली.

परंतु या गोष्टीचा कोणीच बभ्रा केला नाही. मॅदॅम द मॉंतेस्पांची कोठेही रवानगी न करतां खुद्द राणीने तिला आपल्या नोकरांवर देखरेख करण्याकरतां

नेमली. सून घरांत आली तेव्हां तिच्याही तैनातिला कांही स्त्रिया नेमाव्या लागल्या. त्या निवडतांना त्यांचे वर्तन राजाने लक्षांत घेतलें. त्यातलें प्रमुख स्थान मॅरेशाल द रॉषफॉरला मिळालें. शय्यागृहांतली पहिली जागा डचेस द रिशलिअला, आणि दुसरी मॅदॅम द मॅंतनॉंला मिळाली. तेव्हां आतां तिच्यावर राजाच्या इतर; मुलांची जबाबदारी राहिली नाही, परंतु तिचा भारदस्तपणा पाहून तिचें सुनेवर वजन पडावें म्हणूनच राजाने ही नेमणूक केली होती, आणि केवळ तिच्या विनयामुळें व स्नेहामुळेंच डचेस द रिशलिअला पहिलें स्थान मिळालें होतें, याची तिलाही जाणीव होतीच आतां राजवाड्यांतली सर्व भांडणें मिटलीं आणि मॅदॅम द मॅंतानॉंलाही आतां एकटेंच स्वतंत्र राहण्याची इच्छा फारशी प्रबळ नव्हती.

राणी बिचारी कधींच थाटांत रहात नसे. राजाची वर्तणुक सुधारल्याबद्दल तिने ईश्वराचे आभार मानले, पण ती राजाशीं बोलायला अजूनही भीत असे आणि कांहीं विनंति करण्याकरतां त्याच्याकडे जायचें झालें तर मॅदॅम द मॅंतनॉंला ती आपल्याबरोबर अगदी दरवाजापर्यंत नेत असे. याचा परिणाम असा झाला कीं राजवाड्यांत सर्व कांहीं मॅदॅम द मॅंतनॉंच्या सल्ल्यानें चालत असे आणि तरीदेखील ती कोणाच्या डोळ्यांत सलत नसे. कारण ती अत्यंत विनयाने डचेस द रिशलिअच्या मागें मागें असे. परंतु तिचे वजन किती आहे याची चाणाक्ष माणसांना बरोबर कल्पना होती आणि याची बातमी पोपपर्यंत देखील पोंचून त्याने तिला आपल्या हातानें पत्र लिहून एक धार्मिक पद्धतीचें बक्षिस पाठवलें. कारण तिच्यामार्फत राजा धर्माकडे वळला होता.

तिच्या धर्मगुरूनें तिला प्रथमपासूनच दानधर्म करायला लावलें होतें आणि आतां तर ती आपल्या पगाराचा कांहीं भाग त्याच्याकडेच दानधर्मा-करतां पाठवीत असे. कॅथोलिक धर्माच्या नियमाप्रमाणें तिला जेव्हां आपल्याला पापांचा पाढा वाचावा लागे, तेव्हां आपले दरबारांत इतकें वजन असल्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो, हेंच मुख्य पाप ती सांगत असे. राणीने स्वतः असें म्हटलें आहे कीं 'राजा तिच्याशीं बोलल्यानंतर माझ्याशी अत्यंत प्रेमाने वागतो.' राजा तिला सुनेच्या घरींच भेटत असे असें नाहीं, तर तो तिला

मुद्दाम बोलावून तिच्याशीं लांबलचक संभाषणें करीत असे, आणि यांत कांहींच गुपित नसे आणि याबद्दल कोणाला विषाद वाटत नसे. सून एखादे वेळीं मधेंच राजाला भेटायला आली तर तिला ती दोघें दोन प्रशस्त खुर्च्यांवर बसलेली दिसत आणि ती निघून गेल्यावर संभाषण पुढें चाले. या परिस्थितीमुळें राजाच्या मंत्र्यानाही तिला मान द्यावा लागे.

अर्थात् एकादी स्त्री गरिबींतून इतक्या मानाच्या पदाला चढली, तर कांहीं लोकांना ते पांहवणार नाहीं आणि ते तिच्यावर शक्य तर शिंतोडे टाकायला पाहतील यांत नवल नाही. पण ते टाकायला देखील त्यांना तिच्या आयुष्यांत कांही सांपडलें नाही. तिच्या बापाची आणि भावाची वागणूक त्यांना बाहेर काढावी लागली. भाऊ अजूनही तिच्यामागें होता. जसजसें तिचें वजन वाढत गेले तसतशा त्याच्या पैशाच्या मागण्याही वाढत गेल्या. त्याला एका लहानशा शहराचा गव्हर्नर नेमला होता तेव्हां त्याने तेथील लोकांना मनसोक्त लुटलें होतें. याशिवाय त्याचा एक अनौरस मुलगा बहिणीच्याच घरीं वाढत होता. ती त्याच्या लग्नाची खटपट करीत असतां त्यानें एकदां तिला कळवि-ल्याशिवाय एका १५ वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें. त्याबरोबर तिने त्यांना एक घर भाड्याने घेऊन देऊन निंमे भाडे ती स्वतः भरत असल्यामुळें तिला त्यांच्या खर्चावर देखरेख ठेवतां येई. मेणबत्त्यांना किती पैसे लागतील, साखरेला किती, दारूला किती, वगैरे सर्व हिशोब बारकाईने करून तुझा खर्च अमुक रकमेपेक्षां जास्त होतां कामा नये, असे ती त्याला कळवी. त्याची बायको खेडवळ होती इतकेंच नव्हे तर तिला व्यवहारिक ज्ञानही फारसें नव्हतें, तेव्हां तिचें शिक्षण तिला हातीं घ्यावें लागलें. पण तिने त्या दोघांची शक्य तितकी सोय करून दिली आणि भावाला सरकारांतून नेमणूकही करून दिली.

भावाची सोय झाल्यावर तिला आपल्या आतेभावाकडे लक्ष देणें भाग पडले. हा ( फिलिप द व्हिलेत ) आरमारांत होता, पण तो प्रॉटेस्टंट असल्यामुळें त्याने कितीही कर्तबगारी दाखवली तरी त्याला चांगलीशी बढती मिळेना. त्याची बायको कॅथोलिक होती. यावरून तो मोठासा जाज्वल्य प्रॉटेस्टंट नव्हता, तरीदेखील धर्म त्याच्या आड येत होता, कारण राजाचें

धोरणच तसें होतें. तेव्हां तिने त्याला लिहिलें कीं निदान तूं आपल्या मुलाला तरी माझ्या ताब्यांत दे, म्हणजे त्याची अशी दशा होणार नाही. त्याने ते कबूल केलें आणि राजवाड्यांतच त्याला कॅथोलिक धर्माची दीक्षा मिळाली आणि तो तिच्याकडेच वाढला.

अशा रीतीने तिने आपल्या नात्याचीं बरींच मुलें गोळा केलीं आणि एकदां तर तिने एका मुलीला आईबापांना न कळत पळवूनच आणली. पण ती राजवाड्यांत वाढणार असें पाहून आईबापांनीही तक्रार केली नाही. धर्म बदलण्याकरतां ती फिलिपलाही एकसारखा आग्रह करीत होती, आणि त्याने शेवटीं एकदां तें कबूल केलें आणि त्याच्यावर ताबडतोब राजाची मर्जी बसली.

१६८२ मध्यें डॉफिनला एक मुलगा झाला आणि त्याला ड्यूक द बूरगॉन्य ही पदवी मिळाली, आणि लोकांनीं जें आनंदाचे प्रदर्शन केलें त्यावरून त्यांनीं स्पष्ट दर्शवलें की औरस मुलांची किंमत त्यांना जास्त वाटत होती. राजाला एकंदर सतरा मुलें झालीं, परंतु त्यांतली दहा मेलीं होतीं. या वेळीं त्याला स्वतःला मुलगा झाल्याइतकाच आनंद झाला, कारण तो वंशाचा आधार होता.

मॅडम द मँतनॉंचे आयुष्य यापुढें आपल्या नात्याच्या मुलांच्या शिक्षणांत जाणार, असेंच लक्षण दिसत होतें, अर्थात् डॉफिनच्या बायकोचे कॅस विंचरण्याचें काम तिच्याकडे होते तेंहि ती अत्यंत लक्षपूर्वक करीत असे. तिच्याकडे सोंपवलेल्या कोणत्याही कामाची तिने कधी हयगय केली नाही. गरिबांना मदत करण्याकरतां तिने एक स्त्रियांची संस्था काढली आणि त्यांना मदत करण्यास केवळ दानधर्मापलीकडे कांहीतरी करणें जरूर आहे याची जाणीव तिला होती. तिने पुष्कळ बड्या घराण्यांतल्या बायकांना हा उद्योग करायला लावलें. प्रत्यक्ष गरिबांच्या घरीं जावून त्यांना भेटणें आणि त्यांची स्थिति सुधारण्याकरतां शक्य ती खटपट करणें जरूर होतें आणि याचा तिने पायंडा पाडला.

तिच्या आयुष्यांत यापुढे कांही फरक होईल असें कोणालाच वाटण्याचें कारण नव्हतें, पण तो अकस्मात् घडून आला. १६८३ च्या जुलै महिन्यांत राजा राणीसह आपल्या 'अलसास' प्रांतांतील प्रजाजनांची भेट घेण्याकरतां

जाऊन परत आला. परत आल्याबरोबर राणी आजारी पडली. आणि चारच दिवसांत निधन पावली. मरतेवेळीं राजाबरोबर मॅदॅम द मॅंतनॉंही तेथें हजर होती.

यानंतर लगेच सर्वांनीं असें मत प्रदर्शित केलें कीं त्यानें पुनः लग्न केलेंच पाहिजे. तो फार दिवस दुःखांत मग्न होणें शक्यच नव्हतें. यानंतर थोड्याच दिवसांनी तो आपल्या सुनेला व मॅदॅम द मॅंतनॉंला बरोबर घेऊन गार्डीतून सहल करीत असतां त्याने त्यांना स्पष्ट सांगितलें कीं आतां रडके चेहरे ठेवण्याचें कारण नाहीं. थोडेबहुत हंसलें तरी चालेल. अशा स्थितींत त्याची चंचल वृत्ति पुनः उचल खाईल या भीतीनेंच त्याच्या धर्मगुरूसह सर्वांचे मत पडलें कीं त्याने ताबडतोब लग्न करावें. एक स्त्री मेली म्हणून विधुरपणांत दिवस काढणें अनैसर्गिक आहे, वगैरे प्रकारची मतें लोक उघडपणें बोलूं लागले.

यानंतर त्याने बिलकुल बभ्रा न करतां खाजगी रीतीने मॅदॅम द मॅंतनॉंशी लग्न केलें, पण तें राणी वारल्यावर किती दिवसांनीं किंवा महिन्यांनी केलें याबद्दल धडसा पुरावा नाहीं. व्हॉलतेरनें याविषयीं माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे मतें दोन वर्षें मधें गेलीं असावी. निदान मॅदॅम द मॅंतनॉंचा राजाशीं कांही नवीन निकट संबंध झाला आहे याबद्दल त्याच्या आसपासच्या लोकांना बरेच दिवसपर्यंत शंकाही आली नाहीं. पण हें लग्न झालें होतें याबद्दल शंका नाहीं, कारण त्याचा पुरावा धर्मगुरूंच्या आणि खुद्द तिच्या पत्रांत सांपडतो. इतरांनी मात्र याचा उल्लेख केलेला नाहीं. पण आतां लग्न करण्यांत कोणतेही राजकारण साधावयाचें नव्हतें. तेव्हां उघड इतमामाने लग्न करण्यांत मोठासा मुद्दा नव्हता आणि मॅदॅम द मॅंतनॉंलाही मिरवायची हौस नव्हती. राज्याला वारस होताच, तेव्हां तशी लग्नाची जरूर मुळीच नव्हती.

या लग्नांत प्रेमाचाही कांही भाग नव्हता, आणि ते इतक्या गुप्तपणाने झाले की तें झालेच नाहीं असेंही कित्येकांनीं लिहिलें आहे. पण त्याचे कारण इतकेंच की मॅदॅम द मॅंतनॉं ही कधीही राणीसारखी मिरवली नाही आणि दरबारांतही राजाबरोबर बसली नाही. ती अभिषिक्त राणी कधीच झाली

नाही, पण ती राजाची बायको झाल्याचा एक पुरावा व्हॉलतेरने दिला आहे की व्हर्सायिच्या राजवाड्यांतील प्रार्थनामंदिरांत ज्या दोन जागा राजाकरतां व राणीकरतां मुद्दाम तयार केलेल्या होत्या, त्यांतल्या राणीच्या जाग्यावर मॅदॅम द मॅंतनॉं आतां बसूं लागली. दरबारांत जरी ती मिरवली नाही, तरी आतां आपल्याला येथे मात्र राणीच्या जाग्यावर बसण्याचा हक्क आला असें ती मानीत असली पाहिजे. एरवीं तिच्या एकंदर चरित्रावरून पाहतां तिचें राजाशीं लग्न झाल्याशिवाय ती अशा ठिकाणीं कधीही बसली नसती. हें लग्न गुप्त राहिल्याने आपल्या नांवाला विनाकारण कलंक लागेल अशी भीति तिला वाटली नाही. कारण ती सर्व कांहीं धर्मगुरूच्या सल्ल्याने करीत असे. यानंतर तेरा वर्षांनीं तिच्या धर्मगुरूने राजाला लिहिलेल्या एका पत्रांत या लग्नाचा स्पष्ट पुरावा सांपडतो. इतकी उत्तम बायको मिळाल्याबद्दल त्याने राजाचें अभिनंदन केलें आहे.

या लग्नाचा नक्की काल ठरवणें कठिण आहे, पण राणीच्या मृत्यूनंतर दोनच महिन्यांनी मॅदॅम द मॅंतनॉंने आपल्या धर्मगुरूला लिहिलेल्या पत्रांत (जरी याचा स्पष्ट उल्लेख नाही तरी) पूर्वी झालेल्या संभाषणाचा उल्लेख करून सल्ला मागितला आहे व तो या लग्नासंबंधीच असला पाहिजे, आणि तें लग्न यानंतर लवकरच झालें असलें पाहिजे, कारण राजाचें वय या वेळीं ४५ होतें आणि त्याला फार दिवस वाट पाहण्याची संवय नव्हती.

---

# ७

मॅडॅम द मॅंतनॉं राणी झाल्यानंतर फ्रान्समधें ज्या अनेक घडामोडी झाल्या, त्यांबद्दलची जबाबदारी तिच्यावर फारशी येत नाही, कारण राजा नेहमी तिच्या धोरणाने चालत असे असें नाही. तिने अनेक सत्कृत्यें केलीं यांत शंका नाही. तिच्या स्वतःच्या मॅंतनॉंच्या किल्ल्यांत शेंपन्नास गरीब पोरें निरुद्योगी पडलेलीं असत, त्यांना तिने उद्योग धंद्यांचें शिक्षण देऊन कामाला लावलें. कांही डच विणकरी आणवून एक कारखाना सुरू केला, आणि या सर्वांवर ती स्वतः मधूनमधून जाऊन देखरेख करी. राज्याच्या घडामोडींकडे ती फारसें लक्ष देत नसे.

तिचा आजा ज्या 'ह्यूगनो' पंथाचा होता, तो सोडून ती जरी कॅथोलिक झाली होती आणि इतरांना कॅथोलिक पंथांत ओढण्याचा प्रयत्न करीत होती, तरी देखील ह्यूगनो पंथांतील लोकांबद्दल तिला अत्यंत आदर असे. तेव्हां चौथ्या हेन्रीनें १५९८ सालीं ज्या कायद्याने त्या पंथांतील लोकांना थोडेबहुत हक्क दिले होतें, ते हिरावून घेण्यांत तिचा हात असणें शक्य नाहीं दुसऱ्याचा छळ करण्यापर्यंत तिची धार्मिक वृत्ति कधींही पोंचली नाहीं. तरी पण ती राणी झाल्यावर चौदाव्या लुईने जुना कायदा रद्द केला आणि ह्यूगनो लोकांना सळो की पळो करून सोडलें, याची जबाबदारी कित्येकांनी तिच्यावर लादण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हा कायदा रद्द झाला तो तिच्या सल्ल्याने

नव्हे तर तिच्या मनाविरुद्धच. याचा अर्थ इतकाच की लुई नेहमी तिच्या सल्ल्याने वागत असे असें नाहीं. बाह्यतः तिचा दर्जा अजून पूर्वीचाच होता आणि अजूनही ती आपल्या सुनेचे केंस विंचरण्याचें काम करीत असे, आणि तिच्या एकंदर वर्तनावरून तिला कोणीही राणी म्हटलें नसतें.

कित्येक इतिहासकारांनीं ( उदाहरणार्थ मिशले याने ) वरील कायदा रद्द झाल्याचा इतिहास असा दिला आहे की एका जेझुइट धर्मगुरूने राजाला तिचें आमिष दाखवून त्याच्याकडून तो रद्द करवून घेतला तिचें वय त्यावेळीं ४८ वर्षांचें होतें हें लक्षांत घेतल्यास आमिष म्हणून तिचा कितपत उपयोग होईल अशी शंकाही-या इतिहासकाराला आली नाही. वस्तुस्थिति अशी होती की हा बाह्यतः जरी धार्मिक प्रश्न दिसला, तरी तो राजकारणांतला प्रश्न होता. फरान्सचा चौदावा लुई आणि इंग्लंडचा दुसरा चार्लस हे दोघेही फरान्सच्या ४ थ्या हेन्रीचे नातू होते, आणि बरोबरच वाढले होते. इंग्लंडांत चार्लसची जी दुर्दशा झाली ती केवळ प्रॉटेस्टंट पंथामुळे झाली, ही गोष्ट लुईच्या मनावर चांगली ठसली होती. तेव्हां प्रॉस्टेटंट लोकांपासून धोका आहे व त्यांचा नायनाट केल्याशिवाय आपल्या देशांत एकी होणार नाही, आणि एकी झाल्याशिवाय राज्य स्थिर राहणार नाही, अशा बुद्धीनें त्यानें तो कायदा रद्द केला. यापूर्वीचीं त्याचीं युद्धें याच उद्देशाने केलेलीं होतीं, आणि त्याचा मंत्री लूव्हवा हा प्रथमपासूनच मॅदॅम द मॅंतनॉंच्या विरुद्ध असे. या प्रसंगीं राजानें तिचें न ऐकतां आपल्या मंत्र्याचें ऐकलें. पण तो कायदा रद्द केल्याचा परिणाम मात्र त्याला पाहिजे होता तसा झाला नाहीं. ह्यूगनो पंथांत जे लेचेपेचे लोक होते, ते ताबडतोब कॅथोलिक झाले हें खरें, पण जे खरोखर कर्तबगार होते, ज्यांना आपल्या मतांचा अभिमान होता, ते फ्रान्समधून पळून जाऊन त्याच्या शत्रुंना मिळाले. हा कायदा रद्द झाल्यावर तीनच वर्षांनीं 'विल्यम ऑफ ऑरेंज' याने इंग्लंडवर स्वारी केली आणि दुसऱ्या जेम्सचा पराभव केला, त्यावेळीं सैन्यांतले ११०० अधिकारी या पळून गेलेल्या लोकांपैकीं होते, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. लुईने जेम्सला दिलेल्या आश्वासनाचा कांहीएक उपयोग झाला नाही. आणि इंग्लंडांत प्रॉटेस्टंट पंथच कायम झाला.

या जुलमामुळे बरेच लोक कॅथोलिक झाले हें पाहून जरी मॅदम द मँतनाँला आनंद झाला, तरी जे ह्यूगनो पंथांतच राहिले त्यांचा छळ झालेला तिला बरा वाटला नाही. पण जें होतें तें सर्व ईश्वरी इच्छेने होतें अशी धार्मिक समजूत असल्यामुळें तिला त्यांतच समाधान मानून रहावें लागलें.

---

म. ग्रं. सं. ठाणें.

# ८

मॅडम द मँतनाँ ही राजाची बायको झाल्यावर राणी म्हणून जरी मिरवली नाही, तरी व्हेर्साय येथील राजवाड्यांत तिचें स्थान काय होते हे पाहणें अगत्याचें आहे. त्याच राजवाड्यांत राजाचा भाऊ व त्याची बायको रहात असत. याला 'मंस्य' (मिस्टर) व त्याच्या बायकोला 'मॅदम' म्हणण्याची पद्धत होती. याचा एक मुलगा धूक द शार्त्र याचे लग्न मॅदम द मॉंतेस्पांच्या एका मुलीशीं, म्हणजे राजाच्या अनौरस मुलीशीं, झालें होतें अशींच इतर कांही लग्नें होऊन राजाचीं सर्व अनौरस मुलें केवळ कायद्याने नव्हे तर विवाहाने राजघराण्यांत शिरत होती.

या अनौरस मुलांपैकी धूक दु मेन हा मॅडम द मँतनाँचा आवडता होता. त्याच्या लग्नाची गोष्ट जेव्हां तिने राजाजवळ काढली, तेव्हां तो म्हणाला 'अं: ! अनौरस मुलांचीं कोठे लग्नें होत असतात काय ?' पण तिनें त्याच्या करतां एक मुलगी पसंत केली आणि तिने सँ-सीर येथें जी एक शिक्षणसंस्था स्वतःच्या खर्चाने चालवली होती, तेथे तिला ठेवली. अशा तऱ्हेने हें राज घराणें वाढत चाललें आणि शेवटीं अशी वेळ आली की राजवाड्यांतल्या या सगळ्या राजघराण्यांत मॅडम द मँतनाँ ही एकटीच काय ती राजकुळांतली नव्हती.

या राजवाड्यांत अर्थातच राजाचा भाऊ 'मंस्य' आणि त्याची बायको मॅदम यांना अतिशय महत्त्व होतें. मॅडम द मँतनाँ ही सामान्य कुळांतील

बाई इतक्या महत्वाला चढलेली पाहून त्यांना काय वाटलें असेल ? पण तिचा हेवा वाटावा अशी तिची वागणूक नव्हती. राजाकडून मिळालेले पैसे ती दान करीत असे, म्हणजे बहुतेक सर्व सँ-सीर येथील शाळेवर खर्च करीत असे. तिचा कोणताही थाटमाट नसे आणि ती पुष्कळ वेळां राजवाड्यांत नसून सँ-सीर येथे असे. अशा स्थितींत तिचा हेवा तरी कसा वाटावा ? पण तरीं देखील 'मॅदम'ला तिचें वर्चस्व सहन झालें नाहीं. ही बाई मूळची जर्मन होती, आणि तिचें जरी फ्रान्सच्या राजघराण्यांत लग्न झालें होतें, तरी तिला जर्मनीचाच अभिमान होता. लग्नाचे वेळीं तिला जबरदस्तीने कॅथोलिक धर्म स्वीकारावा लागला होता, पण तो ती फारसा पाळीत नसे. दर शुक्रवारीं किंवा लेंट मधेंही ती उपास करीत नसे. तिला आपल्या उच्च कुळाचा अतोनात अभिमान असे आणि राजाविषयीं जरी तिला स्नेह वाटत असे, तरी त्याने मॅदम द मँतनाँसारख्या एका सामान्य कुळांतील स्त्रीशीं लग्न करावें हें तिला पसंत नव्हतें. पण तिच्या विरुद्ध कांहीही बोलण्याची सोय नव्हती, कारण राजा तें सहन करणार नाही हें माहीत होतें. केवळ राजाच नव्हे तर त्याचीं सर्व मुलें नव्या राणीशीं अत्यंत आदबीने आणि प्रेमाने वागत. हें तिला असह्य होऊन ती स्वतःशींच तळमळत असे आणि जर्मनींतल्या आपल्या नात्याच्या माणसांना लिहिलेल्या पत्रांत तिची नालस्ती करीत असे. इतक्या पत्रांत ही काय लिहिते अशी शंका एकदां राजमंत्री लूव्हवायाला येऊन त्याने कांही पत्रें मिळवून फोडलीं, तेव्हां हें बिंग बाहेर पडलें. शेवटीं तिला मॅदम द मँतनाँची क्षमा मागावी लागली. पण राणीने तिला इतक्या सौजन्याने वागवलें की तिला याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें भाग पडलें. हा राजा मरेपर्यंत तिची अशी मुस्कटदाबी होत होती, पण नंतर मात्र तिने याचा सूड घेऊन मॅदम द मँतनाँला मनसोक्त शिव्या देऊन घेतल्या, आणि नाना प्रकारचे खोटे आरोप केले. सँ-सिमाँ या प्रसिद्ध लेखकाने जी मॅदम द मँतनाँची नालस्ती केली आहे. तिचा उगम या बाईच्या बरळण्यांत आहे, कारण त्याने सर्व माहिती तिच्याकडून मिळवली. त्याने अशा रीतीनें दिलेली एक थाप म्हणजे मॅदम द मँतनाँचा पहिला नवरा स्कॅराँ याचें नांव देखील काढलेलें राजाला

खपत नसे आणि रॅसीन या प्रसिद्ध नाटककाराने एकदां त्याचा उल्लेख केल्यामुळें राजा त्याच्यावर चिडला. पण वस्तुस्थिति अशी आहे की व्हेर्साय येथील राजवाड्यांतील प्रशस्त नाटकगृहांत स्कॅरॉंच्या एका नाटकाचा प्रयोग पहायला राजा व राणी दोघेंही हजर होतीं, आणि हें त्यांच्या लग्नानंतर फक्त तीनच वर्षांनी !

खरें पाहिलें तर नैतिक दृष्ट्या ४५ वयानंतर राजा पूर्णपणें मॅदम द मँतनॉंच्या ताब्यांत आला होता. धार्मिक बाबतींतही तो तिचेंच एकत असे, पण त्याच्यावर हळू हळू जेझुइट लोकांनी वजन पाडलें, आणि याचा एक परिणाम म्हणजे वर सांगितलेला ह्यूगनो लोकांचा छळ. मॅदम द मँतनॉला जेझुइट बिलकुल आवडत नसत. राजा प्रार्थनेला जातो, पण त्याला लॅटिन कळत नसल्यामुळें तो स्वतः धर्मग्रंथ वाचीत नाही, याचें तिला वाईट वाटत असे.

१६९१ सालीं, म्हणजे ती राणी झाल्यावर सात वर्षें झालीं तरी, मॅदम द मॉंतेस्पां अजूनही राजवाड्यांतील नाचांत वगैरे सामील होत असे. पुढें तिच्या एका मुलीचें जेव्हां लग्न झालें, तेव्हां मात्र ती राजवाडा सोडून गेली. तिला राजवाड्यांत रहायलाही कोणी अडथळा केला नव्हता, आणि सोडून जायलाही कोणी अडथळा केला नाही. यानंतर मॅदम द मँतनॉंने तिची एका मठांत राहण्याची व्यवस्था केली.

राजाचा वारस–याला डॉफिन म्हणत असत–मॅदम द मँतनॉंशीं अत्यंत प्रेमाने वागत असे, इतकेंच नव्हे तर तिचा सल्ला घेण्याचाही प्रसंग एकदां त्यावर आला होता. १६९० सालीं एका बाळंतपणांत त्याची बायको मेली, तेव्हां त्याच्या बाबतींत पुनः राजासारखाच प्रश्न उपस्थित झाला. लोक म्हणूं लागले, त्याने पुनः लग्न केलें पाहिजे. त्याने स्वतः मॅदम द मँतनॉला लिहिलें की ' मी लग्न न केल्यास मला नीतीने राहतां येईल की नाही याची शंका आहे. पण कोणत्याही राजघराण्यांत मला साजेशी मुलगी दिसत नाही आणि मी बदफैली झालो तर राजालाही वाईट वाटेल. हें गुप्त ठेवून मला भेटण्याची

संधि द्यावी.' राज्याचा वारस सावत्र आईला असें पत्र लिहूं शकतो, यावरून तिच्या वागणुकीची कल्पना करतां येईल.

त्याच्या आणखी एका पत्रावरून असें दिसतें की त्यानें अगोदरच आपल्या सारख्याच एका लठ्ठ बाईशीं लग्न केलें होतें आणि हें गुपित आईच्या मार्फत त्याला राजाच्या कानावर घालायचें होतें. अर्थात् राजाने जें केलें तेंच त्याने केलें होते, म्हणजे पहिली बायको मेल्यावर एका सामान्य घराण्यांतील स्त्रीशीं लग्न केलें होतें, आणि याचा परिणामही तोच, म्हणजे मॅदम द मॅंतनॉं जशी कधींही अभिषिक्त राणी झाली नाही, तशीच ही नवी बायको राणी होणें शक्य नव्हतें. त्याला अगोदरच तीन मुलगे असल्यामुळें वंश चालवण्याबद्दल प्रश्न नव्हता. आतां लग्न हा त्याचा खाजगी प्रश्न होता. पण तरी देखील राजाला दुःख होऊं नये म्हणून त्याला हें लग्न गुप्त राखण्याचाच सल्ला तिने दिला असावा असें वाटतें, कारण सँ-सिमॉंसारख्या माणसाला देखील तें कळलें नाही. मॅदम द मॅंतनॉंप्रमाणेंच डॉफिनची ही नवी बायको अत्यंत विनयशील होती. या बाईचें वर्णन 'मॅदम'ने असें केलें आहे की 'इतके मोठे स्तन मी कधींही पाहिले नाहीत. डॉफिनचें प्रेम त्यांवरच बसलें असावें! डॉफिनचें आणि राजाचें प्रथमपासूनच फारसें रहस्य नव्हतें, पण मॅदम द मॅंतनॉंच्या मध्यस्थीने ते एकमेकांशीं बऱ्याच सलोख्याने वागूं लागले असें दिसतें.

तिचा आवडता मुलगा ड्यूक द्यु मेन, यालाही तिच्या मध्यस्थीची गरज पडत असे. तो पायाने अधू असल्यामुळें लंगडत असे आणि यामुळें दरबारांत मिरवण्यापेक्षां तो लढाईच्या मैदानावरच आयुष्य कंठीत असे. पण आपले पराक्रम राजाच्या कानावर घालण्याकरतां तो मॅदम द मॅंतनॉंचा उपयोग करून घेत असे. राजाच्या अनौरस मुलांनी असें कांही केलें तरच त्यांचा अनौरसपणाचा कलंक धुवून निघेल, असेंच मॅदम द मॅंतनॉंला वाटत असल्यामुळें ती त्यांना शक्य तितकी मदत करीत असे.

राजाच्या अनौरस मुली मात्र तिच्या फारशा ताब्यांत नसत. त्यांना जरी बंड करणें शक्य नव्हते, तरी त्यांना तिचे वर्चस्व फारसे आवडत नसे.

यामुळे तिलाही त्यांच्याबद्दल फारसे प्रेम नव्हतें. त्यांना योग्य शिक्षण देण्याकरतां तिने आपली शिकस्त केली होती, पण त्यांना त्याचें महत्त्व वाटत नव्हते. यांपैकीं एक ध्युशेस द्यु शार्त्र ही पत्रांतून तिची व राजाची चेष्टा करीत असे. 'मॅदॅम' प्रमाणेंच तिचींही पत्रें एकदां तिच्या हातीं आलीं तेव्हां तिने एकदां तिला प्रत्यक्ष बोलावून आणून पत्रांतील मजकूर तिलाच आपल्यासमोर मोठ्याने वाचायला लावला. तेव्हां तिने क्षमा मागितली, पण तें ती विसरली नाही.

१६९६ सालीं अशी स्थिति झाली होती की राज्यांत खरी अभिषिक्त राणी तर नव्हतीच, पण भावी राजा जो डॉफिन, त्यानेही भलतीच बायको केल्यामुळे तो राजा झाला तरी राणी नाहीच, अशी स्थिति झाली. अशा वेळीं डॉफिनचा वडील मुलगा जो ध्युक द बुरगॉन्य त्याच्या लग्नाची वाटाघाट सुरू झाली. त्याच्याकरतां जी मुलगी शोधून काढली होती ती फक्त बारा वर्षांची होती. ती राजाला प्रथमदर्शनींच इतकी पसंत पडली की त्या रात्रीं त्याने बराच वेळ मॅदॅम द मॅंतनॉंजवळ तिच्या सौंदर्याचे वर्णन करण्यांत घालवला. त्यांचें लग्न एकदां उरकून घेतले आणि नंतर राजवाड्यांतच तिचें शिक्षण मॅदॅम द मॅंतनॉंकडे आणि नवऱ्याचें शिक्षण फेनलॉं नांवाच्या धर्मोपदेशकाकडे सोपवण्यांत आलें. हीं दोघे या शिक्षणाच्या बाबतींत एकमेकांचा सल्ला घेत असत, आणि फेनलॉंच्या शिक्षणाचा परिणाम या भावी राजाच्या स्वभावावर अत्यंत प्रभावी झाला असें म्हणतात. फेनलॉं व मॅदॅम द मॅंतनॉं यांचा चांगला स्नेह होता आणि तो पुढें इतका दृढ झाला की त्याला जेव्हां आर्चबिशपची जागा मिळाली, तेव्हां त्या दीक्षेचा समारंभ सॅं-सीर येथील शाळेच्या प्रार्थनागृहांत व्हावा अशी त्याने विनंति केली. स्नेही या नात्याने त्याने तिला उपदेश केला की राजदरबारांत राहणाऱ्या माणसांनीं थोडेबहुत व्यवहारी बनलेच पाहिजे, केवळ परमार्थाकडे लक्ष देऊन भागणार नाही. यावरून मॅदॅम द मॅंतनॉंची प्रवृत्ति कशी होती हें दिसून येतें.

---

# ९

तिने सँ–सीर येथे जी शाळा काढली, तिचा थोडा इतिहास पाहण्यासारखा आहे. तिचें राजाशीं लग्न झाल्याबरोबर ही कल्पना तिच्या डोक्यांत आली. राज्यांतील बडया लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचा तिचा उद्देश तिने राजाला सांगितल्यावर त्याला तो पसंत पडला, कारण आतांपर्यंत सर्व शिक्षणसंस्था म्हणजे मठ असत, आणि ही संस्था मठासारखी नव्हती. जिने मठांत जावें लागूं नये म्हणून स्कॅरॉंसारख्या पंगूशीं लग्न करण्याचें पत्करलें, तिला मठ पसंत नव्हते हें सांगायला नको. राजाने या संस्थेला सढळ हाताने मदत केली आणि मॅदम द मॅंतनॉंचें नांव संस्थापक म्हणून जाहीर झालें. या संस्थेंत गरीबी आलेल्या मोठ्या कुळांतील २५० मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. ॲबे ऑफ सँ-दनी नांवाच्या एका धार्मिक संस्थेचें उत्पन्न या शाळेला दिलें. यांतून निघणारे सालीना एक लक्ष फ्रँक जर खर्चाला पुरले नाहीत, तर राजाने आणखी ५०००० द्यायचें ठरवलें आणि नंतर त्याला आणखीही ३०००० द्यावे लागले. राजाने स्वतः आपल्या हाताने या संस्थेची घटना लिहून काढली.

या संस्थेंत तीच मुखत्यार होती, सर्व अधिकार तिच्याच हातांत होता आणि तिला पाहिजे तशी व्यवस्था करून घेतां येत होती. जी स्वतः कधी

माता झाली नाही, तिला राजाच्या मुलांच्या बाबतींत मातृत्वाची जबाबदारी पत्करावी लागली, तशी आतां ती खुषीनें इतक्या मुलींची आईसारखी काळजी घेऊं लागली. राजा जरी कॅथोलिक होता तरी मठांची व्यवस्था त्याला पसंत नव्हती, आणि म्हणूनच त्याने ही संस्था मठांसारखी नसावी असें ठरवलें होतें. वास्तविक रोमच्या पोपचा अधिकार कॅथोलिक पंथांतील सर्व लोकांवर अनिर्बंध चालतो, पण लुईने पोपला धाब्यावर बसवून त्याला कळवलें होतें की फ्रान्सवर तुझा ताबा चालणार नाही. अडचण इतकीच होती कीं मठांतील धार्मिक लोकांशिवाय आजपर्यंत शिक्षणाचें काम कोणीही हातीं घेतलें नव्हतें, तेव्हां तें कोणाच्या हातांत द्यावें ? मॅदॅम द मँतनाँ ही देखरेख करायला तयार होती. पण प्रत्यक्ष शिक्षणाचें काम तिला शक्य नव्हतें. पण शेवटीं तिला अशी एक बाई सांपडली की ती जरी मठांतच तयार झाली होती तरी कर्मठ नसून विद्वान होती. हिचे नांव मॅदॅम ब्रिनाँ. तिला प्रथम शिक्षकिणी तयार करण्याचें काम दिलें. याकरतां तिच्या ताब्यांत बारा तरुण स्त्रिया दिल्या आणि त्यांपैकी शेवटीं चारच सँ-सीर येथें शिक्षकाचें काम करण्यास योग्य ठरल्या.

या शाळेंतील शिक्षकिणीकरतां मॅदॅम द मँतनाँने एक पोषाख कल्पून, तो प्रथम तिने आपल्या नोकरिणीला घालायला लावून तिला राजासमोर उभी केली आणि राजाने त्यांत कांही फरक सुचवल्यावर तो पसंत झाला. नंतर मुलींच्या पोषाखाची गोष्ट निघाली, तेव्हां राजाने सांगितलें की त्यांत काळा रंग बिलकुल नको, कारण मठांतल्या स्त्रिया काळें नेसत असत. प्रत्येक शिक्षकिणीला आणि मुलीला वेगळें पिण्याचें भांडें, कांटा व चमचा, हीं चांदीचीं दिलीं. मठासारखें गरिबीचें ढोंग आपल्याला नको, पण त्यांनी कोणाकडूनही नजराणे घेतां नये आणि तेथें कोणी पाहुणे जेवायला येतां नये, असा हुकूम होता. राजघराण्यांतील मुलींना मात्र प्रथम मॅदॅम द मँतनाँची परवानगी काढून तेथें जातां येत असे.

या शाळेंत कोणाला घ्यावें हें राजा स्वतः ठरवीत असे. कोणाचा अर्ज आल्यास तिच्या कुळाची चौकशी करून मग राजा तिला स्वतः उत्तर लिहीत असे. या मुलींचीं लग्नें व्हावीं अशी इच्छा असल्यामुळें जांवई शोधून काढ-

ण्याचें काम मॅदॅम द् मँतनाँकडे असे आणि तेथून दरवर्षी ज्या वीस मुली बाहेर पडत, त्यांना हुंड्याकरतां लहानशी रकम संस्थेंतूनच मिळत असे. मॅदॅम द मँतनाँ शक्य तों दररोज सकाळीं राजासह या शाळेंत देखरेखीकरतां जात असे, आणि शाळेंतील मुलींना उदाहरण घालून देण्याकरतां ती स्वतः अत्यंत साधा पोषाख करीत असे. फक्त तिच्या गळ्यांत एक हिरेजडित 'क्रॉस' लोंबत असे आणि या क्रॉसला तिचें नांव मिळालें आहे. ती स्वतः कपड्यांचीं कपाटें उघडून पहात असे, स्वयंपाक चाखून पहात असे, हिशोब पहात असे.

मॅदॅम ब्रिनाँ स्वतः कविता आणि नाटकें लिहीत असे आणि त्या काळचा प्रसिद्ध कवि व नाटककार रॅसीन हाही त्यांच्या सेवेला हजर होता, आणि त्याची नाटकें संस्थेंतील मुली करूं लागल्या. पण नाटक म्हटलें म्हणजे प्रेमाशिवाय कसें होणार ? आणि या संस्थेंत तर प्रेमाचें नांव काढतां नये. ही मोठी अडचण उपस्थित झाली. शेवटीं या अडचणींत मॅदॅम द मँतनाँने रॅसीनला विनंति केली की त्याने एक प्रेमरहित धार्मिक नाटक या मुलींकरतां लिहावें. रॅसीन आतां विरक्त होऊन नाटकें लिहीत नाहीसा झाला होता, पण त्याने या विनंतीला मान देऊन आणि बायबलांतील एस्तेरच्या गोष्टीवर एक नाटक लिहिलें आणि तें मुलींनी करावें असें ठरलें. याकरतां फक्त १५ वर्षांच्या आंतल्या मुली निवडल्या होत्या आणि नाटक उत्कृष्ट वठलें. अर्थात् पुरुषांचीं कामेंही मुलीच करीत होत्या. शेवटीं १६ जानेवारी १६८९ रोजीं स्वतः राजेसाहेब डॉफिनला आणि कित्येक बिशपांना बरोबर घेऊन नाटक पहायला आले आणि ते इतके खुष झाले की या नाटकाचे अनेक प्रयोग होऊन सर्व दरबारी लोकांना तें पाहण्याची संधि मिळाली. या नाटकांचे वेळीं राजा स्वतः दरवाजावर उभा राहून निमंत्रित प्रेक्षकांच्या यादीबरहुकूम प्रेक्षकांना आंत सोडीत असे आणि नंतर दरवाजा बंद होत असे. मॅदॅम द मँतनाँ त्याच्या मागें मागें राहून लोक काय म्हणतात तें त्याला सांगत असे. मॅदॅम द सेव्हिन्ये ही प्रसिद्ध लेखिका एकदां हजर होती, आणि प्रयोग संपल्यावर राजा तिला म्हणाला, 'काय, नाटक तुम्हाला आवडलें असें म्हणतात ?' ती लवून मुजरा करून 'होय' म्हणाली आणि राजा आपल्याजवळ बोलला म्हणून

तिला अतिशय आनंद झाला. ज्यांच्याजवळ तो बोलला नाही, ते हिरमुसले होत असत पण सर्वांजवळ तो कसा बोलणार ? त्याने द्वारपालाचें काम केलें तरी तो आपला रुबाब कधी विसरत नसे आणि लोकांना त्याचा नेहमी वचक असे.

हळूहळू १५ वर्षांच्या वरच्या मुलींना हेवा वाटूं लागला आणि शेवटीं त्यांनाही नाटकांत काम करण्याची परवानगी मिळाली. नाटकाबरोबर दागिनेही आले होते आणि आतां एकमेकींत हेवादावा इतका वाढूं लागला आणि इतकीं भांडणें होऊं लागलीं की ही मोठी पंचाईत झाली असेंच सर्वांना वाटूं लागलें. शिवाय एका मुलीने बाहेरच्या कोणाला तरी पत्र लिहिलेलें सांपडलें तेव्हा इतका गहजब उडाला की शेवटीं राजाने स्वतःच्या करमणुकीवर पाणी सोडून नाटकें बंद केलीं.

पण याचे पर्यवसान पुढें असें झाले की पोपने या प्रकाराचा फायदा घेऊन या मुलींना मठांतच ठेवणें बरे, नाहीतर त्या बिघडतात असें बोलणें सुरूं केलें. आणि ॲबेचें उत्पन्न या संस्थेला दिलें होतें, त्यांतून पोपला जो कर द्यावा लागत असे, तो अशा अटीवर सोडण्याचें त्यानें कबूल केलें की या संस्थेचें मठांत रूपांतर व्हावें आणि शेवटीं राजानेही तें मान्य केलें. पोपच्या सत्तेला जरी त्याने एकदां धुडकावलें होतें, तरी पोपसारख्याशीं कायमचें भाडण राहूं देणें त्याला बरें वाटलें नाही, आणि शेवटीं ही मोठ्या आग्रहाने 'मठासारखी नको' म्हणून काढलेली संस्था मठांत रूपांतर पावली. त्यांत आणखी बऱ्याच धार्मिक भानगडी उपस्थित होऊन शेवटीं प्रत्यक्ष मॅदॅम द मँतनाँ देखील राजाच्या मर्जीतून कांही दिवस उतरली होती, कारण एका धार्मिक बाईवर फाजील विश्वास टाकून ती फसली होती. शेवटीं तिला आपली चूक कळून आली आणि राजानेही तिला क्षमा केली.

---

# १०

वरील संस्थेच्या जागेतच मठस्थापना झाल्यावर मठाधिपतीच्या जागीं मॅदम द मँतनाँचीच नेमणूक झाली. पण आतां अर्थातच मठांत बाहेरचा कोणताही मनुष्य जाणें शक्य नव्हतें. फेनलाँचें आणि पोपचें कांही कारणावरून भांडण झालें. त्यांतला मतलब असा की कॅथोलिक पंथांतील लोकांना विचार करण्याची परवानगी नसते आणि पोप सांगेल तें मुकाट्याने कबूल करावें लागतें. तें करण्याऐवजी फेनलॅंने स्वतःचे कांही स्वतंत्र विचार एका पुस्तकांत मांडले होते. सँ-सीर येथील संस्थेवर पोपचा जो राग झाला त्याचें एक कारण असें होतें की मॅदम द मँतनाँ नेहमी शिक्षणाचे बाबतींत त्याचा सल्ला घेत असे. यामुळे आतां काय करावें आणि कोणावर विश्वास ठेवावा हें तिला समजेना.

अर्थात् तिचा दर्जा, वय आणि स्वभाव हीं सर्वच तिला अनुकूल होतीं. तिला आतां ६५ वर्षं पुरीं झालीं होतीं आणि कांही झालें तरी ती राजाची बायको होती. तरीदेखील ती मुलींशीं समरस होत असे. आणि त्यांना अत्यंत प्रेमाने वागवीत असे. ती जरी मठाधिपति झाली तरी एकंदरींत तिला मठांची परंपरा पसंत नव्हतीच. एकदां देवीच्या साथीने मठांतल्या बारा मुली मेल्या. तेथील शिक्षिका मॅदम द ग्लॅपिआँ नांवाची होती, तिला यामुळे अतिशय दुःख होऊन ती खंगून जाऊं लागली. तेव्हां मँतनाँने तिला उपदेश केला की इतकें

प्रेम देवाला आवडत नाही. जें येईल तें धैर्यानें सोसलें पाहिजे. आपल्याला प्रिय असलेलीं पुष्कळ माणसें मरतात, पण आपला धीर खचूं देतां नये. राजा कोठे गेला तर तिलाही त्याच्याबरोबर जावें लागत असे, पण मठ सोडून जाण्याचें तिला दुःख होई. राजवाड्यांतील वैभवांत देखील तिला बरें वाटत नसे, कारण सुखोपभोगापेक्षा तिचें कामाकडेच लक्ष जास्त असे. लोक एकसारखे कांही ना कांही निमित्तानें भेटायला येत असल्यामुळे तिला प्रार्थनेला वेळ काढण्याकरतां पहाटे उठावें लागे, कारण राजघराण्यांतील माणसांना किंवा राज्यांतील प्रतिष्ठित सरदारांना भेटत नाही म्हणणें अशक्य होतें. हा प्रकार रात्रीं निजेपर्यंत चाले आणि बिछान्यावर पडल्यावर देखील राजेसाहेबांना कांही बोलायचें असल्यास जागावेंच लागे. या सर्व दगदगीमुळे तिची प्रकृति नीट रहात नव्हती. इतकें करूनही तिचा बराच वेळ पत्रें लिहिण्यांत जात असे. सँ-सीर येथील मुलींना तिने लिहिलेली पत्रें त्या जतन करून ठेवीत आणि ती स्वतः तेथे जाऊन मुलींना प्रवचनें देत असे, तींही त्या उतरून घेत आणि हीं पत्रें आणि व्याख्यानें अजूनही उपलब्ध आहेत. कधीकधी राजवाड्यांतून सुटी घेऊन ती सबंध दिवस सँ-सीर येथें घालवी आणि असे दिवस सर्वांनाच आनंदांत जात. कारण शिस्त लावण्यांत जरी ती कडक असे, तरी तिला मुलींबरोबर खेळकर होतां येत असे.

त्या मठांतून तयार झालेली मॅदॅम दोमॅल नांवाची एक मुलगी तिच्या जवळ मदतनीस म्हणून राजवाड्यांतच रहात असे. ती संभाषणांत चतुर होती आणि तिचा आवाजही चांगला असल्यामुळें राजाला तिची करमणूक होत असे. अलीकडे राजेसाहेबांनी सँ-सीर येथें जाण्याचें सोडून दिलें होतें, तरी मठासंबंधी ते चौकशी करीत असत आणि या मुलीमुळे त्यांना त्याची वारंवार आठवण होत असे.

राजाला आपलें वैभव दाखवायला आवडत असे, पण मँतनाँला तें पसंत नव्हतें. तिला राजाकडून आतां फक्त महिना ४००० फ्रँक मिळत असत आणि वर्षारंभीं आणखी १२००० मिळत असत. तिचा दानधर्म यांतूनच चालत असल्यामुळे तिला कोणाला मोठ्या रकमा देतां येत नसत. कोणाला दोनशें

कोणाला सवडीने आणखी शंभर देण्याचें आश्वासन असे, उल्लेख ठिकठिकाणीं सांपडतात. राजालाही तिनें काटकसरीचे धडे दिले असते, पण तो तिचें या बाबतींत फारसें ऐकत नसे. याबद्दल तिच्या धर्मगुरूला लिहिलेल्या पत्रांतून तक्रारी असत. राजा ख्रिस्ती होता आणि धार्मिक समजलेलीं कर्तव्यें तो करीत असे, पण धर्माचे गरीबीचें तत्व मात्र त्याने स्वीकारलें नव्हतें. धर्मकृत्यें संपल्यावर आपलें वैभव उपभोगण्याचा आणि तें लोकांना दाखवण्याचा आपला हक्क आहे असें तो मानीत असे. हें मँतनॉंला पसंत नव्हतें, पण तिचें यांत कांही चालेना.

तिच्या चारित्र्याबद्दल अनेकांनी संशय घेतला आहे, पण तिने आपल्या धर्मगुरुंना लिहिलेलीं पत्रें जो वाचील त्याला याबद्दल बिलकुल शंका राहणार नाही. कॅथोलिक धर्मात आपल्या पापांची कबुली द्यायची असते हा मुद्दा सोडला तरी ती स्वतःबद्दल जें लिहिते त्यावरून कोणाचीही खात्री व्हावी. आपल्या चारित्र्याचा तिला गर्व नाही. ती म्हणते ‘ मी असलीं पापें केलीं नाहीत, पण त्यांत कांही मोठेंसें भूषण नाही, कारण माझा स्वभावच तसा होता. सुखाच्या लालसेपेक्षा कीर्तीची महत्वाकांक्षा माझ्या बाबतींत प्रबल असल्यामुळें मला तसल्या प्रकारचा मोह कधी फारसा झालाच नाही. ’

सन १७०० च्या सुमारास राजा आणि ती हीं दोघेंही सुखाच्या परमावधीला पोंचलीं होतीं असें म्हटलें तरी चालेल. युद्धानंतर तह होऊन राजाला कीर्ति मिळाली होती; व्हर्साय येथील राजवाडा व बाग वगैरेची शोभा परिपूर्ण झाली होती; वंश कसा चालणार याचीही काळजी नव्हती; डॉफिनला तीन मुलगे होते आणि वडील मुलगा ड्युक द बूरगॉन्य यालाही मुलगे होते. मॅदम द मँतनॉंने अंगीकारलेलें कर्तव्य पार पाडलें होतें, म्हणजे राजाचें मन तिने धर्माकडे वळवलें होतें, आणि सँ-सीर येथील शाळाही नीटपणें चालून लोकप्रिय झाली होती. इतकेंच नव्हे तर तेथें तयार झालेल्या मुली बाहेर जाऊन तसेंच काम इतरत्र चालवूं लागल्या होत्या. मँतनॉंने जरी प्रॉटेस्टंट पंथ सोडला, तरी त्याचीं बंडखोर तत्वें तिने सोडलीं नव्हतीं आणि तिला जेथें सुधारणा पाहिजे असें वाटेल तेथें ती बोलायला कचरत नसे.

युद्धें चालूच होती आणि १७०९ सालीं बिकट परिस्थिति उत्पन्न झाली. थंडी फार होती आणि लोकांना अन्न पुरेसें नव्हतें. राजानें कर वाढवण्याऐवजीं आपलीं स्वताचीं चांदीसोन्याचीं भांडीं टांकसाळीकडे पाठवलीं, आणि त्याचें अनुकरण बऱ्याच सरदारांनी केलें. गहूं पुरेसा मिळाला नाहीं तर बार्लीचा उपयोग कसा करावा, हें ती आपल्या पत्रांतून शाळेच्या चालकांस लिहून कळवीत असे.

तिचें वय आतां ६२ वर्षांचें होतें. सँ-सीर येथील शाळेबद्दल तिची एकच इच्छा राहिली होती. तेथे मठ स्थापन झाल्यावरही राजाच्या आग्रहामुळें तेथील मुली इतर मठासारखा पोषाख करीत नसत, आणि पोपने देखील त्यांच्यापुरता अपवाद केला होता, पण मँतनॉला हा अपवाद नेहमी टिकावा हें बरें वाटलें नाही. तिची इच्छा पाहून तेथील मुलींनाही तसेंच वाटूं लागलें. अडचण काय ती राजाज्ञेची होती. मँतनाँ एकदां राजाला म्हणाली की मी त्यांच्याकरतां एक धार्मिक पोषाखाचा नमुना तयार करावा अशी त्यांची इच्छा आहे. राजा म्हणाला 'म्हणजे मी मेल्यावर त्यांचा तसा पोषाख करण्याचा बेत दिसतो, आणि त्याकरतां त्या माझ्या मरणाची वाट पहात बसणार, तसें नको, त्यांना वाटल्यास आतांपासूनच तसा पोशाख करावा. माझी हरकत नाही.' इतकें झाल्यावर तिने एका बाहुलीला तसा पोशाख चढवला आणि ती राजाला दाखवून त्याने पोशाखांत कांही फरक सुचवल्यावर तो कायम झाला.

अशा तऱ्हेने शेवटीं मँतनाँच्या शाळेंत आणि मठांत राहिलेला एकच फरक नाहीसा झाला आणि ती इतर मठांच्या ओळीला येऊन बसली. तथापि तेथील शिक्षणपद्धती सुधारलेली होती आणि याचा परिणाम इतरावरही झाल्याशिवाय राहिला नाही.

———

# ११

मँतनाँ जरी राजकारणांत लक्ष घालीत नसे, तरी अप्रत्यक्ष रीतीने तिचा राजकारणाशीं निकट संबंध येत असे. उदाहरणार्थ १७०१ सालीं जेव्हां लुईचा नातू फिलिप हा स्पेनचा पांचवा फिलिप राजा झाला, तेव्हां या गादीवर ऑस्ट्रियाचा आर्चड्युक हक्क सांगत होता. आणि लुईला जरी त्या भांडणांत प्रत्यक्ष पडतां येत नव्हतें, तरी त्याला त्याची इत्थंभूत बातमी मिळवावी लागत असे. इकडे ड्युक द बूरगॉन्यचें ज्या मुलीशीं लग्न करून दिलें होतें, तिच्या धाकट्या बहिणीचें फिलिपशीं लग्न करून देऊन लुईने या दोन राज्यांची संघटना करण्याची व्यवस्था केली होती, आणि या नव्या राणीवर देखरेख करण्याकरतां मँतनाँची प्रँसेस देज्यूरसँ नांवाची मैत्रीण स्पेनमध्यें ठेवली होती. या दोघींत एकसारखा पत्रव्यवहार चालू असे आणि दोन्ही बाजूंचीं पत्रें लुई वाचीत असे, व मॅद्रिद येथील फ्रान्सच्या वकिलाकडून जी बातमी कधीही समजली नसती, अशी खाजगी बातमी त्याला सहज मिळत असे. दर आठवड्याला एक याप्रमाणें हीं पत्रें सतत आठ वर्षें चालू होती.

या दोन स्त्रियांत एक मोठा फरक होता. तो असा की मँतनाँ ही धार्मिक आणि युद्धभीरु होती पण पँसेसे मात्र तशी नव्हती. फ्रान्सच्या कीर्तीला धक्का लागू नये म्हणून ती नेहमी युद्धाला प्रोत्साहन देई. या मुद्यावर या

दोघींचीं एकसारखीं भांडणें चालत. आस्ट्रियाने स्पेनचा पराभव केल्यावर जेव्हां राणीला पळून जावें लागलें तेव्हाची हकीकत या पत्रांत सांपडते. अर्थात् लुईला आपलें सैन्य पाठवून फिलिपला मदत करावी लागली. याच सुमाराला (१७०९) फ्रान्समध्यें हिंवाळ्यांत भयंकर थंडी पडल्यामुळे पिकांची नासाडी होऊन भयंकर दुष्काळ पडला. धान्य तर पिकलें नाहींच, पण झाडांना फळें आलीं नाहीत व झाडेंही मरून गेलीं. यावरून मँतनाँने असा निष्कर्ष काढला की या युद्धांत ईश्वर आपल्या विरुद्ध असल्यामुळे त्याने हीं सकटें पाठवलीं.लुई मात्र थंड राहून आपल्या सेनापतींना नेहमी धीर देत असे. त्याला फारच दुःख झालें तर तो मँतनाँच्या खोलींत जाऊन रडत असे, पण लोकांना तो नेहमी धीरगंभीर दिसे.

मँतनाँ आतां ७५ वर्षांची झाली होती आणि तिची प्रकृति खालावत चालली होती. याचा तिला एक फायदा असा झाला की प्रकृतीमुळे कोणाला भेटत नाही असें सांगतां आल्यामुळे तिला विश्रांति मिळूं लागली. पण १७११ सालीं राजघराण्यावर जी संकटपरंपरा कोसळली तिने तिचा धीर अधिकच खचला. एप्रिल ९ रोजीं डॉफिन देवींनी आजारी झाला आणि मे १५ ला त्याचा अंत झाला. राजाने कोणाच्याही मृत्युशय्येजवळ असतां नये असा नियम असे, यामुळे तो मरणार हें नक्की होतांच राजा खोलींतून बाहेर गेला.

हा मुलगा राज्य करण्याला नालायक असेंच सर्वांचें मत असल्यामुळें त्याच्या मृत्यूने कोणाला फारसें वाइट वाटलें नाही. त्याचा वडील मुलगा ड्युक द बूरगॉन्य हा आता डॉफिन झाला. त्याला फेनलाँनें शिक्षण दिलें असल्यामुळे त्याला प्रजेबद्दल काळजी वाटत असे आणि या दृष्टीने सुधारणा करण्याकडे त्याची प्रवृत्ति असे आणि युद्धें करून कीर्ति मिळवण्याच्या तो विरुद्ध असे. यामुळे हा कसा काय राजा होईल अशी लुईला शंका वांटे, पण त्याचें स्वतःचें मनही संकटांमुळे बरेंच मऊ झालें होतें, तेव्हां तो त्याचें कौतुकच करीत असे. तो दरबारांतील लोकांना देखील उघड म्हणूं लागला की हा राजा झाला म्हणजे सर्व कांहीं माझ्यापेक्षा उत्तम रीतीने करलि.

पण तें होणें नव्हतें. सुमारें एका वर्षाने, म्हणजे ५ फेब्रुवारी १७१२ रोजी व्हेर्साय येथे डॉफिनच्या बायकोला ताप आला आणि तो देवींचा ठरला.

मँतनाँची ती आवडती असल्यामुळे ती तिच्या बिछान्याजवळ बसून राही आणि डॉफिनही तिला एकटी सोडीना. राजा देखील बऱ्याच वेळां चौकशीला येई, पण कांही उपयोग न होतां ती दहा दिवसांतच मेली. दुसऱ्या दिवशीं डॉफिनला स्वतःला ताप आला व तोही देवींचाच ठरला व १८ फेब्रुवारीला त्याचाही अंत झाला. या वेळीं मात्र नेहमीचा नियम बाजूला ठेवून राजा मृत्यूशय्ये जवळून हालला नाही.

त्याला दोन मुलगे होते. एक पांच वर्षांचा व दुसरा अजून अंगावर पीत होता. यांपैकी मोठ्या मुलाला आतां डॉफिन ही पदवी मिळाली. पण दुसऱ्याच दिवशीं ह्या दोघांनाही ताप आला. या दोन्ही मुलांचें नामकरण व्हायचेंच होतें, तें घाईने उरकून घेतलें आणि राजाने मोठा मुलगा मरणार असा अजमास करून दोघांचेंही नांव 'लुई' असेंच ठेवण्यास सांगितलें त्याच रात्रीं मोठा मुलगा मेला, आणि धाकटा मुलगा राज्याचा वारस झाला. अशा रीतीने तीन डॉफिन एका वर्षांत वारले आणि पुढें काय होणार याची भीति वाटूं लागली. हीं मुलें विषप्रयोगाने मेलीं अशी बातमी उठली. त्यांच्या प्रेतांची तपासणी करण्याचा हुकूम राजाने दिला आणि त्यांचें रक्त बिघडलें होतें असा पुरावा मिळाला. राजाचा मुख्य डॉक्टर फगाँ याने विषप्रयोग झाला असें मत दिलें, पण दुय्यम डॉक्टर मॅरेशाल याचें मत तसें पडलें नाही, आणि त्याने स्पष्ट सांगितलें की देवींनी मेलेल्या माणसांत अशींच चिन्हें सांपडतात हें मला माहीत आहे. तथापि विषप्रयोग नव्हताच अशी लोकांची खात्री होईना. याचें एक कारण असें होतें की राजाचा पुतण्या ड्युक दॉर्लेआं हा दुष्ट व बदफैली होता. आणि त्याचीच ही कारवाई असली पाहिजे अशी लोकांची खात्री झाली. स्पेनचें राज्य आपल्याला मिळेल असेंही त्याला एकदां वाटत होतें, पण लुईने त्याला कधी उघड विरोध केला नाही, इतकेंच नव्हे तर आपला नातू ड्युक द बेरी याचें लग्न त्याने ड्युक दॉर्लेआंच्या मुलीशीं लावून दिलें होतें. तथापि ड्युक दॉर्लेआं हा आपल्या नास्तिकपणाबद्दल आणि बदफैली वागणुकी-बद्दल उघडपणें ऐट मारीत असे, यामुळे राजाला तो बिलकुल आवडत नसे. मॅदॅम द मँतनाँला तर तो प्रत्यक्ष सैतानच वाटे. जो आपल्या भक्तांना संकटें

सोसायला लावतो तो देव कसला, असें तो उघडपणें म्हणत असे, इतकेंच नव्हे तर सैतानाशीं आपली मैत्री असल्याचें तो सांगत असे. लोकमत अर्थातच त्याच्या विरुद्ध होतें आणि आतां एकच लहान मुलगा राज्याला वारस राहिला होता, त्याच्यावरही काळाचा घाला आल्यास हा दुष्ट मनुष्य वारस होणार ही भीति सर्वांना वाटत होती. त्यानेच विषप्रयोग केला असला पाहिजे असें सर्वजण म्हणूं लागले, पण राजाने स्वतः तसें म्हटलें नाही, इतकेंच नव्हे तर तो कसा झाला तरी राजघराण्यांतला असल्यामुळे त्याचा उघड उपमर्द होऊं नये अशी दक्षता तो बाळगीत असे, आणि या विषप्रयोगाच्या बातमीवरही त्याने विश्वास ठेवला नाही.

या सर्व प्रकारामुळे राजा इतका हवालदिल झाला होता की सायंकाळीं कांही विशेष काम नसल्यास तो तीन वाजल्यापासून मँतनॉंकडे जाऊन बसे व दहा वाजेपर्यंत तेथून हालत नसे. त्याच वर्षी ड्युक द बुरगॉन्यचा भाऊ ड्युक द बेरी हाही देवींनींच मेला. त्याचेंही रक्त तपासलें तेव्हां तशींच चिन्हें सांपडलीं. आणखी कांही दिवसांनी स्पेनची राणीही वारली आणि ज्या दोन बहिणी राण्या होणार असें लुईला वाटत होतें, त्या दोघीही मृत्यूला बळी पडल्या.

ड्युक द बेरी वारल्यावर राजाने सर्व औपचारिक दुखवट्याच्या भेटींना आणि काळ्या पोषाखांनाही बंदी केली. तो स्वतः देखील बाहेर गार्डीतून फिरायला गेला आणि दरबारी खान्यांतही सामील झाला. विषप्रयोगावर आपला विश्वास नाही हें त्याने स्पष्ट दाखवलें आणि खरोखरच विषप्रयोगाचा कांही संबंध नव्हता असें आतां सिद्ध झालें आहे. रक्त बिघडलें तें रोगाने विषानें नव्हे, आणि राजाने तसें उघडपणें एकदां बोलूनही दाखवलें.

याप्रमाणें आपल्या पुतण्यावर आलेल्या संशयाचें जरी त्याने निराकरण केलें, तरी आपल्या दुर्गुणांची बढाई मारणाऱ्या या पुतण्याबद्दल शक्य तितकी सावधगिरी बाळगण्याचा त्याने निश्चय केला.

———

# १२

लुई आतां ७६ वर्षांचा होता. आपला राहिलेला नातू तरी राज्यावर येतो की ड्युक दॉर्लेआं राजा होणार, ही शंका त्याला होतीच, पण तो राजा झाला नाही तरी राजाचा पालक म्हणून रीजंट तरी निदान होणारच याबद्दल शंका नव्हती. ड्युशेस द बूरगॉन्य मेल्याबद्दल सर्वांना अतोनात दुःख झालें होतें, कारण ती अत्यंत खेळकर असून राजासकट सर्वांची करमणूक करीत असे. आतां मॅतनॉंच्या खोलींत देखील सर्व गंभीर माणसेंच असत आणि सर्वांचे चेहरे दुःखी असत पण तरीही राजा तेथेंच येऊन बसत असे. ड्युक ड्यु मेन हा राजाचा अनौरस मुलगा तेथें लंगडत आला म्हणजे तो मात्र थोडीबहुत करमणूक करीत असे आणि एखादेवेळीं तरी स्मित करण्याची संधि देई. तरीपण विषप्रयोगाविषयीं बोलल्याशिवाय त्यालाही राहवत नसे. पण तोही ड्युक दॉर्लेआंवर उघड आरोप करायला धजत नसे, कारण राजाला ते अवडणार नाहीं हे माहीत होतें. ड्युक दॉर्लेआंला या आरोपांची संवयच झाली होती आणि तो अधिकच बदफैली झाला होता, इतकेंच नव्हे तर त्याची विधवा झालेली मुलगीही त्याचाच कित्ता गिरवीत असे.

अशा स्थितींत आपण मेल्यावर राज्याचीं सूत्रें अशा माणसाच्या हातीं जाऊं नये अशी कांहीतरी व्यवस्था करणें जरूर आहे, असें लुईला वाटणें

साहजिकच होतें. याकरतां त्यानें पहिली गोष्ट केली ती ही की आपल्या अनौरस पुत्रांना वारसा हक्क दिला. म्हणजे ड्युक दार्लेंआंच्या नंतर गादीवर त्यांचा हक्क समजावा असें फर्मावलें. याचा एक परिणाम असा झाला की ड्युक द्यु मेनसारख्या नेक मनुष्याला उघडपणें राजपुत्राचा दर्जा आल्यामुळें डॉफिनचें संरक्षण करण्याचा हक्क त्याला आला आणि तो ड्युक दॉर्लेंआंच्या कारवाया चालूं देणार नाही असा विश्वास उत्पन्न झाला. त्याचा धाकटा भाऊ काँत द तूलूज हाही सुस्वभावी होता आणि मँतनॉला याबद्दल अभिमान वाटत असे, कारण हीं मुलें तिच्या हाताखालीं वाढलीं होतीं. लुईने आतां ६२ वर्षें राज्य केलें होतें, यामुळें राजमुगुट आपल्याच मालकीचा आहे आणि आपण तो पाहिजे त्याला देऊं अशी भावना त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती, आणि हे दोन्ही मुलगे त्याला आवडत होते.

त्यांना वारसाहक्क दिल्यावर एकाच महिन्याने राजाने आपले मंत्री आपल्या खोलींत बोलावून त्यांना सांगितलें की ‘ हें माझें मृत्युपत्र पार्लमेंटच्या ताब्यांत रहावें म्हणून मी तुमच्या हातांत देतों. इमारतीच्या मनोऱ्यांतील भिंत खोदून जागा करून तेथें हें मृत्युपत्र बंद करून ठेवा, म्हणजे तें सुरक्षित राहील. ’ या मृत्युपत्राने आपण मेल्यावर आपला लहान नातू गादीवर येतांच ड्युक दॉर्लेंआं हा एकटाच रीजंट न होतां एक मंत्रिमंडळ नेमून त्यांच्या हातांत राज्याची सर्व व्यवस्था दिली होती. अनौरस मुलांना त्या मंडळांत स्थान होतें. हें मृत्युपत्र मोहोरबंद होतें आणि त्याने तें कोणालाही दाखवलेलें नव्हतें. या मृत्युपत्राला राजाने मरतां मरतां एक परिशिष्ट जोडून ड्युक द्यु मेनला लहान राजाचा पालक नेमला. त्याच्या शिक्षणाची व्यवस्था त्याने करावी, त्याच्या घरांतील व्यवस्था त्यानेच पहावी, आणि पॅरिसमधील सर्व सैन्य त्याच्याच ताब्यांत रहावें. असें त्यांत लिहिलें होतें.

राजाने दाखवलेला स्वतःवरचा अविश्वास ड्युक दॉर्लेंआंला इतका असह्य झाला की त्याने आपण होऊन एकदां राजाला सांगितलें की ‘ माझ्यावर काय आरोप असतील त्यांची एकदां चौकशी व्हावी आणि तेथपर्यंत मला तुरुंगांत ठेवावें. माझी तयारी आहे. ’ पण लुईनें त्याच्याकडे तिरस्काराने पाहण्याप-

लीकडे कांही उत्तर दिलें नाही. मृत्युपत्र जरी कोणाला दाखवलेलें नाही असें लुईने म्हटलें होतें, आणि तें खरेंच असणार कारण अशा बाबतीत तो खोटें बोलणें शक्य नव्हतें, तरी त्यांतला मतलब मँतनॉंला माहीत होताच. कारण तिच्या सल्ल्यानेच सर्व गोष्टी होत असत, निदान तिच्याजवळ सर्व गोष्टींचा खल होत असे. औरस आणि अनौरस हा भेद मँतनॉंला महत्वाचा वाटत नव्हता. माणसाचें चारित्र्य ती पहात असे आणि त्यावरून त्याची किंमत ठरवीत असे, तेव्हां तें तिला पसंत होतें यांत शंका नाही. ड्युक द्यु मेनला तिची प्रथमपासूनच अशी शिकवण असे की 'तूं अनौरस आहेस, तूं जर स्वतःची किंमत दाखवलीस तर तुला कांही मान मिळेल. इतरांप्रमाणें जन्म-जात मान तुला नाही.' आणि हें मनांत ठेवून तो वागला होता.

या वेळीं राजाजवळ एक मनुष्य मात्र असा होता की तो मँतनॉंला पसंत नव्हता आणि तो राजाला काय सांगेल हेंही तिला कळत नव्हतें. कॅथोलिक धर्माप्रमाणें एखाद्या धर्मगुरुजवळ आपलीं पापें सांगावीं लागतात आणि याकरतां 'पेर ल तेलिए' नामक जेझुइट माणसाची नेमणूक झाली होती. जेझुइट तिला मुळीच आवडत नसत, पण या बाबतींत तिने कधी विरोध दाखवला नाही. राजाजवळ अधिकारवाणीने बोलण्याचा हक्क त्याला आपल्या धार्मिक दर्जामुळें प्राप्त झाला होता, पण याला तिचा इलाज नव्हता. त्याने त्याला काय उपदेश दिला हें नमूद नाही; पण लुईच्या मृत्युपत्रांतील व्यवस्था मँतनॉंला पसंत होती.

तो आतां खंगत चालला होता. तो कधी मरणार याबद्दल लंडनमधें लोक पैजा मारीत होते, आणि ही हकीकत वर्तमानपत्रांतून त्याच्याही नजरेस येई. अर्थात् डाक्टरांनी कितीही धीर दिला तरी तोही स्वतःला अमर समजत नव्हता. शेवटपर्यंत त्याने आपलें काम सोडलें नाही. १२ आगष्ट १७१५ रोजीं त्याला पायांत सायटिकाच्या वेदना होऊं लागल्या आणि हेंच त्याचें शेवटचें दुखणें होतें. तरी दुसऱ्या दिवशीं त्याने आपल्याला खुर्चीवरून दरबा-रांत नेववलें आणि तेथे कशाचाही आधार न घेतां स्वतः आपल्या पायांवर उभा राहून, एक तोतया इराणचा वकील म्हणून आला होता, त्याची

भेट घेतली. नंतर मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि तेथून मँतनॉंच्या खोलींत थोडें संगीत ऐकून तो निजायला गेला. हा संगीत ऐकण्याचा क्रम आणखी दोन तीन दिवस सतत चालू होता. १७ तारखेला त्याने पुनः कांही काम केलें. वीस तारखेला मात्र त्याने बिछाना सोडला नाहीं. त्याचा डॉक्टर त्याच्याच खोलींत निजला. त्याच्या हुकुमावरून शेजारच्या खोलींत मॅदॅम द मँतनॉं व मॅदॅम दोमॅल या निजल्या. चोवीस तारखेला त्याने पुनः मंत्रिमंडळाची सभा बोलावली आणि सायंकाळ झाल्यावर सर्वांसमवेत भोजन केलें. त्या रात्रीं त्याच्या वेदना एकदम जास्त झाल्या आणि तेव्हांपासून मँतनॉंने त्याची खोली सोडली नाही. मरण जवळ आलें असें वाटतांच पेर ल तेलिए आंत शिरला आणि ती बाहेर गेली.

२५ तारखेला डाक्टरांनी त्याच्या पायांतील तपासलें तेव्हां तें सडलेलें दिसलें ( गँग्रीन ). यानंतर मात्र आशा सुटली. यानंतर तो कोणाजवळ तरी बोलतांना 'मी राजा होतों तेव्हां' असें म्हणाला, यावरून त्यालाही तें समजलें होतें. मरणाच्या आदल्या दिवशीं त्याने मृत्युपत्राला आणखी एक परिशिष्ट जोडलें आणि पेर ल तेलिए याला लहान राचाचा धर्मगुरु नेमला. नंतर मँतनॉंला आपले कांही कागदपत्र जाळायाला सांगितले. यांत तिने त्याला लिहिलेलीं पत्रें असावींत, कारण त्यांतलें आज एकही सांपडत नाही. त्याने आपली प्रार्थनेची माळ मँतनॉंला दिली. मॅदॅम दोमॅलला एक डबी बक्षिस दिली. नंतर मँतनॉंला आपण सुखी करूं शकलों नाही, याबद्दल त्याने तिची क्षमा मागितली, पण आपल्या प्रेमाबद्दल आणि आदराबद्दल खात्री दिली. खोलींत आणखी कोणी आहे की काय, असें विचारतां तिने नाही म्हटलें, तेव्हां त्याला बरें वाटलें आणि तो म्हणाला, 'बाकी तुझ्याजवळ बोलतांना मला रडूं आलें तर कांही आश्चर्य नाहीं.' रडणें बरें नव्हे असें वाटून ती बाहेर गेली व किंचित वेळाने पुनः परत आली. राजाने विचारलें, 'तुझें आतां कसें होणार ?' ती उत्तरली, 'मी कोण आहे, आणि माझें काय व्हायचें ?' तरी पण स्वतःचें ८० वर्षांचें वय आणि असहाय स्थिति पाहतां आपलें कसें होईल असें तिलाही वाटलें, आणि तिने लुईला शेवटची विनंति केली की

माझा थोडाबहुत मान राखण्याबद्दल ड्युक दॉर्लेआंला सांगावें. राजानें तें कबूल केल्यावर ती आपल्या खोलींत गेली आणि मग इतरांना दरवाजा उघडला तेव्हां, राजघराण्यांतील व इतर बडीं माणसें आंत आलीं. त्यानें सर्वांना सांगितलें, 'मी तुम्हाला वाईट उदाहरण घालून दिलें याबद्दल मला क्षमा करा. तुम्ही माझी जशी इमानें इतबारें सेवा केली, तशीच माझ्या नातवाची करा आणि राज्यांत भांडणें होऊं देऊं नका आणि माझी थोडी बहुत आठवण ठेवा.'

ड्युक दॉर्लेआं एकटा राहिल्यावर त्याने त्याला सांगितलें की मॅदॅम द मँतनॉंबद्दल मला किती आदर होता हें तुला माहीत आहे. त्याच आदराने तिला वागवीत जा आणि तिने स्वतःकरतां किंवा आपल्या स्नेह्यांकरतां कांही विनंति केली तर तिचें ऐकत जा. ती त्याचा फाजील फायदा घेणार नाही त्याने तें कबूल केलें आणि लगेच तो राजाचें मृत्युपत्र रद्द करावयाच्या उद्योगाला लागला. अशा तऱ्हेने २ सप्टेंबरला राजाचा अंत झाला.

यानंतर मँतनॉं अर्थातच सँ-सीर येथें जाऊन राहिली आणि तेथून पुन्हा हालली नाही चार दिवसांनी ड्युक दार्लेआं तिला भेटायला आला या वेळीं तीं दोघेंही एकमेकांशीं मोकळेपणाने बोललीं. त्याने सांगितलें की 'नव्या राजाला कोणताही धोका पोंचणें माझ्या हिताचें नाही, कारण तसें कांहीं झाल्यास मला स्पेनशीं युद्ध करावें लागेल, इतकेंच नव्हे तर कदाचित् स्पेनचा पांचवा फिलिप हा स्पेनच्या राज्यावरचा हक्क सोडून देऊन फ्रान्सच्या गादीवर हक्क सांगेल.'

मँतनॉंनें स्वतःची कैफियत मांडली. तिला पूर्वी जे पैसे राजाकडून मिळत होते, ते तसेच चालू ठेवल्याबद्दल तिने त्याचे आभार मानले, आणि ती स्पेनशीं व्यापार करते असा तिच्यावर असलेला आरोप खोटा असल्याचें सांगितलें. नंतर त्यानें मठांतील मुलींशीं बोलण्याची इच्छा दर्शवल्यावरून त्याला त्यांची मुलाखत करवली, तेव्हां तो म्हणाला, 'मजकडून जी काय मदत तुम्हाला होण्यासारखी असेल ती करण्यास मी तयार आहे. तुम्ही माझ्याकरतां ईश्वराजवळ प्रार्थना करा.'

यानंतर 'मॅदॅम' (लुईच्या भावाची जर्मन बायको) तिला भेटायला आली. अर्थात् ही भेट केवळ औपचारिक होती आणि तिच्या मनांतला

वैरभाव बिलकुल कमी झाला नव्हता. त्याचप्रमाणें राजघराण्यांतील इतर माणसेंही तिला भेटून गेलीं.

यानंतर ती पूर्ण एकांतांत राहिली. कपड्यावरची जर तिने काढून टाकली, तलम कपडे देऊन टाकले, आणि पूर्वीच्या थाटमाटापैकी फक्त चांदीचें जेवणाचें साहित्य आणि तिचा स्वतःचा वापरण्याचा सोन्याचा चमचा आणि कांटा, इतकेंच शिल्लक ठेवलें. सर्व नोकरांना रजा देऊन फक्त दोन नौकरिणी आणि घराबाहेर कांही कामें असल्यास तें करण्याकरतां एक नोकर इतकेंच ठेवलें. गाडी विकून टाकली आणि आपल्या पगारांतून गरिबांना किती मदत करायची याची एक यादी तयार केली. मरणाची कोणाला कां भीति वाटावी, मेल्यावर सर्व दुःख संपतें, असा विचार मनांत येऊन तिने मरणाची तयारी केली. तिला ८० वर्षें पुरीं झालीं होतीं.

तिच्या मैत्रिणींनीं भेटण्याची इच्छा दर्शवल्यास ती कांहीतरी सबबी काढून त्यांना भेटण्याचें टाळूं लागली. व त्याही कांही युक्तिने तिची भेट घेण्याचा प्रयत्न करूं लागल्या. ही टाळाटाळी करण्यांत तिचा उद्देश असा होता की आजपर्यंत ती अर्धवट राणी आणि अर्धवट मठाधिकारी अशी होती, त्याऐवजीं आतां पूर्णपणें सँ-सीरकडेच लक्ष देण्याचा तिचा बेत होता.

ती कोणाला भेटली नाही तरी पत्रें मात्र लिहीत असे. तिचें राजाशीं लग्न शेवटपर्यंत गुप्तच राहिल्याने तिला उघडपणें विधवा राणीचा दर्जाही मिळणें शक्य नव्हतें, आणि हें तिच्या एकांतवासाचें आणखी एक कारण होतें. आपलें दुःख आपल्याशींच ठेवावें, त्याची वाच्यता होऊं नये, अशी तिची इच्छा होती. सँ-सीर मधील मुलींनीं तिचीं संभाषणें देखील इत्थंभूत लिहून ठेवलेलीं आहेत, इतकें तिचें महत्त्व त्यांना वाटत असे. तीं तिला दाखवून तिच्याकडून दुरुस्तही करून घेतलेलीं आहेत. राजाने तिला लिहिलेलीं पत्रें तिने एकदां जाळून टाकलीं, यामुळे राजाची तिच्याशीं कशी वागणूक होती त्याला कांही पुरावा राहिला नाही. तसेंच तिने प्रँसेस युरसँला स्पेनमधें पाठवलेलीं पत्रेंही जाळून टाकण्याची तिने तिला विनंति केली, कारण त्यांना राजकारणाचा वास आला असता. तिने पत्रें जाळलीं त्याचा अर्थ कित्येकांनीं असा केला आहे की

तिचा ज्यांच्याशीं अनैतिक संबंध होता त्यांचीं पत्रें तिने जाळलीं परंतु याला कोणताही पुरावा नाही. राजाशीं झालेलें लग्न खाजगी रहावें, जाहीर होऊं नये हाच, तिचा पत्रें जाळण्यांत उद्देश होता.

अशा रीतीने तीन वर्षें निघून गेलीं. बऱ्या लोकांशीं तिची शेवटची भेट म्हणजे जेव्हां रशियाचा झार 'कौंत द्यु नॉर' हें नांव धारण करून प्रवास करीत होता, तेव्हां तिला भेटायला आला होता तो प्रसंग. तिने त्याची हकीकत अशी लिहिली आहे की, "तो आला तेव्हां मी बिछान्यावरच होतें. त्याने विचारलें, 'आपण आजारी आहांत काय?' तेव्हां मी म्हणालें 'होय' 'काय आजार आहे' असें विचारतां मी सांगितलें वय बरेंच झालें आहे, आणि मूळची प्रकृतिही फारशी चांगली नाही" यानंतर तो फारसा थांबला नाही. परंतु तिचें दर्शन व्हावें म्हणून त्यानें बिछान्याचें पडदे बाजूला करायला सांगितलें व तिला पाहिल्यावर तो निघून गेला. एकमेकांच्या भाषा येत नसल्यामुळें एका दुभाष्याला आणावा लागला होता, यामुळें संभाषण फारच थोडें झालें, परंतु तिची किर्ति ऐकल्यावरून तिला पहायलाच तो आला होता.

ती आणखी दोन वर्षें जगली. या अवधींत तिची एकांताची आवड वाढतच गेली. कोणी भेटायला आलें तर त्याने जेवायला राहूं नये, म्हणून आपला स्वयंपाकी चांगला नाही असें ती सांगे. द्युक द्यु मेन मात्र तिला नियमाने भेटायला येत असे. त्याचा छळ होत होता कारण लुईची त्याच्यावर मर्जी असे व हें सर्वांच्या डोळ्यांत सलत असे. शेवटीं त्याच्यावर तुरुंगांत राहण्याचा प्रसंग आला, तेव्हां तर आतां जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं असेंच मँतनॉंला वाटूं लागलें.

ही बातमी तिला १७ दिसेंबर १७१८ रोजीं कळली. ती लगेच एक तासभर प्रार्थनेला बसली. त्याच रात्रीं तिला ताप आला व ती खोकूं लागली. आपण आतां मरणार हें तिला कळून चुकलें. तथापि तो हिंवाळा तिने काढला. तिने मृत्युपत्र केलें, पण कोणाला ठेवण्यासारखें तिच्याजवळ फारसें कांहीं नव्हतेंच. तिला वाटलें आपल्या मृत्युपत्राला लोक हंसतील. कोणाला तीन हजार, कोणाला एक हजार, हें काय राणीचें मृत्युपत्र झालें? शेवटीं एप्रील १६ तारखेला ती झोंपेंतच मेली.

ती मेल्यावर मात्र तिची शत्रु ‘मॅदॅम’ [लुईच्या भावाची जर्मन बायको] हिने तिच्यावर पुरा सूड घेतला. तिने तिच्यावर अनेक प्रकारचे खोटे आरोप केले. लूव्हवा तिचा शत्रू असल्यामुळें तिने त्याला विष घातलें होते, तिची चैन व्हावी म्हणून फॅगॉने पहिल्या राणीला विष घातलें होतें, तिने अतोनात पैसा केला होता, त्यांतला बराच लपवून ठेवलेला असल्यामुळें तो कोणालाच मिळाला नाहीं, वगैरे वगैरे. अशी तिची नालस्ती जर्मनींत पाठवलेल्या पत्रांत तिने केल्यामुळें मॅंतनॉला अत्यंत दुष्ट समजणारे कांही लोक अजूनही आहेत, आणि सॅं-सीर येथें तिला ईश्वरी अवतार समजून तिची पूजा करणारे लोकही होते.

बाहेरच्या जगांत तिच्याच हट्टामुळें तिला लोक अजिबात विसरले होते, इतके की तिच्या मरणानंतर तीसच वर्षांनी ‘ला बोमेल’ याने तिचें चरित्र लिहिण्याकरतां माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला, पण कोणांला विचारावें हेंच समजेना. एकदां रॅसीन कवीच्या मुलाने बापाचे कांही कागदपत्र विकले त्यावरून तिच्यासंबंधींची कांहीं माहिती मिळाली. नंतर सॅं-सीर येथें चौकशी केली तेव्हां तेथेही पुरेशी माहिती मिळाली नाही. तेव्हां तोंडच्या गप्पावरून चरित्र लिहावें लागलें.

फ्रान्समध्यें जेव्हां पहिली क्रांति झाली, तेव्हां लोकांना तिची खरी माहिती नव्हती. १७९४ सालीं जानेवारींत कांहीं मजुरांनी तिचे प्रेत उकरून काढून फेकून दिले, परंतु तिच्या कांहीं चाहत्यांनी ते आपल्या ताब्यांत घेऊन त्यावर समाधि बांधली. परंतु कांही सुधारकांनी पुनः एकदां ते फेकून दिले, कारण तिने प्रॉटेस्टंट लोकांचा छळ केला अशी त्यांची कल्पना होती, पण पुन्हां एकदां सॅं-सीर येथे एका सेनापतीच्या खटपटीने तिचे प्रेत मूळच्या जागयावर पुरले आणि ते तेथेच राहिले.

व्हॉलतेर या प्रख्यात लेखकाने जेव्हां संशोधन करून तिचें खरें चरित्र ‘चौदाव्या लुईचें शतक’ या ग्रंथांत लिहिलें, तेव्हां तिच्यासंबंधीच्या खोट्या समजुतींना मूठमाती मिळाली. तरीपण अजूनही एखाद्या सामान्य माणसाला मॅदॅम द मॅंतनॉसंबंधी विचारल्यास तो स्मित केल्याशिवाय रहात नाही. ती

लुईची रखेली होती अशी पुष्कळांची समजूत असते. विवाह गुप्त ठेवल्याचा हा परिणाम आहे.

पण एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे. कोणालाही दोन खरे शब्द सांगायला ती कचरत नसे. राजालाही उपदेश करायला तिने कमी केलें नाही. राजाची वागणूक तिला पसंत नव्हती आणि ती सुधारण्याकरतां तिने आपली शिकस्त केली पण तरीही त्याचीं अनौरस मुलें तिने वाढवलीं. ती सेवेला नेहमी तत्पर असे, पण आपलीं धार्मिक व नैतिक मतें तिने कधीही लपवून ठेवलीं नाहीत. राजेलोकांच्या आसपास इतकें धैर्य दाखविणारीं माणसें फारच थोडीं असतात, आणि म्हणूनच लुईच्या मनांत तिच्याविषयी इतका आदर उत्पन्न झाला होता. ती जरी धार्मिक होती, तरी देखील ती आपल्या परीने सुधारक होती आणि तिने सुधारणा अंमलांत आणण्याचा कसून प्रयत्न केला. पण धर्माच्या बंधनामुळेच तिला त्यांत पूर्ण यश मिळाले नाही. पण प्रयत्नापेक्षां कोण काय जास्त करूं शकतो ?

६०२२

REFBK-0006722

## : आमची प्रकाशनें

**झुलता मनोरा**
: लेखक :
भा. वि. वरेरकर
मूल्य ३ रु.

**वैष्णव**
: लेखक :
वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज)
मूल्य ३ रु.

**मी तुझीच आहे**
: लेखक :
वासुदेव पोवळ
मूल्य २॥ रु.

## : आगामी प्रकाशनें :

**मुमताज**
लेखक : डॉ. अ. वा. वर्टी

**रस्ता आमचा आहे**
: लेखक :
वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज)

**सीमा**
लेखक : माधव मनोहर

**मवाली**
लेखक : रॉय किणीकर

**श्रीकांताचे घर**
: लेखक :
वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज)

**नेत्रपल्लवी**
लेखक : रमाकान्त

**एका माळेचे मणी**
लेखक : दत्तु बांदेकर

**गौळण**
लेखक : कृ. ब. निकुम्ब

शिवाय
पु. ल. देशपांडे, दि. बा. मोकाशी
आणि पुरुषोत्तम भास्कर भावे
यांच्या
बहारदार लघुकथांचे संग्रह

**धरित्री प्रकाशन मुंबई नं. ४.**